म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क्र. ५६४

REFBK-0020412
REFBK-0020412

# माझा युरोप-अमेरिकेचा प्रवास

REFBK-0020412

: लेखक :

द्वा. ग. गुप्ते

किंमत ३ रुपये

प्रकाशक :
श्री. रा. ग. गुप्ते
८३, दुधीआ तलाव
नवसारी ( जि. सुरत )

★

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

★

मुद्रक ;
य. व्ही. कामत
चंद्रकांत आर्ट प्रिंटिंग प्रेस
हुसेनी हाऊस,
जेरबाई वाडीया रोड,
परळ, मुंबई.

## अर्पण—

माझी पत्नी सौ. मालती व मुलें चि. आशा, कुन्दा, निलीमा व अजीत ज्यांच्या प्रोत्साहन व संमति मुळेंच मला प्रवास करणें शक्य झालें, त्यांस सप्रेम अर्पण.

★

## स्मरणांजलि,

मी निघालो त्या वेळेस ज्यांचे आशिर्वाद घेणे शक्य झाले नाही असे माझे परमपुज्य वडील **कै. ति. दादांना.**

# क्षमा

लेखकांना पुस्तकाची कीतीही पाने लिहील्यानंतर "लेखकाचे दोन शब्द" लिहावयाचे बाकीच राहतात. मला मात्र क्षमा मागायची आहे. कारणें पुष्कळ आहेत.

गुजराथेत जन्म झाल्यामुळें, कॉलेजपर्यंतचे शिक्षण गुजराथ मध्ये होऊन, व्यवसायाचे शिक्षणाकरितां व व्यवसायासाठीं बिहार-बंगालमध्यें राहणे प्राप्त झाले, त्यामुळें महाराष्ट्राशी व मराठीशी संबंध तुटल्यासारखा झाला. असे असून सुद्धा मी मराठीत पुस्तक लिहायचे धाडस करावे, हे खरेंच क्षमा मागण्यासारखे आहे. माझ्या ह्या लिखाणांमुळें मराठी माउलीचा न कळत अनादार झाला असेल, तरी मराठी माउलींनी व तीच्या अनेक सुपुत्रांनी खंबीरपणे मला क्षमाच करावी.

माझा प्रवास ४ नव्हेंबर १९५६ ला संपला व पुस्तक लिहीण्याचे काम एक वर्षानें "आरंभे शुरा" ह्या न्यायाने सुरु करून नंतर अगदीं हलतडुलत चालू ठेवले. त्यामुळें स्मृति-विभ्रमानीं कांहीं स्थळांची किंवा प्रसंगाची वर्णने करण्यात चूक झाली असेल. जाणकारानी चूक माझ्या लक्षात आणून दिल्यास पुस्तकाचे मुद्रण करण्याचा पुन्हा प्रसंग आल्यास मी चूका सुधारून घेण्याचा नक्की प्रयत्न करीन. त्याचप्रमाणे मी माझी मते पण निरानिराळ्या विषयांवर दिली आहेत. वेळेस कित्येकांना ती पटणार नाहित पण सुज्ञांनी समंजसपणान सावरून घ्यावे अशी विनंती.

मी माझा प्रवास माझ्या व्यवसायाचे ज्ञान वाढविण्याच्या दृष्टिने केला होता. त्यामुळें कोळशाच्या खाणींची वर्णने, खाणींत वापरली जाणारी यंत्र सामुग्री व ती उत्पादन करणाऱ्या कारखान्यांची वर्णने करणे अगदीं अपरिहार्य झाले. त्यामुळें प्रवासवर्णन ह्या दृष्टिनेच वाचणाऱ्या साहित्य रसिकांचा वेळेस थोडासा विरस होईल. पण त्यातल्या त्यात ह्या व्यवसायाकडे कांहीं महाराष्ट्रीय युवकांचे लक्ष वेधले गेले तर मात्र मराठी साहित्याला लागलेले हे कोळश्याचे डाग धुतले गेल्यासारखे वाटतील.

माझ्या प्रवासा दरम्यान माझ्या बऱ्याच चांगल्या व्यक्तींशी ओळखी झाल्या (संबंध प्रवासात मला चांगलीच लोक भेटली, कोणच्याहि खल पुरुषाशी-इमीग्रेशन ऑफीसर ते कस्टमच्या अधिकाऱ्यांना धरून-माझा केव्हांही संबंध आला नाही) त्यांचा नाव निर्देश करणे पुष्कळ ठिकाणी अगदीं आवश्यक होते. तसे करतांना त्यांची कोणाचीही संमती घेणे शक्य झाले नाही, तरी चुक झाली असल्यास जीतक्या मायाळुपणानी ही सर्व लोक माझ्या प्रवासा दरम्यान माझ्याशी वागलीत तितक्याच मोठेपणानी त्यांच्या संमति शिवाय त्यांच्या नावाचा निर्देश केल्याबद्दल मला क्षमा करतील ही नम्र विनंती.

**द्वा. ग. गुप्ते.**

प्रकरण १

# पूर्वतयारी

मला परदेशांत जाण्याची इच्छा अगदीं लहानपणापासूनच होती. लहानपणापासून म्हणजे वयाच्या १२ व्या वर्षापासून होती, असें म्हटल्यास हरकत नाहीं. त्या सुमारास मी न्युयॉर्कचें वर्णन एका गुजराथी मासिकांतून वाचलें होतें. तें वर्णन श्री. पटेल. ( मुंबईचे इंडस्ट्रिअल केमिस्ट )–आमच्या शाळेच्या हेडमास्तरांचे चिरंजीव–ह्यांनीं केलें होतें. तें वर्णन वाचून माझें मन फारच वेधलें गेलें होतें. त्यानंतर मला 'युरोप–अमेरिकेबद्दल–विशेषतः अमेरिकेबद्दल कोणतेंही प्रवास वर्णनाचें पुस्तक किंवा लेख वाचायला मिळाल्यास मी तो मोठ्या उत्सुकतेनें वाचत असे व शक्यतो लवकर संपवित असे.

हा खेळ पुष्कळ वर्षें चालला होता आणि माझी जिज्ञासा वाढतच होती. ह्या देशांत कसें जावें ह्याच्याकडे माझें सारखें लक्ष लागले होते, व तेथें जाण्यासाठीं निरनिराळे प्रयत्न सारखे चालूच होतें. परन्तु कांहीं ना कांहीं अडचणीमुळें माझें प्रयत्न फलश्रुत होत नव्हतें.

१९३७ मध्यें School of Mines मधून पास झाल्यानंतर मी Colliery Manager या परिक्षेच्या रहाट गाडग्यांत पडलो आणि त्यानंतर १९४१ मध्यें तर महायुद्धालाच सुरवात झाली. झालें ! माझें जाणें आणखी लांबणीवर पडलें ! त्यानंतर १९४५ मध्यें युद्ध संपल्यावर मी पुन्हां जाण्यासाठीं प्रयत्न करण्यास सुरवात केली. परन्तु कोठें ना कोठें 'खो'च मिळत गेला. १९५५ मध्यें भारत सरकारच्या Coal-Commissioner–च्या ऑफीस मधून कोलंबो–Plan–साठीं किती माणसें कोळशाच्या व्यवसायाला पाठवायचीं आहेत अशी पृच्छा एका साधारण पत्रकाद्वारें ( Circular ) कोळशाच्या धंद्याच्या निरनिराळ्या संस्थांना करण्यांत आली होती. ह्यापैकीं ज्यांनी कोणती माणसें पाठवायची त्यांचीं नांवें कळविली होती. त्या उमेदवारांना Colombo plan साठीं मुलाखती करता बोलविण्यांत आलें. जेव्हां ते उमेदवार कलकत्त्यास गेलें तेव्हां त्यांना असे सांगण्यांत आलें कीं, ही मुलाखत Colombo-plan करिता नसून अमेरिकेस जाण्यासाठीं "4 Plan" साठीं आहे. त्याप्रमाणें त्यांच्या मुलाखतीपत्रांत सुधारणा करण्यांत आलीं. थोडक्यांत सांगायचें म्हणजे ह्या साधारण पत्रकाला ज्यांनी चुकीचें उत्तर दिलें त्यांना फायद्याची संधि मिळाली. कारण त्या पत्रकांत किती माणसें पाठवायची ही पृच्छा केली होती परन्तु नांवें मात्र मागविली नव्हती. Coal-Commissioner च्या ऑफीसचा हा घोटाळा जेव्हां माझ्या लक्षांत आला तेव्हां मी त्यांच्या ह्या चुकीबद्दल त्यांना एक झणझणीत पत्र लिहिलें आणि त्यांनी चुकीची दुरुस्ती करावी असें आग्रहानें सांगितलें. ह्या पत्राची नक्कल हिं.

सरकारच्या उत्पादन कचेरीत पाठविली. तसेंच त्या घोडचुकीचें निदर्शन स्थानिक नियतकालीकांतून केलें आणि संपादकीय कलमेंतून ह्या घोडचुकीबद्दल चांगलीच टीका व्हावी याची व्यवस्था केली. चूक करणारे मुख्य अधिकारी जे Indian Mine Managers' Association चें अध्यक्ष होते त्यांनाही त्यांच्या चुकीबद्दल व ती दुरुस्त करण्याबद्दल Indian Mine Managers' Association च्या सर्वसाधारण सभेंत त्याबद्दल पृच्छा केली तेव्हां त्यांना बोलायला कांहींच उरलें नसल्यामुळें अध्यक्ष महाराज चांगलेच गोंधळले व मला असे कांहीं प्रश्न विचारणार असाल तर मी सभेचे अध्यक्षपद स्विकारणार नाहीं असे चिडून सांगूं लागले. ह्या वेळेस सभेंत थोडा गोंधळ झाला. माझ्या ह्या पृच्छेनें लोकांच्यांत चांगलीच उत्सुकता निर्माण झाली होती तरीसुद्धां सरकारच्या मोठ्या अधिकाऱ्यांची नापसंती नको म्हणून बऱ्याच सभासदांनीं मी कांहीं एक पृच्छा करूं नये अशी मला विनंती केली. सभेच्या बहुतेक लोकांना स्वतःच्या हिताबद्दल असलेली अनास्था पाहून मी शेवटीं ह्या प्रश्नाची छाननी करण्याचें सोडून दिलें.

माझ्या ह्या विक्रमामुळें मला हळूं हळूं असेच वाटूं लागलें कीं आतां आपण हिंदुस्थान सरकारच्या कोणत्याहि योजनेकरितां प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं कारण मी त्यांचें चांगलेंच वैमनस्य संपादलें होतें; मी आतां ठरवलें होतें कीं जें कांहीं करायचें तें आपणच आपल्या पडाडीनें करायचें.

मी माझ्या परदेशी जाण्याबद्दलच्या बेताबद्दल कंपनीला कळवून मला जाण्याकरितां मदत करावी असें सुचविलें. मला माझ्या कंपनीच्या Managing Director नें प्रथम होकार देऊन सहा महिन्याची पगारी सुटी व एकतर्फी जाण्याचा खर्च देण्याचें कबूल केलें. तसेंच माझा Passage वगैरेचा बंदोबस्तहि ते करतील असें आश्वासन दिलें. त्याप्रमाणें त्यांच्या आश्वासनावर मी माझ्या Passage ची वाट पहात बसलों. परन्तु शेवटीं थोडें दिवसांनीं त्यांनीं माझें परदेशांत जाण्याचें एक वर्ष आणखी लांबणीवर टाकावें असें सांगितल्यामुळें मला तसें करणें भाग पडलें. पुढें एक वर्षानंतर मी त्यांना त्यांच्या वचनाचें स्मरण करून दिलें तेव्हां त्यांनीं मला असें सांगितलें कीं ह्या वर्षी रजा देणें शक्यच नाहीं व पुढील वर्षाचेहि नक्की सांगतां येत नाहीं. त्यामुळें त्यांच्या आश्वासनावर अवलंबून रहाणें म्हणजे निव्वळ मूर्खपणा आहे असें मानून मी स्वतःच्याच हिंमतीवर जाण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें मी कंपनीला कळवलें कीं मला जाऊं न दिल्यास मी नोकरीचा राजीनामा देईन. असें इतकें झाल्यानंतर शेवटीं हो ना करतां त्यांनीं मला स्वखर्चानें जाण्याची परवानगी दिली. नंतर मी माझ्या जाण्याचा बेत १९५६ मधें नक्की केला. मला जाण्यासाठीं १॥ महिन्याची सुटी मिळायची तेवढीच मिळाली शिवाय जहाजानें जाण्यासाठीं Passage मिळत नसल्यानें मला विमानानें जाणें भाग पडलें. त्यामुळें मी Air India-International च्या विमानाचें ता. १५ मे-चें तिकिट काढलें.

●

# मी जाण्यास निघतो

माझें विमानाचें तिकिट व इतर गोष्टींची व्यवस्था मी हरिसिंग आणि कंपनीच्या मार्फत केली होती. मी त्यांना विमानाच्या तिकिटाचे माडें आणि ५०० पौंडाचें Traveller's cheque याकरितां सर्व मिळून अंदाजें ८००० रु. दिलें होतें. माझी रजा १ मे पासून सुरू होत असल्यामुळें व मला माझ्या नातेवाईकांना भेटायचें असल्यामुळें मी अशी व्यवस्था केली कीं माझें तिकिट व Traveller's cheques मला मुंबईच्या ऑफीसमध्यें मिळतील. व ते मला १५ ता. पूर्वी मिळतील असे आश्वासन मिळालें होतें. मी धनबाद स्टेट बँकेवरचा क्रॉस चेक ह्या Travel-Agents ना दिला होता. हा चेक १५ ता. पूर्वी वटून येईल अशी खात्री त्यांनी मला दिली होती. मी ता. ३ ला धनबाद सोडून ता. ५ ला मुंबईस आलों. नंतर ४–५ दिवसांनी हरिसिंगच्या मुंबईतील office मध्यें घिरट्या घालण्यास सुरुवात केली. हे office म्हणजे fort (फोर्ट) विभागांतील एका office मध्यें घातलेली Partition ची खोली होतीं. तेथें त्यांचा रामन् नांवाचा मद्रासी गृहस्थ बसायचा. रोज तपास करूनहि माझ्या तिकिटाबद्दल कांहींच माहिती येत नसल्यामुळें मी अगदीं फारच अधीर झालों होतों. १५ ता. चे दोन दिवस आधीसुद्धा मला कांहींच माहीती न मिळाल्यामुळें मी रामन् वर अगदीं संतापलों होतों. हा मनुष्य मला प्रत्येकवेळीं निरनिराळीं आश्वासनें देऊन निराश करत असे आणि शेवटी मला असें कळलें कीं हा मनुष्य मला Express तार करतो वगैरे ज्या निरनिराळ्या सबबी सांगत होता–त्यापैकीं त्यानें कांहींहि केलेलें नव्हतें. शेवटी त्यानें मला एथपर्यंत सांगितलें कीं, जरी कलकत्ता office मधून कांहींच खबर आली नसली तरी तुम्हीं घाबरू नका, मी तुम्हांला १५ ता. विमानांत बसविण्याची हमी घेतो व त्या दिवशी तुम्ही मुंबई सोडाल अशी व्यवस्था करतो. येवढ्या आश्वासनावर मी जरा धीर धरला.

१५ ता. ला. मला हरिसिंग आणि कंपनीची कलकत्त्याहून तार आली कीं त्यांनी माझ्याकरितां ठेवलेलें बुकिंग परत माघारी घेतलें होतें. त्यानंतर मी रामन् ला भेटायला गेलों परन्तु तो दुपारपासूनच बेपत्ता होता. आणि त्याच्या ऑफीसलाहि कुलूप असल्यामुळें मी फारच हताश झालों. मला काय करावें तें सुचेनासें झालें. इकडे माझ्या नातेवाईक मंडळींना असें वाटूं लागलें कीं मी मुर्खासारखा पैशाचा चेक एका अनोळखी कंपनीच्या माणसाजवळ दिला आणि फसलो आहे. परन्तु मला स्वतःला पूर्ण खात्री होती कीं मी माझ्या नातेवाईकांना जितका मूर्ख वाटत होतों तेवढा नव्हतों. हरिसिंग आणि कंपनीच्या

कलकत्याला चांगल्या दोन मोठ्या कचेऱ्या होत्या व ती कंपनी B. I. S. M. कंपनीची Sole-Agent होती. जाण्याचा तो दिवस दवडूं नये म्हणून आणि तिकिट रद्द होऊं नये म्हणून दुसरे पैसे भरण्याचा विचार केला. तसेंच तेथें खर्चाकरितां इथून थोडा Sterling चा बंदोबस्त करावा असें मनांत योजिलें परन्तु जर माझें बाकीचें Sterling चे Traveller's cheques मिळालें नाहीं तर माझी चांगलीच अडचण होईल हा मनांत विचार येतांच जोपर्यंत चेकचा उलगडा होत नाहीं तोपर्यन्त न गेलेलें बरें असें ठरवलें. नंतर दुपारीं माझ्या चेकची काय भानगड आहे याच्या चौकशीकरितां धनबाद State-Bank च्या Agent ला Urgent-Trunk-Call केला. नंतर मला कळलें कीं माझा चेक ५ ता. लाच धनबादहून पास झाला होता परन्तु आतां तो त्यांच्या हातांत नव्हता. मला Trunk-Call करितां विनाकारण १२ रु. बिल भरावें लागलें. मी लगेच हरिसिंग आणि कंपनीला Express-Telegram करून, माझा चेक धनबाद State-Bank-Agent नें ५ ता. ला Clear झाल्याचें कळवलें पण अजून तो का वटवला गेला नाहीं ह्याबाबत खुलासा करण्यासाठीं हरिसिंग कंपनीच्या माणसाशीं प्रत्यक्ष टेलिफोनवर बोलावे असा विचार करून सकाळीं ९ लाच Trunk-Call केला. परन्तु ऑफिसांत कोणीच न आल्यामुळें माझा टेलिफोन तेथील चपराशानें घेतला व त्यामुळें माझा १२ रु. चा खर्च फुकट गेला.

आतां मात्र मी पूर्ण निराश झालों. मला भेटायला आलेल्या सर्व नातेवाईकांना निराश होऊन परत जावें लागलें. नंतर ता. १७ ला मी परत हरिसिंग आणि कंपनीच्या ऑफिसमध्यें गेलों त्यावेळेस रामन् गृहस्थानें मला सांगितलें कीं त्या दिवशीं तिकिटाचें Booking झाल्याची तार आली असुन माझें Traveller's cheques सुद्धां अमेरिकन Express च्या ऑफिसमधून मिळतील हें कळल्यानंतर मला अतिशय आनंद झाला व हरिसिंग कंपनीकडून जर बुकिंगचा बंदोबस्त झाला नाहीं तर दुसऱ्या कंपनीकडून थोड्या दिवसांच्या credit वर मी तो करून घेतल्यामुळें व रामन्नें माझ्या तिकिटाचा बंदोबस्त केल्यामुळें मला त्या दिवशीं जाण्यासाठीं कांहीं त्रास झाला नाहीं. मी आतां नक्की जाणार ह्याबद्दल मला खात्री वाटूं लागली. नंतर पुन्हां Traveller's cheques बद्दल तपास करण्यासाठीं मी हरिसिंग आणि कंपनीला Trunk-call केला कारण अमेरिकन Express-company ला चेकबद्दल कांहींच माहिती नव्हती. हरिसिंग आणि कंपनीनें अमेरिकन Express कंपनीला तार केल्याचें मला सांगितल्यामुळें मी त्या कंपनींत ३-४ वेळां चकरा मारल्या परन्तु अद्याप तेथें त्यांना तार मिळालेली नव्हती. शेवटीं ऑफिस बंद व्हायच्या वेळेस त्यांना तार आली व ऑफिस बंद झाल्यानंतर त्यांनीं मला ५०० शें पौंडाचें Traveller's Cheques

दिले. हे सर्व घेऊन मी अतिशय घाईनें घरीं आलों परन्तु घरीं कोणीच नसून कांहीं मंडळी लग्नाच्या निमित्तानें निघून गेलेली होती. मी आजच्याच विमानानें रात्रीं १२ ला जाणार म्हणून सर्व नातेवाईकांना भराभर निरोप कळवले. नंतर घाईघाईनें माझें सामान Air Travel च्या पेटींत भरलें. रात्रीं १० वाजेपर्यन्त माझी जायची सर्व तयारी झाली. नंतर आम्हीं टॅक्सी करून सान्ताक्रूझ विमानतळावर जायला निघालों. तेथें Customs चे फॉर्म भरून पेटी वजन करण्यासाठीं दिली. विमानतळावर कांहीं फोटोग्राफरहि हजर होते. त्यांनी सुचवल्यावरून आम्हीं एक ग्रुप फोटो काढून घेतला. ह्या वेळेस विमान तळावर बरेच नातेवाईक जमले होते .

तथें थोड्या वेळानंतर मला Custom च्या खोलींत बोलावण्यांत आलें व मी काय सामान घेतलें आहे वगैरेची चौकशी करण्यांत आली. नंतर Emigration व Health ऑफिसरसनीं Pass Port वगैरे बघितले व माझी सोडवणूक लौकरच केली. सर्व उतारूंना एका निराळ्या Block मधें बसण्यास सांगितलें परन्तु आमचें विमान १ तास उशिरां निघायचें आहे हें आम्हांला नंतर कळलें. योग्य वेळीं आम्हांला विमानांत जाण्यासाठीं सांगण्यांत आलें. मी अगदीं ह्या वेळेस विचारांच्या लाटेंत पोहत असून खिडकींतून माझ्या स्वजनांकडे पहात बसलों होतों. थोड्या वेळानें पंखे सुरू होऊन विमानाच्या Exhaust Pipe मधून निळ्या ज्योति निघूं लागल्या व थोड्याच वेळांत विमान हळूं हळूं जमिनीवर चालूं लागलें. नंतर जेव्हां विमानानें जमिन सोडून वर वर उड्डाण केलें तेव्हां मला हायसें वाटलें.

●

## प्रकरण ३ रें

# " मी लंडनला पोंहचलो "

विमानांत माझी जागा पुढच्या रांगेंत खिडकीच्या बाजूला होती. परन्तु मला तर सारखें वाटूं लागलें कीं आपल्याला खिडकीजवळ बसायला मिळेल तर फार मजा होईल. माझ्या शेजारी एक पारशी तरुण वयाचे असे गृहस्थ बसले होते ते त्यांच्या मित्रांना भेटण्यासाठीं जिनिव्हाला चालले होते. मी उभा राहून खिडकींतून पहाण्याचा प्रयत्न करितच होतो. परन्तु खालीं काळाकुट्ट समुद्र आहे असेंच दिसत होतें. थोड्या वेळानें मी त्या पारशी गृहस्थाशीं ओळख करण्यास सुरुवात केली. त्या गृहस्थानें मला खुर्चीचा पट्टा कसा बांधावा, सोडावा किंवा ती खुर्ची झोंपण्यासाठीं कशी आरामशीर 'तिरपी करावी वगैरे समजाऊन सांगितलें. नंतर विमानांतील Air-Hostess आली व कांहीं जरूर पडल्यास घंटी वाजवून कसें बोलवावें व Seat वरचा दिवा कसा लावावा हे समजावून दिलें.

ह्या वेळेस विमानांतील सर्व दिवे विझलेलेच होतें फक्त आंत थोडा अंधुक प्रकाश होता. मी झोपण्याचा प्रयत्न केला परन्तु बाहेरील आवाजामुळें मला झोंप लागेना आणि त्यांतच बाहेरचें दृश्य बघण्याची मला वारंवार इच्छा होत होती परन्तु बाहेर रात्रीं फारसें दिसणें शक्य नव्हतें. रात्रीं ३ च्या सुमाराला आम्हाला खालीं मोठमोठ्या ज्वाला दिसल्या व विजेचे दिवे दिसले. त्या वेळेस आमचें विमान **आबादानच्या** तेलाचे शुद्धिकरण करणाऱ्या कारखान्यावरून जात असल्याचें सांगण्यांत आलें. थोड्या वेळानंतर आमचें विमान आणखी एका रिफायनरी वरून चाललें होतें. त्यानंतर मला थोडीशी डुलकी लागली होती परन्तु जागें होतांच पहांट झाल्याचें दिसलें व चांगलाच उजेड आला होता. नंतर मी जवळ असलेल्या Toilet-room मध्यें तोंड वगैरे धुवून बसलों थोड्याच वेळांत आमचा सकाळचा चहा केक्स् वगैरेसह आम्हांला कागदाच्या ट्रे-मधून देण्यांत आला. चहानंतर आम्हांला स्वीट्स् देण्यांत आल्या. थोड्या वेळानें विमानाचें बुलेटिन आमच्या हातांत देण्यांत आलें. त्याप्रमाणें " Good Morning from Capt Godrej " ह्या शीर्षकापासून, आम्ही त्याक्षणीं कुठें आहोंत किती उंचावर व इतर जगाच्या घडामोडी दर्शविणारें पत्रक आमच्या हातांत देण्यांत आलें. त्या वेळेस आम्ही १८००० फूट उंचीवर होतो व बाहेरील हवेंतील टेंपरेचर-१०° सेंटि. ग्रेड. होतें. मला पायलट बसतों तेथें जाऊन निरनिराळ्या यंत्रांची माहिती करून घ्यायची फार इच्छा होती त्यामुळें मी तसा निरोप कॅप्टन जवळ दिला व त्यानें फुरसतीप्रमाणें तुम्हांला

बोलावूं असेहि कळवलें होतें. त्यानंतर दुपारी १२ वाजतां मला त्यांनी आंत येण्यास सांगितलें व सर्व समजाऊन दिलें. आमचें विमान, वरती निरभ्र आकाश, सूर्य जवळ जवळ डोक्यावरतीं आणि खाली समुद्राच्या उसळणाऱ्या लाटा, कांहीं शुभ्र पांढरे ढग अशा दृश्यांतून अंदाजे ३०० मैल वेगानें संथपणें जात होतें.

नंतर पुन्हां आम्हांला कागदाच्या ट्रे-तून लंच देण्यांत आलें. कागदाच्या निरनिराळ्या बशांतून भात, सुप, भाजी, दुध वगैरे देण्यांत आलें होतें. शेवटी तिखटी सुपारीहि होती.

दुपारी २ च्या सुमारास 'बेरुटचें' विमानतळ लागलें. हे लिबिनॉनची राजधानी आहे व ही एक अरबस्थानांतील फ्रेंच वसाहत असून नुकतेंच तिला स्वातंत्र्य मिळालें होते. विमानतळावर अरब, फ्रेंच मिश्रित प्रजा दृष्टीस पडत होती परन्तु फ्रेंच भाषेचा उपयोग जास्ती होत होता असें दिसण्यांत आलें. आम्हांला तेथें उतरण्यास सांगण्यांत आलें. आम्हीं आतां अरबस्थानांत आलों होतो. येथें आम्हांला निराळेंच लोक दिसूं लागलें. प्रथम आम्हीं Emigration office मधें जाऊन Pass-Port दिलें व त्याबद्दल त्यांनी आम्हांला Emigrants temporary visa दिला. नंतर आम्ही रेस्टॉरंटमधें गेलों तेथें आमची जेवणाची व्यवस्था केली होती. 'टुरिस्ट क्लास व फर्स्टक्लास उतारूंची जेवणें निरनिराळी होती. एक तासानंतर आम्हांला परत विमानांत बसण्यास सांगितलें त्यावेळेस आम्हीं Emigration office मधून आमचें पासपोर्ट परत घेतलें. त्यावेळेस माझ्यापुढेंच एक अगदी साधी, मद्रासी तऱ्हेनें पातळ नेसलेली, नाकांत चमकी असलेली व पायांत चपला घातलेली अंदाजे ३० वर्षांची बाई होती. तिनें तिचा Swiss Pass-Port मागितला तेव्हां मी तिला आश्चर्यानें विचारलें कीं तुम्हीं Swiss पासपोर्ट कां मागतां त्यावर तिनें मला असे सांगितलें कीं माझें लग्न एका Swiss माणसाशी झालें असून मी आतां स्वित्झर्लंडची नागरिक आहें. नंतर आम्ही विमानांत येऊन बसलों. विमानतळावर पाश्चात्यपद्धतीची मोठमोठी घरें दिसत होतीं.

नंतर आमचें विमान ४ च्या सुमारास जिनिव्हाला पोंहचलें. तेथें आम्हीं बाहेर पडलों तर पाऊस पडत होता. आम्ही पावसांत भिजतच विमानतळावर उतरलों. इथें आमची चहाची व्यवस्था करण्यांत आली होती. चहाची पानें एका पारदर्शक कागदाच्या पुडींत ठेवलेली होती व ती कपांतल्या गरम पाण्यांत एका दोरीनें आंत सोडली होती. आपण आपल्या इच्छेनुसार चहाचा रंग बघून दोरीनें पुडी उचलून बाजूला ठेवायची. आमचा नास्ता वगैरे झाल्यानंतर आम्ही परत विमानांत बसलों. येथें विमानतळावरील एका दुकानांत स्वित्झर्लंडमधील अनेक वस्तु विक्रीस ठेविल्या होत्या.

नंतर आमचें विमान ६ च्या सुमारास पॅरिसच्या एरोड्रोमवर पोंहचलें. इथें आमची जेवणाची व्यवस्था करण्यांत आली होतीं. शाकाहारी लोकांसाठीं निराळी व्यवस्था होती. एकंदरीत जेवण चांगलें झालें. इथें विमानतळावर कांहीं महाराष्ट्रीयन लोकांची ओळख झाली. त्यापेकीं श्री. गुत्ते हे पण एक होते. हे गृहस्थ Air-India-Inter-National मध्यें काम करीत होते. ते त्यांच्या पत्नीसह युरोपच्या प्रवासाला निघाले होते. आम्ही विमानांत बसल्यानंतर विमान चालू होऊन थोडेसें अंतर गेलें तोंच कांहींतरी बिघाड असल्याचें पायलटच्या दृष्टीस आल्यामुळें विमान परत मागें आणलें व आम्हांला विमानतळावर जाण्यास सांगितलें. एक तासाभरांत दुरुस्ति होऊन आम्ही पुढें निघूं असें सांगण्यांत आलें. विमानतळावर आल्याबरोबर विमानतळाच्या Air-Hostess नें आमचा वेळ मजेंत जावा म्हणून लागेल ते मद्यपेय घेण्यास सांगितलें. सर्व प्रवासी मजेंत होतें व बारवरती एकच गर्दी उडाली होती. विमानतळावरच्या अन् विमानांतील Air-Hostess निरनिराळ्या असतात. दरेक कंपनी त्या त्या देशाच्या Air-Port वर वेगळ्या Air Hostess नेमत असते.

आतां आम्ही सर्व लोक येथें वेळ बराच असल्यामुळें एकमेकांशीं मिळून मिसळून वागत होतो व त्याचवेळेस आमच्या ओळखी झाल्या. त्यावेळेसच मला असं कळलं कीं मुंबईहून विमान सुटतांना उशिर होण्याचें कारण म्हणजे आमच्याबरोबर राजकुमारी अमृतकौर ह्यासुद्धां येणार होत्या. त्या जिनिव्हाला उतरून गेल्या.

आमच्या प्रवासांत आमच्या बरोबर एक पारशी कुटुंब होते. हे पारशी गृहस्थ हैदराबादचें डॉक्टर असून बायको व सासूला इंग्लंड दाखवावयास घेऊन चालले होते. ह्या गृहस्थांचें मेव्हणे म्हणजे इंडियन हायकमिशनरचें डेप्युटी हायकमिशनर श्री. गंडेव्हिया हे होय. ह्या गृहस्थांनीं मला “ वर्माउथ ” हे मद्य ध्यायला सुचविलें. त्याप्रमाणें मी घेऊन पाहिलें तो खरंच ते मला फारच आवडलें. नंतर मी फ्रेंच वाईन आणि शॉपेनहि घेतली परन्तु मला ती फारशी पसन्त पडली नाहीं.

आमच्या बरोबर एक गुजराथी बाईहि चालली होती. ह्या बाईचें लग्न एका गुजराथी डॉक्टरशीं झालें असून तो F. R. C. S. चा अभ्यास करीत होता. त्या बाईनें जुन्या पद्धतीचें दागिने घातले होते व तिच्या एकंदर चेहऱ्यावरून ती बंगाली असावी असा माझा ग्रह झाला होता. इथें मला कांहीं अमेरिकन सुद्धां भेटले. त्यांनीं मला अगदीं अनौपचारिकपणें मी कुठें जात आहे वगैरे चौकशी केली. आमचे विमान अद्यापहि दुरुस्त होण्याचें चिन्ह दिसेना तेव्हां आम्ही आमच्या Air Hostess ना सुचविलें कीं आमची व्यवस्था पॅरिसच्या कुठल्यातरी हॉटेलमध्यें करावी व पॅरिस दाखवण्याची व्यवस्था

Air Company नें करावी. त्याप्रमाणें Air Hostess नें कबूल केलें परन्तु Air Manager कबूल होईना. शेवटीं रात्रीं १२ वाजतां विमान तयार झालें व लंडन मार्गाला निघालें.

पॅरिसचा विमानतळ बराच मोठा असून तेथें निरनिराळ्या विमानांची सारखी ये जा चालू होती. कांहीं अमेरिकन लोकांना मी अमेरिकेसही येणार असे सांगितलें तेव्हां त्यांनीं लगेच आपली कार्डें वगैरे देऊन मला त्यांना भेटण्यास सुचविलें. ह्यावरून इतर लोकांशी अनौपचारिकपणानें त्यांची वागणूक कळते.

आमच विमान लंडनला रात्री २ ला पोंहचलें. त्यावेळेस सर्वत्र सामसूम होती. उतरल्याबरोबरच आम्हांला Custom च्या भानगडींतून जावें लागले परन्तु रात्रीची वेळ असल्यामुळें फारसा कोणी त्रास दिला नाहीं. नंतर Air Hostess नें ज्या लोकांचें निरोप त्यांच्या नातेवाईकांकडून आलें होते तें वाचून दाखवलें. नंतर आम्हांला Health Certificate देऊन आमची लौकरच सुटका झाली. ज्यांना हिंदी चलन बदलायचें होतें त्यांनीं बदलून घ्यावें असें सांगण्यांत आलें. मी माझ्या जवळच्या नोटा बदलून पौं. शि. पे. आणलें. हिं. सरकारकडून ८० रु. पर्यन्तच्या नोटा बाहेर घेऊन जाण्याची परवानगी होती.

नंतर आम्हांला सांगण्यांत आलें कीं ज्यांना विमान कंपनीच्या कोचनें जायचें असेल त्यांनीं कोचमध्यें बसावें. ज्या लोकांच्या ओळखीच्या लोकांनीं गाड्या आणल्या होत्या त्यांना सोडून आम्ही सर्वजण कोच् मधें बसलों. आमच्याकडून ५ शि. भाडें घेण्यांत आलें होतें. आम्हांला विमानतळापासून व्हिक्टोरिया स्टेशनपर्यन्त कोच होते. अंदाजे ३ चे सुमारास आमचा कोच् सुटला. मला लंडन बघण्याची तीव्र इच्छा असल्यामुळें मी सारखा बाहेर बघत होतो. माझ्या दृष्टीस प्रथम दोन मजल्यांची घरें पडली व निरनिराळे जाहिरातीचे बोर्ड दिसले. पुष्कळ ठिकाणीं रस्त्यांच्या दोन्ही बाजूस दिव्यांची एकसारखी उघडझांप होत होती. हे दिवे लोकांच्या सुरक्षिततेसाठीं मोटार चालवणाऱ्या लोकांना संकेत होता. आम्ही सुमारें २० मिनिटानंतर व्हिक्टोरिया स्टेशनवर आलों. आमची हॉटेलमध्यें व्यवस्था करण्यासाठीं तेथें B. D. S. E. च्या Air Terminus च्या अधिकाऱ्यांनीं प्रवासीजनांच्या गरजेप्रमाणें निरनिराळ्या हॉटेल्सना फोन करण्यास सुरुवात केली. माझ्यासाठीं कर्कलॅंडस् प्रायव्हेट हॉटेलमध्यें व्यवस्था केली व एक टॅक्सीहि रिझर्व्ह केली. माझे सामान घेऊन मी टॅक्सीतून त्या हॉटेलवर जाण्यास निघालों. मध्यरात्रीची वेळ असूनही मला जातांना भय वाटलें नाहीं. ह्या लोकांच्या प्रामाणिकपणाबद्दल मी बरेच ऐकलें होतें. मी हॉटेलपाशी आल्यानंतर तेथील घंटी वाजवली. थोड्याच वेळांत एक वयस्कर

माणूस तळघराच्या ( बेझमेंटच्या ) पायऱ्या वाजवत येऊन त्यानें दार उघडलें. नंतर टॅक्सीवाल्यानें माझी Suit-case आंत आणून दिली. मी त्याचें भाडें दिल्यावर तो मला म्हणूं लागला कीं मी तुम्हांला इतक्या रात्रीं आणलें तर त्याबद्दल मला कांहीं नको का ? तेव्हां मी ओळखलें किं ह्याला कांहींतरी बक्षीस हवें आहे. नंतर मी त्याच्या हातावर १-२ शिलींगाचें नाणें ठेवलें तेव्हां मात्र खूष होऊन गेला. नंतर हॉटेलमधील त्या माणसानें मला खोली वगैरे दाखवली. मी त्याला सकाळीं लौकर न उठवण्याबद्दल सांगितलें. खोली चांगली प्रशस्त असून फर्निश्ड होती.

मी सकाळीं ८ वाजतां उठलों. नंतर न्याहारी व चहासाठीं बेल दाबली. अगदीं English पद्धतीचा Break Fast होता. न्याहारींत पाव, रोटी, लोणी, मार्मलेड्, बेकन, दोन अंडी वगैरेचा समावेश होता.

नास्ता झाल्यानंतर मला लंडन पहाण्याची उत्सुकता असल्यामुळें मी थोडावेळ रस्त्यावर येऊन उभा राहिलों. मला ह्या वेळेस फारच गंमत वाटत होती. कारण इतक्या थोड्यावेळांत मी हिंदुस्थानांतून इथें इतक्या दूर आल्यामुळें त्याची जाणीव मात्र कांहींच होत नव्हती. नंतर माझी हॉटेलमधील एका हिंदी विद्यार्थ्याशी भेट झाली तेव्हां मला फारच आनंद वाटला. त्याला मी स्वस्त हॉटेल्स् वगैरेची माहिती विचारली तेव्हां त्यानें Indian-Students हॉस्टेलवर मला चौकशी करण्यास सांगितलें.

लंडनचें फोन आपल्या फोनपेक्षां निराळें असतात. Hotels सारख्या पब्लिक जागेंतून पैसे टाकून फोन करण्याची व्यवस्था आहे परन्तु फरक इतकाच कीं मुंबईसारख्या फोन असलेल्या ठिकाणी आपल्याला फोन लाग्ला नाहीं तरी पैसे फुकट जातात परन्तु येथे तस नसून जर फोन चुकून कधी लाग्ला नाहींतर एक विशिष्टप्रकारचें बटण दाबलें कीं आपलें पैसे परत मिळण्याचीं व्यवस्था केली असतें. तसेंच फोन नंबर हा फक्त आंकड्यावरती नसून A. B. C D. पासून Z पर्यन्त अक्षरें व आंकडे असतात. Exchange च्या नांवाची पहिली तीन अक्षरें लावायची व नंतर जो नंबर असेल तो Dial करायचा. समजा आपल्याला Trunk-call किंवा long-distance-call करायचा झाला तर किती पैसे टाकायचें ते विचारून टाकलें कीं लगेच आपल्याला नंबर मिळतो.

Indian students साठीं कांहीं Hostel आहेत कां असे मी टेलिफोन Directory चाळून पाहिली तेव्हां Indian student Y. M. C. A. अशी Fitiz-Roy-square ला संस्था आहे असे मला आढळलें तेव्हां मी लगेच फोन करून विचारलें परन्तु तेथून त्यांनी मला असे कळवलें कीं जागा आहे किंवा नाहीं हे

आम्हांला आतांच सांगता येणार नाहीं. आम्हीं तुम्हांला थोड्यावेळानें कळवूं. परन्तु बराच वेळ फोन न आल्यामुळें मी बाहेर जाण्याचें ठरविलें. मला त्याचवेळेस High commissioner च्या ऑफीसमधें कांहीं कामानिमित्त जाणें प्राप्त होतें. मी कपडे करून हायकमिशनरच्या जागेचा तपास करून बसमध्यें बसलों. जातांना चुकलो तर आपलें हॉटेलचे कार्ड बरोबर असावें म्हणून ठेवलें होतें.

मला जाता जातां लंडन बघण्याची फारच मौज वाटत होती. ह्यावेळेस सूर्यप्रकाश असून धुकें वगैरे कांहीं नव्हतें. सगळे लोक निरनिराळे रंगीत गरमकोट घालून फिरत होते. दुकानांतील निरनिराळे कपडे व वस्तु पहाण्याची मला फारच मौज वाटत होती. माझ्या शेजारी बसलेल्या एका वयस्क गृहस्थाला मला 'ओल्ड–वीच्' ठिकाण आलें म्हणजे सांगा असें मी सांगून ठेवलें होते. त्याप्रमाणें तें ठिकाण येतांच त्यानें मला उतरण्यास सांगितलें. तेथें मी उतरून हायकमिशनरचें ऑफीस शोधून काढलें. परन्तु शनिवार असल्यानें ऑफीस बंद आहे असें मला कळलें. तेथें जवळच दोन हिंदी विद्यार्थी उभे होते म्हणून मी त्यांच्याजवळ जाऊन ओळख करून घेतली. आजचा दिवस कसा घालवावा असें मी त्यांना विचारलें. तेव्हां त्यांनीं मश्र प्रख्यात .असलेले क्यूगार्डन्स पहाण्यास जा असें सुचविलें. नंतर मी त्यांना स्वस्त हॉटेलसबद्दल विचारलें, तेव्हां त्यांनी 'रसेल Square' मध्यें पुष्कळ हॉटेल्स असल्याचें सांगितलें. तेथें १३ ते १५ शिलिंगपर्यन्त दर आहेत असें सांगितल्यामुळें मी तिकडे जाण्याचा विचार केला. परन्तु ते विद्यार्थी म्हणाले कीं थोड्यासाठीं हॉटेल बदलूं नका. परन्तु तुम्ही रुपये आण्यांचें कोष्टक मात्र विसरून जा. त्या विद्यार्थ्यांचें ते म्हणणें मला मात्र पटत गेलें. मी त्यांचा निरोप घेऊन जवळच असलेल्या पोस्ट ऑफिसमधें मी लंडनला सुखरूप पोहचल्याची तार करून टाकली. नंतर तेथून बसनें थेट व्हिक्टो. स्टेशनवर आलो. येथें मला असें कळलें कीं लंडन दाखवणाऱ्या बसेस येथून सुटतात व २॥ शिलिंगांत आपल्याला लंडनचा बहुतेक भाग पहाण्यास मिळतो. त्याप्रमाणे त्याचा फायदा घ्यायचा ठरवला. परन्तु बसला थोडा अवकाश असल्यामुळें मी फिरत फिरत इकडे तिकडे वेळ काढला. त्याच वेळेस मला एका भिंतीवर लंडनचा नकाशा रोलरवरती कांचेच्या फ्रेममध्यें ठेवलेला दिसला. त्याच्याखालीं लंडनच्या निरनिराळ्या रस्त्यांच्या पद्धतशीर खानेवारीचा चार्ट दुसऱ्या Roller वरती होता. सबंध नकाशावर निरनिराळे चौक काढलेले होते व आडव्या बाजूंनीं A B. C अशी चौकांच्या कोपऱ्यावरती अक्षरे होतीं. तसें वरील बाजूस १, २, ३ असें नंबर असून आपल्याला जिथें जायचे असेल ती जागा रोलर फिरवून कोणत्या चोकांत बसतें ते शोधून काढावयाचे व नंतर मोठ्या नकाशांत त्याप्रमाणें पाहून काढायची. त्याचप्रमाणें आपण त्याच वेळेस कुठें आहोंत ते एका बाणानें दर्शविलेले

असते. त्यानंतर आपल्याला एकदां जायचें ठिकाण मिळाल्यानंतर तेथें कोणते मोठे मोठे रस्ते आहेत, कोणत्या बसेस त्या मार्गानें जातात, कोणती ट्युबची स्टेशनें आहेत वगैरे सर्व माहिती आपल्याला मिळतें. अशा तऱ्हेनें एखाद्या माणसाला एखाद्या ठिकाणी जाणें सोपें पडतें.

मी बसची वाट पहात असतांना बाजूच्या फुटपाथवर कांहीं अपंग लोकांनी निरनिराळी, रंगींत खडूंनीं चित्र काढलीं होती. ही चित्रें फारच सुंदर होती. त्या अपंग लोकांनीं एका बाजूला आपल्या टोप्या ठेवल्या होत्या व त्यांत सहृदयी माणसें त्यांच्या इच्छेनुसार पैसे टाकतांना दिसत होतें. थोड्याच वेळांत बस आल्यामुळें मी बसमधें चढलों. कांहीं वेळानें बस सुरूं होऊन ती लंडनच्या मुख्य मुख्य भागांतून जाऊं लागली. माहिती देण्यासाठीं बसमयें एक माहितगार माणूस असून तो माहिती सांगतांना विनोदहि करत होता. आमची बस बकिंगहॅम पॅलेस, हाईड पार्क, केंझिंग्टन गार्डन्स व जुनें लंडन त्याचप्रमाणें लंडन टॉवर, हाऊस ऑफ पार्लमेंट, डाऊनिंग स्ट्रीट वगैरे सर्व भागांतून आली नंतर २ तासानंतर बसचा दौरा संपवून ती पुन्हां पूर्वठिकाणी येऊन थांबली. ह्याच बसमध्यें माझ्या शेजारी एक बाई बसली होती तीसुद्धां मला मधून मधून सर्व माहिती समजाऊन देत होती.

बसमधून उतरल्यानंतर मी समोरच असलेल्या न्यूज थिएटरमधें काय आहे म्हणून पहाण्यास गेलों. तेथें एका शिलिंगाचें तिकिट होतें. आंत News Reels व इतर गंमतीदार व मनोरंजक चित्रें दाखवली जात होती. हा चित्रपट सतत चालू असून आपण केव्हांहि आंत जाऊं शकतो व बाहेरहि येऊं शकतो. मी थोड्या वेळानें थिएटराबाहेर पडलो व मुख्य रस्त्यानें इकडे तिकडे बघत चालण्यास सुरुवात केली. नंतर बरेंच चालल्यानंतर मी ट्राफलगार स्क्वेअर वगैरे भागांत पोंहचलों. तेथून बसमधें बसून मी हाईड पार्क पहाण्यास आलों. तेथें बँड चालू असून कांहींतरी कार्यक्रम चालू होते. तेथें बऱ्याच खुर्च्या ठेवल्या होत्या व बरेच लोकहि बसलेले होते. कांहींजण उभेहि होते. मी एका खुर्चीजवळ जाऊन बसतांच एक परिचारक माझ्याजवळ येऊन ६ पेन्स मागूं लागला. मी त्याला न बोलतां पैसे दिलें व तिकिट घेतलें. मी जर उभा राहिलों असतो अगर हिरवळीवर बसलों असतो तर फुकटांत मला तो कार्यक्रम पहाण्यास मिळाला असता.

मला त्या बँडमध्य विशेष रस न वाटल्यामुळें मी तेथून उठलों आणि तेथील Speakers Corner कडे गेलों. येथें पुष्कळ होतकरू वक्ते आपली भाषणें देत होते व आजूबाजूला थोड्या फार श्रोत्यांचा जमावहि दिसत होता. हे श्रोते एकाच वक्त्याचे भाषण न ऐकतां भुंग्याप्रमाणे निरनिराळ्या वक्त्यांचें रस श्रवण करतांना दिसत होते. ह्या वक्त्यांमध्यें Black Peoples league च्या आश्रयाखालीं कांहीं आफ्रिकेंतील

वक्ते बोलत होते. त्यांचें भाषण ऐकण्यास पुष्कळसे श्रोते जमले होते. हे वक्ते फारच तन्मयतेनें बोलणारे होते. त्यांचें उच्चार सोडले तर ते फारच सुंदर तऱ्हेनें इंग्लीश बोलत कारण त्यांचे बहुतेकांचे शिक्षण केंब्रिज व ऑक्सफर्डला झालेले होते. त्यांचा बोलण्याचा विषय हा होता कीं पांढऱ्या माणसांनीं आमच्या मुलखाची पुष्कळ नासाडी केली असून त्यांनीं आमचा मुलूख सोडला नाहीं तर आम्ही त्यांचा जास्तीत जास्त सूड घेतल्याशिवाय रहाणार नाहीं. त्याचप्रमाणें हिंदुस्थानाच्या घड्यावरून त्यांनीं लौकरच अक्कल घ्यावी. आमचा देश सोडला नाहींत तर तुमच्याचप्रमाणें आम्ही तुमच्या बायकांशीं लग्न लावून मिश्रप्रजा उत्पन्न करूं व ती तुमच्यावर सूड उगवील. ह्या सर्व भाषणाला तेथें उभे असलेल्या इंग्रज लोकांच्या खूप टाळ्या पडत होत्याच परंतु त्यापेक्षां इंग्रज स्त्रियांच्या "We Shall Marry You" म्हणून आरोळ्या देऊन टाळ्या पडत होत्या. हे भाषण संपल्यावर वक्ते व श्रोते ह्यांची प्रश्नोत्तरेही होत असतात. थोडक्यांत म्हणजे स्वतःच्या देशांत दुसऱ्या देशाच्या माणसाला वाटेल ते बोलण्यास स्वातंत्र्य असून त्याचे म्हणणें ऐकून घेण्यास लागणारी खिलाडू वृत्ति पाहून मला त्या लोकांचें कौतुकच वाटलें. हळूं हळूं काळोख पडूं लागला होता व मी घड्याळांत पाहतों तों रात्रीचे १० वाजण्यास आले होते. मला माझ्या घड्याळावर विश्वासच वाटेना. परन्तु उन्हाळ्यांत जास्त वेळ संधि प्रकाश असतो हे लक्षांत आल्यावर मी माझ्या हॉटेलकडे जाण्यास निघालों. लवकरच बस पकडून हॉटेल शोधून काढून मी हॉटेलांत पोंहचलों.

दुसरे दिवशीं सकाळीं माझा Break-Fast संपवून मी Indian Students Y. M. C. A. Hostel ला फोन केला तेव्हां तेथें मला १७ शि. ६ पेन्स मध्यें रहावयास खोली Break-fast व एकवेळचें जेवण मिळत असल्यानें मी तेथें जायचें ठरवलें व माझ्याकरिता एक खोली ठेवण्यास सांगितलें. माझ्या-जवळ वजनदार पेटी असल्यामुळें मी टॅक्सी करून फिटझरॉय स्वेअरला गेलो. टॅक्सीवाल्याला भाडे दिले परन्तु टिप न दिल्यामुळें तो माझ्यावर चांगलाच नाखूष झाला होता. मी सामान आंत घेतले व किल्लीचें डिपॉझीट व २ दिवसांचें भाडे देऊन माझ्या खोलीवर गेलों. मला त्या दिवशी लंडन पहायचें असल्यामुळें मी क्यूगार्डन-मधें जाण्याचें ठरविलें. कसें जायचें याची चौकशी केली तेव्हां ट्यूब रेल्वेनें जावें असे सुचवलें गेलें म्हणून मी जवळच्याच लॉरेन स्ट्रीट स्टेशनवर गेलों व न्यूगार्डनचें तिकिट काढून कोणत्या Plat-form वर जायचें, याची चौकशी केली. तेथें तिकिटांसाठीं Automatic Machines पण होती. त्यांत पैसे टाकलें कीं आपोआप तिकिट मिळते. Platform वर जाण्यासाठीं पुष्कळ आंत जावे लागत होतें त्याकरितां तेथे सतत चालणारें जिने होते त्यांना (Esealators) म्हणतात. ह्या जिन्यांच्या पायऱ्या

एकसारख्या चालू असतात. आपणांस त्यांच्यावर फक्त पाय ठेवायचा असून आपण जेथे जायचें असेल तेथें जाऊं शकतो. चढण्या व उतरण्यासाठीं निरनिराळें Esealators होतें. येथें नवख्या माणसाचें मन शंकित होते परन्तु एकदां संवय झाल्यावर मजा वाटतें. प्रत्येक Platform वर Indicator असून तेथे एक नकाशाहि असतो. आपण ज्या स्टेशनवर उभें असतों ते बाणानें दर्शवले असतें. आपण नकाशांत पाहून दिलेल्या स्टेशनांच्या अद्याक्षरांतून जायचे ठिकाण शोधून काढायचे. त्याच्यासमोरच अक्षर व अंक लिहिलेला असतों त्याप्रमाणें नकाशांतून ते ठिकाण अक्षर व अंकाच्या चौकटींतून पाहून काढायचें. तसेंच आपल्याला कसें जाणें सोईचें होईल व कुठें गाड्या बदलाव्या लागतील हेहि काढतां येतें. लंडनच्या Tube Rlys च्या निरनिराळ्या lines आहेत. उदा. District-line, पिकॅडली Circle-line वगैरे कित्येक lines वर २ किंवा ३ स्टेशनें Common असतात. नकाशांतून आपण कुठें गाडी बदलावी वगैरे माहिती कळतेंच. ट्युब रेल्वे ही फार रुंद नसून तिची उंचीहि जास्त नसतें. गाडी स्टेशनमधे आली कीं तिचें दरवाजे आपोआप उघडतात. उतरणारें प्रवासी उतरल्यावरच चढणारें प्रवासी चढतात. दरवाजे चांगलें रुंद असल्यामुळें चढण्या-उतरण्यास फारसा त्रास होत नाहीं. गाडीतील बसायच्या seat वरील गाद्या फारच सुंदर असतात.

निरनिराळ्या रंगाचे कपडे घातलेल्या आंग्ल लोकांना बघण्याची आपल्याला चांगलीच गंमत वाटते. आपल्या देशांत प्रवाश्यांना गाडींतून न उतरतांनाच गाड्या चालू केल्या जातात तसे इकडे दिसलें नाहीं. सर्व लोक आंत बसल्यावर Porter नें संकेत केल्यावरच गाडी चालू होतें. येथील युवकयुवतींना गाड्यांतून जातांना " प्रणय-क्रिडा " करण्यास कांहींच वाटत नाहीं.

क्यूगार्डन ही त्या स्टेशनपासून फार लांब नव्हती. रविवार असल्यामुळें लोकांच्या मात्र झुंडीच्या झुंडी दिसत होत्या. तेथें बरीचशी लहान लहान रेस्टॉरंट व कॅफे हाऊसेस दिसत होती. क्यूगार्डन हे जगांतील अत्यंत नांवाजलेले असें उद्यान आहे. त्यांत हिमालयांत उगवणाऱ्या वनस्पतिंपासून आफ्रिकेच्या जंगलांत होणारी वनस्पती व फुलें वगैरे ठेवलेली आहेत. उष्ण देशांतील वनस्पती व फुलांकरितां कांचेची Herbatorium केलेली आहेत त्यांत विशिष्ट प्रकारचेंच उष्णतामान ठेवलेलें असतें. ह्या बागेचे क्षेत्रफळ चांगलेंच विस्तृत असून आंत कांहीं संग्रहालयें व एक पॅलेसही आहे. हे सर्व पहाण्यास १ शि. ची फी द्यावी लागते. तेथें सुंदर गवतावर अनेक जोडपी एकमेकांच्या बाहुपाशांत पडलेलीं आढळतात परन्तु गंमत अशी किं त्यांच्याजवळून जाणारे लोक त्यांच्याकडे साधा दृष्टीक्षेपहि टाकत नाहींत !

मी क्युगार्डन्स् पाहिल्यानंतर केंझिंगनला असलेला Geological-Museum बघण्यास गेलों. हें म्युझियम London University चें एक अंग असून ५ मजली घरांत संबंध भूस्तरशास्त्राची माहिती देण्याकरितां फारच उपयुक्त आहे. ह्यांत निरनिराळे नकाशे, चित्र वगैरे नमुन ठेवलेले असतात. माझा भूस्तरशास्त्र हा विषय असल्यामुळें मला त्यांत विशेष रस वाटला. संध्याकाळीं ५ वाजतां Museum बंद होत असल्यामुळें मी जेमतेमच पाहून बाहेर पडलों. त्यानंतर परत House of Parliament वगैरे भागांत आलों. तेथें वेस्ट मिनिस्टर ॲबे, हाऊस ऑफ लॉर्डस्, हाऊस ऑफ कॉमन्स, 10 Downing-Street, (इंग्लंडच्या पंतप्रधानाचें निवासस्थान) वगैरे भाग पाहून रात्री १० च्या सुमारास मी परत माझ्या निवासस्थानीं परतलों.

लंडनचें पोलिस म्हणजे ज्यांना बॉबी असे साधारण मनुष्य म्हणतो ती म्हणजे लंडनची एक फार महत्वाची संस्था आहे. ह्याच्या नेमणूकीत चांगली म्हणजे असुकच व्यक्तिमत्व असलेली व चांगली शिकलेलीच माणसे नेमतात. ह्यांच्या प्रामाणिकपणाचें धोरण जरा उच्च पातळीचें असतें. हा नवीन येणाऱ्या माणसांना खूपच उपयोगी पडतो. रहदारी नियंत्रित करणाऱ्या बॉबीला तुम्हांला जायच्या ठिकाणी कसें जावें म्हणून विचारलेंत तर तों तुम्हांला व्यवस्थित माहिती देईल. रस्त्याच्या बाजूला उभा असलेला पोलिससुद्धां तुमच्याशी न चिडतां विनोदानें गप्पागोष्टी करील.

दुसरें दिवशीं माझें Science-Museum पहाण्याचें राहून गेले ते परत पहाण्यासाठीं मी केंझिंग्टनला गेलों. Museum उघडण्यास थोडा अवकाश असल्यामुळें मी बागा व इतर दुसऱ्या जागा बघण्यांत तेवढा वेळ घालविला. ह्याच भागांत लंडन युनिव्हर्सिटीची मुख्य कचेरी असून University ची निरनिराळी Colleges वगैरे इथेंच आहेत. ११ वाजण्याचें सुमारास परत सायन्स म्युझियमच्या दारापाशीं आलों. अद्यापहि Museum चे अधिकाऱ्याचें येण्याचें लक्षण दिसत नव्हतें परन्तु बरोबर ११ चे ठोक्याला म्युझियमचें दार आंतून उघडलें व तेथील परिचारक आंत फिरत होतें.

ह्या म्युझियमध्यें निरनिराळ्या शास्त्रांची माहिती देणारें कित्येक नमुनें होतें. नौकाशास्त्र, रेल्वेची इंजिनें, मोटारींची निरनिराळी मॉडेल्स वगैरे अनेक मॉडेल्स होती. मॉडेलसचे बटण दाबलें कीं ते Model चालू व्हायचें व आंतील सर्व भाग चालत असल्याचें दिसायचें. इंडियन रेल्वेच्या मॉडेलमध्यें जी. आय्. पी. रेल्वेचेहि मॉडेल होतें. इथें लहानमुलांना मॉडेल्सना हात लावण्याची मनाई नसतें. लहानमुलें त्यांच्याशी वाटेल तशी खेळत असतात. संध्याकाळीं पांच वाजतां Museum बंद झाल्यानंतर मी वाटर्लू स्टेशनजवळचे Royal-opera-house बघण्यास गेलो. येथे चांगली चांगली नाटकें

व सुंदर संगिताचें कार्यक्रम ठेवतात. हे ऑपेरा हाऊस फारच सुंदर आहे. नंतर मी ‘ पिकडली सर्कस ’ वगैरे बघून रात्री परत आलों.

दुसरें दिवशीं म्हणजे मंगळवारी व्हिटसन् हॉलिडेज् संपत असल्याने National Coal–Board च्या ऑफिसमध्यें जावयाचें असल्यामुळें मी व्हिक्टोरिया स्टेशन-जवळच्या हॉबर्ट हाऊसमध्यें गेलो. तेथें enquiry ऑफिसमध्यें गेलों असतांना तेथल्या बाईनें विचारले, “ Are you Mr. गुप्ते ! मी हो म्हटल्यावर तिनें बसायला सांगितलें व म्हणाली कीं Mrs. Spiller आतांच बाहेर गेल्यात परंतु मी त्यांना निरोप पाठवते. थोड्याच वेळांत मला त्या बाई भेटायला आल्या व माझ्या कार्यक्रमाचा कागद त्यांनीं मला दिला. नंतर तिनें मला कुठें उतरलों वगैरे माहिती विचारली माझ्या कार्यक्रमाचा प्रत्येक दिवस आंखलेला होता. त्यांत मी कुठें, केव्हां कोणत्या गाडीनें जायचें वगैरे सर्व गोष्टी बारकाईनें आंखलेल्या होत्या. मला ११। च्या गाडीनें ग्लासगोला जायचें असल्यामुळें मी लवकरच office सोडलें. जाण्यापूर्वीं लंडनच्या कांहीं office मध्यें जायचें असल्यामुळं मी टॅक्सी करून तेथें जाण्यास निघालों.

•

प्रकरण ४ थें

# ‘ग्लासगो’

मी हिंदुस्थानांतून निघण्यापूर्वी तेथील व अमेरिकेच्या कांहीं Mining Machinery (खाणींत लागणारी यंत्र सामुग्री) च्या तयार करणाऱ्या कारखानदारांकडे त्यांच्या हिंदुस्थानांतील प्रतिनिधींकडून परिचयपत्र घेऊन गेलों होतो म्हणून त्यांना लंडनचें ऑफिसमध्यें मला भेटण्यास जायचें होतें. प्रथम कालौ स्ट्रीटवरील Joy Sullivan Manufacturing Co. च्या लंडन ऑफिसच्या Manager ला भेटण्यास गेलों. थोड्या वेळांतच ते गृहस्थ मला अगदीं आनंदानें व परिचय असलेल्या माणसांसारखें भेटायला आले. हे गृहस्थ चांगलेच स्थूल शरीराचें, उंच व धिप्पाड असून आनंदी दिसत होते. त्यांनीं माझ्याशीं खूपच आनंदानें हस्तांदोलन केले व आस्थापूर्वक चौकशी केली. मी इंग्लंडमध्यें (खाणीच्या दृष्टीनें) काय काय पाहिलें तें आस्थापूर्वक सांगितल्यावर त्यांनीं लगेच माझ्यासमोर त्यांच्या कंपनीच्या ग्लासगोजवळील कारखान्याच्या मॅनेजरला Trunk Call केला व माझ्या येण्याविषयीं तेथील मॅनेजरला कळवून मला तेथें सर्व नीट दाखवण्याची व्यवस्था करण्यास बजावलें. तसेंच अमेरिकेस पुष्कळ पहावयास मिळेल म्हणून जाण्यास सुचविलें व खर्चाची भिती वाटत असेल तर थोड्या फार मदतीचेंहि आश्वासन दिलें. त्यांच्या बोलण्यावरून मलाहि अमेरिकेत जाण्याची इच्छा होऊं लागली व त्यांच्याबद्दल मला कुतुहल निर्माण झालें. नंतर मी मिन्सिंगलेनवर ॲलेक्झ लॉरीच्या ऑफिसमध्यें गेलों. तेथें त्या कंपनीचें इंजिनिअर वगैरे लोक मला Visitors Room मध्यें भेटण्यास आलें. नंतर थोड्या वेळांत तेथील Managing Director भेटायला आलें. ते स्वतः हिंदुस्थानांत पुष्कळ वर्षे त्यांच्या हिंदुस्थानांतील शाखेचे डायरेक्टर होते व त्यामुळें त्यांना हिंदुस्थानची चांगलीच माहिती होती. त्यांनीं मला त्यांच्या मुख्य Principal ना पत्र लिहिण्यास व त्यांचे कारखाने दाखवण्यास सांगितलें. माझ्या गाडीची वेळ झाल्यामुळें मी लवकरच निघालों. नंतर निवासस्थानीं येऊन माझी सूटकेस वगैरे घेऊन टॅक्सी करून लंडन यूस्टन स्टेशनवर जायला निघालों. हे स्टेशन फारच मोठें होतें. तेथें ग्लासगोच्या गाडीचा तपास करून मी तिकिट काढलें. स्टेशनवर तेथील एका पोर्टरनें माझें सामान घेऊन त्यानें मला कोणत्या Platform वर जायचें तें सांगितलें. त्याप्रमाणें मी प्लॅटफॉर्मवर गेलो व थोड्याच वेळांत पोर्टरहि माझें सामान घेऊन तेथें आला. त्यानें कंपार्टमेंटमध्यें माझें सामान ठेवलें. गाडी सुटण्यास जरा अवधी असल्यामुळें लोक विशेष आलेले दिसत नव्हते. ह्या वेळेस सूर्य चांगलाच वरती

निघाला होता व म्हणून जो तो जरा आनंदांतच दिसत होता. प्लॅटफॉर्मवर चालणारे पोर्टर व स्टेशनमास्तरसुद्धां शिट्या वाजवीत जातांना दिसत होते. कांहींजण तर Oh ! What a Nice Day ! म्हणून तालांत चालत होतें. इंग्लीश लोकांचें वैशिष्ट म्हणजे जरा सूर्य वर आला तरी त्यांना फारच आनंद होतो व ते Mood मधें येतात. त्याच वेळेस आपण कोणाबरोबरहि बोलून दोस्ती करूं शकतो. हळूं हळूं लोक येऊन ते शान्तपणें आपल्या जागेवर बसले.

नंतर गाडी हळूं हळूं वेग घेऊं लागली. जी गाडी आधी रिकामी दिसत होती ती आतां भरून गेलेली होती. स्टेशनवर पाहिलें तर ४।६ माणसेंच लोकांना पोहोंचवण्यास आलेली दिसत होती व स्टेशन आपल्यासारखें मुळींच गजबजलेलें नव्हतें. गाडींतील प्रत्येकाजवळ एक Suit-case शिवाय कांहींहि सामान दिसत नव्हतें. आमची गाडी स्कॉटलंडला जाणार होती. ती दुपारीं निघत असल्यामुळें तिला Mid day scot म्हणतात. गाडी लंडनच्या भागांतून जातांना मला बाहेर पहाण्यास मजा वाटत होती.

माझ्या शेजारीं पांचसहा माणसें बसलेली होती. त्यांत अेक मिलिटरींतला शिपाईहि होता. त्यावेळेस मला असं कळलं किं इंग्लंडमध्यें वयाच्या १८ ते ३० वर्षं पर्यन्त National-Service म्हणून Military त शिरणें सर्व नागरिकांना सक्तिचें होतें. फक्त कोळशाच्या खाणींत काम करण्यास माणसें कमी पडत असल्यामुळें कोळसा कामगारांना माफी होती. आणि म्हणूनच ज्यांना लष्करी शिक्षण नकोसे वाटत होते तेच लोक कोळशाच्या खाणींतून काम करण्यास जात होते. थोड्यावेळानें माझ्या शेजारच्या एका प्रवाशानें एका छोट्या पेटींतून संगिताचें सूर काढण्यास सुरूवात केली तेव्हां मी पाहिलें तर तो बॅटरीवर चालणारा रेडिओ होता. गाडींत विशेष कोणी कुणाशीं बोलत नव्हतें. मला बाहेर पहाण्याची इच्छा असल्यामुळें मीहि गुपचुप निरनिराळी गांवें बघत होतां. आमची गाडी मोठमोठ्या स्टेशनवर उभी राहात होती.

थोड्याच वेळानंतर गाडींतील रेस्टॉरंटचा वेटर First bell for the lunch असें ओरडत आला. ज्यांना lunch घ्यायचें त्यांनीं order दिली. मलाहि खूप भूक लागली होती. मीहि सांगून ठेवलें आणि Dining-Car मध्यें गेलों. तेथें Lunch मागून बिअर वगैरेहि स्वस्त असल्यामुळें मागितली. नंतर माझ्या जागेवर पुन्हां येऊन बसलों व सृष्टिशोभा पाहूं लागलों. मधून मधून लहान गांवे ब त्यांत असलेली टुमदार घरें त्याचप्रमाणें जिकडेतिकडे पसरलेली हिरवळ, शेतें व त्यांत स्वैर फिरणारी जनावरें हें पहाण्याची मला मोठी मौज वाटत होती. ग्लासगोला आमची गाडी काळोख

असतांनाच आली. ग्लासगो हें स्टेशन फारच मोठें असून कोळशाच्या धुरानें चांगलेच काळवंडलेलें होतें इंग्लंडची बहुतेक स्टेशनें काळवंडलेली असतात. आपल्या इकडीलप्रमाणें झकपक ठेवण्याचीं वृत्ती दिसली नाहीं. मी स्टेशनवर उतरल्या नंतर एका पोर्टरनें माझी Suit-Case घेतली व मला टॅक्सी हवी होती म्हणून ती टॅक्सींत नेऊन ठेवली.

मी पोर्टरला त्याची बक्षीसी देऊन टॅक्सींत बसलो. मी टॅक्सीवाल्याला मोर्स हॉटेलवर न्यावयास सांगितलें. इथें माझा ५ दिवसांचा कार्यक्रम होता. माझी ह्या हॉटेलमधें रहाण्याची व्यवस्था National-Coal-Board च्या लोकांनी केलेली होती. माझें सामान मी कांचेच्या फिरत्या दरवाजातून घेऊन गेलों. नंतर मी माझी खोली रिझर्व्ह आहे किं नाहीं ही चौकशी केली. नंतर पोर्टर माझी सुटकेस घेऊन खोलीवर गेला. हें फिरते दरवाजे येथील पुष्कळ मोठ्या हॉटेल्सना केलेले असतात. कारण त्यामुळें बाहेरील थंड हवा आंत येऊं शकत नाहीं.

हे फिरते दरवाजे म्हणजे दोन कांचेचें दरवाजे एकमेकांना काटकोन करीत असतात. व काटकोनाच्या आजुबाजूला ते भिंतीच्या अर्धगोलाकार चौकटींत फिरतात व असें करून त्या दोन दरवाजांचें चार विभाग पडतात. येणारा किंवा जाणारा कोणताही मनुष्य एका कप्प्यांत जातो. दरवेळेस कोणचा ना कोणचा दरवाजा अर्धगोलाकार भिंत बंद करतो पण माणसाला मात्र आंत येतां येते.

मी पाहिलें तर माझी खोली चांगलीच मोठी असून आंत सुंदर असे जाड जाड गालिचे होते. खोलींत रेडिओ, टेलिफोन, चांगल्या पैकी फर्निचर, खोलीला लागूनच Bath-room व त्यांत कित्येक निरनिराळे टॉवेल्स होतें. मला एकंदर हॉटेलचें वातावरण पाहून संशय आलाच कीं हे फार महाग हॉटेल असेल. थोडा वेळ आराम करून मी खालच्या Dining-room मध्यें कांहीं खायला मिळेल तर तपास करण्याकरितां आलों, पण रात्र बरींच झाल्यामुळें आतां कांहीं खायला नाहीं असें मला सांगण्यांत आले म्हणून मी चीझच्या सँडविचेस व चहा मागविला. व त्यांनी क्षुधा तृप्ती केली. खोलीवर परत जातांना मी सहज Reception करणाऱ्या बाईला विचारलें कीं माझ्या खोलीचें काय भाडे आहे! तर तिनें मला रोजचें ३०।। शिलींग भाडे आहे असे सांगितले. अर्थात हे भाडे म्हणजे सगळ्या इंग्लंडच्या Hotel मध्यें असते, त्याप्रमाणें होते. म्हणजे रात्री रहाण्याचे भाडे व सकाळचा Break-fast एवढाच ह्या भाड्यात बसतो. मी जरा चपापलोच, कारण मी माझ्या स्वतःच्या खर्चानें आलो होतो. व मला माझा प्रवास जितक्या कमी खर्चात होईल तितकें पहावयाचें होतें. मी माझ्या खोलीवर गेलो. व मला लंडनच्या Indian-Students Y. M. C. A. नी सांगितलें होतें कीं

श्री. अे. ॲरन् नांवाचे हिंदी गृहस्थ हिंदी विद्यार्थांकरितां अेक लहानसें हॉटेल चालवत होतें. त्यांचा पत्ता मला Telephone–Directory मधून मिळाला व त्यांना सकाळीं telephone करूं असा बेत करून मी थोडा वेळ रेडिओ अैकून झोपीं गेलो.

दुसरे दिवशीं सकाळीं उठून तोंड वगैरे धुवून ७ च्या सुमारास खोलींतील telephone मधून श्री. अे. ॲरन ना Phone केला. त्यांनी सांगितलें कीं स्वतंत्र खोली मिळणार नाहीं. पण जर माझी हरकत नसेल तर दुसऱ्या अेका विद्यार्थाबरोबर मला राहतां येईल. खोलीचें भाडे १८ शिलिंग होते. त्यांत सकाळची न्याहरी, रात्रीचें जेवण व शिवाय रविवारी lunch मिळत असे. म्हणून मी तेथेंच राहावयाचें ठरविलें. व त्यांना मी लवकरच येतो म्हणून कळविलें. नंतर कपडे करून मी खालीं जेवावयाच्या खोलींत सकाळच्या न्याहारीला आलो. खोलीचा हॉल फारच प्रशस्त होता. सुंदर स्वच्छ टेबलावरती काढलेला रुमाल, चिनीमातीची सुंदर भांडी मांडलेली होती व कांटे, सुऱ्या, चमचे व्यवस्थित जागीं ठेवलले होते. जमिनीवर सुंदर गालिचे आंथरले होते. वाढणारें, तैनातीत असलेले नोकर काळे लांब कोट घालून कडकडीत इस्त्रीबंद शर्टाच्या कॉलरवर बो वगैरे लावलेलें असून वाढण्याच्या पदार्थांचे नांव फ्रेंच भाषेतून सांगत होते. खाण्यासाठी कितीतरी वेगवेगळ्या तऱ्हेचे पदार्थ असतात. त्यांतून आपण पसंती करावयाची असते. त्यामुळें नवीन मनुष्य गोंधळूनच जातो. सर्वांत प्रथम अेखाद्या फळाचा रस त्यानंतर पॉरिज किंवा दुधांत टाकून कॉर्न फ्लेक्स, नंतर अंडी व बेकन किंवा फिशचे निरनिराळे पदार्थ असतात व बरोबर टोस्ट, लोणी व मार्मलेड असून भरपूर चहा अथवा कॉफी मिळते.

मी श्री. ॲरन्कडे जायचें ठरवल्यामुळें खोलीचें भाडें चुकतें केलें व मला टॅक्सी आणून देण्यास सांगितलें. नंतर पोर्टरनें माझी सूटकेस आणून दिली. मी टॅक्सीनें हॅमिल्टन ड्राईव्हवर श्री. ॲरन् ह्यांच्याकडे गेलों. मला तेथून लगेच ९॥ च्या सुमारास ग्लासगोहून ग्रीनाकला असलेल्या Joy Sullivan च्या office मध्यें जायचें असल्यामुळें श्री. ॲरन् ह्यांचे घरीं थांबण्यास वेळ नव्हता म्हणून त्यांच्या निवासस्थानीं आल्याबरोबर मी माझी Suit case समोर आलेल्या तरुणाजवळ दिली व त्याला विचारतांना तो पुतण्या असल्याचें त्यानें सांगितलें. नंतर मी त्याला मला थांबण्यास वेळ नाहीं असें सांगून मी श्री. ॲरन्ना टेलिफोनवर माझ्याकरितां खोली ठेवण्यास सांगितलेंच आहे व आतां मी एकदम संध्याकाळीं येईन असें घाईनें सांगून ज्या टॅक्सीनें आलों त्याच टॅक्सीनें ग्लासगो सेंट्रल स्टेशनवर गेलों. नंतर ग्रीनॉकचे तिकिट काढून लगेच गाडी आल्यामुळें मी गाडींत चढलों.

ग्रीनॉक हे ग्लासगोहून ४० मैलांच्या अंतरावर आहे. ह्याचा सबंध भाग

कारखान्यानें भरलेलें आहे. येथे मो०मोठीं जहाजें बांधण्याकरितां येतात व त्याबद्दल हें जगप्रसिद्ध आहे. जगांतील सर्वांत मोठीं जहाजें, Queen Elizabeth व Queen Mary इथल्या Ship-yard मध्यें बांधली गेली होती. ग्रीनॉक स्टेशन आल्यावर मी उतरलों व ठरल्याप्रमाणें दरवाजाच्या बाहेर श्री. स्वेग माझी वाट पहात उभे होतें. मी माझी ओळख करून दिल्यानंतर त्यांनीं मला त्यांच्या गाडीनें Joy sullivan च्या कारखान्यांत नेले. त्यांच्या ऑफीसमधें चहावगैरे झाल्यानंतर त्यांनीं मला त्यांच्या मॅनेजरकडे नेले व त्यांच्याशी माझी ओळख करून दिली. नंतर त्यांनीं मला सबंध कारखाना दाखवण्यास सांगितलें. Joy Manufacturing Co. ही अमेरिकन कंपनी असून जगांतील Mining-Machinary तयार करणारी सर्वांत मोठी कंपनी आहे. त्यांनींच इंग्लंडमधें उभारलेल्या कंपनीला Joy sullivan Co. ह्या नांवानें ओळखतात. इथें खाणींत लागणारी निरनिराळी मशिनरी तयार करतात. मशिन्सचें निरनिराळें भाग तयार होतांना पहावयास मिळत असल्यामुळें एकप्रकारची गंमतच वाटतें. ही कंपनी बहुतेक बाहेर तयार केलेला माल विकत आणून ते जुळवाजुळवीचें काम करीत होती. दुपारीं श्रीं. स्वेग व त्यांचें Chief-Engineer यांनी मला lunch साठीं जवळ असलेल्या एका रेस्टॉरंटमधें नेलें. जेवणापूर्वी लागणारी Drinks घेतल्यावर जेवणास सुरुवात केली. lunch नंतर परत कारखान्यांत आलों. मला जे कांहीं पाहावयाचें होते तें पाहिल्यानंतर श्री. स्वेग यांनीं ग्रीनॉकचा कांहीं भाग दाखवला. नंतर त्यांनी स्टेशनवर सोडलें. मला तिकिट घ्यायचें होतें त्यावेळेस ते म्हणाले किं तुम्ही return ticket कां नाहीं घेतलेंत. तें फार स्वस्त पडतें. त्यावेळेस कळलें किं रेल्वेंत व बसमधें return ticket मिळतें व तें स्वस्त पडतें. त्यानंतर मी ते काढण्याची दक्षता घेऊं लागलों.

मी पुन्हा ग्लासगोला संध्याकाळच्या सुमारास परत आलों व तेथून टॅक्सीनें माझ्या निवासस्थानीं हॅमिल्टन ड्राईव्हला आलों. मला बसमध्यें असें आढळून आलें किं सर्व-साधारण वर्ग अगदीं निराळ्याच उच्चारानें इंग्लीश बोलतो. त्याचप्रमाणें तें पूर्णपणें इंग्लीशहि नसतें. कारण तिकिट देणारी मुलगी फक्त 'टिस् प्लीज' म्हणायची व ती काय बोलते हे हे मला कळायचें नाहीं व मी काय बोलतो हें तिला कळायचें नाहीं. एखाद्या माणसालाच चांगलें इंग्रजी यावयाचें परंतु विशेष गैरसोय होत नसे.

मी निवासस्थानीं आल्यानंतर श्री. ॲरन् ह्यांची चौकशी केली. परन्तु ते न आल्यामुळें मिसेस ॲरन् ह्यांनी मला माझी खोली दाखवण्याकरितां त्यांच्या पुतण्याला दिले. नंतर जेवण तयार असल्याचें मला सांगितलें. मी तोंड वगैरे धुवून जेवणाचें खोलींत

गेलों. तेथें बरेचसे हिंदी विद्यार्थी होते. मिसेस् अॅरन् ह्यांनी त्या सर्वांशी माझी ओळख करून दिली. त्यांत F. R. C. S. चा अभ्यास करणाऱ्या दोन विद्यार्थिनी होत्या. त्यांतील दोन बंगाली विद्यार्थ्यांचे नातेवाईक बलिहारी–कोलामरी जवळच्या वरारी–कोक–प्लँट मध्येंच काम करत असल्यामुळें तेथें तें बरेंच वेळां येऊन गेल्यानें मला फारच मौज वाटली. मिसेस् अॅरन्नें मला सांगितलें किं तेथील एक विद्यार्थीही Mining Engineer चा अभ्यास करणारा असून तो हल्ली कोळशाच्या खाणींत काम शिकत आहे. पुढें मला कळलें किं हाच विद्यार्थी म्हणजे आमच्या Coal–field मध्यें असलेल्या चौधरींचा नातेवाईक होता. येथील आमचें वातारण अगदीं खेळीमेळीचे होतें. आमच्या गप्पा खूपच रंगत असत. मिस्टर व मिसेस् अॅरन् हे एका युनिव्हर्सिटीचें M. A. असून Mr. अॅरन् हें निवृत्त झाल्यानंतर त्यांनी हें हिंदी मुलांकरितां हॉस्टेल काढलें होतें. त्यांना ह्या कामी बाहेरची मदत असल्यामुळें ते कमी खर्चात विद्यार्थ्यांना ठेवूं शकत होतें. ग्लासगोला जाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांना मी मि. अॅरनच्या हॉस्टेलचीच शिफारस करीन. परन्तु त्याहिपेक्षां land–lady कडे स्वस्तांत रहातां यत. परंतु जोपर्यंत ही व्यवस्था होत नाहीं तोपर्यंत मि. अॅरन्चें हॉस्टेल हे कांहीं वाईट नाहीं. जेवण झाल्यावर मी माझ्या खोलींत येऊन पडलों. थोड्याच वेळांत कोणी जिना चढतांना मराठी गाणे गुणगुणल्याचा आवाज ऐकूं आला. तेव्हां मी बाहेर आलों व चौकशी केली तेव्हां श्री. दामले नांवाच्या पुण्याच्या विद्यार्थ्याशी ओळख झाली. श्री. दामले ग्लासगो University त Mechanical–Engineering शिकत होतें. मी त्यांच्याशी थोडा वळ गप्पागोष्टी करून रात्र झाल्यामुळें बिछान्यांत पडलों. नंतर माझ्याच खोलींत राहाणारा विद्यार्थी आला. तेव्हां त्याच्याशींहि थोड्या गप्पा मारून झोपलों.

दुसरें दिवशीं ग्लासगो शहराच्या जवळच असलेला Mavor & Coulson कंपनीचा कारखाना बघायचा असल्यामुळं मी तिथें जाण्यास कपडे करून तयार झालों. आदल्या दिवशीं Joy Sullivan च्या ऑफिसमधून श्री. स्वेगनीं दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम कळतांच Mavor & Coulson कंपनींत टेलिफोन करून गाडी माझ्या घरच्या पत्त्यावर पाठवण्यास सांगितलें होतें. परन्तु गाडी जरा उशिरांच आली. गाडीस उशीर होण्याचें कारण म्हणजे शोफर हॅमिल्टन ड्राइव्ह ऐवजी हॅमिल्टन स्क्वेअर स्कॅव्हरला गेल्याचें सांगितलें. कारखान्याकडे जात असतांना तो माझ्याशीं खूप बोलत होता, व मी इतके चांगले इंग्लीश स्कॉटलंडमध्यें आल्यावर शिकलों कां म्हणून त्यानें मला विचारलें. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील गाड्या Right Hand Drive च्या किंवा Left Hand Drive च्या असतात हे विचारलें, तेव्हां मला सांगणें भाग पडलें कीं तुमच्या

लोकांनीं आमच्यावर १५० वर्षे राज्य केले तेव्हां आम्ही तुमचीच पोपटपंची (भाषा, पोषाख, कायदे, वगैरे अनेक बाबतींत) शिकलों आहोंत. माझ्या पुढील प्रवासांतहि मला चांगल्या शिकलेल्या माणसांनी प्रश्न विचारला कीं तुम्ही एवढें चांगलें बोलूं कसे शकतां ? तुमचें शिक्षण Oxford Camdribge मधें झालें आहे कां ?

मला ह्या शोफरच्या गाडी चालवण्यावरून असे दिसून आलें कीं पायी क्रॉस करणाऱ्या लोकांना चांगलाच मान द्यायचा व कोणी क्रॉस करतांना दिसलें तर गाडी थांबवून त्याला हांसत स्तूण करून क्रॉस करायला प्रथम द्यायचें व नंतर गाडी चालूं करायची. जरी उशिर झाला तरी ते चिडत नसत. त्याचप्रमाणें ते एका रस्त्यावरून दुसऱ्या रस्त्यावर जाण्यापूर्वीं गाडी थांबवून इकडे तिकडे बघून सावकाशपणें गाडी चालवत असतांना दिसत होते.

आम्ही कारखान्यांत आल्यावर ऑफिस मधें श्री. रेन्किनची चौकशी केली. त्यांच्याशीं थोडा वेळ गप्पा गोष्टी व चहा वगैरे झाल्यानंतर त्यांनी त्यांचा कारखाना दाखवला. ह्या कारखान्यांतही मशिनरी तयार होत होती. विशेष म्हणजे Belt–Conveyors तयार करण्याचें वैशिष्ट्य होतें. ह्यांचे ग्लासगोला तीन ठिकाणीं कारखानें होते. कारखान्यांच्या बाबतींत त्यांची चांगलीच प्रगति झालीं होती. म्हणून एकाच ठिकाणीं कारखाना न वाढवतां निरनिराळ्या ठिकाणीं वाढवला होता. ह्यांच्या कारखान्यांत विजेच्या मोटारी वगैरे सुद्धां तयार करित होतें.

संध्याकाळीं त्यांनी मला माझ्या निवासस्थानीं सोडलें. मी जेवण झाल्यानंतर थोडावेळ जवळच असलेल्या बागेंत गेलों. त्यावेळेस उन्हाळा चालूं होता तरी मधून थंड वाऱ्याच्या चांगल्याच झुळकी यायच्या. त्यामुळें ओव्हरकोट ठेवणें भागच पडायचें. ओव्हरकोट म्हणजे तेथील एक प्रथाच झाली आहे कारण जो तो ओव्हरकोट घालूनच बाहेर पडतो. मला स्वतःला ओव्हरकोट बिलकूल आवडत नसे. कारण त्यामुळें स्वतःला ढगळ कांहींतरी घातल्यासारखें वाटतें. शिवाय त्यांत माणसाचा चुणचुणीतपणा दिसत नाहीं. ही बाग चांगलीच मोठी असून त्यामधें ग्लास हाऊस वगैरे होतें.

दुसरें दिवशीं मला Anderson Boyes चा मॉथरवेलला असलेला कारखाना पहावयास जायचें होतें. हा कारखाना ग्लासगोहून २०–२५ मैलांवर वर होता. तेथें जाण्यासाठीं स्टेशन पासून बस होती. मी कारखान्यांत आल्यावर त्या कंपनीचें डायरेक्टर श्री. रॉबर्ट रेसेल यांची चौकशी केली तेव्हां मला त्यांच्या खोलीवर घेऊन जाण्यांत आलें. श्री. रसेल हे वयस्क गृहस्थ असून त्यांचें बोलणें समजण्यास मला थोडा त्रासच पडायचा. त्यांनी मला कारखाना दाखवण्यास सुरुवात केली. नंतर दुपारच्या लंचला मला ते निराळ्या

डायरेक्टर लोकांच्या खोलींत घेऊन गेलें. हळूं हळूं सगळें डायरेक्टर लोक जमूं लागल. थोड्याच वेळांत कंपनीचे मालक व मॅनेजिंग डायरेक्टर आलें. नंतर त्यांच्याशी माझी ओळख करून देण्यांत आली. मॅनेजिंग डायरेक्टर नें मला त्यांच्याजवळ बसण्यास सांगितलें व नंतर आमच्या लंचला सुरवात झाली.

ते सर्वजण काय बोलत होते तें मला समजत नव्हतें. परन्तु मधून मधून ते मला समजेल अशा रीतीनें माझ्याशीं बोलायचें. त्या लोकांनाहि मला इतके चांगले इग्लिंश कसें येते ह्याबद्दल आश्चर्य वाटलें व ते आपसांत म्हणायचें किं हा मनुष्य आपल्यापेक्षां इंग्लिश चांगलें बोलतो.

कारखाना पाहून मी संध्याकाळीं माझ्या निवासस्थानीं परत आलों. दुसऱ्या दिवशीं शनिवार असल्यामुळें मला कुठेंहि कार्यक्रम नव्हता. कारण शनिवारी सर्व कारखानें बंद असतात. तो दिवस मी श्री. दामले यांच्याबरोबर त्यांची University बघण्यांत घालविला. तसेंच त्यांनीं मला University च्या Union ची बिल्डींग दाखवण्यास नेलें. ही इमारत खरोखरच खूप मोठी असून तेथें जेवणासाठीं दोन मजली इमारत असून मोठी रेस्टॅारंट, खेळण्याकरिता निरनिराळ्या खोल्या व सुंदरपैकीं लायब्ररी वगैरे होती Union च्ये खालीं निरनिराळ्या Societies काम करायच्या त्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या Activities मध्यें मदत करतात. त्यांत आपलें हिंदी विद्यार्थीहि प्रामुख्यानें भाग घेत असलेले दिसले. युनियनची बिल्डींग विद्यार्थ्यांच्या सभासद वर्गणींतून उभारलीं होती. कित्येक तर मोठे पदवीधर असलेलें युनियनचे माजी विद्यार्थी त्याचें कायमचें सभासद ( life Member ) होते.

दुसरें दिवशी मला तेथून ४०–५० मैल दूर असलेल्या एडिंबरला जायचें होते म्हणून मी ग्लासगोच्या क्वीन स्ट्रीट स्टेशनपासून निघालो व एडिंबराच्या वेव्हर्ली स्टेशनवर आलों. माझी रहाण्याची व्यवस्था पामर्स्टन हॉटेलमधें झाली असल्यामुळें मी तेथें रहावयास गेला. दुपारचीं वेळ असल्यामुळें हॉटेलमधें सामसूम होती. तेथें काम करीत असलेल्या एका बाईनें मला माझी खोली दाखवली. तेथें गेल्याबरोबर मला पुष्कळ सर्दी झाली असल्यामुळें मी औषधाची चौकशी केली. तेव्हां त्या बाईनें मला Boot's च्या औषधाच्या केमिस्टकडे जायला सांगितलें. ही Boot's च्या औषधाची केमिस्टची दुकानें निरनिराळया ठिकाणी असून सबंध इंग्लंडभर प्रसिद्ध आहेत. औषध वगैरे घेऊन मी सार्वजनिक बाग, म्युझियम वगैरे भागांत फिरलों. तेथें बागेंत गेलों असतांना एक मध्यम वयाची बाई भाषण करीत असतांना दिसली व तिच्या भोंवताली २००–३०० माणसें जमा झाली असून तिच्या भाषणाचा विषय असा

होता कीं "स्कॉटलंडनें इंग्लंडपासून दूर व्हावें कारण इंग्लंडमुळें स्कॉटलंडचें फार नुकसान झालें." नंतर मला असें कळलें कीं अशा विचाराची माणसें अजून स्कॉटलंडमधें थोडीबहुत आहेत परन्तु आतां त्यांना तितकें महत्त्व नाहीं. आतां इंग्लंड व स्कॉटलंड ह्यांचे हित समरस झालें आहे. थोडें पुढें गेल्यावर मी सबंध एडिंबरो दाखविणाऱ्या टुरिस्ट बसनें जाण्याचें ठरविलें व मी बसमधें चढलों. ही बसची व्यवस्था म्युनिसिपालटीनें केलेली आहे. ह्या बसेस दिसायला फारच सुंदर असून आंत छानपैकीं कुशन्स होत्या. सर्व लोक चांगले कपडे घातलेले असून बायकांचें रंगीत पोषाख आणि खोटे पण झगमगणारे खड्यांचे दागिन्यांमुळें वातावरण एक प्रकारचें प्रसन्नतेचें वाटत होतें. मी थोड्यावेळांत तिकीट घेतलें परन्तु ज्या माणसानें मला तिकीट दिलें तोंच गाडी चालवण्यास बसला होता व त्यानें समोर असलेल्या मायक्रोफोनवरून 'सद्गृहस्थहो व सन्नारीहो आतां मी तुम्हांला एडिंबरो शहर दाखवण्यास घेऊन जात आहे असें सांगितलें व नंतर बस चालवण्यास सुरुवात केली. जुन्या एडिंबरोपासून व तेथील प्रख्यात किल्ल्याच्या भागांतून बस घेऊन हळूंहळूं तेथील राजवाडे वगैरे दाखवत एडिंबरोच्या नवीन भागांतून आणलें. दर एक महत्त्वाच्या जागीं बस थांबवून आम्हांला सर्व कांहीं समजावून दिलें जात होतें. तसेंच एडिंबरोतील ऐतिहासिक इमारतीं पाठीमागचा इतिहास समजावून देत होता. कांहीं ठिकाणीं मला त्याची विनोदवृत्ती चांगलीच दिसून आली. तो ड्रायव्हर असून माहिती सांगतांना खूप हंसवतहि होता. बसमध्यें कंडक्टर वगैरे कोणी नसून सर्व काम बस ड्राव्हरच पहातो. आपल्या देशांत ह्याच कामासाठीं वेगवेगळी माणसें लागली असती. सबंध टूर संपवून आमची बस १-२ तासांनी सुरुवातीच्या ठिकाणीं परत आली व आमचा दोन शिलिंगाचा प्रवास संपला. दुसरें दिवशीं सकाळी ८॥ वाजतां एका National Coal Board ची गाडी न्यायला येणार असल्यामुळें मी सकाळचीं न्याहारी आटोपून खाणींत जाण्यासाटी बदलायचें कपडे घेऊन गाडीची वाट पहात बसलों. थोड्या वेळांतच सुंदर चकचकीत काळ्या रंगाची गाडी आली व त्यांतून चांगल्यापैकीं सूट घातलेला एक तरुण गृहस्थ उतरला व मला आपणच Mr. Gupte आहांत कां म्हणून प्रश्न केला. मला वाटलें किं हा Coal-Board चा कुणीतरी ऑफीसर मला नेण्यासाटी पाठवला असेल म्हणून मी त्याला हस्तालोदंन केले व गाडींत बसलों. थोड्यावेळानें मी चौकशी करतांना त्याला विचारलें किं आपण Coal Board मधें काय काम करतां तेव्हां तो म्हणाला किं तो त्या गाडीचा शोफर असून ती गाडी N. C. Board नें माझ्या तैनातीसाठीं ठेवली होती. त्यामुळें मला आश्चर्याचा धक्काच बसला व मी चांगलाच घुटमळलों. व त्याच्याशी हस्तालोदंन केल्याबद्दल व त्याच्या जवळ बसल्याबद्दल चांगलाच कचरलो.

माझ्या या मुर्खपणाबद्दल तो काय म्हणत असेल असे मला वाटलें, परन्तु नंतरच्या माझ्या इंग्लंडमधल्या अनुभवांत असे कळून आलें कि मला लाज वाटण्यासारखे कांहींहि घडलें नाहीं कारण तेथील समाजामधें शोफर व गाडींत बसणारा मालक ह्यांच्यांत कांहीं फरक मानत नाहींत व ते एकत्र बसून चहा पितात व बार मध्यें Drinks वगैरेसुद्धां एकत्र घेतात.

Write Hill Colliery च्या ऑफीसमध्यें पोंहचल्यानंतर मी तेथील मॅनेजरची चौकशी केली. ऑफीसमधें काम करणारा वर्ग सर्व बायकांचा होता. मला मॅनेजरजवळ घेऊन जाण्यांत आलें व त्यांचा परिचय करून देण्यांत आला. नंतर त्यांनीं माझ्याकरितां लॅंच तेथील Cantin मधून चहा, सॅंडविचेस् वगैरे मागवलें. आम्ही थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा केल्यानंतर खाणींत जाण्यासाठीं माझ्याजवळ बूट नसल्यामुळें बुटांची व्यवस्था केली. स्वतः मॅनेजरनें माझ्यासाठीं धावपळ करून माझ्या पायाला होणारे बूट आणले. वास्तविक बूट आणण्याचें काम आपल्याकडे चांगल्या दर्जाचें माणसानें केले नसते ही विशेष ध्यानांत घेण्यासारखी गोष्ट आहे.

थोड्या वेळानें ते मला खाणींत घेऊन गेलें व त्यांची पहिलीच कोळशाची खाण बघून मला चांगलेंच आश्चर्य वाटलें. येथील कोळशाच थर पातळ असून जिथें कोळसा कापण्याचें काम चालतें तेथ ३–३॥ फुटांपेक्षां जास्त उंची नसल्यामुळ चांगलेंच वाकून चालावें लागतें. कोळसा खणण्याचें काम संबंध मशिननें होतें. कोळसा कापून झाल्यावर तो कोळसा एका Belt-Conyeyer म्हणजे सतत चालणाऱ्या रबरी पट्यावर मशिननेंच भरला जातो. नंतर कापलेल्या जागेपासून चांगलाच दूर जाऊन तो गड्यांतून भरला जातो. नंतर त्या गाड्या जमिनीवरती घेऊन जातात व रिकाम्या केल्या जातात. ही सर्व काम यंत्रांच्या सहाय्यानें केली जातात व त्यामुळें तेथील दैनिक उत्पादनांत व हिंदुस्थानच्या उत्पादनांत चांगलाच फरक असतो.

खाणींतून आम्ही दुपारीं २ च्या सुमारास परत आलों व वरती असलेली कांहीं यंत्र सामुग्रीची माहिती दिल्यानंतर मॅनेजर मला लंचसाठीं त्यांच्या ऑफीसमधं घेऊन गेलें. लंच म्हणजे सॅंडविचेस्, दूध, चहा वगैरेच होतें. आम्ही खाणींतून सरळ ऑफिसमधें आल्यामुळें आमच्या तोंडावर बारीक कोळशाचे थर लागलें होते व संबंध अंग काळें दिसत होतें. तशाच स्थितींत मला लंच घेण्यास प्रशस्त वाटलें नाहीं पण नाइलाज झाला कारण तेथील लोक तशाच स्थितींत लंच घेतल्यानंतर आंघोळ वगैरे करतात असे दिसलें. मलाहि लंच संपल्यावर ऑफीसरच्या असलेल्या आंघोळीच्या खोलींत घेऊन गेलें. येथं त्यांच्या व आपल्या संस्कृतीत किती फरक आहे हें मला जाणवलें. अंदाजे ५ च्या सुमारास मी माझ्या निवासस्थानीं परतलों.

एडिंबरोमध्यें माझा मुक्काम एक आठवडा होता. इथें असलेल्या जवळपासच्या खाणी पहाण्याचा कार्यक्रम National–Coal–Board नें केला होता. कांहीं खाणी समुद्राच्या अगदीं जवळ असून कोळसा खोदण्याचे काम समुद्राच्या कितीतरी आंत गेलें होतें. कित्येक ठिकाणीं चांगलेच पाणी यायचें परन्तु ते उपसण्यासाठीं चांगला बंदोबस्त होता. समुद्राच्या खाली आपण किती आहोंत हे पाहाण्यासाठीं खाणीच्या खालून बोरींग ( Boring ) करून वर पाणी लागल्यावरोबर पाणी येऊं शकणार नाहीं अशा Valve नें बंद करायचीं व्यवस्था होती. एके ठिकाणीं समुद्राच्या मधून कोळसा शुद्ध करण्याकरितां लहान लहान बोटींवर बोरिंग मशिन ठेवून बोरिंगचे काम चालू होतें. एक खाण मी पहाण्यास गेलों तेव्हां मला जे गृहस्थ खाण दाखवायला घेऊन जात होतें त्यांनीं जमिनीवर चालणाऱ्या Belt Conveyer वर उडीं मारून ते स्वतः Belt Convayer वर सबंध शरीर पालथें टाकून त्यांनीं मलासुद्धां तसेंच करण्यास सांगितलें. असे करण्याचें कारण दोन दोन अडीच फूट कोळशाच्या पातळीच्या थरांत चालावें लागण्याचा त्रास बराच वांचत होता. मला अशा रितीनें जायचा कधींच प्रसंग आला नाहीं त्यामुळें मी चांगलाच घुटमळलों व मला काय करावें ते सुचेना. माझें मार्गदर्शक तर सारखे पुढें जात होते शेवटीं मी त्या Belt Conveyer वरतीं उडी घ्यायचें ठरवलें. परंतु मी त्यांच्या पाठीमागें Conveyer वरतीं ओढला जात होतों. कांहीं अंतर गेल्यावर माझे मार्गदर्शक Belt-Conveyer जवळ उभ्या केलेल्या दोन लोखंडी टेक्यांच्या सहाय्यानें बाहेर निघून आलें व मलाहि तसें करण्यास सांगितलें परंतु माझी उंची कमी असल्यान मला तसें करण्यास जमेना. मी अगदीं गोंधळून गेलों. आणि परिस्थिती तर अशी होती कीं मला जर Belt–Conveyer वरून उतरतां आलें नसते तर पुढें असलेला पट्टा चालत असणाऱ्या चाकांवरती मी आपटलों असतों व त्यापासून तर जिवाला फार धोका होता. मी ह सर्व जाणून होतो. म्हणून मी ओरडून सांगूं लागलो, 'पट्टा थांबवा, पट्टा थांबवा ! आतां माझें सगळे लक्ष 'आतां काय होतें' ह्याकडे लागलें होतें. शेवटीं एकदांचा पट्टा थांबला आणि मी Belt Conveyer वरून उतरून बाहेर आलों. मी मनांतून खूप संतापलों होतो कारण Belt वर चढणें हा कायद्यानें गुन्हाच होता. आणि त्या माणसानें मला Belt वर चढतां येतें कीं नाहीं चौकशी न करतांच वर चढायला सांगितलें होतें.

अशीच एक दुसरी खाण पहायला जातांना मला करकाल्डी या स्टेशनाहून जावें लागल होतें. ह करकाल्डी गांव Linoneum म्हणजे मेणकापड तयार करणाऱ्या कारखान्यांबद्दल प्रसिद्ध आहे. त्या सबंध गांवांत जिकडे तिकडे जवसाच्या तेलाचा वास येत होता.

●

प्रकरण ६

# न्यू कॅसल

एडिंबरोचा माझा कार्यक्रम संपवून मला न्यू कॅसलला जावयाचें होतें. त्यासाठीं मला एडिंबरोहून न्यू कॅसलला जाणारी गाडी गाठायची होती. परंतु बसनें जाणें जास्त स्वस्त असल्यानें मी बसनेंच जायचें ठरवलें. बस स्टॉपवर मी हॉटेलपासून Taxi करून गेलों व न्यू कॅसलची बस गांठली. नंतर मी न्यू कॅसलच्या बस स्टेशनवर सायंकाळीं ५-५॥ वाजतां पोहोंचलों. Taxi ची चौकशी करतां मी Taxi कंपनीच्या जवळच असलेल्या Office मध्यें गेलों व Taxi मिळेल कां म्हणून विचारलें. तेथील इसमानें त्याच्या Wireless Transmitter नी निरनिराळ्या टॅक्सींशी बोलण्यास सुरवात केली व ज्या टॅक्सीला लवकर येतां येण्यासारखें होतें त्या टॅक्सीला बोलावलें. टॅक्सी ड्रायव्हर्सशी अशा रीतीनें Wireless नी बोलण्याची व ऐकण्याची व्यवस्था तेथें आहे. याचप्रमाणें स्वतःच्या टॅक्सीशीं टॅक्सी मालकांना Wireless द्वारें बोलण्याची तेथें व्यवस्था आहे. त्यानंतर मी माझी व्यवस्था केलेल्या जसमॉंट रोडवरील 'इम्पिरिअल' हॉटेलमध्यें आलों. नंतर मी भूक लागल्यामुळें सॅंडविचीस व चहा मागविला. परंतु सॅंडविचीस डुकराच्या मांसांच्या असल्यामुळें मला खाववेनात. म्हणून मी त्या तशाच टाकून दिल्या. थोड्या वेळानें मी खालीं आलों तों तेथें नृत्य चाललें होतें. म्हणून मी तेथें नृत्य पहाण्यास बसलों. तेथें माझ्याशीं 'अर्ल' नांवाचे तरुण गृहस्थ ओळख करून घ्यायला आले. ते कोळशाच्या खाणींत काम करत असून नुकतेंच First Class Colliery Manager च्या परीक्षेस बसले होते. आम्ही दोघेही एकाच धंद्याचें असल्यामुळें आम्हीं निरनिराळ्या विषयांवर चर्चा केल्या. थोड्या वेळानें आठवण केल्यासारखें करून ते गृहस्थ मला म्हणाले "अरेच्चा! ज्या मुलीला मी नृत्य करायला आणलें आहे तिला मी साफच विसरलों. आतां ती माझ्यावर चांगलीच रागावेल तेव्हां मी तिच्याबरोबर नृत्य करण्यास जात आहे त्याबद्दल मला माफी करा" असें म्हणून ते निघून गेले. परंतु थोड्याच वेळांत ते परत आले व म्हणाले मी हिंदी माणसाशीं बोलत असून तिला विसरून गेल्यामुळें ती खुपच चिडली आहे व माझ्याशीं बोलत नाहीं. पुढें ते म्हणाले माझें व तिचें लग्न व्हावें म्हणून मी प्रणय करीत होतो परंतु आतां आमचे लग्न मोडलें असें दिसते. हें त्या गृहस्थानें सांगितल्यावर माझ्यामुळें त्या माणसाचें लग्न मोडावें ह मला बरें वाटलें नाहीं, व मी त्यांना म्हणालो की, हवें असल्यास मी तुमच्या प्रेयसीची क्षमा मागूं कां? त्यावर ते म्हणाले ती अशीच चिडक्या स्वभावाची आहे. मलाही तिची पर्वा नाहीं. असें म्हणून "अहो समुद्रावर अशा लाखो गारगोट्या पडलेल्या असतात,

मी त्यापैकी कोणतीही उचलून घेईन." त्यांचें हे विधान ऐकून मी स्तंभित झालों व त्यांच्या ह्या तत्वज्ञानाबद्दल मला आश्चर्यच वाटलें. ह्या प्रकाराबद्दल त्यांच्यापेक्षां मीच खिन्न झालों.

ह्या नंतर १२ वाजतां त्यांनी मला त्यांच्या क्लबमध्यें येण्याचें आमंत्रण दिले व कोणत्या बसनें यायचें ह्याची ही माहिती दिली. मी दुपारचें आमंत्रण स्विकारल्यामुळें सकाळचा वेळ न्युकॅसलचा बाजार पहाण्यांत घालविला. जात असतांना एका दुकानांत नायलॉनचा शर्ट विकत घेण्याचे ठरविलें कारण मला बहुतेक ठिकाणीं थोड्या दिवसांचा कार्यक्रम असल्यामुळें व लॉंड्रीतील कपडे वेळेवर मिळत नसल्यानें मला तें स्वतःच धुण्यास व इस्त्री करण्यास लागत असत; परंतु नायलॉनचा शर्ट घेतल्यानंतर माझा सर्व त्रास वांचेल. कारण हा शर्ट एका तासाच्या आंत वाळतो व इस्त्री करण्यास लागत नाहीं म्हणून तो शर्ट घेण्याचें निश्चित केलें.

येथील सर्व दुकानांत जो कांहीं माल असतो तो सर्व कांचेच्या कपाटांत सुशोभित रितीनें ठेवण्यांत येतो. रविवारीं दुकानें बंद असल्यामुळें काम करणाऱ्या लोकांना संध्याकाळीं सहा वाजल्यानंतरच वस्तु पसंत करण्यास वेळ मिळतो ह्यालाच window Shopping म्हणतात. एखादी वस्तु पसंत केल्यानंतर आपल्या बायकोला किंवा घरमालकिणीला ती वस्तु दुसरें दिवशी आणण्यास सांगण्याची पद्धत आहे. मी सुद्धां त्याचप्रमाणें त्या दुकानाची खुण लक्षांत ठेवून तो शर्ट विकत घेण्याचें ठरविलें.

नंतर जवळच असलेल्या बागेमध्यें गेलो. तेथें शिशुक्रिडेकरितां नौकाविहार करण्यासाठी एक छोटासा कालवा केला होता. तेथें नौकाविहार करण्यास प्रत्येक मुलापाठी-मागें ६-६ पेन्स असून प्रत्येकाला लांकडी नौका देत होते. लहान मुलें ती नौका घेऊन स्वतःच चालवीत होती. अगदीं लहान म्हणजे ६ -७ वर्षांची मुलें होडी वल्हवीत होती त्यामुळें त्यांच्यांत एकप्रकारचा धीटपणा निर्माण होण्यास व तें देशाचें चांगलें नाविक होण्यास मदत होत होती. मग तें देशाचें आदर्श नाविक झालें नाहीं तर काय आश्चर्य ?

त्यांच्याच शेजारीं मध्यम वयाचीं माणसें रेडिओ नियंत्रित केलेली लहान नौका चालवीत होती. ही नौका पाण्यांत असून तिला पुढें मागें किंवा निरनिराळ्या दिशांनीं जाण्याचें काम बाहेर उभें राहून रेडिओच्या लहरींनी नियंत्रित केलें जात असे. मला माझ्या मित्रानें आमंत्रण केलेल्या क्लबकडे जाण्याची वेळ झाली असल्यामुळें त्यांनी नंबर दिलेली बस गांठली व त्यांनीं सांगितलेल्या जागेवर उतरलों आणि क्लब शोधून काढला.

ह्या क्लबची इमारत चांगली दोन मजली व प्रशस्त होती. मी आंत गेलों आणि माझ्या मित्राची चौकशी केली परन्तु ते अजून आलें नाहींत असें मला कळलें. मी तेथें

कोणी enquiry clerk आहे कां याचा तपास करत होतों परन्तु तेथें कोणीच न दिसल्यामुळें तेथें असलेल्या मद्य देणाऱ्या माणसाकडूनहि मला कांहीं उत्तर मिळालें नाहीं. नंतर त्यांनीं मला क्लबचें पुस्तक सही करण्यास सांगितलें व मी त्याप्रमाणें केलें. जवळच कांहीं लोक मोठ्या मोठ्या कांचेच्या भांड्यांतून बीअर घेत होते. त्या लोकांनीं मला माझा मित्र येईपर्यन्त त्या लोकांत enjoy करायला बोलावलें. मी शेजारच्या खोलींत थोडावेळ काढण्याकरितां पाहिले परन्तु तेथेंहि पुष्कळ लोक मद्यपान करीत असल्याखेरीज कांहीं दिसलें नाहीं. त्यामुळें मला जरा प्रश्नच पडला होता. कारण मी न्युकॅसलहून १०–१२ मैल आलों होतों, व माझा मित्र आला नाहीं तर कसा वेळ घालवावा असा प्रश्न पडला होता. वरच्या मजल्यावर कांहीं खेळ वगैरे गंमत चालली असेल म्हणून पहाण्यास गेलो परंतु खालीं जें चाललें होते, त्याचीच पुनरावृत्ति वरच्या मजल्यावर चालली होती. सर्व लोक मद्यपान करीत आनंदात होते, व मला जो तो आग्रहानें त्यांच्या बरोबर बिअर घेण्यास सांगत होता. परंतु मी अनोळखी असल्यामुळें तेथून निसटलों. नंतर खालीं रस्त्यावर येऊन मित्राची वाट पहात थांबलों. आणि मनाशीं ठरविलें कीं थोड्यावेळांत मित्र आला नाहीं तर परत जावें, परंतु तेवढ्यांत माझा मित्र आपल्या वृद्ध पित्यासह तेथें उपस्थित झाला. तो आपल्या भावाच्या गार्डीनून आला होता. उशीर झाल्याबद्दल माफी मागून आपल्या वडिलांची व भावाची ओळख करून दिली. त्याच्या वडिलांनी संबंध आयुष्यभर कोळशाच्या खाणींत काम केले होते. व त्यांना एक दोन वेळां अपघात होऊन त्याच्यांतून वाचून आतां ते वृद्धावस्थेबद्दल पेन्शन घेत होते. नंतर मला घेऊन ते सर्वजण वर आले. आम्ही सर्वजण एका टेबला भोंवती बसलों. माझ्या मित्रानें बिअर वगैरे मागविली, आणि मला मोठ्या कौतुकानें सांगितलें कीं तो त्याच्या आईवडिलांपासून निराळा रहात असून दर रविवारीं त्यांची चौकशी करण्यास जात असे. दर रविवारीं मद्यपानासाठीं तो आपल्या वडिलांना येथें घेऊन येत असे. त्याचें वडील कमीत कमी ७५ वर्षं वयाचें असून देखील मोठ्या उत्साहानें मद्यपान करीत होते. थोड्याच वेळांत माझ्या मित्राचा फ्रेंच मित्र जो इंग्लंडमध्यें स्थायिक झाला होता तो आमच्या ग्रुपमध्यें सामील झाला. माझ्या मित्रानें त्याला माझी ओळख करून दिली. त्यानंतर त्यानें मजजवळ हिंदुस्थानांतील रितीरिवाजांबद्दल चौकशी केली. मी जेव्हां त्याला सांगितलें कीं आमच्या देशांत मद्यपान निषिद्ध समजलें जातें, व जो कोणीं मद्यपान करीत असेल तो गुपचूप चोरून करतो. आम्हीं आमच्या वडील माणसांसमोर मद्यपान कुठचें परंतु सिगरेटसुद्धां ओढीत नाहीं. तेव्हां त्यांना खूपच आश्चर्य वाटलें. आणि ते माझ्याकडे मानानें व कौतुकानें पाहूं लागले. नंतर त्यांना मी आपली एकत्र कुटूंबपद्धति समजावून सांगितली व आमच्याकडे आम्हीं वृद्ध आईवडिलांना एकटें सोडून कधींहि जात नाहीं व कोणी मुलानें असें केलें तर

त्यास आम्ही फार वाईट समजतो. असें मी त्यांना सांगितलें तेव्हां ते मला म्हणाले तुम्ही फार सुधारलेलें असून आम्हीं मागासलेलें आहोंत खरंच ! मला पुष्कळ ठिकाणीं आढळून आले कीं त्यांच्याकडे एकुलता एक मुलगा असला तरी सुद्धां लग्न झाल्यावर निराळा रहातो, आणि रविवारी फक्त त्यांच्याचकडे चौकशीला जातो. त्यापलीकडे त्यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध रहात नाहीं. फक्त एवढेंच चांगलें आहे कीं वृद्ध माणसांस त्या देशांत ६५ वर्षाचें वय झाल्यानंतर त्यांना सरकारकडून वृद्धावस्थेसाठीं भत्ता मिळतो व हा भत्ता स्वतःचा खर्च करण्यासाठीं कमी पडत असल्यास कौंटी कॉन्सिलला अर्ज केल्यास वाढवून सुद्धां देतात. त्याचप्रमाणें आजारीपणांत सरकारकडून सबंध औषधोपचार विनामूल्य मिळत असल्यामुळें कांहीहि काळजी करण्यासारखें नसतें." याशिवाय म्हाताऱ्या माणसांकरतां कांहीं स्वतंत्र संस्था असून तेथें त्यांना ठेवण्यांत येते आणि तेथेंच त्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था केली जाते.

नंतर मी ह्या मंडळीचा निरोप घेवून न्यू कॅसलची बस गांठली. दुपारीं तेथून जवळच असलेल्या समुद्राकांठीं जाण्याचें ठरविलें. नंतर बस गांठून तेथें गेलों. समुद्राचा किनारा स्त्री-पुरुषांनीं अगदीं भरून गेला होता. कित्येक स्त्री पुरुष सूर्य प्रकाशांत उघड्या अंगानें किरणांचा आनंद घेत पडलें होतें. कांहीं जण तर डोळ्यांवर काळे चष्मे घालून वाळूवर उताणे पडून सूर्य प्रकाशांत आपली पांढरी कातडी लालसर करण्याचा अविरत प्रयत्न करत होते. कांहीं लोक समुद्रांत होड्यांत बसून जात होते. कांहीं वाळूवर निरनिराळे खेळ खेळत होते. तेथें जवळच खाण्यापिण्याची दुकानें होती. नंतर संध्याकाळीं मी माझ्या निवासस्थानीं परत फिरलो.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मला Vietor-Products चा कारखाना पहाण्यास जायचें होते. नियोजित वेळीं त्यांची गाडी मला नेण्यास माझ्या हॉटेलवर आली. कारखान्यांत गेल्यावर मी त्या कंपनीच्या डायरेक्टरची भेट घेतली. नंतर त्यांनीं मला कारखाना दाखविण्याकरतां त्यांच्या एका वरिष्ठांची व्यवस्था केली. प्रथम कारखाना दाखविण्यापूर्वी माझा फोटो काढून घेतला व तो त्यांच्या मासिकांत छापला जाईल असें त्यांनीं मला सांगितलें.

ह्या कारखान्यांत खाणींत सुरुंग लावण्याकरतां, भोकें करण्यासाठीं विजेची Drilling-Machines तयार केली जात होती. त्या कारखान्याची सुरवात थोड्या वर्षांपूर्वी फक्त ७ माणसांपासून केली असून आज ५००, ६०० माणसें तेथें काम करीत होती. मी सर्व कारखाना पाहिल्यानंतर तेथील मुख्य अधिकाऱ्यांशीं विचार-विनिमय करून त्यांच्या नवीन संशोधनाबद्दल काय केले आहे ह्याबद्दल चर्चा केली.

दुसऱ्या दिवशीं Hew Wood कंपनीचा कारखाना पहाण्यास गेलो. ह्या कंपनींत खाणींत लागणारी निरनिराळ्या प्रकारची यंत्रसामुग्री तयार होती. त्यांतल्यात्यांत वैशिष्ठ्य हें वाटलें कीं त्यांनी तयार केलेली मशिनरी कुठें कुठें आणि काय कामें करीत होती ह्याची सुंदर फिल्म व बोलकें चित्रपट तयार केलें असून ते मला लंच नंतर मुद्दाम तयार केलेल्या थिएटरमध्यें दाखविण्यापूर्वी मला त्यांनीं न झोंपण्याबद्दल बजावलें. परंतु हिंदुस्थानांत जेवण झाल्यानंतर झोंपायची माझी संवय गेलीं नसल्यामुळें मला चित्रपट पहातां पहातां झोंप आल्याशिवाय राहिली नाहीं.

प्रकरण–७

# चेस्टर फील्ड व शेफील्ड

ह्यानंतर मला विक फील्डला जायचें होते. इंग्रजी साहित्यांतील प्रख्यात कादंबरीकार Oliver Gold–Smith ह्याची Vicar–of Vickfield ह्या कादंबरींत प्रसिद्ध झालेलें वेकफिल्ड हेंच तें गांव होय. माझ्या हॉटेलच्या समोरच बस–स्टँड असल्या-मुळें मी माझें सामान घेऊन तेथें गेलों. तेथें मी ब्रिटिश जेफ्रि डायमंड आणि रिचर्डस सटक्लिफ हें कारखाने बघून घेतले. त्यानंतर मी Ceag कंपनीचा कारखाना, जेथें खाणींत वापरण्याकरितां विजेचे Accumulator असलेले Safety–lamps करतात, तो पहाण्याची व्यवस्था अलेक्स लॉरी कंपनीकडून करून घेतली होती. हा कारखाना मला फारच आवडला आणि विशेषतः Safety–lamps मध्यें वापरलें जाणारें विजेचे ल्हान ल्हान Bulbs कसें तयार करतात हें पहातांना मला फारच मौज वाटली. सर्व कामें यंत्राच्या सहाय्यानें होत होती, व प्रत्येक यंत्रावरती एक एक बाई होती, आणि त्या आपलें काम गात गात करीत होत्या.

ह्या नंतर माझा कार्यक्रम शेफिल्डला असलेलें Mechanization Training Centre व शेफील्ड University त खाणींत लागणाऱ्या सुरक्षिततेसाठीं चालु असलेल्या संशोधनाकरतां काम करणारी संस्था पहाण्याचा होता. माझी रहाण्याची व्यवस्था Private Hotel मध्यें केली होती. हॉटेलची व्यवस्था पहाणारी बाई वृद्ध असून प्रेमळ होती. मला असा अनुभव आला कीं येथील वृद्ध बायका फार प्रेमळ असतात. थोड्या वेळानें Colliery Engineering Works चें मॅनेजिंग डायरेक्टर निडहॅम यांना भेटण्यासाठीं टेलिफोन केला परंतु थोड्याच वेळांत येतो असें त्यांनीं सांगितलें. नंतर कांहीं वेळानें ते आले. आम्ही बऱ्याच गप्पागोष्टी केल्या. श्री. निडहॅम यांनीं मला त्यांच्या बरोबर रात्रीच्या जेवणाचें आमंत्रण देऊन रात्रीं मला ते नेण्यास येतील असें सांगून त्यांनीं माझा निरोप घेतला.

ठरलेल्या वेळेप्रमाणें ते मला नेण्यास आले व मला शेफील्डच्या अत्यंत बादशाही हॉटेलमध्यें घेऊन आले. त्यांच्याबरोबर त्यांच्या कंपनींत काम करत असलेल्या शेफील्ड युनिव्हर्सिटीतून पास झालेल्या श्री. मित्रा नांवाच्या एका हिंदी विद्यार्थ्यालाही त्यांनीं आमंत्रण दिले होते व तो तेथें उपस्थित होता. त्यांनी त्याच्याशी माझी ओळख करून दिली. नंतर आम्हीं आमचें ओव्हर कोट हॉटेल बाहेर असलेल्या एका परिचारिकेला देऊन जेवणाच्या मुख्य हॉलमध्यें गेलों. हा हॉल चांगलाच प्रशस्त असून बँड वगैरे ऑर्केस्ट्राच्या संगीतांत लोक जेवत होते. ज्यांना नृत्य करावयाचें होते ती जोडपीं

संगीताच्या सुरावर नृत्य करीत होती. लांब कोट घातलेले Waiters हळूच नमन करून फ्रेंच भाषेंत तयार असलेल्या पदार्थांची नांवें सांगत होते. मी श्री. निडहॅमच्या सहाय्यानें जेवणाचें पदार्थ आणण्यास सांगितले. त्यांची सुप नंतरची फिशची डीश आली असतांना मला त्याचा उग्र वास सहन होईना, तो इतका कीं मला ओकारी होते कीं काय असें वाटूं लागलें. मी महाप्रयत्नानें सांवरून धरलें व त्या मांशाच्या प्रकारास हातच लावला नाहीं. त्या हॉटेलमधून आंतून गरम हवामान ठेवलें होते तरी मला चांगलीच थंडी वाजत होती. आणि अशा स्थितींत तेथें असलेल्या बायका उघड्या खांद्यांनीं कशा नाचत होत्या याचें मला फार आश्चर्य वाटत होते. जेवण झाल्यानंतर श्री. निडहॅमनी आमची माफी मागून मला व मित्रांना गप्पा गोष्टी करण्यास सांगून ते निघून गेले, आणि जातांना मित्रांना शेफील्ड जवळची निसर्गशोभा मला दाखविण्यास सांगून गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं श्री. मित्रा शेफील्डहून २५–३० मैल दूर असलेले फॉक्स-होल ह्या ठिकाणीं घेऊन जाण्यास आले. नंतर आम्हीं दोघेही निघालों. खरोखर शेफील्डहून थोड्या अंतरावर सुंदर हिरवेगार गवत व लहान लहान झाडी असलेले डोंगर होते. तेथील सृष्टिशोभा अगदीं अवर्णनीय दिसत होती. लोकांच्या झुंडीच्या झुंडी स्वतःच्या मोटारींनी किंवा बसनें येत होत्या. लहान लहान विद्यार्थी सायकलवरून येत होते तर कांहीं जण चालत येत होते. आम्हीं जवळच असलेल्या एका उपवनांत गेलों. मला फार भूक लागली असल्यामुळें आम्ही एका कॉफी हाऊसमध्यें गेलों, व थोड्या वेळानें एक मध्यम वयाचा गृहस्थ खांद्याला झोळी अडकवून आला व आमच्या जवळ बसला. थोड्या वेळानें आमच्या गप्पा गोष्टी सुरू झाल्या. त्या माणसानें राजकारणावर अशा कांहीं सयुक्तिक टिका केल्या कीं माझें मन त्याच्या बुद्धिवादी बोलण्यानें चांगलेंच वेधलें गेलें. त्याच्या बोलण्याचा मुख्य उद्देश असा होता कीं इंग्लंडमध्यें जे इतके लोक स्वतंत्र आहेत तितके नाहींत. अजून सुद्धां कांहीं Public जागेंतून सर्व लोकांना शिरकाव करून देत नाहींत. त्या माणसानें आम्हाला असा उपदेश केला कीं तुम्हीं तुमच्या देशांत जें कांहीं लोखंडाचें कारखाने उभारतां त्यांत ब्रिटिश भांडवलशाहीला मुळींच शिरकाव करून देऊं नका. कारण ते लोक त्यांच्या स्वार्थाप्रमाणें कारखान्यांची प्रगति होऊं देतील एकंदरींत बोलण्यावरून ते कम्युनिस्ट असावे असा तर्क केला. परंतु कम्युनिझमबद्दल गोष्ट काढतांना ते थोडेबहुत कम्युनिझम विरुद्धहि बोलले. शेवटी त्यांना काय धंदा करता अशी पृच्छा केली असतां ते अेका शाळेच्या बागेची रखवाली करीत होते असें समजलें. हें ऐकून मी थंडगारच झालों. आणि इतक्या खालच्या दर्जाच्या लोकांत सुद्धां इतकी राजकीय जागृति असलेली पाहून मला कौतुक वाटलें.

नंतर संध्याकाळीं परत आल्यावर मला दुसरें कांहीं काम नसल्यामुळें मी सबंध शेफील्डच्या भोंवताली फिरणारी बस गांठली. आणि शेफील्डचा औद्योगिक भाग पहाण्याची संधी साधली. शेफील्ड म्हणजे इंग्लंडचें सर्वांत जास्त लोखंडाचें उत्पादन करणाऱ्या कारखान्यांचें शहर आहे. येथें खूप प्रचंड कारखाने आहेत. शहराच्या भोंवताली जिकडे तिकडे लोखंड गाळण्याच्या अजस्र भट्ट्यांतून धूर दिसतो व लोखंडाच्या निरनिराळ्या वस्तु बनविण्याचें कारखानें आहेत. बसचें चक्कर खूपच मोठें असल्यामुळें व मी जेथून चढलो ती जागा मी विसरून गेल्यास घोंटाळा होईल, म्हणून बस कंडक्टर बाईला माझ्या चढलेल्या जागीं मला उतरण्याची आठवण करा असें बजावून ठेवलें. परंतु एखादें वेळेस असें वाटायचें कीं ती बाई विसरून गेली तर मी परत पुढें तर निघून जाणार नाहीं ना अशी धास्ती वाटत होती. मी वरच्या मजल्यावरती बसलों होतो. मधें एके ठिकाणी ड्रायव्हर आणि कंडक्टर यांची बदली झाली व दुसरे कंडक्टर व ड्रायव्हर आले, परंतु मला वरती ऐकु आलें कीं त्या पहिल्या बाईनें दुसऱ्या येणाऱ्या बाईला सांगितलें कीं वर वसलेल्या हिंदी माणसाला एका ठिकाणीं उतरायचें आहे तर ती जागा आल्यावर उतरण्याची आठवण त्यास करून दे. आणि खरोखर ती जागा आल्याबरोबर त्या बाईनें मला वरती येऊन उतरण्यास सांगितलें. नंतर मी थोडा वेळ समोरच्या बागेंत बसून माझ्या निवासस्थानीं गेलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळी मला National Coal-Board नें चालविलेलें Mine Mechanization training centre पहायचें होतें. ह्या centre मधें कोळशाच्या खाणींत लागणाऱ्या सर्व प्रकारच्या यंत्रसामुग्रीचें शिक्षण इंजिनिअरपासून ते खालच्या दर्जाच्या माणसापर्यन्त देण्यांत येते. National Coal-Board च्या निरनिराळ्या दर्जाच्या लोकांना इथें शिक्षणास पाठवितात. तेथें ठराविक वेळेप्रमाणें ते शिक्षण झाल्यावर निरनिराळ्या मशिनरी उघडून दाखवितात व त्यांतील सर्व भागांची माहिती देऊन त्यांच्या फिटिंगची सर्व कल्पना देतात. त्याचप्रमाणें ती मशिनरी खाणींत कशी चालवायची ह्यांचासुद्धां अनुभव देतात. मला हे सर्व पहाण्यास फारच आनंद वाटला. आणखी एक दिवस तें सर्व पहाण्याची माझी इच्छा होती परन्तु मला वेळ नसल्यामुळें ते शक्य झालें नाहीं. दुसरें दिवशीं सकाळी १० वाजतां पोर्टोबेलो रोडवर असलेलें शेफील्ड युनि०च्या आश्रयाखालीं चालणारें, खाणीसाठीं सुरक्षितता कशी वाढवावी ह्याचें संशोधन करणारी संस्था बघण्याचा कार्यक्रम होता. परन्तु श्री. निडहॅम यांच्या कंपनीनें उभारलेला, दर ताशीं १५०० टन कोळसा स्वच्छ ( Washing करून त्याच्यांत असलेलें पत्थर वगैरे काढून टाकण्याचा कारखाना मी पहावा अशी त्यांची इच्छा होती—त्यामुळें मी आदल्यादिवशीच त्या संस्थेच्या डायरेक्टरांशीं गोष्ट करून मी दुपारी आलों तर चालेल

कां असें विचारलें होते व त्यांची कांहीं हरकत नसल्यामुळें मी श्री. निडहॅमचा शेफील्ड-हून ३०–३१ मैल दूर असलेला कारखाना पहाण्यास गेलो. मला घेऊन जाण्याकरितां श्री. निडहॅमनें एका कॅनडियन इंजिनिअरला व श्री. मित्रांना पाठवले होते. कारखाना खरोखर फार मोठा होता. व माझ्यादृष्टिनें त्यांत पहाण्यासारखें बरेंच होते. खाणींतून कोळशांबरोबर एक प्रकारचा पत्थर निघत असून तो जितका काढला जाईल तितका चांगला असतो. म्हणून निरनिराळ्या रितींनी ह्या पत्थराला कोळशांतून काढून टाकण्यांत येते. एका विशिष्ट पत्थराचें चूर्ण करून त्याचें व पाण्याचें मिश्रण करण्यांत येते व त्या मिश्रणांत खाणींतून येणारा कोळसा व पत्थर सोडतात व हवा सोडतात. त्यामुळें कोळसा तरंगतो व पत्थर खालीं पडतो. अशा रितीनें त्यांना वेगळें करण्यांत येते.

मला बरोबर १ च्या सुमारास त्या कॅनडिअन इंजिनिअरनें व श्री. मित्रानें पोर्टोबेलो रोडवर सोडले. नंतर तेथें त्या संस्थेत गेल्यावर मी तेथील डायरेक्टरांची चौकशी केली असतां मला निरनिराळ्या विभागांतून घेऊन जाण्यांत आलें. ह्या विभागांत पुष्कळच महत्वाचें संशोधनाचें काम चाललें होतें. एका विभागामध्यें, कोळशाचें कण श्वासाबरोबर फुप्फुसांत गेलें असतां कसें निरनिराळें पट बसतात हे दाखविण्यासाठीं खाणींतील मजुरांच्या फुप्फुसांची क्ष–किरणांनी घेतलेलीं चित्रेंच काय परन्तु कोळशाच्या कणापायीं होणाऱ्या फुप्फुसांच्या रोगानी ( Sglicoses ) मेलेल्या मजुरांची फुप्फुसें कापून तयार केलेल्या Slides पाहून कोळशाचें कण फुप्फुसांत इतकें पट तयार करूं शकतात ह्याचें आश्चर्य वाटलें.

दुसऱ्या विभागांत हवेंत उडणारें अत्यंत बारीक कण मोजण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारच्या यंत्रांचें संशोधन चालू होते. एका इंचाचा लाखावा भाग ( Micron ) इतके कण ह्या निरनिराळ्या यंत्रांनीं विजेच्या सहाय्यानें ( Electronic ) व प्रकाशाच्या सहाय्यानें मापणारें यंत्र ( Goniometres ) होते. निरनिराळ्या खाणींतून हवेचें ( Samples ) नमुने खाण विभागाचें ( Mines Department ) इन्स्पेक्टर ह्या प्रयोग शाळेंत पाठवत व त्याबद्दलचा निकाल ते लोक Mines Department ला कळवत असत. आपल्या देशांत अजून खाणींतून हवेचें Samples घेत नाहींत परंतु त्याकडे हिंदुस्थान सरकारचा कल हळू हळू वळूं लागला आहे. दुसऱ्या एका विभागांत खाणींत वापरलें जाणारें दिवे ( Safty lamps ) बहुतेक जे विजेचे असतात त्यांची प्रकाशक क्षमता ( Candle-Power ) मापण्यासाठीं व्यवस्था केलेली होती. व जरूरीपुरती प्रकाशक्षमता असल्यास ते दिवे खाणींत वापरण्यास परवानगी मिळण्याचें प्रमाणपत्र मिळत असे. शिवाय खाणींत वापरल्या जाणाऱ्या निरनिराळ्या विजेच्या लहान लहान यंत्रसामुग्रींतून Spark ( ठिणगी ) न होण्यासाठीं संशोधन चालू होते.

कारण विजेच्या ठिणगीनें खाणीत असलेल्या स्फोटक वायुंचा स्फोट होऊं शकतो. ह्यानंतर जवळच असलेल्या इमारतींत खाणींत वापरल्या जाणाऱ्या निरनिराळ्या लोखंडाच्या जिनसा कशा तुटतात ह्यांचें संशोधनाचें काम चालू होते. हा भाग फार मनोरंजक होता.

दुसरें दिवशीं मला येथून अंदाजे ४० मैल दूर असलेल्या 'बक्स्टन' येथें असलेली अशाच प्रकारची एक संस्था पहावयाची होती. मला घेऊन जाण्याकरितां N. C. Board ची गाडी आली व मी सकाळी माझें सामान घेऊन निघालों. ह्या सबंध रस्त्यावर फारच सुंदर सृष्टिसौंदर्य पहावयास मिळतें. बक्स्टन ही एक सबंध चुन्याच्या टेकडीवर असलेलीं उंच जागा असून इथें फक्त ह्या संस्थेचींच वसाहत आहे. तसेंच येथें मोठमोठ्या प्रयोगशाळा आहेत आणि निरनिराळ्या प्रकारचें संशोधन काम येथें चालू आहे. आंत गेल्याबरोबर मी तेथील डायरेक्टरांची भेट घेतली. त्यांनीं त्यांच्या सहाय्यकांना मला प्रयोगशाळा व संस्था दाखवण्यास सांगितलें. त्याच दिवशीं कांहीं खाणींत काम करणारें Eelectrical Engineers व खाण कामाचें शिक्षक ही संस्था पहाण्यास आलें होते. आम्हांला सर्वांना बरोबर घेऊन जाण्यांत आले व निरनिराळे विभाग दाखवण्यांत आलें. येथें विशेषतः खाणींत वापरलें जाणारें (Explosives) स्फोटक पदार्थ खाणींत कशा रितीनें सुरक्षितपणें वापरण्यांत येतील आणि ज्यामुळें आजूबाजूला त्यांच्या स्फोटानें कमी जाळ होऊन बाजूच्या स्फोटकवायु किंवा कोळशांच्या कणांचा स्फोट होणार नाहीं ह्यासाठीं प्रयोग चालू होतें व निरनिराळ्या कंपनीतून येणाऱ्या स्फोटक पदार्थंना त्यांच्यावर प्रयोग करून त्याप्रमाणें त्यांना खाणींत वापरण्यासाठीं परवानगी मिळत असे. दुसऱ्या एका विभागांत विजेच्या मोटर्स खाणींत असलेल्या स्फोटक गॅसमधें त्यांच्यांत स्फोट होऊनहि त्यांच्या स्फोटाच्या ज्वाळा बाहेर येऊं नयेत ह्यासाठीं Flame Proof ची परिक्षा घेण्यांत येत असे व त्याप्रमाणें परवाने देण्यांत येत असत. आणखी एका ठिकाणी स्फोटक वायुंचा स्फोट होऊन तो कसा व किती वेगानें जातो, त्याच्या मार्गांत निरनिराळ्या जाळ्यांचा अडथळा ठेवला तर तो कसा रोखला जातो याचें संशोधन चालू होतें.

दुसऱ्या विभागांतून खाणींत वापरल्या जाणाऱ्या रबरी पट्ट्यांना [Belt Conveyers] कशी आग लागते व रबरांवर विशिष्ट रसायनांचा [Penivillin Chloride] सारखा पट दिल्यावर ती आग कशी थांबते ह्यांवर व धातूच्या संघर्षणानें ठिणग्या पडून खाणींत कसा स्फोट होऊं शकतो, त्याचप्रमाणें कोळशाचें कण स्फोटांत कसा भाग घेऊं शकतात याचें निदर्शन करण्यासाठीं प्रयोग करून दाखवत. संध्याकाळच्या सुमारास सगळी संस्था दाखवून झाल्यानंतर त्यांच्या व्याख्यानगृहामधें आम्हांला नेण्यांत

आलें. तसेंच निरनिराळ्या शाखेचें मुख्य संशोधन करणारें अधिकारीसुद्धां आलें. नंतर तेथें चालत असलेल्या संशोधनाबद्दल आम्हांला कांहीं प्रश्न, चर्चा किंवा टीका करायला सांगण्यांत आलीं. पुष्कळ लोकांनी तेथें चालू असलेल्या संशोधनाबद्दल निरनिराळे प्रश्न वगैरे विचारलें व चर्चा केली. मी सुद्धां ह्या चर्चेंत भाग घेतला. दुपारी मला ह्या संस्थेचे Deputy–Director, Dr. Wilson हे जवळच्याच गावांत जेवणासाठीं घेऊन गेले. हें गांव म्हणजे मँचेस्टर विभागांतल्या कापड गिरण्यांचें धनाढ्य मालकांचें होतें व तेथें पुष्कळ मोठी प्रासादतुल्य घरें होती. परंतु हिंदुस्थानच्या कापड गिरण्यांचा उद्योग फार भरभराटीस आल्यानें मँचेस्टर वगैरेंच्या कापड गिरण्यांवर त्यांचा चांगलाच परिणाम होऊन एवढ्या मोठ्या घरांची व्यवस्था ठेवणें शक्य न झाल्यामुळें आतां ह्याच घरांचें रुपान्तर Public संस्थेमधें केलें होतें. त्यांनीं मजजवळ अशी तक्रार केली कीं, आजकाल त्यांच्या देशांत इतकें कांहीं उद्योग वाढल्यामुळें व उद्योगांत मजुरी पुष्कळ मिळत असल्या-मुळें आतां त्यांना घरमालकालाच काय परन्तु सरकारी संस्थेमधूनसुद्धां नोकरवर्ग मिळणें मुष्कील झालें आहे व त्यामुळें अधिकारी लोकांनाच बहुतेक जड कामें करावी लागतात.

ह्या संस्थेची पहाणी संध्याकाळीं आटपून मी संस्थेच्या डायरेक्टरांचें व डॉ. विल्सन यांचें आभार मानून निरोप घेतला. नंतर मला संध्याकाळचें गाडीनें मँचेस्टरला जायचें होतें. म्हणून ज्या गाडीनें मी संस्था पहाण्यास आलों होतो त्या गाडीनें मला परत स्टेशनवर पोंहचवण्यांत आलें.

•

## प्रकरण ८ व

# [ मँचेस्टर ]

संध्याकाळच्या सुमारास मी मँचेस्टरला आलों. तेथें स्टेशनपासून ५–६ मैल दूर फेलोफील्ड विभागांत असलेल्या ओकहिल हॉटेलवर गेलो. दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझी मुलाखत सायमन–कार्स (Cars) कंपनीच्या प्रयोगशाळेंत भेट देण्याची होती. त्यांची गाडी वेळेवर मला नेण्यासाठीं न आल्यामुळें मी त्यांच्या ऑफीसमधें फोन केला व जे गृहस्थ माझा तेथील कार्यक्रम आंखणार होते तें बाहेर गांवी गेल्यामुळें हा घोंटाळा झाला होता असें सांगण्यांत आलें. थोड्या वेळानें दुसरें एक गृहस्थ मला गाडी घेऊन आले व मला त्यांच्या प्रयोगशाळेंत घेऊन गेलें. ही कंपनी निरनिराळ्या उद्योगांवर संशोधन करणारी व सल्ला देणाऱ्या इंजीनिअरांची कंपनी आहे. हीचें सल्ला देण्याचें काम सबंध जगभर चालू असतें. मला ज्या गृहस्थांनी लॅबोरेटरी दाखवली तें गृहस्थ टर्कीहून परतलें होते. त्या कंपनीचें मुख्य क्षेत्र कोळशावर निरनिराळ्या दिशेंत संशोधन करण्याचें काम होतें. तसेंच खाणींतून बाहेर निघालेल्या कोळशांतून, त्याबरोबर आलेलें पत्थर वगैरे स्वच्छ करण्याचा संशोधनावर त्यांनीं कांहीं मालकी हक्क Patents मिळवलें होते. कोळशांतून कोक करण्याच्या भट्टया (ovens) व निघणाऱ्या वायूंतून निरनिराळें By Products तयार करण्याची त्यांची हातोटी होती. त्यांच्या अशा भट्टया हिंदुस्थानांत व इतर अनेक देशांत त्यांनी उभारल्या आहेत. त्यांचें मुख्य ऑफीस पुष्कळ मोठें असून प्रयोगशाळा ३–४ मजल्याच्या दोन मोठ्या भव्य इमारतींत आहेत. त्यांनीं मला सबंध प्रयोगशाळा दाखवून दुपारच्या वेळेस त्यांनी National-Coal-Board करतां जवळच्या दोन खाणीवर बांधले असलेले कोळसा शुद्ध करण्याचें कारखानें [ Washeries ] दाखवून मला परत संध्याकाळीं मांझ्या निवासस्थानीं पोंहोचते केले. त्यांच्या प्रयोगशाळेंत फिरत असतांना तेथें काम करीत असणारे हिंदुस्थानचे विद्यार्थी श्री. राव भेटले व त्यांनी मला संध्याकाळीं आपण फिरायला जाऊं व मी तुमच्या हॉटेलवर येईन असें सांगितलें होतें. ठरलेल्या वेळीं श्री. राव आले व मला मँचेस्टरची मुख्य बाजाराची जागा दाखविण्यास नेले. तेथील Town-Hall, मँचेस्टर गार्डीयनचें ऑफीस वगैरे सर्व दाखवून झाले. संध्याकाळ झाल्यानें दुकानें बंद झाली होती. त्यामुळें आम्हीं सर्व गोष्टी पाहील्यावर चांगले Window-Shopping केले. नंतर इंग्लंडचें प्रसिद्ध पत्र Daily-Express ह्यांचा छापखाना पहाण्यास गेलो. ह्या छापखान्याची इमारत ५ मजल्याची असून, सबंध इमारत कांचेच्या तावदानांची (Glass sheets) केलेली आहे. आणि

एकसुद्धां विट ह्या इमारतींत नाहीं. छापायचें सर्व काम बाहेरून बघतां येते. व नुकतेंच छापलेले वर्तमानपत्र भिंतीवर लोकांना वाचण्याकरीतां आंतून लावून ठेवतात. आम्हांला येवढेंच आश्चर्य वाटलें कीं पुष्कळ वेळां कांहीं लोकांना पसंत नसणारे विचारसुद्धां हें वर्तमानपत्र प्रसिद्ध करीत असते, परंतु ह्या इमारतीवर एकसुद्धां लहान दगड पडल्याची कुठेंही खूण दिसत नव्हती. कोणत्याही वर्तमानपत्राला आपल्या हिंदुस्थानांत अशी कांचेची इमारत बांधण्याचें धैर्य होईल कां ?

दुसऱ्या दिवशीं मला मेट्रोपोलीटन विकर्सचा कारखाना पहाण्याचा कार्यक्रम होता. हा कारखाना म्हणजे विजेच्या लहानापासून मोठमोठ्या अगदीं ५ हजार हॉर्स-पॉवरच्या मोटारी व विद्युत् उत्पादन करणारे तेवढेच मोठाले Generators व त्यांना चालविण्याकरितां वाफेची Turlines वगैरेचा अत्यंत मोठा प्रचंड कारखाना होता. हा कारखाना खूप दूरवर पसरला होता व त्याचे निरनिराळे भाग होते. माझा मुख्य कार्यक्रम म्हणजे खाणींतून कोळसा बाहेर काढण्याकरितां लागणारें Electric winders हें पहाण्याचा होता. म्हणून मी त्या विषयाच्या तज्ज्ञांची भेट घेतली होती. हे तज्ज्ञ अगदीं मूलभूत सिद्धान्तापासून फार रंगून सांगत. त्यांची Company आतां नवीन उपाय योजनेचें काम करते. त्या तज्ज्ञांपैकीं त्यांच्या ह्या शाखेचे Chief Engineer एक पोलिश गृहस्थ होते. ते फार विद्वान असून ते सर्व इतक्या शांतपणानें समजावून देत कीं त्यांच्या त्या पांढऱ्या शुभ्र दाढीकडे पाहिल्याबरोबर आपण जुन्या काळच्या एखाद्या ऋषींच्या आश्रमांतच आलों आहोंत असा भास होई. त्यांनीं स्वतः मला त्यांचा कारखाना दाखविला. आणि प्रत्येक लहान लहान भागाची समजेल अशी माहिती दिली. या कारखान्याचें आणखी एक वैशिष्ट्य असें कीं, तेथें पाहुण्याकरितां दुपारच्या जेवणाची व्यवस्था तेथील मोठ्या अधिकाऱ्यांबरोबरच असे. आणि पाहुण्यांनीं कुठें बसावें हेंहि नोटिसबोर्डावर लिहिलेलें होतें. जेवणापूर्वी दिल्या जाणाऱ्या मद्यपेयाकरितां त्यांच्या जवळ मद्याचा इतक्या प्रकारांचा सांठा असे कीं त्यांतील एखादें मद्य आपल्याला पसंत करायला सांगितल्यास आपला फार गोंधळ उडतो. 'शेरि' म्हटलें कीं लगेच 'तुम्हाला इंग्लिश, फ्रेंच, डच्च कोणची पाहिजे' असा प्रश्न विचारण्यांत येतो. आपण एखादें नांव सांगितलें कीं पुन्हां 'गोड पाहिजे कीं साधी' असें विचारतात व मग मात्र आपला गोंधळ उडतो.

संध्याकाळीं परत मी श्री. राव यांच्याबरोबर शहरांत गेलों. थोडा वेळ इकडे तिकडे फिरून आम्ही एक इंग्लिश Ice-reove-म्हणजे नाट्यगृहाच्या रंगमंचावर पाणी गोठवून बर्फ तयार करायचें व त्या बर्फावर नाटकाचे प्रयोग करावयाचें, ते पहाण्यास गेलो.

सगळ्या पात्रांनीं निरनिराळे व सुंदर रंगीत पोशाख करून बर्फावर चालण्याकरितां लहान चाकाचे जोडे ( Skating shoes ) वापरून सुंदर तऱ्हेचें त्याचे Skating कौशल्य दाखविलें तें पहातांना फारच मजा वाटली. पात्रांवर निरनिराळ्या रंगाचा प्रकाश झोत टाकीत व बर्फावर त्यांचें प्रतिबिंब उठें; तें मला फार नयनमनोहर वाटे.

दुसऱ्या दिवशीं शनिवारीं मला व्हिगनला जायचें होतें. पण श्री. रावांनीं मला तेथील बेल व्हयू हा मँचेस्टरचा प्रसिद्ध भाग पहाण्यास सांगितल्यामुळें मी व्हिगनच्या Grand-Hotel ला ( जिथें माझी रहाण्याची व्यवस्था झाली होती ) मी टेलिफोननें कळविलें कीं, मी शनिवारीं न येतां रविवारीं येईन. आम्ही दुपारीं बेलव्ह्युला जावयास निघालों. बेलव्ह्युला तेथल्या कार्पोरेशननी चालविलेला बाग असून त्यांत चांगल्या प्रकारचें प्राणी संग्रहालय होतें व इतर मनोरंजनाची निरनिराळीं साधनें होती व ह्यांत मोठमोठाल्या सर्कशी वगैरे सुद्धां येत असत. त्या वेळेस प्रख्यात रशियन स्टेट सर्कस आली होती. प्रवेश तिकिटें काढून आम्हीं आंत गेलो व प्राणि संग्रहालय पहाण्यास सुरुवात केली. तेथील कांहीं जागेंतून पुन्हा निराळीं तिकिटें असायची Sea-lion चीं एक निराळी जागा बांधून घेतली आहे व त्यांना ठराविक वेळेस जेवण देण्यांत येते. त्यावेळेस त्यांच्या-कडून अनेक कामें करून घेण्यांत येतात. प्रेक्षकांना बसण्याकरतां सर्कशीसारखें चढ-उताराचें बांके आहेत. Sea-lion जवळून काम करून घेण्याकरतां एक बाई येते व त्यांचे जवळून अनेक मनोरंजन करणारी कामें करून घेते. उदाहरणार्थ ती त्यांच्यामध्यें रबराचा चेंडू फेकतें व ते त्यांच्या नाकानें व्यवस्थितपणें चेंडूशी खेळून दाखवतात. त्याचप्रमाणें निरनिराळ्या कमानींतून व उंच जागेवरून उड्या मारणें, शिट्या फुंकणें व ढोल वाजवणें तसेंच गाणें गाऊन दाखविणे वगैरे अनेक मनोरंजनाची कामें ते करून दाखवित.

ह्या बागेंत मद्यपेय करणाऱ्या गिनेस कंपनीचें एक अतिशय सुंदर मोठे घड्याळ आहे. हे घड्याळ एका कपाटांत असून त्याची खालची दारें लावलेली आहेत. त्याच्या जवळ एक लहानसा किल्ला आहे. दर १५ मिनिटांनी किल्ल्याच्या बुरुजावरचें घुमटाकृति-दार उघडतें व त्यांतून एक खरोखरच्या माणसाच्या आकाराची एक शिपायाच्या आकृति बाहेर पडतें. तो शिपाई एक घंटा वाजवितो. इतक्यांत किल्ल्यावरच्या खोलीची खिडकी उघडते, त्यांतून एक म्हातारा गृहस्थ डोंके बाहेर काढून मासे पकडण्या-करितां काठी बाहेर काढतो व गळाने चित्राचें तयार केलेलें मासे वर खेंचतो. त्या बरोबरच किल्ल्याच्यावर सूर्याची आकृति गोल गोल फिरते व त्याच्याजवळ असलेली एक छत्री उघडतें व तिच्यातून विदुषकाच्या आकृतिची चित्रें गोल गोल फिरावयास लागतात. त्या सुमारास कपाटाचें खालचें दार उघडते व त्यांत ठेवलेल्या गेनेसच्या बाटलीच्या भोंवती बदक वगैरे

प्राणी फिरतात व एक प्रकारचा सुंदर आवाज काढतात. कपाटांत Every time is Ginis Time म्हणजे गिनिश घ्यायला कोणतीही वेळ चालते, असें लिहिलेलें असते. मनोरंजनासाठीं निरनिराळे प्रकार आहेत. एका ठिकाणीं Bobs नांवाचें लोखंडाचें गर्डर्सचें पुलाच्यासारखे निरनिराळे नागमोडी आकाराचें बांधकाम केलेलें आहे व त्याच्यावर जाण्याकरिता लहान लहान दोन माणसें बसण्याच्या गाड्या असतात. मला रावांनीं ह्या गाड्यांमध्यें बसून पुलावरतीं जाण्याचें आग्रहानें सांगितलें. कारण ही मँचेस्टरची फार आठवण ठेवण्यासारखी वस्तू होती. मी १ शिलिंगचें तिकिट काढून गाडींत बसलों. एका वेळेस ८–१० गाड्या सोडतात. व एका गाडींत २ माणसें बसण्याची व्यवस्था असते. ह्या गाड्यांना जमिनीपासून अंदाजे १८० फूट उंचावर गर्डर्सच्या चढणांनीं घेऊन जातात. गाड्या फारच जोरानें चालतात व १०० फूट आल्यावर बहुतेक सबंध मँचेस्टर दिसते. गाड्या जरी फारच वेगानें चालत होत्या, तरी मला सर्वांत उंच शिखरावर येईपर्यंत कांहीं विशेष वाटलें नाहीं. परंतु ह्यानंतर गाड्यांना एकदम जोरानें खालीं सोडून दिल्यामुळें व परत दुसऱ्या चढणावरतीं उंच घेऊन जाण्यामुळें व अशा रितीनें अंदाजे १० मिनिटें ह्या गाड्या अत्यंत वेगानें चढायच्या व उतरायच्या व निरनिराळ्या वळणामुळें शरिर गाड्यांतून फेकलें जायचें. मी अगदीं डोळे बंद करून, शरिराचा एक चेंडू करून, मुठी बांधून हा खेळ आतां केव्हां बंद होतो याकडे माझें लक्ष लागलें व गाडींत बसण्याची चुक केल्याबद्दल पश्चात्ताप करीत बसलों. मी रावांवर चांगलाच संतापलों होतो. अंदाजें १० मिनिटांनी गाड्या थांबल्या व मला थोडी चक्कर येत असल्यामुळें मी जेमतेम शरिर गाडीतून बाहेर काढलें व उतरलों. माझ्यासाठीं श्री. राव खाली वाट पहात होते. व खदखदां हंसत होते. मी उतरल्यावर त्यांनी मला विचारले आतां राहील ना मँचेस्टरची आठवण? माझा त्यांच्यावरील राग हळू हळू उतरला जात होता. मी माझें मन सांवरून 'हो' असें म्हटलें, ह्या अद्‌भुत अनुभवामुळें माझें मन बराच वेळ खिन्न होतें. आणि त्यानंतर मला आपण फार मोठ्या संकटातून बाहेर पडलों असें वाटूं लागलें. माझ्या आतेष्टांना त्याचा अनुभव न घेण्याबद्दल मी नेहमी बजावित असे. ह्या प्रसंगाबद्दल मी विचार करीत होतों, तोंच माझ्या शेजारच्या गाड्यांतून ८–१० वर्षांची मुलें जी गाड्या चालू असतांना मोठ्यानें ओरडत होती, ती गाड्या थांबल्यावर हसत हसत बाहेर पडली. ह्या गोष्टीचें मला खूपच आश्चर्य वाटलें. आणि ह्या लोकांना असल्या करमणुकी आवडतात तरी कशा ह्याचें मला राहून राहून नवल वाटत होतें. अशाच प्रकारची दुसरी अनेक करमणुकीची साधनें तेथें होती. सिनिक रेल्वे हीसुद्धां अशीच बांधून काढलेल्या पहाडावर व उंच जागेवर चढून डबे तसेच सोडून द्यायचे आणि हे डबे तयार केलेल्या बोगद्यांतून जायचें तसेंच मधून थोड्या पाण्यांतूनसुद्धां

जातात. त्याचप्रमाणें निरनिराळ्या चक्क्यासुद्धां असतात. हा सर्व भाग पाहून झाल्या-नंतर आम्ही रशियन सर्कस पहायला जायचें ठरविलें, त्यामुळें आम्हीं बाहेर आलो आणि तिकीटें काढण्यासाठीं उभे राहीलो, परंतु सर्व तिकीटें संपल्यामुळें आम्हीं तेथल्याच मैदानावर चालत असणाऱ्या मोटरसायकलीची शर्यत पहाण्यास गेलो. ह्या शर्यतीमध्यें ६–७ माणसें मोटरसायकलीवरती एका आंखून दिलेल्या वर्तुळाभोंवती फारच जोरानें दौडायची. हें काम अत्यंत धाडसाचें वाटायचें. प्रेक्षकगण त्यांच्याकरितां मुद्दाम उभारलेल्या जागेतून बघत असत. या मोटरसायकलीवर घोड्यांच्या शर्यतीप्रमाणें शर्यतीसुद्धां लावत असत. पुष्कळ वेळां मोटर सायकली चालवणाऱ्यांना अपघातसुद्धां झालेले आहेत.

बरीच रात्र झाल्यामुळें आम्हीं 'बेल–व्ह्यु' सोडले आणि मला दुसऱ्या दिवशीं व्हिगनला जायचें असल्यामुळें, मी श्री. रावांचा निरोप घेतला. आणि मी माझ्या निवासस्थानीं परतलो. येथें मी रहात असलेल्या 'ओकहिल' हॉटेलबद्दल आणखी कांहीं गोष्टी निर्दिष्ट करणें जरुरीचें वाटतें. मी ज्या दिवशीं 'ओकहिल' हॉटेलवर आलों, आणि माझी पेटी वर माझ्या खोलींत घेऊन जाण्यास, स्वागत करणाऱ्या बाईला सांगितलें. तेव्हां तिनें आपला नवरा बाहेर गेला असें सांगितलें, नाहींतर त्याला आपण पेटीवर नेण्यास सांगितलें असते असें सांगून स्वतः बॅग उचलण्याची इच्छा प्रदर्शित केली. परंतु मी तिला तसें न करूं देतां माझी बॅग स्वतःच माझ्या खोलींत घेऊन गेलों. मी माझ्या खोलीची किल्ली मागतांच तिनें मला किल्ली दिली. परंतु त्या किल्लीनें माझ्या दाराचें कुलुप उघडेना. म्हणून तिला त्याबद्दल मी विचारलें असतां तिनें सांगितलें कीं आमच्याकडे खोल्यांना कुलुपें लावायची जरूर नाहीं. ही किल्ली हॉटेलच्या बाहेरच्या दाराकरीतां आहे आणि रात्रीं ११ वाजल्यानंतर हॉटेलचें दार बंद होतें. जर तुम्हांला येण्यास उशीर झाला तर हॉटेलच्या बाहेरील दाराचें कुलूप ह्या किल्लीनें उघडून आंत या. बाहेरच्या कुलूपाची ही किल्ली आहे. इंग्लडच्या मी आतांपर्यंत राहिलेल्या हॉटेल्समध्यें तुमच्या खोलीची एक भली भक्कम लक्कडीं किल्ली मिळते व त्याला एक सांखळीची पट्टी जोडलेली असते. तसेंच त्यावर हॉटलचें नांव आणि पत्ता लिहिलेला असतो. तुम्ही केव्हांहि बाहेर गेलांत कीं, खोलीची किल्ली तुम्ही तुमच्याबरोबर घेवून जावयाचें नसतें परन्तु ती हॉटेलचें मॅनेजर किंवा receptionist जवळ द्यायची असते. कारण सकाळच्या वेळेस तुमच्या गैरहजेरींत तुमची खोली उघडून ती स्वच्छ करून तिथें तुमचा बिछाना घालायचा असतो व म्हणून ती किल्ली हॉटेलच्या परिचारीकांना जवळ टेवावी लागतें. तुम्हीं जर किल्ली चुकून घेऊन गेलांत तर पोस्टाचें तिकिट त्या लांकडाच्या पट्टीला लावून पोस्ट करायची म्हणजे ती हॉटेलच्या लोकांना परत मिळते. ह्या ओक-हिल हॉटेलमध्यें ती बाई व तिचा नवरा हें दोघेहि हॉटेलमधें काम करीत होते. त्या बाईचा नवरा बहुतेक लिहिण्याचें काम करीत

असें व जेवणाच्या खोलींत Waiter चें कामहि तोंच करीत असे. त्याचें कपडे मात्र सुशिक्षित माणसासारखे असत तसेंच तो फार विनोदी वृत्तीचा दिसत होता. प्रथम मला असें वाटलें होते किं हा हॉटेलचा मॅनेजर असावा. ह्या हॉटेलांत तुम्हीं तुमचें जोडे पॉलिश करून घेण्याकरितां जर रात्री झोंपण्यापूर्वी खोलीच्या बाहेर काढून ठेवलेंत तर पहांटेस परिचारक तुमचें जोडे पॉलिश करून ठेवतो. एके दिवशीं मी सकाळीं लवकर ऊठून खोलीचें दार उघडून पहातों तो मला मॅनेजर वाटणारा हा तरुण गृहस्थ माझ्या जोड्यांना पॉलिश करण्याचें काम करतांना दिसला. तेव्हां मी त्याला आश्चर्यानें विचारलें किं, तुम्हीं मॅनेजर असून जोडे कां स्वच्छ करतां? तुमच्या हॉटेलचा परिचारक रजेवर गेला आहे कां? त्यावर तो म्हणाला, मी हॉटेलचा मॅनेजर नसून मालक आहे परन्तु मी व माझ्या बायकोनें खूप कर्ज करून हें हॉटेल भाड्यानें घेतलें आहे व कर्ज फेडण्याकरितां आम्हांला काटकसर करावी लागते.

ह्या हॉटेलमधें एक आर्जेंटिनामधील स्पॅनिशबाई व तिचा नवरा असें दोघेजण रहात होते परंतु तिच्या नवऱ्याला इंजिनिअरिंग कंपनींत ट्रेनिंगकरतां पाठविलें होते. त्यावेळेस आम्हीं हॉटेलांत रहाणारें कांहीं हॉटेलच्या उठण्याबसणाच्या खोलींत बसत होतो व ही Spanish बाई तिच्या मोडक्या तोडक्या इंग्रजींत अर्जेंटिनाबद्दल आम्हांला चांगलीच माहिती द्यायची. ती मधून मधून बोलतांना अडखळत बोलायची परन्तु लगेंच तिची Spanish Dictionary उघडून तिला लागणारा शब्द पाहून तिचें बोलणें चालू ठेवायची. आमच्या लोकांचा वेळ त्यांतून निर्माण होणाऱ्या विनोदांमध्यें निघून जायचा.

मला दुसरें दिवशीं व्हिगनला जायचें असल्यामुळें आम्ही व्हिगनच्या बसस्टॉपवर आलों व तेथें बस गांठली. व्हिगन येथून ४० मैल दूर होतें. मी दुपारच्या सुमारास पोहोंचलों. व्हिगन हें १५–२० हजार वस्तीचें गांव होते परन्तु हा संबंध भाग कोळशाच्या खाणीचा असल्यामुळें इथें बरीच मोठी Technical-Colleges होतीं. तेथें Mining-Engineering चें शिक्षण सुद्धां दिलें जात होतें. संध्याकाळचा वेळ मी तेथील बागेंत घालविला. ही बाग फारच मोठी होती व चौफेर हिरवळ असून त्यांत सुंदर फुलें डोलत होती. दुसरें दिवशीं सकाळीं मला Coal-Board च्या कार्यक्रमाप्रमाणें, ॲलेक्झांडर नांवाचें तरुण गृहस्थ त्यांची गाडी घेऊन नेण्याकरितां आले. श्री. ॲलेक्झांडर हे लंडन युनिव्हर्सिटिचे Mining-Engineering चें graduate असून त्यांच्या वडिलांची सुद्धां लंडनला Consulting-mining-Engineering म्हणून Practice होती. कोळशाच्या खाणींत कोणतेही जबाबदारीचें काम करण्याकरितां तेथल्या Board of trade नें नेमलेल्या निरनिराळ्या परिक्षा पास व्हाव्या

लागतात. परन्तु अशाच परिक्षांहि कोळशाचें खाणीचें मॅनेजर होण्यास पास व्हाव्या लागतात. University चें कितीहि उच्च शिक्षण झालें असलें तरी जोंपर्यन्त ह्या परिक्षा पास होणार नाहींत तोपर्यन्त कोणतेहि जबाबदारीचें काम खाणींत मिळूं शकत नाहीं. University तून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना National Coal Board ह्या परीक्षा पास होण्याकरितां लागणारें अनुभवाचें शिक्षण (Training) देते व त्याला Directed Practical Training असें म्हणतात. श्री. ॲलेक्झांडर अशाच प्रकारचें Training घेत होते. त्यांना National-Coal-Board नें माझ्या व्हिगनमधील आठवड्याच्या दरम्यानच्या मुक्कामांत सर्व खाणी दाखविण्याचें काम सांगितलें होते. ह्या दिवसांत मी बऱ्याच मोठमोठ्या खाणी बघितल्या व खाणींत लागणाऱ्या अनेक प्रकारच्या निरनिराळ्या Machinery ची माहिती करून घेतली.

माझा इंग्लंडमध्यें रहाण्याचा कार्यक्रम हळूं हळूं संपत येत होता व इंग्लंडहून मी पुढें अमेरिकेला जावें कीं नाहीं याचा विचार एकसारखा डोक्यांत येत होता. अमेरिकेस जाण्याकरितां व्हिसा व ६०० डॉलर्स घेण्याची परवानगी Reserve-Bank कडून मिळाली होती परन्तु माझें अमेरिकेंत जाण्याचें निश्चित नसल्यामुळें मी डॉलर्स घेण्याचा परवाना मुंबईस चुलत भावाजवळ ठेवला होता. डॉलर्स घेण्याकरितां एक सही केलेला कोरा चेक व दुसरा कोरा चेक लंडन न्यू यार्कचें तिकिट काढण्याकरितां त्याच्याजवळ निघण्यापूर्वी देऊन आलों होतो. मी न्यू कॅसलहून त्याला डॉलर्स घेण्याबद्दल व लंडन न्यू यार्क विमानाचें तिकिट घेण्याबद्दल कळवलें होतें. मी असा विचार केला कीं जायचें तर कांहीं नक्की नाहीं तरी ह्याचें पैसे कांहीं फुकट जात नाहींत कारण ते केव्हांहि मिळूं शकतील. जेव्हां मी व्हिगनला होतो तेव्हां एकदां खाणींतून परत आल्यावर मला हॉटेलच्या Manager नें तुमचा Trans-World-Air Passage चा Trunk-Call आला असून त्यांना तुम्ही जरूर टेलिफोन करा असें सांगितलें तेव्हां मला वाटलें होते कीं माझ्या Air-Passage बद्दल त्यांना कांहीं बोलायचें असेल म्हणून मी त्यांनी दिलेल्या नंबरवर लंडनला Trunk-Call केला. Trunk-Call करतांना त्यांनीं मला कळवलें कीं, American-Express कंपनीकडून त्यांना माझ्या भाड्याचें पैसे मिळाले होते व न्यू यार्कला जाण्यासाठीं कोणत्या तारखेचें विमान सोईस्कर पडेल ते सांगण्यासाठीं हा टेलिफोन करीत आहोंत.

माझा इंग्लंडमधील कार्यक्रम २४ जुलैला आटपत असल्यामुळें मी त्याना २६ जुलै ही तारीख कळवली. त्यानंतर एक महिना अवधी असूनहि ह्या लोकांनीं जे काम

पत्रव्यवहारानें होऊं शकलें असतें तें काम करण्याकरितां Trunk-call केला होता. व मलाहि करणें भाग पाडलें होते. परंतु त्यांतल्या त्यांत मला एवढें आश्चर्य वाटलें होते किं मी थोड्या दिवसापूर्वींच माझ्या चुलत भावाला मुंबईच्या American-Express ला चेक देण्याकरितां कळवलें होते व इतक्या लवकर माझ्या Air passage चा मी ७००० मैल दूर असूनहि तडकाफडकी कसा निकाल लागला. मुंबईस मला सोसाव्या लागलेल्या त्रासाची आठवण झाली. थोड्याच दिवसांत मला लंडनच्या American Express कंपनीकडूनसुद्धां पत्र आलें व त्यांनी ६०० डॉलर्स त्यांच्या लंडनच्या ऑफिसमधून घेऊन जाण्यास कळविले होते. नंतर माझा मुक्काम Leigh लहि या जागीं होता. तेथें कोर्टस् हॉटेलमध्यें माझी रहाण्याची व्यवस्था केली होती. शनिवार असल्यामुळें मी गांव बघायला निघालों व तेथेंच भरत असणारा बाजार पहाण्यास गेलों. तेथेंहि आपल्याकडे भरतो असा उघड्या जागेंत शनिवारी आठवड्याचा बाजार भरायचा. तसेंच बहुतेक जिनसा विकत मिळायच्या. फिरतां फिरतां मी बघितलें किं, इथून ब्लॅकपूल नांवाच्या जागीं जाण्याकरितां रविवारची स्पेशल Execursion Service चालवायची. मला तेथें जाण्याची इच्छा असल्यामुळें ६ शि. ६ पेन्सचें तिकिट काढून रविवारी सकाळी ब्लॅकपूलच्या बसमधें बसलों. येथें केवळ मजेकरितां जाणारे पुष्कळ लोक दृष्टीस पडलें. आमची बस सुमारें ८ वाजतां निघाली व ब्लॅकपूलला अंदाजे ११ च्या सुमारास पोंहचली. ब्लॅकपूल हे लीहपासून ४० मैलांच्या अंतरावर असेल. बस वाटेंत एका ठिकाणीं लोकांना चहापिण्याकरितां थाबली होती. बसस्टँडजवळ कांहीं घोड्याच्या गाड्या आढळल्या. तेथील लोक ह्या गाड्या भाड्यानें करून समुद्रकाठीं जात होते. इंग्लंडमध्यें सर्वांत प्रथमच मी त्या गाड्या बघितल्या व मजेकरितांच त्यांचा उपयोग केला जात होता. समुद्रकांठ फार दूर नसल्यामुळें मी पायींच जाण्याचें ठरविलें. एक दहामिनिटांत समुद्रकिनाऱ्यावर आलों. तेथें ब्लॅकपूलची खरी मजा दृष्टीस पडली.

ब्लॅकपूल हें इंग्लंडचें फारच मोठें हवाखाण्याचें ठिकाण अजून लोक इंग्लंडहून शनिवारी, रविवारी मजेकरितां येतात येथील समुद्रकांठ चांगलाच लांबच्यालांब असून ठिकठिकाणीं लोकांचें थवेच्याथवे दिसतात. समुद्रकांठाच्या दुसऱ्या बाजूला अगदीं सुंदरपैकी घरें बांधलेली आहेत व बहुतेक Hotels आहेत. सबंध रस्त्यावर निरनिराळ्या रंगाचें रंगीत दिवे लावलेलें आहेत. हें रात्री लागतात. समुद्राच्या वाळुवर अनेक लोक सूर्याच्या प्रकाशाचा आस्वाद घेत पडलेले असतात. कित्येक लोक समुद्रस्नानहि करण्यासाठीं पोहतांना दिसतात. इथें लोकांच्या करमणुकीसाठीं अनेक साधनें आहेत त्याचप्रमाणें त्यांच्या खाण्यापिण्याकरितां पुष्कळ फेरिवाले लहान लहान दुकानें घेऊन बसलेले दिसतात. मोटरबोटींतून अनेक लोक समुद्रांत जलविहार करायला जातात. ह्या नौका समुद्रावरील

लाटांवर इतक्या कांहीं हेल्कावे घेत असतात किं पहाणाऱ्यास भिती वाटते. समुद्राच्या दोन्हीं कांठावर फारच सुंदर बागा आहेत व अर्ध्या रस्त्यावर दोन मोठे धक्के बांधलेले आहेत तसेंच ह्या धक्क्यांवर सुंदर रेस्टॉरंटस् व इतर करमणुकीचे खेळ चालू असतात. धक्क्यांना लागून ब्लॅकपूलहून जवळच्या गांवांत जाण्यासाठीं एक बोट सर्विससुद्धां आहे. धक्क्यावरून अनेक लोकांचा मासे पकडायचा उद्योग चालू होता मी समुद्रकांठावर चालत होतो व आजूबाजूची शोभा पहात होतो इतक्यांत एक सुंदर मोठ्या राजवाड्यासारखी इमारत माझ्या दृष्टिस पडली. ती इमारत माझ्यापासून बरीच लांब होती परन्तु ती इमारत कसली आहे ने बघून परत फिरायचे असे ठरवून मी जात होतो. तेथें पोंहचल्या-वर त्या इमारतीबाहेरची पाटी मी वाचली व अगदीं आश्चर्यचकित झालों कारण तिथें 'लँकशॉयर डिस्ट्रिक्ट कोल माइन वर्कर्स कन्व्हेलेसन्ट होम' अशी अक्षरें लिहिलेली होती. म्हणजे कोळशाच्या खाणींतील कामगारांकरितां त्यांना दुखण्यांतून बरें होण्यासाठीं व प्रकृति सुधारण्यासाठीं हें गृह होतें. तें N. C. Board चालवीत होतें. मला वाटलें किं ब्लॅकपूलमधील सर्वांत मोठें उत्कृष्ठ असें हेंच गृह असावे. ह्यानंतर मी परत फिरत असतांना मला कांहीं विशिष्ट Swiming Pool बांधलेलें दिसलें. तें बघण्यासाठीं तिकिट काढून आंत गेलो. नंतर नंतर ब्लॅकपूलमधील प्रसिद्ध Museum व अंदाजे ३५० फूट उंच असलेले Tower बघण्याकरितां गेलो. Museum पहाण्यासाठीं २ शिलींगाचें तिकिट होते. आंत प्राणी संग्रहालय (२००) चित्रकला प्रदर्शन वगैरे अनेक गोष्टी होत्या. ५ व्या मजल्यावर सुंदरपैकीं Terrace Garden सुद्धां होती. इथें निरनिराळ्या कौटुंबिक प्रसंगांचें चित्रांनी तयार केलेले नमुने 'पेनि' टाकल्यावर मूक अभिनय करून दाखवायचें. जवळच एक मोठे नाट्यगृह होते. तेथें चांगल्या कलावंतांची नाटकें व संगीताचा कार्यक्रम व्हायचा. ह्याच रस्त्यावर आणखी पुढें लोकांच्या मनोरंजनासाठीं अनेक लहान लहान दुकानें होती व निरनिराळें कलाकौशल्य पहाण्यासाठीं निरनिराळें खेळ होते. आणखी पुढें कांहीं विविध विचित्र गुण असलेलें माणसांचें प्रदर्शन भरत होते तर २,३ ठिकाणीं संकटांत सांपडलेल्या बायकांचें आत्मवृत्तांत त्यांच्या तोंडून ऐका असें म्हणून २,३ बायकांना उभ्या करून कोणी कपोल कल्पित वृत्तांत सांगण्याच्या बहाण्यानें त्या कशा एका खराब टोळींत सांपडल्या गेल्या व त्यांचें कसें हाल झालें असें सांगण्याच्या बहाण्याखालीं त्यांचें अगदीं बहुतेक नग्न अवस्थेंत प्रदर्शन करीत होत्या. इंग्लंडमधील कायद्याप्रमाणें असें करण्यास कांहीं हरकत नाहीं व हे पहाण्यास चांगले सभ्य लोक व स्त्रियासुद्धां जात असत.

हळू हळू वेळ झाल्यामुळें मी बस स्टँडवर येण्यास निघालों व लीड्सला जाणारी बस गांठली. लीड्सला मी अंदाजें १० च्या सुमारास पोंहचलों. दुसऱ्या दिवशीं सकाळी माझा

मँचेस्टर Division मधील आद्यावत् मशिनरींनी फिट केली असलेली Mosley-Common-Colliery ला जायचा कार्यक्रम होता. स्टँडवर गेलो व तेथें जायच्या बसची वाट पहात होतों. तेथें मला एक Polish कामगार भेटला व मी त्याच्याशीं गप्प मारण्यांत वेळ घालविला. हा पोलिश कामगार पोलंडहून निर्वासित म्हणून आला होता. त्यानें मला पोलंडमधील रशियन विरुद्ध ( हुकमती राजवटी ) खूपच कागाळ्या सांगितल्या तसेच कम्युनिस्ट तंत्राबद्दल त्यांनें चांगलाच विरोध दर्शविला. कम्युनिस्ट तंत्राविरुद्ध तक्रार करणारी माणसें मला बरीच भेटली.

Mosly-Common-Colliery ही एका दिवसांत एका खाणींतून ६–७ हजार टन कोळशाचें उत्पादन काढते. हें उत्पादन हिंदुस्थानच्या कोणत्याहि कोळशाच्या खाणींच्या मानानें अधिक आहे. तेथील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कोळशाच्या व त्याच्या वरच्या थरांतून (Strata) जो स्फोटक वायु (Marsh-gas) निघतो, त्याला काम करण्याच्या जागेपासून निरनिराळ्या दिशेंत मोठमोठाली बोअरींग करून त्यांच्यांत (Pipes) लोखंडाचे नळ घालून (ह्या Pipes) त्यांतून अगदीं खाणीच्या बाहेर काढलेला आहे तेथून हा वायु Boiles मध्यें जाळतात व त्याला फुकट जाऊं देत नाहीं. मी तेथें असतांना मँचेस्टर शहराला लागूनच असलेली एक खाण बघावयास गेलो व तेथें अनेक विशिष्ट गोष्टी होत होत्या. एके ठिकाणीं खालच्या थरापासून वरच्या थराला येण्यासाठीं खालून वर विहीर खोदण्याचें काम चालू होते. निरनिराळे कोळशाचे जोडणारे पत्थरांतून बोगदे खणत होते. हे बोगदे ५–७ मैल लांबीचे होते. निरनिराळ्या थरांतून कोळसा ह्या बोगद्यांतून आणण्याचा हेतु होता. ह्या बोगद्यांतून मोठमोठाली Locomotives कोळशाच्या गाड्या खेंचणार होते व नंतर ह्या सर्व गाड्या जमिनीवर जाणार होत्या.

क्रोट्स् हॉलखालीं इंग्लंडच्या दुसऱ्या हॉटेलप्रमाणें मद्यविक्री केंद्र होतें. तेथें गांवातली चांगल्या प्रकारचे लोक जमायचे. मी सुद्धां माझा वेळ घालविण्यासाठीं बिअरचा एखादा ग्लास घेऊन बसत होतो. जर लोकांशीं ओळख करून घ्यायची असेल तर अशा मद्यापानगृहांत ( ज्याला Pub म्हणतात ), संधी मिळतें. ज्या प्रमाणें आपण आपल्या मित्राला पाहुणचाराला रेस्टारंटमधें घेऊन जातो त्याप्रमाणें इथल्या देशांत आपल्या मित्राला वेळ घालविण्यासाठीं अशा Pub मधें घेऊन जातात. मला असें सुद्धां कांहीं लोकांनीं सांगितलें किं, चांगला शिष्टवर्ग अशा Pubs मधें जात नाहीं व गेलाच तर चांगल्या हॉटेलच्या बार मधें जातो. आमच्या हॉटेलच्या Bar मधें गांवातील शिष्ट लोक येत होते. त्यापैकी एक Supdt. of Police त्या गांवच्या निरनिराळ्या जागां Supdt. त्या गांवच्या म्युनिसिपालिटीचा retired chairman वगैरे लोक असायचे व माझी त्या

लोकाशी लवकरच ओळख झाली. साधारणपणें १० वाजल्यानंतर बारमधील पिणें बंद करायचें असतें व त्याआधीं तुमचा ग्लास लवकर संपवा असा इषारा बारच्या परिचारिका देत असतात. परंतु गांवांतील पोलीस सुप. हा इतका कडक नसल्यामुळें ११ वाजेपर्यंत पिणें चाले. आमच्याही गोष्टी रंगांत येत असत. १२ वाजेपर्यन्त वेळ अगदीं विनोदानें जायचा. लीहच्या माझ्या १ आठवड्याच्या मुक्कामानंतर मला चेस्टर-फील्डला जायचें होतें. बस पकडण्याकरितां मी रस्त्यावर उभा होतों. परंतु त्या दिवशीं रविवार असल्यामुळें बस-सर्व्हीस जादा चालू नव्हती. त्यामुळें मला बसची थोडा वेळ रस्त्यावर वाट पहात उभें रहावें लागलें. माझ्याजवळच एक वयस्क गृहस्थ उभे होते, वेळ घालविण्यासाठीं मी त्यांच्याशीं बोलण्यास सुरुवात केली. त्यांच्या बोलण्यावरून मला असं समजलं कीं तें त्यांच्या एका अविवाहीत मुलीजवळ रहात होते. ती नोकरी करून घराचा सांभाळ करीत होती. कारण तिला आई नव्हती. त्यांच्या मुलीचें लग्न येत्या रविवारी होतें व ते स्वतः स्वतःचा सुट लवकर शिवून घेणार होते. मी विचारलें कीं तुम्हीं तुमच्या मुलीच्या लग्नाकरीतां कोण कोणते कपडे शिवले ? त्यावर ते म्हणालें किं, माझी मुलगी नोकरी करीत असल्यामुळें तिनें तिचें कपडे शिवून घेतले आहेत व आतां त्यांना कांहीं करायचें शिल्लक नाहीं. मी त्यांना पुन्हां विचारलें किं, तुम्ही मुलीला लग्नाप्रीत्यर्थ काय देणार ? त्यावर ते म्हणालें मी तिला १० पौंड देणार आहे. ह्यावर मी त्यांना म्हणालो किं आणखी काय काय करणार आहांत ? तेव्हां ते मला सांगू लागलें किं, अहो ती स्वतःहून घरटें सोडून जात आहे व स्वतःचें स्वतंत्र घरटें तयार करीत आहे तेव्हां मला आतां आणखी कांहीं करायची गरज नाहीं. आतां मी फक्त लग्नप्रित्यर्थ मद्यपानाचा वगैरे खर्च करणार आहे. हें सर्व ऐकुन मला मनांत वाटलें कीं ह्यांच्यांत लग्नें किती सोपी असतात. परन्तु आपल्याकडे मात्र मुलीचें लग्न म्हटलें म्हणजे काबाडकष्ट करून जे कांहीं पैसे वडिलांनी मिळवले असतील ते सर्व खर्च करूनहि वर कर्ज करावे लागण्याची पाळी येते. मात्र वरील उदाहरण पाहिलें म्हणजे वाटतें किं आपणहि साधी व थोडक्या खर्चाची लग्नें करण्यास शिकलें पाहिजे.

चेस्टरफिल्डला मी संध्याकाळीं आलों. दुसरें दिवशीं सकाळीं मला Plough-right Brosi चा कारखाना पहायचा होता. या कारखान्यांत खाणीच्यावर लागणारी यंत्रसामुग्री अशी कीं, कोळशाच्या गाड्यांना लवकर लवकर वरतीं रिकामें करण्याकरितां निरनिराळ्या यंत्रसामुग्रीची रचना आखायचें व तें काम करुन पार पाडण्याचें काम ह्या लोकांनाच करावे लागत होते. त्यांनी मला निरनिराळ्या ठिकाणीं त्यांनी केलेल्या कामाची फील्मसुद्धां दाखवली. संध्याकाळीं मालकम आणि कं. चा कारखाना पहाण्यास गेलों. ह्या कारखान्यांत मोठमोठालें Turbines वगैरे करीत होते. कोळसा काढून टाकल्यानंतर त्याजागीं पत्थर,

माती वगैरे हवेच्या सहाय्यानें (Stowing) भरण्याचें Machines पण तयार करीत होते. दुसऱ्या दिवशीं मला डॉनिस थॉर्पेला जायचें होते परन्तु माझा ship-bridge Co. चा कारखाना पहाण्याची व्यवस्था 'अॅलेक्स-लॉरी' कंपनीनें केली असल्यामुळें मी डॉनिस थॉर्पे कंपनीच्या मॅनेजरला एक दिवस उशिरां येण्याचें कळवलें. Ship-bridge कंपनींत कोळशाच्या गाड्या तयार करण्याचें काम, गाड्यांना दोराच्या सहाय्यानें खेंचण्याचें cranes तयार करण्याचें, वगैरे अनेक मोठी कामें करण्याचें काम चालू होते. कारखाना बघुन मी दुपारीं बस गांठली व दोन ठिकाणी बस बदलून 'डॉनिस-थॉर्पेला' संध्याकाळीं पोंहचलों.

डॉनिस थॉर्पे हें हजार लोकांच्या वस्तीचें गांव असून तेथें बहुतेक लोक जवळ-पासच्या कोळशाच्या खाणींत काम करीत होते. इतकें लहान गांव असूनसुद्धां बहुतेक घरांमध्यें वीज व टेलीवीझन होते. मी ज्या हॉटेलमध्यें उतरलों होतों त्या मालकिणीकडे टेलीवीझन, कपडे धुण्याचें मशिन वगैरे, सर्व कांही होते. हॉटेलचा खालचा कोळसा काढून घेतल्यामुळें हॉटेलच्या इमारतीला चांगलेंच तडे गेले होते.

दुसरें दिवशीं मी डॉनिस थॉर्पे कोलीअरीवर गेलो. त्या कॉलीअरीवर कोळसा काढल्यानंतर रिकाम्या झालेल्या जागीं वरून माती आणि दगडाचें पीठ आणून ते हवेच्या दाबानें (Compressed Air) भरण्याच्या कामाचें वैशिष्ठ्य होते. त्याचप्रमाणें येथें सतत कोळसा कापणारे मशिन सुद्धां आहे. दर तासाला एक मशिन ५०० टनापर्यन्त कोळसा कापायचें. दुसऱ्या कोळसा कापण्याच्या मशीनमधें मशीन कोळशाच्या थराच्या खालीं कापायचे. नंतर कोळशाच्या थरांत विजेच्या ड्रीलींग मशीनने भोंक पाडून त्यांत डायनेमाइटसारखे स्फोटक पदार्थांचें सुरुंग लावून कोळसा पाडायचे व नंतर हा कोळसा भरण्यासाठीं दुसरें मशीन घेऊन हा कोळसा कोळश्यांच्या गाड्यामधें किंवा रबरी पट्ट्यांवर भरला जाई. ह्या सर्व निरनिराळ्या कामांमुळें जास्त वेळ लागतो परन्तु ह्या सतत कोळसा कापण्याच्या मशीनमुळें कोळसा सारखा कापला जातो व त्यामुळें कोळशाचें उत्पादन चांगलेंच वाढतें.

मला आतां अमेरिकेला जावेंसें खूपच वाटत होतें. व लंडनला भेटलेलें जॉयसुलीवन कंपनीचें व्यवस्थापक श्री. मॉर्गन्स ह्यांनी मला खर्च कमी येण्यासाठीं मदत करण्याचें आश्वासन दिलें होते म्हणून मी त्यांना पत्र लिहिलें व त्यांत माझी अमेरिकेस जायची इच्छा व्यक्त केली. तसेंच मला त्यांना भेटण्याची इच्छा व्यक्त करून शनिवारी भेटल्यास चालेल का म्हणून विचारणा केली. इकडे मला हरिसिंग आणि कंपनीचें त्या अगोदरच एक पत्र आलें होते व त्यांत त्यांनीं मला माझा इंग्लंडमधला कार्यक्रम संपण्यापूर्वीच एक

बोट गांठायची असल्यास मी लंडनच्या C. I. T. कंपनीशी पत्रव्यवहार करावा असें कळविलें होते. त्याचप्रमाणें C. I. T. कंपनीचेहि मला पत्र आलें होते. परन्तु त्यावेळेस माझी जाण्याची इच्छा नसल्यामुळें मी C. I. T. कंपनीला नाकारले होते. मला पुन्हां २० जुलैला " अमेरिकनक्लीपर " नांवाचें माल व उतारू घेऊन जाण्याचें जहाज न्यूयॉर्कला जात असल्यामुळें व मला त्यानें जाण्याची इच्छा असल्यास मी त्यांना तसें कळवावें असें कळवलें होते. माझी जाण्याची इच्छा असल्यामुळें मी ह्या सर्व गोष्टींचा निर्णय करण्या-करितां शनिवारी सकाळीं लंडनला जायला निघालो व लंडनला मी ११ च्या सुमारास पोंहोचलो. नंतर लगेच हिंदी विद्यार्थ्यांचा Y. M. C. A. कडे गेलो कारण त्यांना माझ्याकरितां खोली ठेवण्याचें कळविलें. होते व माझे सामान खोलींत ठेवल्यानंतर मी श्री. मॉर्गन्सला भेटायला त्यांच्या कचेरींत जायला निघालों. शनिवारी सर्व कचेऱ्या बंद असूनहि ते माझ्याकरितां मुद्दाम कचेरींत थांबले होते व माझी वाट पहात होते. मी त्यांच्याशीं थोडावेळ गप्पागोष्टी केल्यानंतर त्यांनी सुचविलें कीं तें त्यांच्या न्यूयॉर्कच्या कचेरीला माझ्याबद्दल लिहितील व त्यांच्या पत्राची नक्कल मला ते लौकरच पाठवतील त्यांचा निरोप घेऊन मी निघालो व लंडनचा जो भाग पाहिला नव्हता तो पहाण्याचें ठरविलें. मी पार्लमेंटच्या थेम्सच्या बाजूला निघालो व तो सर्व भाग पाहून ट्राफलगार, स्केलर, पिकॅडली सर्कस हा भाग पाहून घेतला. पिकॅडेली सर्कस हा एक लंडनच्या अत्यंत महत्वाच्या व्यापार केंद्रामधें आहे व मध्यभागीं कारंजे असून त्यावर EROS चा पुतळा आहे. लोक संध्याकाळीं व रात्री खूप उशिरांपर्यन्त कारंजाच्या भोंवताली बसतात व आजूबाजूच्या निरनिराळ्या रंगीत जाहीराती पहाण्यांत वेळ घालवितात.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुन्हां मी Change of Guards चा प्रेक्षणीय समारंभ वेस्टमिनिस्टर येथें पहाण्यास गेलों. तेथें लालरंगाचें गणवेष केलेलें सैनिक घोड्यावर बसून पहारा करतात. हा पहारा सकाळी १० वाजतां बदलतात. रात्री पहाऱ्यावर असणारें सैनिक सकाळीं पहारा करणाऱ्यांना सुटी देतात. तो कांहीं विधिपूर्वक होतो. हे लंडनचें वैशिष्ट्य असून बाहेरगांवहून लंडन पाहाण्यास येणारे लोक हे पहाण्यास चुकत नाहींत. नंतर मी वेस्टमिनिस्टर ॲबे पहायला गेलो व त्यावेळेस रविवारची प्रार्थना चालू असल्यामुळें ती मला पहाण्यास मिळाली.

दुपारी लंडनचा नाट्यगृह, सिनेमा व रेस्टोरंस्टसाठीं प्रसिद्ध असलेला सोहो स्केअर ( Soho Square ) चा व्यापारीवर्ग त्या भागाला प्रसिद्धि मिळावी म्हणून एक " सोहो मेळा " ( Soho fair ) साजरा करणार होते ते पहाण्यास गेलो. ह्या मेळ्याचें मुख्य आकर्षण म्हणजे सोहो भागांत असणाऱ्या निरनिराळ्या दुकानदारांना त्यांचा माल

आकर्षक रीतीनें प्रसिद्धी देण्याकरतां त्या मेळ्यांतल्या मिरवणुकींत भाग घेण्यास संधी देत. आणि अशा तऱ्हेनें जे आकर्षक रीतीनें प्रसिद्ध करायचें त्यांना बक्षिसें देण्यांत यायची. मिरवणुकीच्या पूर्वी आणि नंतर जिकडे तिकडे लोक आनंदांत असून रस्त्यावर नाचगाणें वगैरे करीत. अशा तऱ्हेनें सबंध रात्र त्यांची ही करमणुक चालत असे. मिरवणुक दुपारीं २-२॥ च्या सुमारास निघाली, परंतु त्याच्या अगोदरच लोकांचे थवेच्या थवे गोळा झाले होते. आणि लोकांनी गडबड गोंधळ करूं नये म्हणून पोलीसांचा बंदोबस्त सुद्धां चांगला ठेवला होता. ही मिरवणुक फारच मोठी होती. निरनिराळ्या व्यापारांनी स्वतःच्या मालाची प्रसिद्धी करण्याकरतां अगदीं पराकाष्ठा केली होती. एका चीनी खाद्यगृहानी एक संबंध चीनी मंदिर केले होते व त्याच्या आजुबाजुस चिनी पोशाखांत निरनिराळ्या प्राण्यांचे मुखवटे घालून त्या मंदिराच्याभोंवती नाचत होते व चीनी वाद्य-संगीत त्याला साथ देत होते. हें मंदिर एका रथावर ठेवलें असून ते एका ट्रकनें खेचलें जात होतें. त्याचप्रमाणें इतर लोकांनी सुद्धां स्वतःचें सामान निरनिराळ्या रितीनें आकर्षक करण्याकरतां प्रयत्न केलें होते. मिरवणूक गेल्यानंतर लोकांचे निरनिराळें वृंद रस्त्यावर नाचत होते, तर कांहीं लोक आपलें कलाकौशल्य दाखवित होते. रस्ता मोटारींच्या वाहतुकीसाठीं बंद झाला होता. मी ह्या मिरवणुकीबरोबर थोडेसें अंतर गेलों. नंतर मला " सिनेरमा " म्हणजे सिनेमाचा एक अगदीं आधुनिक प्रकार पहावयास जायचें असल्यामुळें मी आधीपासूनच माझें तिकिट काढून ठेवलें होते. मी त्या थिएटरमधें 'सिनेरमा' पहाययास गेलों. ह्या लंडनच्या थिएटरमधेंच फक्त सिनेरमा दाखवला जात होता. येथील तिकिटांचें दरसुद्धां सिनेमापेक्षां चौपट होते. दाखवलें जाणारें चित्र प्रवास वर्णनाचें होते. स्वित्झर्लंड, फ्रान्स व अमेरिका यांचें कांहीं भाग दाखविलें होतें. " सिनेरमाचें " वैशिष्टय म्हणजे डोळ्यांना विशिष्ट चष्मा न लावतां अगदीं हूबेहुब जसें सत्यसृष्टींत तीन आकारी घन पदार्थ पहातो त्याप्रमाणेंच आपल्या पडद्यावर सत्यसृष्टी-सारखेंच दिसतें. मी माझ्या वाचकांना सिनेरमा पहाण्याची संधी मिळाल्यास ती दवडूं नका असे जरूर सांगेन.

दुसऱ्या दिवशीं मला माझ्या जहाजाच्या तिकिटाची व्यवस्था करायची होती त्यामुळें मी C. I. T. कंपनीच्या कचेरींत गेलों. तेथें माझ्यासाठीं एक जागा देण्याचें व माझें विमानाचें तिकिट रद्द करून अमेरिकन एक्सप्रेस कंपनीकडून तिकिटाचें ७१ पौंडाचें भाडें वसूल करून ध्या असें सांगितलें. इकडे अमेरिकन एक्सप्रेस कंपनीच्या माणसांना मी विमानानें न जाण्याचें व जहाजाच्या तिकिटाचें पैसे C. I. T. कंपनीला देवून बाकिचें पैसे मी हिन्दुस्थानांत गेल्यावर गोळा करीन असें कळविलें व एक लेखी पत्रहि लिहून टाकलें. माझा नंतरचा कार्यक्रम दक्षिणवेल्सच्या कोळशाच्या खाणी पहाण्याचा असून

मला दूपारची १॥ ची गाडी 'पोंटीप्रीथला' Ponty Pricld जाण्यासाठीं गांठायची होती व ती गाडी मिळावी म्हणून मी लौकरच निघालों.

पोंटीप्रीथला मी संध्याकाळच्या सुमारास पोंहोचलों. तेथें (New Inn) 'न्यू–इन' ह्या हॉटेलवर आलों. माझा येथील खाणी पहाण्याचा कार्यक्रम रात्रपाळींत होता. कारण मला जे विशिष्ट काम म्हणजे कोळसा काढून घेतल्यानंतर त्या जागी माती व चूर्ण केलेलें पत्थर हवेच्या सहाय्यानें टाकायचें होते ते रात्रपाळींत चालत होतें. मी रात्री जेवण करून ज्या खाणींत जायचें होतें तेथें बस गांठून गेलों. तेथें गेल्यावर माझ्यासाठीं दिलेल्या मार्ग दर्शकाबरोबर खाणींत गेलों. तेथें सर्व काम पाहिल्यानंतर पहांटेस बाहेर येऊन सकाळची बस गांठली. माझ्या संबंध इथल्या कार्यक्रमांत मला रात्रपाळींत ठेवलें असल्यामुळें मी दुसऱ्या खाणीचें मॅनेजर श्री. पॅरी जे हिंदुस्थानांत माझ्या जवळच्याच खाणींत काम करुन गेले होते त्यांना सांगितलें किं मी पत्थर व माती हवेच्या सहाय्यानें भरण्याचें काम इतर ठिकाणी पाहिले आहेत त्यामुळें मला रात्रपाळींत येण्याची विशेष आवश्यकता वाटत नाहीं. तुम्ही जर सकाळी दाखविण्याची व्यवस्था करीत असाल तर मला इतरही गोष्टी पहावयास मिळतील ही माझी सूचना त्यांनी मान्य केली.

माझा इथें अंदाजे २ हप्ते कार्यक्रम होता व ह्या कार्यक्रमाप्रमाणें मला लंडनला २४ तारखेस परत जावयाचें होते परन्तु येथील कार्यक्रमांत मी बहुतेक सर्व पाहिलें असल्यामुळें मी माझ्या कार्यक्रम ठरविणाऱ्या व्यवस्थापक बाईला कळविलें किं मला इथें जास्त दिवस रहाण्याची आवश्यकता वाटत नाहीं तरी तुम्हीं नॅशनल कोल बोर्डच्या हाताखाली चालत असणारी चेल्टनहॅमची कोळश्यावर निरनिराळ्या विषयांवर संशोधन करणारी प्रयोगशाळा व लंडन युनिव्हर्सिटींत Mining Engineering वर काय काय निरनिराळें संशोधन चालू आहे त्याची चर्चा करण्याकरितां तेथल्या प्राध्यापकांशी माझी मुलाखत करुन द्यावी असे त्यांना कळवलें. त्यानंतर त्यांचें मला पत्र आलें किं माझा मंगळवारचा कार्यक्रम चेल्टनहॅमला व बुधवारी लंडन युनिव्हर्सिटीत मायानिंग इंजिनिअरिंगच्या प्राध्यापकांशी चर्चा करण्याकरितां ठेवला आहे. त्यामुळें मी सात दिवस आधींच पोंटीप्रीथ सोडलें व सोमवारी बुस्टरचा Mining Engineering Company चा कारखाना पाहिला व मंगळवारी चेल्टनहॅमला तेथील प्रयोगशाळा पहाण्यास गेलों.

चेल्टनहॅमची प्रयोगशाळा ही कोळशाच्या निरनिराळ्या विषयांवर प्रयोग करीत असून ती गांवापासून बरींच दूर असून दोन भव्य इमारतींत तिचें काम चालू होते. गेल्याबरोबर स्वागत करणाऱ्या बाईला माझा कार्यक्रम काय काय ठेवला आहे याची

चौकशी केली. तिनें डॉ. शार्पले तुम्हांला लौकरच भेटण्यास येतील असे सांगितलें व ते येईपर्यंत मला लायब्ररींत बसण्यास सांगितल्यामुळें मी तेथें पुस्तकें चाळींत बसलो. थोड्या वेळानें तेथें एक वयस्क गृहस्थ माझ्याकडे आले. त्यांना पाहिल्याबरोबर मला वाटलें किं हे तर मला धनबादला स्कूल ऑफ माइन्समधें इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग शिकवण्यासाठीं असलेलें माझेंच प्राध्यापक प्रो. शार्पले तर नाहींत? नंतर मी त्यांना विचारलें कारण माझी व त्यांची १५ वर्षांत भेट नव्हती. मी त्यांना विचारल्यानंतर त्यांनी हो म्हटलें व तूलासुद्धां तूं माझा विद्यार्थीच आहेस कां म्हणून विचारणार होतो असे मला सांगितलें. आम्हांला दोघांनाही एकमेकांना भेटल्यामुळें अत्यंत आनंद झाला. त्यांनी मला त्यांच्या खोलीवर नेलें. नंतर पुष्कळच आगत्यानें मायनिंग कॉलेजच्या निरनिराळ्या प्रोफेसरांबद्दल, विद्यार्थ्यांबद्दल व धनबादबद्दल चौकशी केली. धनबादहुन २८–३० मैल दूर असलेले 'तोपयांची'चे नैसर्गिक सरोवर, जेथून झरीआ कोलफील्डला पाणी पुरविलें जाते त्या जागेची बरीच आस्थेनें चौकशी केली व नंतर सांगितलें किं ही जागा त्यांच्या पत्नीला फार आवडायची व त्यांनीं त्यांच्या घराचें नांव 'तोपयांची' असें ठेवलें होतें. मला त्यांच्या घरीं येण्याकरितां व त्यांच्या बायकोला मी 'तोपयांची'बद्दल गोष्टी केल्यास तिला फार आवडतील म्हणून मला फार आग्रह केला. परन्तु मला वेळ नसल्यामुळें त्यांचें आमंत्रण स्विकारणें शक्य नव्हते. हेच प्रोफेसर आम्हांस शिकवण्यास असतांना आमच्यांत मुळींच मिसळत नसत परन्तु आतां त्यांच्यांतील फरक पाहून मला फारच आश्चर्य वाटलें. त्यांनीं प्रयोगशाळा पाहण्याची माझी व्यवस्था केली.

डॉ. शार्पले यांनीं मला सांगितलें कीं ह्या प्रयोगशाळेंत चाललेल्या संशोधनाचें काम कोळशाच्या उद्योगासाठीं आज उपयुक्त होणार नाहीं परंतु त्याची उपयुक्तता २५ वर्षांनंतर कळेल. कोळसा व त्याबरोबर येणारें पत्थर त्यांच्या प्रकाशजन्य (Optical) गुणधर्मांत असलेल्या फरकांमुळें वेगळा केला जात होता. कोळसा प्रकाश जास्ती परावर्तन (Reflection) करतो व पत्थर त्या मानानें कमी परावर्तन करतो. ह्या गुणधर्मांच्या फरकांमुळें जास्त परावर्तन झालेल्या कोळशाला खरी पट्ट्यावरून पुढें जाता यायचे परन्तु कमी परावर्तन झालेल्या पत्थराला फोटो इलेक्ट्रिक सेलच्या मदतीनें बाजूला फेंकून देण्यांत येते. त्याचप्रमाणें कोळशाच्या भुकीचा अगदीं त्वरीत रीतीनें कसा "कोक" करायचा व त्याच्यातून निघणाऱ्या वायूमधून होणाऱ्या निरनिराळ्या पदार्थांवर संशोधन चालू होते. संध्याकाळीं मी हॉटेलवर आलों व लंडनची गाडी गांठण्याकरितां लौकर निघालों.

संध्याकाळीं जरा उशिरांच मी लंडनला पोंहचलों. तेथून इतक्या लांब टॅक्सीचा खर्च नको म्हणून ट्युबनें हिंदुस्थानच्या विद्यार्थ्यांच्या Y. M. C. A. जवळच्या ट्युब

स्टेशनवर जायचें ठरविलें. ह्या स्टेशनवर हमाल मिळत नसल्यामुळें व माझें रहाण्याचें ठिकाण बरेंच दूर असल्यामुळें मी जरा विचारांतच पडलों. तेवढ्यांत एक म्हातारा पोर्टर दत्त म्हणून हजर झाला. मी त्याच्याजवळ सुटकेस दिली. पाऊस जोरात पडत होता. मी व तो पोर्टर आमच्या निवासस्थानाकडे निघालों. निवासस्थानीं पोंहचल्यावर मी पोर्टरला १ शिलिंग देऊन रवाना केले.

माझी बोट २० तारखेला निघणार होती. परन्तु नंतर मला कळविण्यांत आलें किं ती बोट २२ तारखेस निघणार आहे. मी पोंटीप्रिथला असतांनाच मला C. I. T. कंपनीनें कळवलें होते कीं, माझ्या अमेरिकेच्या Visa ची तारीख ही बोट अमेरिकेस पोंहचण्यापूर्वीच संपत असल्यामुळें मला माझ्या Visa ची मुदत परत वाढवून घेतली पाहिजे. मी त्याप्रमाणें पोंटिप्रीथला असतांनाच कार्डिफला जाऊन व अमेरिकन कौन्सिल जनरलच्या ऑफीसमधून त्याचें लागणारें शुल्क देऊन मी त्याची मुदत वाढवून घेतली होती. माझ्याजवळ सामानाचें पुष्कळच ओझें असल्यामुळें व मला सामानाची हांव असल्यामुळें मी अवास्तव सामान घेतलें होते. तेव्हां मी ठरविलें किं, मला जे अत्यंत जरुरीचें असे आहे तेंच फक्त घ्यावें व बाकीचें हिंदुस्थानांत परत पाठवून द्यावें. पोस्टानें २२ पौंडापर्यन्त वजनाचें सामान पाठवतां येत होतें. म्हणून मी एखादें चांगलें खोकें बघण्याच्या शोधार्थ निघालों. माझ्या निवासस्थानाजवळच भाजी बाजाराचा आठवड्याचा बाजार भरत असें. तेथें फिरुन मी कांहीं लांकडाची खोकी मिळवली. ती मला विनामूल्यच मिळाली. परन्तु त्यांचा आकार पोस्टाच्या पार्सलला लागणाऱ्या आकारासारखा नसल्यानें व माझ्याजवळ करवत नसल्यानें मी शेवटीं कागदाचें खोकें मिळवण्याचा प्रयत्न केला आणि मोठ्या प्रयत्नानें एका दुकानांतून हवें असें कार्डबोर्डचें खोकें मिळवलें. ह्या खोक्याला मजबूत करण्याकरितां त्याच्या भोंवतालीं दुसरे कार्डबोर्ड लावून मी ते मजबूत केले. नंतर पोस्टाचे १ पौंडाचें तिकिट लावून पार्सल रवाना केलें. सामान बरेंच कमी झाल्यामुळें मला हायसें वाटलें. माझी सुटकेस चांगलीच हलकी झाली होती. जर मला माझ्या प्रवासांत कोणत्या गोष्टीचा तिटकारा येत असेल तर तो माझ्या सुटकेसचा. मला दर ३–४ दिवसांनीं जागा बदलावी लागत असे आणि बहुतेक वेळां हॉटेल अगदीं बस स्टँडजवळ, किंवा स्टेशनजवळ असायचें आणि इतक्या थोड्या अंतराकरितां टॅक्सी करणें योग्य वाटायचें नाहीं. म्हणून हातामध्येंच सुटकेस घ्यावी लागत असे. एकदां रेल्वे पोर्टरच्या हातून चामड्याचा पट्टा तुटला. परंतु पोर्टरचा दोष नव्हता. कारण सुटकेस कार्डबोर्डची असून चामड्याचा पट्टा कापडानें चिकटविला होता. त्यामुळें मला दुसरा पट्टा घेणें भाग पडलें. चामड्याचा पट्टा त्याला चिकटणें शक्य नसल्यामुळें मी चेस्टरफील्डला एक कॅनव्हासचा पट्टा सुटकेस-भोंवती गुंडाळला जाईल एवढा घेतला. त्यांत एक लोखंडाचें हँडल असून भोंवती चामडें

होते. सुटकेस उचलतांना मला लोखंडाचें हँडल चांगलेंच हाताला लागून चट्टे पडले. प्रत्येक जागा बदलतांना माझी सुटकेस मला वैरिणीसारखी वाटत असे. आणि सुटकेस-कडे पहातांना माझ्या डोळ्यांतून क्रोधाग्नि निघत असे. हें सर्व सांगण्याचा उद्देश वाचकांनीं परदेशांत जाण्याची संधी आल्यास शक्य तेवढें कमी सामान घेवून जावें असा आहे. २ सुट, ३, ४ शर्ट आणि एक दोन नाईटसुटनीं काम भागण्यासारखें आहे. टॉवेल, आंथरुण, पांघरुण वगैरे घ्यायची कांही जरूर नसते कारण सर्व वस्तु हॉटेलमध्यें मिळतात. कांहीं नायलॉनचें शर्ट घ्यावें कारण ते धुवून लवकर स्वच्छ करतां येतात.

मला लंडनला आणखी कांहीं वेळ मिळाला असल्यामुळें मी तेथील बाकीचा भाग पहाण्याचें ठरविलें. एके दिवशीं मॅडम तुसातचें Museum बघितलें. लंडनमधील अनेक वस्तुंपैकीं मला हें म्युझियम फारच आवडलें. तेव्हां वाचकांनी प्रसंग आल्यास हें जरूर पहावें असें मी सुचवीन. म्युझियमची प्रवेश फी २ शिलींग असून माणसाला आंत गेल्याबरोबर आश्चर्याचें धक्के बसण्यास सुरुवात होते. एका बाजूच्या खोलींत पोलीस Constable व जिना चढतांना जिन्याच्या एका Landing वर म्युझियमचें एक परिचारक उभे असलेले दिसतात. परंतु लगेच लक्षांत येतें कीं* Muesum च्या आंत निरनिराळे विभाग असून जुन्या ऐतिहासिक प्रसंगांपासून हल्लीचें ऐतिहासीक प्रसंग दाखविले आहेत. त्याचप्रमाणें निरनिराळे राजकारणी स्त्री-पुरुषांचे मेणाचे पुतळे केलेले आहेत. ते इतके हुबेहुब दिसतात कीं खऱ्या व मेणाच्या कृतिमध्यें कांहींच फरक वाटत नाहीं. पंडित जवाहरलाल नेहरू, महमदअलीं जिना ह्यांचेही पुतळे होते. प्रेक्षकांना फिरत फिरतां आराम करण्याकरितां मधून मधून बांक ठेवलेले आहेत. मी एका बांकावर बसलों आणि माझ्या शेजारींच एक वृद्ध बाई मान टेकून विश्राती घेत होती. बऱ्याच वेळानंतर तीची कांहींच हालचाल दिसली नाहीं, म्हणून मी जरा निरखून पाहिलें तो ती खरोखरची बाई नसून तो एक मेणाचा पुतळा होता! माझ्यासारखी सगळ्यांचींच फसवणूक ह्या बाईच्या पुतळ्यानें व्हायची. ह्या म्युझियममध्यें Hall of Horror सुद्धां आहेत. आणि तेथें भिती वाटण्यासारखें अनेक प्रसंग दाखविलेलें आहेत. उदा. कांहीं ऐतिहासीक व्यक्तिना फांशी देणे यासारखे होते.

मी Tower of London चा प्रसिद्ध किल्ला पाहिला. ह्या किल्ल्यांत चौदाव्या शतकापासून, इंग्लंडचें राजे राहात असल्यापासूनचें, निरनिराळे ऐतिहासीक प्रसंग व जागा संभाळून ठेवली होती. येथें अगदीं जुन्या काळच्या युद्ध साहित्याचें अनेक नमुने ठेविलेले आहेत. त्याचप्रमाणें निरनिराळया मौल्यवान जडजवाहिराचा सुद्धां उत्तम संग्रह ठेवला आहे. प्रवेशद्वाराजवळ लाल गणवेष धारण केलेला सशस्त्र सैनिक पहारा देत उभा असतो.

* ही खरोखरची माणसें नसून मेणाचे पुतळे आहेत

तो इतका निश्चल असतो कीं हा खरोखरचा शिपाई आहे का पुतळा आहे असा आपल्याला भ्रम पडतो. त्याच्याजवळ उभे राहून अनेक स्त्री पुरुष फोटो काढून घेतात. मी ह्याच खेपेस 'बॅटर्सी पार्क' ही प्रसिद्ध बाग पांहिली. ही बाग फारच मोठी असून ह्यांतही अनेक करमणुकीची साधनें आहेत. बागेंत निरनिराळ्या रंगाचें फुलांचें ताटवें व कारंजी आहेत. हौदाच्या दोन्ही बाजूस अनेक कारंजी आहेत. पाठीमागच्या बाजूला एका नाट्यगृहाची रंगभूमि आहे. करमणुकीच्या साधनामध्यें मँचेस्टरच्या बेलव्ह्यू मधील बागेंत पाहिलेल्या करमणुकीच्या साधनासारखीच साधनें होती. येथील एक गोष्ट विशेष म्हणजे Rotor. एक शिलिंग प्रवेश वर्गणि घेऊन एक दहा, बारा फूट व्यासाची नलीका ह्या गृहाच्या केंद्रांत ठेवलेली असून त्याच्याभोंवतीं प्रेक्षकांना पहाण्याकरीतां सर्कशींतल्या बांकासारखें बांक ठेवलेले आहेत. ज्या प्रेक्षकांना ह्या नलिकेंत जायचें असेल त्यांना बाजूच्या दरवाजांतून जाऊं देण्यांत येते. जाणाऱ्यांचा मुख्य भरणा ८,१० वर्षांच्या मुलांचाच असतो. परंतु कांहीं मोठी माणसेंसुद्धां जातात. थोड्या वेळानें त्या नलिकेला विजेच्या मोटारीनें गोलगोल फिरवण्यांत येते. आंत असलेली माणसें नलिकेच्या भिंतीला चिकटून उभी असतात. नलिका जसजशी जोरानें फिरूं लागते तसतशी आंतील माणसें जमिनीचा आधार सोडून नलिकेच्या भिंतीला चिकटून जमिनीपासून ५,६ फुट हवेंत उंच चढतात. चढण्याचें कारण की Centrifugal-force. त्यामुळें ती माणसें वर चढतात. पहाणाऱ्यांना फारच मजा वाटतें. परंतु आंतील माणसें डोळे मिटून नलिका थांबते केव्हां ह्याची वाट पहात असतात. हळूं हळूं ही नलिका बंद झाल्यावर ही माणसें घसरत घसरत जमिनीवर येतात. ह्या बॅटर्सी पार्कजवळ लंडनला वीज पुरविणारें फारच मोठें पॉवर-हाऊस आहे. आणि त्याचें स्थापत्य फारच कलाकौशल्यानें भरलेलें असून जगांतील पॉवर-हाऊस करतां वापरलेल्या स्थापत्यांमध्यें फार प्रसिद्ध आहे. मी तारीख २२ ला न्युयॉर्कची माझी बोट (American-Clipper) गांठण्याकरीतां दुपारच्या गाडीनें जाण्याकरितां लंडन-डॉककडे ट्युब गाडीचा मार्ग धरला, व शेवटच्या स्टेशनवर उतरून टॅक्सी करून डॉकवर आलों. जहाजावरील अंमलदारानें मला माझी सुटकेस खाली ठेवून जहाजाला जोडलेल्या शिडीनें वर येण्यास सांगितले. त्याप्रमाणें मी केले. चारच्या आंत जहाजावर येण्यास सांगितलें होतें परंतु मी २ च्या आंतच जहाजावर पोहोचलों. उतारूंपैकी मीच प्रथम आलो होतो. थोड्या वेळानें हळूं हळूं दुसरें उतारू येऊं लागले. थोड्या वेळानें आमच्या जहाजाचा Steward आला. त्याचे काम उतारू व अंमलदार यांच्या जेवणाच्या सोयीचें व इतर व्यवस्था पहाण्याचें असते. Steward नें मला माझी Cabin दाखविली. मला स्वतंत्र केबिन मिळाली असून ती इंजिनियरिंग लोकांच्या केबिनला लागूनच होती. मला फार भूक लागली असल्यामुळें मी स्टिव्हर्डेला

विचारलें कीं मला कांहीं खायला मिळेल कां? तेव्हां त्यानें मला स्वयंपाक घरांत असलेले कॉफी, पाव, फळें वगैरे सर्व शिधासामुग्री दाखवून तुम्हांला हवें तेवढें खा असें सांगितलें. चहा कॉफी करण्याकरितां विजेची किटली असून टोस्ट करण्याकरतां ॲटॉमिक टोस्टर होता. हळूं हळूं जहाजावरचे उतारू येऊं लागलें. हें जहाज १२ उतारूंना घेऊन चाललें होते. त्यापैकीं तीन म्हाताऱ्या बायका इंग्लड पाहून, दुसरे कांहीजण मित्रांना भेट देऊन आणि त्यांत अेक नूतन विवाहित जोडपेंही होतें. थोड्या वेळानें Custom ची व Immigration ऑफीसची माणसें आली. त्यांनीं आमचें पासपोर्ट व इतर कागद वगैरे तपासलें. तसेंच नेण्यास निर्बंध असलेलें सामान किंवा इंग्लीश पैसे यांबद्दलही आमच्याजवळ चौकशी केली. प्रत्येक उतारूला १० पौंडापर्यन्त रक्कम नेतां येत होती. सर्व चौकशी केल्यानंतर हे अधिकारी निघून गेले व आमचे जहाज रात्रीं ८ ला सुटणार असल्यामुळें आम्हीं डेकवर इकडे तिकडे फिरत होतो. जहाजाच्या खालीं उतरण्याची परवानगी नव्हती व उतरावयाचें असल्यास Captain ची परवानगी लागत होती.

डेकवर आम्हीं उभें असतांना आकाशांत निळसर धुराचा लांबच्या लांब कित्येक मैल दूर पट्टा उठला होता. हा Jet विमानाचा धूर आहे असें सांगण्यांत आलें. रात्री ८–९ च्या सुमारास आमच्या जहाजाला दुसऱ्या दोन जहाजांनी दोऱ्यानें खेंचले व हळूंहळूं त्याला ओढून थेम्स् नदीच्या मध्यभागीं आणलें. लंडनच्या काळोखांत झगमगणाऱ्या हजारों दिपमालीकांना निरोप देत हळूं हळूं रात्र होत असल्यामुळें आम्ही आमच्या केबीनकडे वळलों. आमचें जहाज आम्हांला २४ तासानंतर लागणाऱ्या फ्रान्सच्या ल-हाव्र बंदराकडे संथपणें पाणी कांपत नेत चाललें होतें.

### ( इंग्लंड मधील कांहीं आठवणी )

मी वेकफिल्डला असतांना मला तेथून लीड्स जवळ माझ्या चुलत भावाच्या रिझर्व्ह बँक स्टॉफ क्वार्टरच्या जवळील क्वार्टरमध्यें रहाणाऱ्या श्री. मुझुमदार यांनी त्यांच्या भावास भेटण्यास सांगितल्यामुळें मी इथून १५ मैल दूर असलेल्या लीड्सला बसनें गेलों. प्रथम ८ मैल दूर असलेल्या ब्रॅमटोप गांवाची बस गांठून दिलेल्या पत्त्यावर त्यांना भेटण्यास गेलों. तेथें गेल्यानंतर त्यांच्याकडे राहत असलेल्या एका माणसानें ते आजारी असून त्यांना ५–६ मैल दूर असलेल्या हॉस्पीटल मध्यें नेलें आहे असें सांगितलें. त्यावेळीं संध्याकाळ बरीच झालीं होती व काळोखही बराच होता त्यामुळें रोग्यास भेटण्याची वेळ नसल्यानें मला त्यांना भेटून देतील किं नाहीं याबद्दल शंकाच होती. मी विचारांत पडलों व ठरविलें किं इतक्या दूर आल्यासरशीं आपण माघार न घेतां भेटण्यास जावें. पुन्हां मी Hospital कडे जाणारी बस गांठली. बस स्टॉपपासून १ मैलावर हॉस्पीटल असून तेथें

पार्यी जाण्यावांचून गत्यंतर नव्हतें. हॉस्पीटलमध्यें गेल्यानंतर (Indoor-patients) विभागांत शुश्रुषा करणाऱ्या एका परिचारकानें 'नमस्ते' म्हणून अगदीं हिंदी पद्धतीनें मला नमस्कार केला. नंतर तो माझ्याशीं मोडक्यातोडक्या हिंदी भाषेंत बोलूं लागला. मला जरा गंमत वाटत होती. मला हिंदुस्थानांत गेलां होतात वगैरे विचारलें व नंतर श्री. मुझुमदार यांचे बिछान्याजवळ मला घेऊन आला श्री. मुझुमदार जनरल वार्डमध्यें असून त्यांना कांहीं दिवसापूर्वीं येथें आणून ठेवलें होते. ते कानांना earphones लावून Radio एकत पडले होतें. इतरहि रोगी त्यांच्याप्रमाणेंच रेडिओ एकत पडले होते. श्री. मुझुमदारांना त्यांच्या घरच्या मंडळींचा निरोप दिला तेव्हां इतकें लांब आल्याबद्दल त्यांना खूप बरें वाटलें. मी हॉस्पीटलबद्दल चौकशी केली तेव्हां ते म्हणाले किं येथें रोग्याची फार काळजी घेतली जाते. त्याचप्रमाणें टापटीप वगैरे फारच असल्यामुळें माणसाला जर पैसा उगीचच नासायचा नसेल तर जनरल वार्ड सुद्धां उत्तमच असतो. करमणूकीसाठीं प्रत्येकाला earphone असून ज्याला वाटेल ते स्टेशन लावून रेडिओ ऐकतां येतो व दुसऱ्याहि माणसाला त्रास होत नाहीं. रोग्यांचे सर्व उपचार विनामूल्य असतात. त्यांच्या पगारांतून आजारीपणाकरितां कांहीं ठराविक रक्कम वजा केली जाते. त्यामुळें कोणत्याहि रोग्याला औषधोपचारासाठीं पैसे खर्च करावे लागत नाहीं. दरेक गांवांत डॉक्टर असून त्यांना Health Ministry कडून पगार दिला जातो. ज्यांना ज्यांना एकाद्या अमुकच डॉक्टरवर विश्वास असेल तर त्या त्या डॉक्टरांकडून आपली नांवे नोंदवून घेतात. त्याचप्रमाणें रोग्यांच्या संख्येवर डॉक्टरांना त्यांच्या सल्ल्याबद्दल मोबदला दिला जातो. विनामूल्य औषधांमधें नुसती औषधें नसून त्यांत चष्मे, दाताची कवळी हेहि मिळते. तसेंच जरूर पडल्यास शस्त्रक्रिया हे सर्व खर्च National-Health Insurance scheme मधें राष्ट्रीय आरोग्य विम्याच्या योजनेंत येते. त्यामुळें लोकांना आजारीपणाबद्दल कांहींच काळजी वाटत नाहीं. तसेंच त्यासाठीं निराळी बचत करावी लागत नाहीं व लोकांमध्यें निराळीच एक प्रसन्नता दिसते.

प्रॉटिप्रिथला असतांना मी एकदां बारमध्यें बसून बिअरचे घोट घेत बसलों असतां माझ्याजवळ एक २५–२६ वर्षांचा तरुण गृहस्थ आला व मग त्यानें विचारलें किं तुम्हीं एकटेच इकडे कां बसलां अहांत ? तुमच्याबरोबर कोण आहे ? त्यावर मी त्याला म्हणालों किं मी एकटाच आहे. त्याबरोबर त्यानें आमच्या मंडळींत तुम्हीं कां येऊन बसत नाहीं असं विचारलें. सहाजिकच मला त्याचें आमंत्रण स्विकारणें भाग पडलें. मलाहि खूप आनंद वाटला कारण मला कोणातरी माणसाची सोबत हवीच होती. मी त्यांच्या कंपूत जाऊन बसलों. त्यांनीं हिंदुस्थानाबद्दल कांहीं प्रश्न विचारल्यानंतर आमच्या गप्पागोष्टी निरनिराळ्या विषयांवर रंगल्या. रात्रीं १० वाजून गेले व त्यानंतर मद्यपेय मिळणें शक्य नव्हते परंतु

जो तरुण मुलगा मला बोलावण्यास आला होता त्यानें, मी कसेहीं करून मद्य मिळवतों असं सर्वांना सांगितलें. हा तरुण मद्य आणण्यास गेला असतां मी कंपूतील दुसऱ्याला विचारलें किं हा कोण गृहस्थ आहे तेव्हां तो दुसरा गृहस्थ मला म्हणाला किं मलाहि ते ठाऊक नाहीं परंतु त्यानेंच तुमच्या सारखेंच मलाहि येथें बोलावलें आहे हें ऐकून मला त्यांच्या दोस्ती करण्याचें व अशा रितीनें वेळ आनंदात घालवण्याचें कौतुकच वाटलें. थोड्या वेळानंतर तो तरुण गृहस्थ आला व हात हलवून आम्हांला सांगू लागला किं मद्य मिळालें नाहीं व निराशेनें खालीं बसला. परंतु लगेच त्यानें कोटाच्या आंतल्या खिशांतून एक मोठी मद्याची बाटली काढून आम्हांला आश्चर्यचकीत केलें. नंतर आम्ही सर्वांनी ती बाटली लौकरच संपविली. त्यानंतर पुन्हां आमच्या गोष्टी चांगल्याच रंगल्या. ह्याच गृहस्थानें मला दुसऱ्या दिवशीं म्हणजे रविवारीं त्यांच्या घरीं बोलावलें. त्यांचें आईवडील पक्के Roman–Catholic पंथाचें असल्यामुळें माझ्या बोलण्यांत आमची भेट Bar मधें झाली हें न येण्याबद्दल त्यानें मला तशी सूचना दिली होती. कारण मद्यपेय करणें त्याच्या आईवडीलांना रुचत नव्हते. त्याचप्रमाणें आपली भेट Y. M. C: A. त झालीं असें सांगण्यास सांगितलें. त्याच्या आमंत्रणावरून मी दुसऱ्या दिवशीं त्याच्या गांवी जाण्यासाठीं बस गांठली. त्याचें गांव अंदाजें ४० मैल दूर होतें. तेथें गेल्यावर त्याचें घर शोधून काढलें. तेथें गेल्यावर दारावर थाप मारतांच तो गृहस्थ दार उघडण्यास आला व मला इतका उशिर कां झाला वगैरे विचारलें. त्याचप्रमाणें मला उशीर झाल्यामुळें आमची जेवणें उरकल्याचें सांगून माझी आई तुमचेसाठीं जेवण तयार करील असेंहि सांगितलें. कांहीं वेळांत माझ्यासाठीं जेवण तयार होऊन मी जेवलो व त्यानंतर आम्ही बऱ्याच गप्पागोष्टी केल्या. हें गृहस्थ त्यांच्या आईवडीलांचें एकुलते एक होतें. मी त्यांच्या आईला विचारलें कीं तुम्हीं मुलाचें लग्न लवकर कां करीत नाहीं. त्यावर त्यांनी मला असें उत्तर दिलें किं, तो लवकर करेल तर आम्हांला आनंदच वाटेल. मी त्यांना म्हणालों किं, लग्न झाल्यावर मुलाला व सुनेला जवळ ठेवाल ना ? त्यावर त्यांनीं मला सांगितलें किं माझ्या घरांत दुसऱ्या बाईला कधींच राहूं देणार नाहीं. नाहींतर आमच्या घरांत भांडणें होतील. मला त्यांच्या ह्या बोलण्याचें फार आश्चर्य वाटलें. नंतर हें गृहस्थ मला गांव दाखवण्यास घेऊन निघालें. आम्हीं जवळच असलेल्या एका टेंकडीवर बसलों. तेथें मला समोरील दुसऱ्या टेंकडीवर एक पुष्कळ उंच radio–aerial चा खांब दिसला तेव्हां मी त्यांना ते काय आहे म्हणून विचारलें तेव्हां त्यांनीं सांगितलें किं त्या खांबापासून घेतलेल्या aerial पासून ज्यांना हवें असेल त्यांना रेडिओच्या Aerial करितां जुळवणी करून ( Connection ) मिळतें. घरांतील स्वतंत्र Aerial पेक्षां ह्या Aerial मुळें आवाज स्पष्ट ऐकूं येतो. नंतर आम्हीं समुद्र किनाऱ्यावर फिरावयास गेलों व संध्याकाळीं मी घरीं येण्याकरितां बस गांठली.

पॅांटिप्रीथला असतांना मला असें आढळून आलें किं, येथील गांवांची नांवें इंग्लंडमधील गांवांच्या नांवाच्या नांवापेक्षा कांहीं निराळीच आहेत. उदा. आर्बेडर, आबर्किनॉन, आब्र-सिनॉन वगैरे ही नांवें व त्याची भाषा ह्याचें जर्मन भाषेशीं थोडें साम्य होतें. मी कांहीं लोकांना विचारतां ही गोष्ट खरी आहे असेंच त्यांनी सांगितलें.

इंग्लंडमधील शिक्षण पद्धतिबद्दल कांहीं उल्लेख करावासा वाटतो. वयाच्या १५ वर्षपर्यंन्त तेथें शिक्षण फुकट व सक्तिचें असतें. परंतु त्यानंतर जी खरी हुषार मुलें किंवा पुष्कळ श्रीमंत आईवडीलांची मुलें Grammer-School मध्यें जातात व तेथून पुढें कॉलेजमध्यें जातात. बाकीची सर्वसाधारण मुलें आपल्या स्वतःच्या आवडीप्रमाणें कोणत्यातरी धंद्यांत पडतात. धंद्यांच्या शिक्षणासाठीं चालत असणाऱ्या शाळांतून ते नोकरी करून उरलेल्या वेळांत त्यांच्या विषयांत तज्ञ होतात. उदा. Electrical Engineer, Mechcanical Engineer वगैरे. तेथें मुलीसुद्धां कुठें कुठें नौकरी करतात त्यामुळें त्यांच्या आईवडीलांना बोजा जाणवत नाहीं. मी कित्येक ओळखीच्या लोकांना विचारीत असें कीं तुमची मुलगी काय करते. तेव्हां आमची मुलगी खाटकाच्या दुकानांत काम शिकते अथवा केस कापण्याच्या दुकानांत काम शिकतें असें सांगण्यांत त्यांना कधीहि लाज वाटलेली दिसत नाहीं. इतकेंच नाहीं परन्तु एखादी मुलगी चांगलें कपडे घालून जातांना दिसली तर तिच्याकडे बोटें दाखवून ही पहा आमची Princess Elizabeth चालली आहे असे कौतुकानें सांगायचें व त्यावर ते समर्थनहि करायचे किं आमचें देशांत इतकें उद्योगधंदे वाढलें आहेत किं प्रत्येकाला कांहीं ना कांहीं काम मिळून त्याला चांगला पैसा मिळवतां येतो व जो तो आपल्या पैशांप्रमाणें चांगलें रहाण्याचा प्रयत्न करतो. हें एकून मला आपल्याकडील बेकारीची आठवण आल्याशिवाय रहात नसे. आपल्या देशांत बायका काय परन्तु पुरुषहि बेकारीमुळें कमवत्या एका माणसावर अवलंबून असतात. आपल्याकडे मॅट्रिक झाल्यानंतर लगेच College मधें जाण्याचा धोपट मार्ग स्विकारतात. मग कितीदांहि नापास झालें तरी पदवी घेण्याचा अट्टाहास करतात व आपली शिक्षणाची कुवत लक्षांतच घेत नाहीं. तसें इथें मात्र नाहीं कारण मला कित्येक चांगल्या पदावर असलेली माणसें भेटली व त्यांनी मला सांगितलें किं मी कांहीं तुमच्यासारखें युनिव्हर्सिटीचें शिक्षण घेतलें नाहीं. मी senior cambridge झाल्याबरोबर नोकरीस लागलों व नोकरी करून कांहीं Technical school मधें अभ्यास करून ह्या पदावर आहे. त्या वेळेसही आपल्याकडील लोकांची वृत्ती व तेथील लोकांची वृत्ती ह्यांतील फरक जाणवला.

---

# अमेरिकेस प्रयाण

आमची बोट दुसरे दिवशीं दुपारीं २ च्या सुमारास फ्रान्समधील लहाव्रच्या बंदराला पोंहचली. ह्या बोटीला परत दुसऱ्या दोन बोटींनीं दोरांनीं खेंचून धक्क्याला आणून लावली. आम्ही ४ च्या सुमारास बोटीवरून खालीं उतरलों. आम्हांला उतरवून घेण्यासाठीं बोटीवर आलेल्या कंपनीच्या फ्रेंच नोकराला Pursuer नें पाठवून आमच्या ट्रांझीट वीसाचा बंदोबस्त केला. Pursuer हा उतारूंचें पैसे देण्याघेण्याचें काम व उतारूंना जमिनीवर उतरवून घेण्यासाठीं लागणारीं निरनिराळी सर्टिफिकिटें देण्याचे काम करीत असतो.बंदरावर उतल्यावर २४ तासानें जमिनीला पाय लागल्यामुळें कांहीं निराळाच आनंद वाटत होता. नंतर मी गांव पहावयास निघालों. गांव हे विशेष मोठें नसून गेल्या युद्धांत अगदीं बेचिराख झालें असल्यामुळें जिकडे तिकडे ६–६, ८–८ मजली इमारती बांधण्याचें काम चालू होतें. सामान उचलण्याकरितां मोठमोठ्या क्रेन्स होत्या, व घरें बांधण्याची कामें अत्यंत जोरांत चालली होती. इतक्या प्रमाणांत घरें बांधण्याची कामें मी कुठेंहि पाहिलीं नाहींत. तेथें मी एका मोठ्या स्टोअर्समध्यें गेलो व लहाव्रची कांहीं चित्रें घरीं पाठवण्यासाठीं विकत घेतली. परकीय भाषेमुळें भाषा बोलण्याचा चांगलाच त्रास पडायचा. परंतु दुकानावरील पाट्यावरून माणूस लवकर भाषा शिकूं शकतो असें मला वाटलें. गांवांतील कांहीं जुना भाग पाहून मी नंतर माझ्या बोटीवर यायला निघालों.

दुसऱ्या दिवशीं आमची बोट दुपारीं २ ला निघणार होती त्यामुळें १२ नंतर लोकांनीं जाऊं नये असें आम्हांला सांगण्यांत आलें. मी पुन्हां गांवांत फिरण्यास निघालों. माझ्याबरोबरचे दुसरे अमेरिकन उतारू फ्रान्समध्यें स्वस्त व उत्तम सुगंधी द्रव्यें (सेंटस्) मिळत असल्यामुळें तें खरीदण्यासाठीं गेली. आमची बोट दुपारीं २ च्या ऐवजीं ४ ला निघाली. बंदरावर उभे असलेल्या कांहीं फ्रेंच स्त्री–पुरुषांना आम्हीं बोटीवर उभे राहून " डाव् रीव्हायर् ला व्हीरा फरान्स ! " असे हात हलवून ओरडून सांगितलें. व तें सुद्धां अगदीं मनापासून तेच वाक्य बोलून पुढें " गुड–बाय् " म्हणाले.

आमची बोट ह्यानंतर ७ दिवसांनीं सरळ न्यूयॉर्कला जाणार होती. म्हणजे आतां ७ दिवस हे आम्हांला फक्त समुद्रावरच काढायचें होते. आम्ही थोडेच उतारू असल्यामुळें उतारूंची जहाजावरील अधिकाऱ्यांची चांगलीच घसवट व्हायची. जहाजावरील कप्तानाशीं व Chief–Engineer शीं माझा चांगलाच परिचय झाला होता. हे अमेरिकन कंपनीचें जहाज असल्यामुळें जहाजावरचे ऑफीसर्स सर्व अमेरिकन होते. अमेरिकन लोकांत असलेला वागणुकीचा साधेपणा त्यांच्यांत होता. जहाजावरील

रेडिओ ऑफिसर हा अमेरिकेंतल्या वकिली धंद्यांतला असून त्याला जहावरील नोकरी आवडत असल्यामुळें तो मधून मधून जहाजावरच रेडिओ ऑफीसरची नोकरी पत्करायचा कारण तो Radio-Engineer चें कामहि शिकला होता. आपल्याकडील कायदेपंडितांना रेडिओ कसा चालतो हें तर माहित नसणारच परंतु ते पाटी लावून बेकार राहतील परंतु असली नोकरी कधींच करणार नाहींत. जहाजावर स्वयंपाक करणारा 'बटलर' जर्मन आई-वडिलांचा असून पुष्कळ वर्षांपासून न्यूयॉर्क मध्यें स्थायिक झाला होता. तो फारच विनोदी होता. माझ्यासाठीं त्यानें एक वेळां भात व कोंबडीचें कालवण असे हिंदी पद्धतीचें जेवण तयार केलें होंते. जहाजाचे कप्तान मला हिंदुस्थानाबद्दल निरनिराळे प्रश्न विचारायचे व दुसऱ्या सर्व अमेरिकन लोकांसारखी त्यांना सुद्धां भिती वाटायची कीं हिंदुस्थान लवकरच कम्युनिझमचा स्वीकार करेल. पंडित नेहरूसुद्धां अंतःकरणानें Communist आहेत विशेष म्हणजे त्यांनीं मला विचारलें कीं, पंडित नेहरूंच्या पाठीमागें किती लोक आहेत ? त्यावर मी म्हणालों, त्यांच्या पाठी-मागें सर्व देश आहे. तेव्हां ते सर्व आश्चर्यचकित झाले. कारण त्यांची समजूत होती कीं, पंडित नेहरू जबरदस्तीनें झालेले हिंदुस्थानचे नेते असतील. व हिंदुस्थानांत Freedom of thought (विचार स्वातंत्र्य) नसेल. मी जेव्हां दुसऱ्या अमेरिकन लोकांना सांगावयाचों कीं, आमच्या देशांत तुमच्या देशापेक्षां पुष्कळ विचारस्वातंत्र्य आहे. तुमच्या देशांत कम्युनिझम काय आहे तुम्हांस माहिती आहे काय ? कम्युनिझमबद्दल तुमच्या अगदीं चुकीच्या समजुती आहेत. कोणी कम्युनिस्ट आहे असा संशय येतांच त्या माण-साला तुमच्या देशांत वाव नाहीं. माझ्या ह्या म्हणण्यानें त्यांना चांगलेंच आश्चर्य वाटलें. मला कॅप्टन पुर्नजन्माच्या सिद्धांताबद्दल विचारीत असे व माझें पुर्नजन्माबद्दल जें कांहीं ज्ञान होतें तें सर्व कांहीं मी त्यास दिलें. माझ्या बोलण्यानें त्यांना चांगलेंच ज्ञान झालेलें दिसलें. कारण आतां त्यांनासुद्धां मुक्ति मिळवण्याची इच्छा होऊं लागली. त्यांनीं मला विचारलें कीं, तुला काय आवडेल "पुर्नजन्म कीं मुक्ति" त्यावर मी म्हणालों कीं मला पुर्नजन्म आवडेल. माझ्या ह्या उत्तरामुळें त्यांना आश्चर्य वाटलें व ते म्हणाले असे कां ? त्यावर मी सांगितलें कीं, मला हें जग आवडतें व जगावरचा माझा मोह कमी झालेला नाहीं. ते तोंड आंबट करीत म्हणाले हे म्हणणें चुकीचें आहे व जगावर मोह ठेवणें योग्य नाहीं सर्वांत उत्तम म्हणजे "मुक्तिच" मला या जडवादी समजल्या जाणाऱ्या अमेरिकनांचें चांगलेंच आश्चर्य वाटलें. मला आणखीहि कांहीं अमेरिकन लोक अमेरिकेंत भेटले कीं, जे त्यांच्या जडवादाला कंटाळले होते व ते मला निक्षून सांगायचें कीं, आम्हीं केलेली चूक तुम्हीं करूं नका. तुमचें अध्यात्मक जीवन आमच्या जडवादी जीवनांपेक्षां पुष्कळ पटींनें बरें आहे.

मला बहुतेक लोक बोटीवर व अमेरिकेंत हिंदुस्थानच्या जातीच्या पद्धतीबद्दल निरनिराळे प्रश्न विचारीत असत व नंतर तुम्हीं आतां जातीयवाद सोडला पाहिजे असें सांगायचे. मी त्यांना जोरानें सांगत होतो कीं, आतां जातीपद्धत बहुशः निघून गेलेली आहे. व थोडी फार आहे ती केवळ खेडेगांवांतच आहे. मला हा प्रश्न विचारणारी एक मध्यम वयाची अमेरिकन महिला सुद्धां होती. ती इन्शुअरन्सचें काम करीत असे. तिच्याशीं मी दोन तास वादविवाद घालून तिला पटवून दिलें कीं, शहरांतून व सुशिक्षित लोकांत जातीयवाद अजिबात गेलेला आहे. ह्या बाईचा उल्लेख पुन्हां न्युयॉर्कच्या माझ्या वसाहतींत येईलच.

आमच्या उतारूंमध्यें एक आयरिश म्हातारा होता. त्याचें काम म्हणज आमच्या जहाजांतून जें शर्यतीचें घोडे जात होते त्यांची रखवाली करण्याचें होतें. हा गृहस्थ थोडा-बहुत अध्यात्मिक विचाराचा होता. त्याची हिमालयांतील ऋषीमुनींची भेट व्हावी अशी फार इच्छा होती. मी त्याच्याबरोबर शर्यतीचे घोडे पहाण्यास गेलो होतो.

अटलांटिक समुद्र हा तुफानी ( खवळलेला ) समजला जातो. त्यांत जहाज मुळींच संथपणें चालत नाहीं परन्तु आमच्या वेळेस आम्हांला फारसा त्रास झाला नाहीं. आमचें जहाज अगदीं संथपणें चाललें होतें. अधून मधून इकडच्या तिकडच्या जाणाऱ्या बोटी आम्हांला दिसायच्या. Queen Elizabeth ही बोट आम्हांला भेटली. आम्हीं सकाळीं उठायचे, नंतर न्याहरी करून जहाजावर असलेलीं कांहीं पुस्तकें व मासिकें वाचत आरामखुर्चीवर पडून रहायचें तसेच थोडेबहुत डेकवर खेळायचें नंतर जेवणाची घंटा वाजली कीं जेवण करून डेकवर आराम करायचा असा आमचा जहाजावरील कार्यक्रम होता. दुपारीं चहा वगैरे घेऊन रात्रीचे जेवण उरकल्यानंतर झोंप येईपर्यंत आरामखुर्चीत पडून रहात असूं. एखादेवेळेस गप्पागोष्टी करून झोंपी जात होतों. कांहीं वेळां आमची ड्रील व्हायची म्हणजे उतारू व जहाजावरील अंमलदार तसेंच नाविक ह्यांनीं जहाजास कांहीं अपघात झाला तर समुद्रांत आपला जीव वांचविण्यासाठीं Sefety-Belts चा कसा उपयोग करायचा ह्याचें प्रात्यक्षिक देण्यांत यायचें. पुष्कळ वेळां जहाजाच्या थोड्या अंतरावर Porpoise म्हणून लोक ओरडायचे व बोटें दाखवायचे. पोरपोईज नांवाचा एक मोठा मासा आहे.

आमचें हळूं हळूं दिवस जात होते. आम्हीं न्यूयॉर्कहून २०० मैल अंतरावर आलों होतों. ह्यावेळेस आम्हांला समुद्र प्रवाहांत लाल रंगाचा एक निराळा प्रवाह दिसला व त्यांत कांहीं बांबू सारखे व जंगली पदार्थसुद्धां तरंगत होते. आम्हीं कॅप्टनला विचारलें असतां

त्यानें सांगितलें कीं हा प्रवाह मॅक्सिकोच्या आखातांतून येतो. नंतर हळुंहळूं आम्हांला श्वेतरंगाचें पक्षी मासे पकडण्यासाठीं येतात ते दिसूं लागलें होतें. आम्हांला किनाराहि दिसूं लागला होता. आमचें मन आतां धरणीकडे लागलें होतें. आतां पक्षांची संख्याहि वाढूं लागली असून ते जहाजाच्या रोलकांठीवर येऊन बसूं लागलें. आमच्या ह्या नव्या मित्राबद्दल आम्हांला फारच कुतुहल वाटायचें. न्यूयॉर्कहून १०० ते १२५ मैलांवर एक मोठें जहाज उभें केलें असून त्याचें काम न्यूयॉर्ककडे जाणाऱ्या जहाजांवर टेहळणी करायचें होतें. हळुंहळूं जहाजांचा सुळसुळाट होऊं लागला व आम्हांला खूप जहाजें दिसूं लागलीं. न्यूयॉर्कला आम्हीं गुरुवारीं रात्रीं पोंहचूं असें आम्हांला सांगण्यांत आलें. रात्रीं ९–१० च्या सुमारापासूनच आम्हांला दोन्ही बाजूला Light Houses दिसूं लागल्या. तसेंच कांहीं विमानतळाचें Search-light सुद्धां दिसूं लागली. आमचें जहाज रात्रीं २ च्या सुमारास न्यूयॉर्क गांठेल असें जहाजाच्या अधिकाऱ्याचें म्हणणें होतें कीं, न्युयॉर्क कसें दिसतें याबद्दल मला फारच उत्कंठा लागली होती. म्हणून मी न्युयॉर्क आल्याबरोबर मला उठवा असें सांगून ठेवलें होते. कांहीं वेळानंतर मी खडबडून उठलों व पाहूं लागलों तर आमचें जहाज चालत नव्हते व शान्तपणें उभें होते. जिकडे तिकडे विजेच्या दिव्यांचा झगझगाट दिसत होता. बरीच जहाजें आमच्या बाजूनें शिट्या फुंकत जात होती. आम्हीं ह्या वेळेस न्युयॉर्क बंदरांत होतो. सकाळीं कस्टम अधिकारी येऊन जहाजाची व उतारूंची तपासणी करतील व नंतर जहाजाला कंपनीच्या मुद्दाम बांधलेल्या धक्क्यावर जहाज थांबवण्याची परवानगी मिळेल असें आम्हांला सांगितलें. मी बराच वेळ जहाजांचा तो चाललेला गजबजाट बघून व जवळील रस्त्यावरची मोटारींची वाहतूक पाहिल्यानंतर सकाळीं लौकर उठण्याचें ठरवून मी माझ्या केबीनमध्यें झोंपीं गेलों. सकाळीं लौकरच उठलों व डेकवर जाऊन उभा राहिलों. एका बाजूला एम्पायर स्टेट बिल्डिंगची उंच इमारत दिसत होती. त्याचप्रमाणें दुसऱ्याहि कांहीं उंच इमारती दिसत होत्या. दुसऱ्या बाजूला हडसन नदीच्या बाजूनें जाणाऱ्या रस्त्यावर मोटारींची सतत वाहतूक चालू असलेली दिसत होती. थोड्याच वेळांत कस्टमची व ॲमिग्रेशन डिपार्टमेंटची मोटर लॉंच आमच्या बोटीजवळ आली. त्यांनीं लवकरच उतारूंचें व जहाज वरील माणसांचे कागदपत्र तपासण्यास सुरुवात केली. जे लोक यु. एस. ए. मध्यें कायम वसाहतीसाठीं आलें होते त्यांचें कागदपत्र ते जरा बारकाईनें तपासत होतें. ह्या कस्टम अधिकाऱ्यांचें सर्व दृष्टीनें समाधान झाल्यानंतरच बोटीला धक्क्याला लावण्याची परवानगी मिळतें. आमची बोट तपासणी झाल्यानंतर कंपनीच्या धक्क्याला लागली. आम्हीं सर्व लोक उतरण्याच्या गडबडींत होतों. आमचें सामान कॅबीनमध्येंच राहूं देण्यास सांगण्यांत आलें. बोटीच्या तळघरांतून ( होल्ड ) एक आडवी शिडी लावून धक्क्यापर्यंत उतरण्याचा

बंदोबस्त केला होता. आम्हीं खालीं आलों व एका बाजूला उभें राहिलों. आमचें सामान थोड्या वेळानें आणलें. नंतर कस्टम अधिकाऱ्यांनीं आमच्या सामानाच्या तपासणीस सुरुवात केली. मला फक्त औपचारिक प्रश्न विचारलें व जाण्याची परवानगी दिली. न्युयॉर्क संबंधीं माझ्या निरनिराळ्या कल्पना होत्या. न्युयॉर्क हे शहर मोठें व तेथील अमेरिकन लोकांची रहाणी म्हणजे अत्यंत खर्चाची आहे हें मला माहित असल्यामुळें मला वाटलें कीं, आपलें कसें होईल म्हणून मी जरा साचंकतेनेंच उत्तरलों. Y. M. C. A. मध्यें International Students' Home मध्यें चांगलें स्वस्त पडतें असें मला इंग्लंडमध्यें लंडनला असतांना कळलें होतें. तेथील पत्ताहि मजजवळ होता. बोटीवरील आयरिश माणसानें मला स्लोन हाऊसच्या Y. M. C. A. मध्यें उतरण्यास सांगितलें होते व ते चांगलेंच स्वस्त पडेल असेंहि सांगितलें होते त्यामुळें मी तेथेंच जाण्याचें ठरविलें.

मी शुक्रवारीं न्यूयॉर्कला उतरलों व सोमवारीं मला वॉशिंग्टनला जायचें होतें. 'स्लोन–हाऊस' ही पंधरा मजली इमारत होती व त्यांत २००० माणसांना रहाण्याची सोय होती. तेथें गेल्याबरोबर मी प्रथम रिसिप्शन रूममध्यें गेलों व खोली मिळण्याविषयीं चौकशी केली. नंतर मला खोली मिळाल्यामुळें माझें नांव राजिस्टर केलें. त्याचप्रमाणें तीन दिवसांचें भाडें आगाऊ देऊन नंतर मला खोलीची किल्ली दिली गेली. किल्लीबरोबर एक कार्डहि देण्यांत आलें. त्यांत माझें नांव, खोलीचा नंबर वगैरे लिहिलें होतें. मी माझी सूटकेस घेऊन वर गेलों. १५ व्या मजल्यावरच्या खोलींत माझें सामान ठेवलें. इमारतीच्या मध्यभागीं तोंड धुण्याकरितां निरनिराळीं वॉश–बेसीन्स होती व आंघोळीची व्यवस्थासुद्धां होती. मी माझे नित्यक्रम आटपून लीफ्टमध्यें बसून खालीं आलो. इथें लीफ्टला लागूनच एक लहानशी पेटी असते त्यांत तुमच्या खोलीची किल्ली टाकायची व ती किल्ली तुम्हीं टाकतां ह्याची दक्षता लीफ्ट चालविणारा मनुष्य घेतो. नंतर मी खालीं आलों व खालीच वाय्. एम्. सी. ए. च्या चालणाऱ्या 'कॅफेटरींत' न्याहरीला गेलों. इथें ओळीनें निरनिराळ्या जिनसा कांचेच्या कपाटांत ठेवलेल्या असतात. तुम्हांला लागेल ती वस्तू तुम्ही दाखवायची म्हणजे वाढपे लोक ती वस्तू तुमच्या ट्रेमध्यें ठेवतात. नंतर तुम्हीं एका टोंकापासून दुसऱ्या टोंकाला सरकत सरकत जातात व तुम्हांला लागेल ती वस्तू तुमच्या ट्रेमध्यें जमते. सुरुवातीच्या ठिकाणीं सर्व ट्रे जमतात. तेथें ट्रेच्या चवडी असतात. त्याखालून गरम हवा पसरवून त्यांना कोरड्या पसरवून त्यांना कोरड्या व जंतुविरहीत करण्यांत येतात. तुम्हीं जशी ट्रे उचलून घेतां तशी खालची ट्रे वर येते व दरवेळेस तुम्हांला गरम ट्रे मिळते. दुसऱ्या टोंकाला पैसे घेणारी बाई

असते ती तुमच्या ट्रेमधील जिनसा पाहून पैसे सांगते. तिच्या कॅश मशीनमध्यें त्याप्रमाणें त्या पैशांचा आंकडा नोंदते. तुम्हीं जास्त पैशांचीं रक्कम दिली तर बाकीचे पैसे मोजून देण्यास त्यांना वेळ लागत नाहीं, कारण निरनिराळ्या पैशांच्या रक्कमेचें त्यांनीं पुडकें करून ठेवलेलें असतें. तिला पैसे देणें झाल्यानंतर जवळच कांटा–सुरी व कागद असतो तें सर्व तुम्हीं तुमच्या ट्रेमध्यें ठेवायचें व बाजूच्या मोठ्या जेवणाच्या खोलींत जेवावयास बसायचें. मी माझें खाण्याचें आटोपून बाहेर पडलों. मी जवळच असलेल्या पोस्ट ऑफीस-मध्यें घरीं पत्र टाकायचें असल्यामुळें गेलों. ह्या पोस्ट ऑफीसची बिल्डिंग भयंकरच मोठी होती. पत्र लिहिण्याकरितां १० सेंटची हवाई पत्रें घेतलीं. मला पोंहोचल्याची तार करायची होती म्हणून तार करायची खिडकी कुठें आहे असें विचारलें तेव्हां मला असें सांगण्यांत आलें कीं तार करण्याचें काम पोस्ट ऑफिस करीत नसून निरनिराळ्या प्रायव्हेट कंपनीज तें करतात. व आपण आपल्याला लागेल त्या कंपनींत जाऊन तार करूं शकतों. नंतर जवळच असलेल्या वेस्टर्न कंपनींत मी तार करण्यास गेलों. तेथें तारेचें काम करणाऱ्या माणसांना मला हिंदुस्थानांत तार करायची आहे व ती शक्यतों कमी खर्चांत पाठविण्यास मी त्यांना सांगितलें. नंतर त्यांनीं मागितले तितके पैसे देऊन पैशाबद्दल पावती मागितली परंतु त्यांनीं सांगितलें कीं पावतीची जरूरी नाहीं, तुमची तार बरोबर मिळेल. मीसुद्धां त्यांच्यावर विश्वास ठेवून बाहेर आलों. नंतर माझी तार घरीं व्यवस्थित पोहोंचल्याचेंहि मला कळलें.

त्यानंतर मला कांहीं न्युयॉर्क कंपनीच्या ऑफिसमध्यें जायचें होतें म्हणून तेथें जाण्यास निघालों. सर्वांत प्रथम जॉय मॅन्यूफॅक्चरींग कंपनीच्या एम्पायर स्टेट बिल्डिंग मध्यें जाण्याचें ठरविलें कारण ही बिल्डिंग माझ्या निवासस्थानापासून जवळच होती. हें जगांतील सर्वांत उंच बिल्डिंग असून १०२ मजल्याचें आहे. ह्याच्यावर टेलिव्हिजनचें एरिअल वगैरे लावलेलें आहेत. मला ६७ व्या मजल्यावर जायचें होतें. त्यामुळें कोणत्या लिफ्टनें जावें ह्याचें निरीक्षण केलें निरनिराळ्या मजल्याकरितां निरनिराळ्या लीफ्टस् होत्या. उदा० पहिल्या मजल्यापासून १५ व्या मजल्यापर्यंत एक लीफ्ट असे. ठराविक लीफ्ट ठरवून दिलेल्या मजल्यापर्यंतच जातात. तुम्हीं कोणत्या मजल्यावर आहांत हे विजेच्या लहान लहान दिव्यांच्या सहाय्यानें कळतें. व त्याप्रमाणें आपल्याला जायचें असेल तेथें जातां येते. त्याचप्रमाणें अमुक एक ऑफिस कुठें आहे हे आपल्याला शोधावें लागत नाहीं कारण ज्या मजल्यावर ते ऑफिस असेल त्याच्या पाठीमागें मजल्याचा नंबर असून पुढें त्या ऑफिसचा नंबर लावलेला असतो. उदा० ६७२० हा नंबर ६७ मजल्यावर असलेल्या २० नंबरच्या ऑफिसचा होय. व हीच

तऱ्हा हॉटेलमध्यें असते. कोणाला हॉटेलमधील अमुक खोलीचा पत्ता पाहिजे असल्यास हॉटेलमधील मजल्याच्या नंबरापुढें खोलीचा नंबर लिहिलेला असतो.

मी जॉय कंपनीचा तपास करीत असतांना ते ऑफिस बदलल्याचें कळलें व त्यांच्या नव्या ऑफिसचा पत्ता काढण्यासाठीं कचेरींत जाऊन पत्ता घेऊन मला ज्यांना भेटायचें होतें त्यांच्याकडे गेलो परंतु ते दौऱ्यावर गेल्यामुळें मी त्यांच्या वरीष्ठ ऑफिसरला भेटलों. व मला अमेरिकेंत काय काय बघायचें आहे हें त्यांना सांगितल्यावर ते माझा कार्यक्रम लौकरच आंखून देतील असें त्यांनीं मला सांगितलें. त्यांच्या ऑफिसमध्यें मी बसलों असतांना मला एक दोन गोष्टी विशेष वाटल्या. त्या ह्या कीं एक चिनी बूट–पॉलिश करणारा माणूस अगदीं ऑफिसमध्यें येऊन विचारत होता कीं, बुट–पॉलिश करायचें आहे कां ? आपल्या देशांत असे ऑफीसमध्यें बूट–पॉलिश करायला जाण्यास धजला नसता. त्याच -प्रमाणें निग्रो मेसेंजर बॉय म्हणजे आपल्याकडचा चपराशी अगदी स्टूलावर बसून कोका कोलाची बाटली घशाखालीं सोडत बसला होता व तेथें एक टाईप करणारी बाई त्याला विनंती करत होती कीं, हें पत्र अमुक अमुक ठिकाणीं नेऊन दे. परंतु त्यानेंहि मी कोका कोला पिल्यानंतर तुझें काम करतों असें उत्तर दिलें. त्यावेळेस त्याच्याकडील शिस्त मला वेगळीच वाटली, त्याचा उल्लेख मी पुढें करणारच आहे. येथील वहातुकीचा पोलीस किंवा दुसरेहि पोलीस अगदीं आरामशीर तंगड्या पसरून कपड्याबद्दल विशेष काळजी न घेतां उभे राहिलेले दिसतात. त्यांच्यापाठीमागें असलेल्या रिव्हॉल्हरवरून मात्र ते पोलीस आहेत हे कळायचें. मला इंग्लंड व येथील पोलीस यांच्यांत चांगलाच फरक जाणवला. मी ह्याबद्दल ओळखीच्या माणसाला विचारलें असतां ते म्हणाले कीं, इंग्लंड–मधील लोक बाह्य देखाव्याला आकार्षिले जातात. पण आम्हांला जे सुखावह वाटत असेल तेंच आम्ही करतों. नंतर मला आणखी एका कंपनीच्या कचेरींत जायचें होतें व संध्या–काळ होऊन गेलीं होती त्यामुळें न्युयॉर्कचा कांहीं भाग पाहाण्याचें ठरवून मी **ब्रॉडवेला** जायचें ठरविलें.

**ब्रॉडवे** हा न्युयॉर्कचें मोठमोठें सिनेमा व थिएटरांकरितां प्रख्यात आहे. मी बसमध्यें बसलों असतांनाच माझ्या शेजारच्या उतारूला रेडिओ–सिटी–म्युझिक–हॉल येथें बस आली म्हणजे मला सांगा असें सांगून ठेवलें. तेथें आल्यानंतर तिकिटांची चौकशी केली परंतु खालच्या दर्जाची तिकिटें संपून वरच्या वर्गाची तिकिटें घेण्यासाठीं बराच क्यू लागलेला दिसला व रविवारीं तिकिटाचा दर कमी असल्यामुळें मी रविवारीच जाण्याचें ठरविलें नंतर मी जवळच असलेले रॉकेफेलर–सेंटर पहाण्याचा विचार केला. आंतील मुख्य हॉलमध्यें गेलों व १ डॉलरचें तिकिट काढलें.

आम्हांला एका विशिष्ट हॉलमधें मोठया खोलींत थोडा वेळ थांबण्यास सांगितलें तेथें सुद्धां माझ्याचसारखीं ' रॉक फेलर ' सेंटर बघणारी माणसें जमली होती. थोड्याच वेळानें आम्हांला रॉके–फेलर सेन्टर दाखविण्याकरितां एक वाटाडी मुलगी आली. तिनें गुड–इव्हीनिंग, एव्हरीबडी करून आतां मी तुम्हांला रॉके फेलर सेन्टर दाखवावयास घेऊन जाते असें म्हणाली. नंतर तिनें स्वतःचे नांव सांगून आम्हांला प्रश्न विचारावयाचे असल्यास विचारा असें सांगून सर्वांना तिच्या पाठीमागें येण्यास सांगितलें. आमचा अंदाजे २५–३० स्त्रीपुरुषांचा घोळका होता. व त्यांत कांहीं अमेरिकन सोडून बहुतेक लोक बाहेरून आलेल्या देशांतील होते.

रॉके–फेलर हें अमेरिकेंतलि हे अत्यंत धनाढ्य गृहस्थ होऊन गेले. तेथील त्यांचा फोटो दाखवून आमच्या वाटाड्या मुलीने रॉके फेलरची माहिती सांगून ती म्हणाली, ५० वर्षापूर्वी ही जागा अगदीं उजाड असून कोलंबिया युनिव्हरसिटीला थोडक्या किंमतींत मिळाली. नंतर ती रॉक फेलरनें विकत घेऊन ही बिल्डींग बांधली. अशा ७–८ बिल्डींग असून त्या ६०/७० मजली आहेत. त्यांत आर.सी.ए.चे बिल्डींग सर्वांत उंच आहे. ह्या इमारतींना वेगवेगळी नांवे असून तेथें अनेक कंपनीच्या कचेऱ्या आहेत. एका इमारतींत ब्रिटीश कंपन्या असून कांहीं ब्रिटीश सरकारच्या ऑफिसेस सुद्धां आहेत. समोरील इमारतींत फ्रेंच कंपन्या व फ्रेंच सरकारची कांहीं ऑफिसेस आहेत. ह्याच इमारतींत त्या त्या देशाचीं वैशिष्ट्ये ठेवलेली आहेत. ब्रिटिश व फ्रेन्च इमारतीमधील रस्त्याला लोकांनीं गंमतीनें ' इंग्लीश चॅनल ' असें नांव ठेवलें आहे. ग्रीक इमारतींत तेथील देवाचे पुतळे केलेले असून मुद्दाम ग्रीक पत्थर मागवून त्याची इमारत बनविली आहे. तसेंच छतांवरून अनेक चित्रें काढली आहेत. वेळ ( टाईम ) ह्याचे चित्र काढलें असून एका बाजूला भूतकाळ, मध्यभागीं वर्तमानकाळ व दुसऱ्या बाजूला भाविष्यकाळ असें चित्र एका मोठया चित्रकाराकडून काढलें आहे. भूतकाळाकडून तें चित्र पाहतांना टाईम त्याकडे निराळ्या दृष्टीने बघत असतो. त्याचप्रमाणें मधें उभे असलेल्या वर्तमानकाळाकडेहि निराळ्या दृष्टीने पहात असतो. व भविष्याकडेहि निराळ्या दृष्टीनें पहात असतो. आम्हांला निरानिराळ्या इमारती दाखवून खालीं असलेल्या रॉ. फेलर सेन्टरचें वैशिष्ट्य अशा एका ओपन एर रेस्टॉरन्टकडे आणलें. तेथेंच एका मोठया चौकांत पुढच्या भागांत एक मोठा ग्रीक देवाचा पुतळा होता व त्याच्यासमोर लोक खुर्चीं, टेबलें टाकून खाण्या–पिण्याच्या पदार्थांचा आस्वाद घेत होते. मधेंच सुंदर सुंदर फुलांची झाडें होती उन्हाळ्यांत ह्या चौकांत कृत्रिम तऱ्हेनें बर्फ गोठवून लोक स्केटींग करतात. नंतर आम्हांला रेडियो सिटी म्युझिक हॉलची इमारत दाखविली. तसेंच जगांतील सर्व मोठया सिनेमागृहांतून

त्यांत बसलेलीं ५००० माणसें जेव्हां बाहेर पडतात तेव्हां एकदम घोळका न होतां सुट सुटे चालतां यावे ह्याकरितां मधूनच केलेली त्रिकोनी खांबाची युक्ति समजावून दिली. ह्या त्रिकोनी खांबाजवळ घोळका आल्याबरोबर सुटा होतांना दिसतो. त्याच्याजवळ एक मोठा थोरला हॉल होता. ह्या हॉलच्या खिडक्या व दारांना लावलेले पडदे मौल्यवान कापडाचे असून ३–३ टनाचे होते. ते पडदे धुण्यास पाठविणें सुलभ नसल्यानें लॅंड्रीची माणसेंच ते जागच्याजागीं धुण्यासाठीं येतात. तेथें छतावर खरोखरच सोन्याचा पत्रा मढ-वला होता. व त्यामुळें भिंतीचें व खालच्या जमिनीचे प्रतिबिंब छतावर पडून भिंत बरीच उंच वाटायची व तिच्या खऱ्या उंचीची कल्पना येत नाहीं. आम्हांला त्या वाटाड्या बाईनें तिची उंची किती असेल ह्याचा प्रत्येकाला अंदाज विचारला तेव्हां कोणी २००–४०० फूट तर कोणि १००–१५० फूट असेल असें म्हणू लागले. परंतु मी थोडा अंदाज लावून ६० फूट उंची आहे असें सांगितलें, त्यानंतर आमच्या वाटाड्या बाईनें जाहीर केलें कीं, हिंदुस्थानच्या गृहस्थाचा अंदाज खरा आहे. हें ऐकून मला जरा हायसें वाटलें. नंतर आम्हांला ३० किंवा ४० मजल्यावर असलेला भाग म्हणजे टॅरेस गार्डन दाखविला. ह्याच्या छतावर छत समान असून छत उतरतें आहे असें दाखविण्यासाठीं कांहीं विशिष्ट रेघा ओढून दृष्टीभ्रम केलेला आहे. इथून दिसणाऱ्या निरनिराळ्या इमारती सुद्धां आम्हांला दाखविल्या. नंतर आम्हीं ७० व्या मजल्यावर लिफ्टनें वर गेलों. तेथें गच्चीवर केलेल्या ऑबसरवेटरीच्या सहाय्यानें सबंध न्युयॉर्क शहर दिसत होतें. समोरच कांहीं अंतरावर एम्पायर–स्टेट–बिल्डिंग सुद्धां दिसत होतें. तेथें फारच मोठे विजेचे दिवे लावले होते. गच्चीवर दोन डोळे लावून बघणाऱ्या दुर्बिणी निरनिराळ्या ठिकाणीं ठेवल्या ोत्या. व त्यांत १० सेंटचें नाणें टाकलेंत ( विशिष्ट जागीं ) तरच तुम्हांला लांबचा देखावा अगदीं जवळ दिसतो. गच्चीच्या चारी बाजूला लोंकांच्या सुरक्षिततेसाठीं मजबूत तारेचें कुंपण केलें होतें. एका बाजूला हडसन नदी तर दुसऱ्या बाजूला ईस्ट नदी, त्यांत चाल-णारीं गलबतें, समोरच असलेलें मोठें उपवन ( पार्क ), आजुबाजूच्या मोठमोठ्या उंच इमारती व रस्त्यावरून जाणाऱ्या मोटारींची सतत वहातुक, तसेच विजेचे निरानिराळें असंख्य दिवे असा देखावा फारच नयनरम्य होता. गच्चीवर एका उंच प्लॅटफॉर्मवर लहानसा बाग केला होंता. तेथें खुर्च्या, बाकें वगैरे होती. लोक तेथें न्यूयॉर्कचें हें दृष्य पहात असतात.

थोड्या वेळानें मी सुद्धां एका खुर्चीवर बसलों. व तेथें माझ्याजवळ बसलेल्या एका गृहस्थाशीं मी गोष्टी करण्यास सुरुवात केली. हे गृहस्थ त्यांच्या कॅमेऱ्यानें एकसारखे फोटो घेत होते मी त्यांना विचारलें कीं, तुमच्या कॅमेरावरून फोटो चांगले निघतील

कां ? त्यावर ते मला म्हणाले कीं, माझा कॅमेरा जर्मन कॅमेरा असून त्यांचे नांव लाइका आहे व ह्या कॅमेरानें मला न्यूयॉर्कची रात्रीची चित्रें घ्यायची आहेत. नंतर आम्हीं निरनिराळ्या विषयांवर बोलूं लागलों. मी हिंदुस्थानी आहे हे कळल्यावर माझ्याशीं हिंदुस्थानबद्दल गोष्टी करण्यास सुरुवात केली. त्यांनीं महात्मा गांधीबद्दल बरेच वाचले होतें. तसेंच त्यांना आपल्या राजकीय नेत्यांबद्दल व जवाहरलाल नेहरूंबद्दल फार आदर होता. त्यांनीं आपल्या सरकारबद्दल चुकीचे आरोप केले व अमेरिकेंतील लोकशाही कशी चालते ते सुद्धां सांगितले. त्याचप्रमाणें त्यांच्या सेनेटमध्यें निरनिराळ्या गटांचे हित व ते निराळे गट कसे संभाळतात व त्यामुळें बहुजन समाजाचें कसें नुकसान होते तेहि समजावून सांगितले. उदा. शेतकरी वर्गाचे हित सांभाळण्याकरितां त्यांच्याकडून लाखों डॉलर्सचे लोणी, अंडीं किंवा धान्य सरकार विकत घेऊन त्यांचा भाव कमी पडूं देत नाहींत. व हा सांठा सरकारजवळ नासला तरी चालेल परंतु शेतकऱ्यांचे नुकसान होऊं नये म्हणून तो सांठा बाजारांत येऊं देणार नाहींत. मी त्यांना सांगितलें कीं, तुमच्याकडील लाखों पौण्डाचे तूप आमच्या देशांत जात असून ते चांगलें नसल्याची तक्रार मी हिंदुस्थानांत ऐकली. नंतर पुढें ते म्हणालें कीं, निरनिराळ्या विशिष्ट गटांचे हित पहाण्यासाठीं त्यांची पगारदार माणसें लॉबीमध्यें असतात. त्यांना लॉबीस्ट म्हणतात. ह्यांचे काम ह्या गटाच्या हिताविरुध्द जर एखादा कायदा ( बील ) आला तर सेनेटच्या निरनिराळ्या सभासदांना भेटून त्यांना आपल्या गटाविरुध्द कायदा पास होऊं नये म्हणून ते लागेल तो प्रचार करतात किंवा सेनेटच्या माणसांना लांचलुचपत देऊनसुध्दां त्यांना आपल्या बाजूचें करतात. तसे केल्याचींहि उदाहरणें आहेत. समजा तेलाच्या खाणीच्या मालकांविरुध्द कांहीं कायदा पास होत असेल तर तो कायदा होऊं नये म्हणून लॉबीस्ट सर्व प्रकारचे उपाय योजतात. ह्या निरनिराळ्या गटांच्या लोकांजवळ एवढा पैसा असतो कीं, ह्या कामाकरितां वाटेल तितका पैसा खर्च करतात. अर्थात ज्याच्याजवळ पैसा जास्त असेल त्याचा जोर जास्त असतो व म्हणूनच अमेरिकेंत Doller is all important असे म्हणतात. सेनेटच्या सर्व सभासदांवर लॉबीस्ट वजन आणूं शकतात. जनहिताची कार्यें ह्या सेनेटकडूनच होतात. त्यांनीं मला आणखी सांगितलें कीं, जशी रशियाचीं ' होयबा ' करणारी राष्ट्रें आहेत तशा आमच्या युनायटेड स्टेटसचीपण आहेत. दक्षिण आफ्रिकेंतील राष्ट्रें नांवालाच स्वतंत्र असून ती आमची होयबा करणारीं राष्ट्रें आहेत. आमच्या विरुध्द (यू.एन्.ओ.) संयुक्त राष्ट्रसंघांत त्यांना जाण्याची हिंमत नाहीं.कारण आम्हीं त्यांच्याकडून त्यांच्या देशांत होणारा पुष्कळ माल विकत घेतो व त्या देशांची आर्थिक उन्नति आमच्या भांडवलदारांच्या हातांत आहे. ह्यांना आम्हीं बनाना स्टेटस म्हणतो. कारण ह्या देशांतून बरींच केळी वगैरे होतात. व मुख्यतः ती आम्हींच विकत घेतों.

न्यूमेक्सिको व कॅलिफोर्नियाचा कांहीं भाग आम्हीं मेक्सिकोकडून जबरदस्तीनें बळकाविलेला आहे. व ते लोक अजून आमच्या विरुद्ध आहेत. ते ह्या दिवसाची आठवण रहावी म्हणून एक शोक–दिन सुद्धां साजरा करतात. ते पुढें म्हणाले कीं, खनिजाबद्दल आमचे सरकार स्वतःची मालकी स्थापन करूं शकत नाहीं. त्यामुळें खनिजावर खाजगी मालकी असल्यामुळें चांगलेंच नुकसान होते. परंतु आमच्या देशावर निसर्गानें चार हात ठेवल्यानें ही उणीव झांकून गेली आहे. युनायटेड सेटस्‌च्या कांहीं राज्यांचे हक्क कांहीं विशिष्ट जागीं होतें व आयसेनहॉवरनें निवडणुकीपूर्वी हे सर्व हक्क फेडरल गव्हर्मेन्टकडे घेऊं अशी घोषणा केली होती. परंतु त्यांनीं त्यांचे वचन अजूनपर्यंत पाळलें नाहीं कारण तसें केल्यास ही राज्यें त्यांच्या विरुद्ध होतील. ह्या राज्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणें आपापल्या माणसांना खनिजाचे पट्टे देतां येणार नाहींत.

ह्या गृहस्थाबद्दल आणखी चौकशी करतां हें न्युयॉर्कच्या एका खाजगी वैज्ञानिक संशोधन संस्थेंत वैज्ञानिकाचे काम करीत होते. व त्यांनीं स्वतःच्या नांवावर कांहीं पेटन्टस्‌ मिळाविलीं होती. ह्यांचे नांव मायरन्‌ प्लीझर असून ते शिकत असतांना त्यांच्याबरोबर हिंदुस्थानचे एक तिवारी नांवाचे गृहस्थ होते जे हल्लीं बनारस विद्यापीठात प्रोफेसर आहेत. ह्या तिवारीकडून त्यांनीं हिंदुस्थानच्या रितीरिवाजांबद्दल पुष्कळ माहिती गोळा केली होती. त्यांच्या प्रामाणिक व बुद्धीवादी बोलण्याबद्दल मला त्यांच्याबद्दल आदर उत्पन्न झाला होता व खरोखरच त्यांच्यासारखा खरें बोलणारा माणूस मला परत अमेरिकेंत भेटला नाहीं.

थोड्या वेळानंतर आम्हीं फिरायला जाण्याचें ठरवून खालीं उतरलों व पायीं चालूं लागलों. मला मुव्ही कॅमेरा घ्यायचा आहे असें त्यांना कळल्यावर त्यांनीं मला रस्त्यावरील निरानिराळीं कॅमेराची दुकानें दाखविली. तसेंच न्युयॉर्कमध्यें पुष्कळ दुकानांत डिसकाऊंट मिळत नाहींत असें सांगितलें जातें. परंतु सेल्समनला जरा बाजूला घेऊन कमींत कमी काय किंमतीला द्याल असे विचारून “ तुम्हीं मला डिसकाऊंट दिलें आहे हें मी सांगणार नाहीं ” असें सांगितलें कीं, ते आपोआप डिसकाऊंट द्यायला तयार होतात. तसेंच त्या गृहस्थांनीं मला त्यांचा पत्ता देऊन सांगितलें कीं, ह्या पत्त्यावर मला टेलिफोन करा म्हणजे आपण दोघे कॅमेरा घेण्यास जाऊं. नंतर हळुंहळुं चालत आम्हीं न्यूयॉर्कच्या ब्रॉडवे वर आलों. तेथें सुद्धां त्यांनीं मला न्यूयॉर्कची बरीच माहिती सांगितली. ब्रॉडवेजवळ दुकानांत असलेल्या जिनसा चांगल्याच महाग असतात. तसेंच परदेशी किंवा अनोळखी

गिऱ्हाईकाचा ते फारच फायदा घेतात. किंमतीच्या वस्तु जास्त आकारतात म्हणून त्या बाजाराला ( सकर्स मार्केट ) म्हणजे 'मुर्खांचा बाजार' म्हणतात.

ह्या गृहस्थाना पुस्तकांचा चांगलाच नाद असल्यामुळें हें पुस्तकांच्या पुष्कळ दुकानांतून जायचें व कांहींना कांहीं पुस्तकें विकत घेत असायचे. आमचें पुष्कळ फिरणें झाल्यानंतर त्यांनीं मला सांगितलें कीं, आतां मी घरीं जातो व तूं आतां इथूनच जवळील सब वे म्हणजे जमिनीखालून चालणाऱ्या रेल्वेच्या स्टेशनवर जाऊन त्यापलिकडे असलेल्या तुमच्या निवासस्थानीं जा. ते मला सबवे पर्यंत पोंहचवावयास आलें मी त्यांना तिकिट कुठें काढायचें असा प्रश्न विचारल्यावर ते मला म्हणाले कीं, तूं अद्याप सबवेनें आलास नाहींस काय ? ह्या ठिकाणीं तिकिटें नसून फक्त १५ सेंटचे ॲल्युम्युनियमचें टोकन मिळतें व ते तेथील गोल फिरणाऱ्या फाटकामध्यें टर्न स्टाईल मध्यभागीं विशिष्ट छिद्र केलेल्या जागेंत टाकलें म्हणजे हे फाटक फिरतें व उतारूंना प्लॅटफॉर्मवर आंत जातां येते. ह्या गोल टोकनसूवंर फक्त एक लहान क्रॉस छेदलेला असतो व त्यावर तारीख किंवा स्टेशनचें नांव वगैरे कांहीं नसते त्यामुळें आपण एका वेळीं लागतील तेवढी टोकनस् घेऊं शकतों व दुसऱ्या नाण्यांबरोबर पाकिटांत ठेवून जेव्हां लागेल त्यावेळेस उपयोगांत आणूं शकतो. टोकनस् विकण्यासाठीं एक माणूस बसलेला असतो. तसेंच तुम्हीं एकदां प्लॅटफॉर्मवर आंत गेलांत कीं न्युयॉर्कच्या ६०–७० मैल लांब असलेल्या रेल्वेवर कोणत्याहि स्टेशनवर उतरूं शकतां व जोपर्यंत स्टेशनबाहेर जाणार नाहींत तोंपर्यंत गाडींतल्यागाडींत किंवा गाड्या बदलून वाटेल तितका वेळ फेऱ्या मारूं शकतां. नंतर मी माझ्या मित्राला तुम्हांला उद्यां फोन करतों असें सांगून ३२ नंबरच्या स्ट्रीट स्टेशनावरून ८३४ नंबरच्या राष्ट्रीय स्टेशनवर आलों. येथील स्टेशनवर नांवें नसून बहुतेक नंबर दिलेले असतात. नंतर मी माझ्या निवासस्थानीं आलों. माझ्याबरोबर असलेलें कार्ड देऊन मी माझ्या खोलीची किल्ली घेतली. त्यावेळेस रात्रीचे २ वाजले होते. इतकी रात्र झाली आहे अशी अंधुक ही कल्पना येत नव्हती. कारण न्युयॉर्क झोंपीं जात नाहीं असें म्हणतात. तेथें ब्रॉडवे–सारख्या ठिकाणीं अनेक झगझगणाऱ्या दिव्यांच्या प्रकाशांत लोक सकाळ इतकेंच उत्साही दिसतात. तसेंच अमेरिकेंतील सर्व हॉटेल्स जवळ जवळ सबंध दिवसरात्र उघडीच असतात. म्हणजे तेथें कोणीतरी माणूस रात्रपाळी करतों. इंग्लंडमध्यें मात्र ११ च्या पुढें हॉटेल्स बंद होतात. रात्रीं ११ चे नंतर तुम्हांला आंत यायचे असल्यास बाहेरील दरवाजाची तुम्हांला किल्ली देतात व ते उघडून तुम्हीं आंत येऊं शकतां. रात्रपाळीला एक पहारेकरी ठेवलेला असून तो तुम्हांला आंत येऊं देतो.

दुसरे दिवशीं सकाळीं मी रेडिओ–सिटी–म्युझिक हॉलच्या सकाळच्या खेळ पहाण्यास जायचें ठरविलें. त्याप्रमाणें मी तेथें गेलों. तेथें सकाळपासून सतत खेळ चालू असतो. माणसें केव्हांहि येतात व आपण पाहिलेलें चित्र चालू असेल तर निघून जातात. तेथें बसण्यासाठीं सुंदर मखमली खुर्च्या, जमिनीवर सुंदर गालिचे वगैरे पडदे फारच मोठे असतात. आवाजहि अगदीं स्पष्ट येतो व पहिलें गौण चित्र दाखविल्यानंतर मुख्य चित्र दाखवितात. मुख्य चित्रानंतर स्टेज–शो हा फार सुंदर असून तो पाहिल्याशिवाय माणसानें अमेरिका सोडून जाऊं नये. ह्या शोमध्यें कांहीं सुंदर नृत्यकलाकारांचें कौशल्य दाखवितातच पण रंगमंच इतका उत्कृष्ट सजवितात कीं, तो फारच प्रेक्षणीय होतो. मी ज्या दिवशीं हा खेळ पहाण्यास गेलों त्या दिवशीं एक मनुष्य चांगलीच लहान सुटकेस घेऊन आला आणि व्यासपीठावरून श्रोत्यांना उद्देशून बोलूं लागला व बोलत असतांना निरनिराळ्या दिशांतून कांहीं निराळे विचित्र आवाज एकूं येऊं लागले. नंतर त्यांनीं साशंक होऊन २ फूट लांब १॥ फूट रुंद व ६ इंच उंच सूटकेस उघडून सर्वांना आश्चर्यचकित करून तीतून एक लहान माणसाला बाहेर काढलें. व त्या माणसाशीं बोलूं लागला. त्याला नांव गांव वगैरे विचारलें. तो लहान माणूस सुद्धा श्रोत्यांना हसूं येईल अशी उत्तरें देऊं लागला. उदा० त्यांनीं विचारलें कीं, युनायटेड स्टेट्सची राजधानी कोणती आहे ? त्यावर लहान माणसानें उत्तर दिलें कीं, सबंध युरोप ! अशा तऱ्हेनें मार्मिक उत्तर देतांना त्याचे हावभाव व तोंडहि मजेशीर करीत होता. मला वाटतें कीं, हा खरोखरीचा मनुष्य नसून तें एखादें मोठें खेळणें असून त्याच्यांशीं गोष्टी करणारा मनुष्य वेंट्रीलोकीस्ट असावा व तोच खेळण्याच्या वतीनें दुसरा आवाज काढून जबाब देत होता. शेवटीं त्यांनीं त्या लहान मनुष्याला परत पेटींत टाकलें. पेटींत ठेवल्याबरोबर तो माणूस पेटींतून लाथा झाडूं लागला परंतु थोड्या वेळांतच त्यांनीं ती पेटी आंत नेली. तेथें नायगऱ्याचें दृश्य इतकें हुबेहुब वठवलें होतें कीं, आपण नायगरा धबधब्यापाशींच आहोंत असें वाटलें. त्या दिवशीं कॅनडाचा राष्ट्रदिवस असल्यामुळें सर्वांत शेवटीं कॅनडाचा मोठा नकाशा दाखवून कॅनडाच्या प्रसिद्ध घोड्यावर बसणारे लष्करी शिपाई ( मौंटीज ) दाखवून, विजेच्या दिव्याच्या सहाय्याने अगदीं आपण दिवाळींत करतों तसे हुबेहुब दारूकाम करून दाखविलें.

सिनेमा संपल्यावर मला कॅमेरा घ्यायची इच्छा झाल्यामुळें मी माझे मित्र श्री. मायरोन फ्रेझरना कॅमेरा घेण्याचा विचार सांगितला तेव्हां त्यांनीं मला ३२ नं. च्या व्हेलोबी स्टोअर्सपाशीं ४ वाजतां येण्यास सांगून ते मला तेथें भेटतील असें आश्वासन दिलें. नंतर ते निघून गेले. ठरल्याप्रमाणें ते मला तेथें भेटले. नंतर आम्हीं दुकानांत

गेलों. तेथें त्यांनीं सेल्समनला बाजूला नेऊन मुव्हीक कॅमेऱ्याबद्दल चौकशी केली तेव्हां ते मला म्हणाले कीं, ३० डॉलरचा कॅमेरा २५ डॉलरपर्यंत मिळूं शकेल परंतु एखादा थोडा वापरलेला कॅमेरा दुसऱ्या दुकानांत तसा कॅमेरा १९ डॉलर्सला मिळाल्यामुळें तो मी घेतला व बरोबर ६० फूटांची फिल्महि घेतली.

नंतर माझ्या मित्रानें मला न्युयॉर्क पाहण्यामार्गें हडसन नदी व ईस्ट नदीवर जाणाऱ्या बोटीची ट्रीप करण्याचें सुचविलें व त्याप्रमाणें जेथून बोट निघत होती तेथें आम्हीं आलों. बोटीचें २॥ डॉलर्सचें तिकिट असून अंदाजे ६० मैलांचा हा प्रवास असून ३ तासांत तो संपतो. बोटीवर एक माणूस भाषण करीत असून जेथून बोट जात होती त्या भागाची माहिती देत होता. आमची बोट बॅटरी पार्कहून निघाली व थोड्या वेळानें न्युयॉर्क बंदराच्या खूणेच्या जागीं म्हणजे Statue of Liberty ह्या बाजूनें निघाली व ह्या नद्यांवर अनेक पूल असून त्यांच्याखालून बोट जात होती. नदीवर दूसऱ्या बोटींची–सुद्धां चांगलीच वहातुक होती. पुष्कळ ठिकाणीं कित्येक लहान मोटर बोटी घेऊन लोक जलविहार करीत असतात. आम्हीं न्यूयॉर्कच्या ज्या ज्या भागांतून जात होतो त्या भागाची माहिती, वर्णन व इतिहास आमच्या बरोबरचा ( गाईड ) वाटाड्या समजावून देत होता. न्युयॉर्कच्या गगन–चुंबी इमारतींजवळून आमचीं बोट चालली होती. शेवटीं आम्हीं ईस्ट नदीवरून जेथें सुरुवात केली होती तेथें येऊन पोहोंचलों. वाटेंत आम्हांला एम्पायर स्टेट बिल्डींग, रॉक फेलर सेंटर, वुल–वर्थ बिल्डिंग, यु. एन्. ओ. ची इमारत लागली.

आम्हीं परत आल्यानंतर माझ्या मित्रानें मला लॉंग आयर्लंडला जायला सांगितलें. कारण नंतर मला न्युयॉर्कचा हा भाग पहाण्यास वेळ मिळाला नसता, त्यामुळें मीहि लगेच निघालों. जातां जातां ब्रॉडवेवरची रात्रींच्या वेळीं पुष्कळ दिव्यांच्या झगझगाटांतील आकर्षक रीतीनें हालणाऱ्या, चालणाऱ्या जाहिरातींची चित्रें मी माझ्या मुव्हीक कॅमेरानें घेतली. नंतर मी लॉंग आयर्लंडला जाण्यास निघालों. अंदाजे ४० मैलांचा प्रवास करून तेथें आलों स्टेशनवरून बाहेर आल्यावर प्रथम थोड्या अंतरावर असलेलीं अनेक करमणूकीची दुकानें पहाण्यास निघालों. लॉंग आयर्लंडला येण्यासाठीं सब–वे नें निघालों होतों. परंतु हीच गाडी जमिनीवर कित्येक मैल लोखंडाच्या पुलावरच्या रस्त्यावरून चालते. अशा जमिनीच्या पुलावर चालणाऱ्या गाडीला एल्व्हेटेड रेल्वे म्हणतात. रस्ता खालीं असतो, त्याच्यावर पूल व पुलावर गाडी चालते. पुलाच्या पायथ्याशीं दुकानें वगैरे सर्व कांहीं असते. स्टेशनें जामिनीवरून उंच पुलावरती असतात. हें दृश्य दिसायला फार

विचित्र व मजेशीर दिसतें. ह्याची थोडी कल्पना आणण्यासाठीं वाचकांनीं असा विचार करावा कीं, दादरपासून थेट चर्चगेटपर्यंत मुंबईच्या मुख्य रस्त्यावर जमिनीवरून ३०--४० फूट उंचीचा पूल केलेला असेल व त्यावर विजेची गाडी धांवत असेल तर हें दृष्य कसें वाटेल.

लॉंग आयलॅंडला पुष्कळच निरनिराळी करमणूकीची व खाण्यापिण्याची दुकानें होती. तसेंच विचित्र गुणांचे प्रदर्शन करणाऱ्या माणसांची दुकानें असून ते एकमेकांजवळून निरनिराळ्या रितीनें पैसे उकळावयाचे. इथें सुद्धां मॅंचेस्टरसारखे बॉम्बच्या धर्तीवर रोलीकोस्टर होते. गोल चक्कर फिरण्यासाठीं सुद्धां अनेक चकत्या होत्या. कांहीं पाळणें खालीं डोकें वर पाय अशा स्थितींत थोड्या वेळाकरतां बंद करायचे व नंतर पुन्हां जोरजोरानें फिरवायचे. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पॅराशूटचा खेळ होता. ह्यांत दोन माणसांना एका पॅराशूटसारख्या छत्रींत बसवून जमिनीपासून अंदाजे १००–१२५ फूट उंच घेऊन जाऊन नंतर त्यांना सोडून द्यायचे नंतर ही छत्री जोरानें खालती यायची व आल्यानंतर बंद व्हायची. बरीच रात्र झाली असल्यामुळें मी परत माझ्या निवासस्थानीं येण्याकरितां निघालों व अंदाजे २ च्या सुमारास आज पण परत फिरलों होतो.

दुसरे दिवशीं मी यू. एन्. ओ. ची बिल्डिंग वगैरे पाहण्याचें ठरविलें म्हणून तेथें गेलों. यु. एन्. ओ. च्या इमारतीचें स्थापत्य अगदीं निराळें असून निरनिराळ्या राष्ट्रांच्या वास्तुशास्त्रांनीं केलेल्या समितीनें सुचाविलेल्याप्रमाणें केलेले आहे. हे दाखविण्याकरितां निरनिराळ्या माहिती सांगणाऱ्या मुलींची नेमणूक केलेली आहे. ह्या निरनिराळ्या देशांतील असतात. फिरवून दाखविण्याकरितां १ डॉलरची फी घेतात मात्र विद्यार्थ्यांना अर्धी फी असते. ह्या स्त्री वाटाड्या यु. एन्. ओ. च्या निरनिराळ्या दिवाणखान्यांतून घेऊन जातात व सिक्युरिटी कौन्सिल, जनरल असेंब्ली हॉल वगैरे सर्व दाखवून ह्यांचे युनोंतील महत्त्व थोडक्यांत समजावून सांगतात. अधिवेशन चालत नसल्यामुळें प्रेक्षक सभासदांच्या खुर्चीतच बसतात. ह्या खुर्च्यांना एकेक इअर फोन लावलेला असतो. ज्यांचें भाषण चालू असते ते प्रत्येकाला हवे असलेल्या भाषेंतून ऐकूं येतें. उदा० वक्ता रशियन असेल तर जसजसा तो बोलत असेल तसतसे निष्णात भाषान्तरकार त्याचे महत्त्वाच्या भाषणांतून भाषांतर करतात व आपल्याला हवे असलेल्या भाषेचें बटण दाबलें कीं चालू असलेलें भाषण त्या भाषेंतून ऐकूं येते. यु. एन्. ओ. च्या ऑफिसमधें निरनिराळ्या राष्ट्राचे लोक काम करीत असतात. व त्यांत आपल्या हिंदुस्थानाचे सुद्धां आहेत. येथील पोलीस फोर्स वगैरे यु. एन्. ओ. चा स्वतःचा असून युनायटेड स्टेट्सचा कोणताहि कायदा चालत

नाहीं. यु. एन्. ओ. चे स्वतंत्र पोस्ट-ऑफिस असून तिकिटें वगैरे सर्व कांहीं निराळे आहे. ही इमारत पाहिल्यानंतर जवळच असलेले टाईम वर्तमान पत्राचे त्यांनीं केलेलें म्युझियम पहाण्यास गेलों. इथें एक मोठा पृथ्वीचा गोल फिरत असून निरनिराळ्या ठिकाणीं किती वाजले आहेत हें दाखविण्यासाठीं घड्याळें लावली आहेत. प्रत्येक घड्याळ कोणत्या स्थळाची वेळ दाखवितें हें खालीं दिलेलें आहे. त्याचप्रमाणें पृथ्वीबद्दल निरनिराळी माहिती देणारे अनेक तक्ते व नकाशे आहेत.

हें सर्व संपवून मी नॅशनल हिस्ट्री म्युझियम पहाण्यास गेलो. जवळच हेडन प्लॅनेटोरिअम आहे तें प्रथम पाहिलें. तेथें पृथ्वीचें व अनेक ग्रहांचे सुंदरपैकीं नमुने केलेले आहेत व खगोल शास्त्राची माहिती देण्याकरितां त्यांचा चांगलाच उपयोग करतात त्याचप्रमाणें इथें आकाशांतून पडलेल्या उल्का सुद्धां आहेत. तसेंच पृथ्वीवरचे वातावरण दाखविण्याची चित्रें त्याचप्रमाणें चंद्र, मंगळ व इतर ग्रह ह्यांची सुद्धां सुंदर चित्रें काढली आहेत. वरच्या मजल्यावर आकाशांत निरनिराळ्या ग्रहांची स्थिती दाखवण्याकरितां आंतील मोठ्या व्यासाच्या कळसावर पुष्कळ चित्र दाखविण्याच्या प्रॉजेक्टरनें आकाशांतील तारे दाखवणारी चित्रें दाखवितात. ही फारच मनोरम्य व माहितीपूर्ण असून दाखविणारा माणूसहि विनोदी भाषेंत बोलत असतो. निरनिराळ्या भागांत तारकांची काय स्थिती असेल तें समजावून सांगत असतो. २००० वर्षांपूर्वी मंगळ कुठें होता, शनी कुठें होता तसेंच २००० वर्षांनंतर ते कुठें असतील ते समजावून सांगतात. हे प्लॅनेटोरिअम पाहिल्यानंतर मी जवळच्या नॅचरल हिस्ट्री म्युझियममध्यें गेलों. मला जास्त वेळ नसल्यामुळें ४ थ्या मजल्यावरून खनिजांच्या विभागांत गेलो कारण हा माझा विषय असून मला ह्यांत जास्ती रस होता. इथें अनेक देशांतून खनिजांचे सुंदर नमुने गोळा केले आहेत व गच्चीतील कांहीं चित्रें पाहात असतांना तेथेंच मला एक हिंदी बाई असल्याचें दिसलें. कांहीं सिंहल, ब्रह्मदेश व दुसऱ्या आशियांतीलसुद्धां बायका तेथें आल्या होत्या. मी त्या हिंदी बाईला विचारलें कीं, आपण हिंदुस्थानांतूनच आलांत कां? व कोणत्या भागांतून आलांत? त्यावर त्या बाईनें × × × असें नांव सांगून पुण्याहून त्या आल्याचें सांगितलें. तसेंच त्या कॅन्सरवर संशोधन करणारे प्रख्यात स्लोन कॅटरिंग इंस्टिटयूटमध्यें विशिष्ट अभ्यास करीत असून त्यांना टाटा कॅन्सर रीचर्स इंस्टिटयूटमधून ह्या अभ्यासासाठीं पाठविलें होते. नंतर आम्हीं बऱ्याच इकडच्या तिकडच्या गोष्टी करून मी त्यांचा निरोप घेऊन माझ्या निवासस्थानीं आलों. येथें न्यूयॉर्कसंबंधीं कांहीं गोष्टी नमूद करणे इष्ट वाटते. न्यूयॉर्क शहरांत पूर्व पश्चिमेकडे जाणाऱ्या रस्त्यांना स्ट्रीट म्हणतात व उत्तर दक्षिणेकडे जाणाऱ्या रस्त्यांना अॅव्हेन्यू म्हणतात. म्हणजे सबंध न्युयॉर्क स्ट्रीटस् व अॅव्हेन्यूस

ह्यांच्या निरनिराळ्या चौकटींत विभागलें आहे त्याचप्रमाणें ॲव्हेन्युसना नंबर दिलेलें आहेत स्ट्रीट व ॲव्हेन्युस ह्यांना नंबर दिल्यामुळें कोणतेंहि ठिकाण चटकन् सांपडतें. तसेंच तें ठिकाण आपल्यापासून किती दूर ह्याचाहि अंदाज कळतो. तसेंच बसने अथवा चालत जाण्याचा निर्णय घेतां येतो. समजा, आपण ४ थ्या ॲव्हेन्युच्या ३४ नं. च्या स्ट्रीटवर असलों व आपल्याला ६ व्या ॲव्हेन्युच्या ३६ नंबरच्या स्ट्रीटला जायचें असेल तर आपल्याला २ ॲव्हेन्यु ओलांडून परत २ स्ट्रीटस पुढे चालायचें आहे म्हणजे इमारतींचे ४ चौक चालायचें आहेत. हें लक्षांत आल्यानंतर आपण पायी चालूं शकतो याचा माणसाला अंदाज येतो व कोणत्या बाजूनें जावयाचे ते सुद्धां आपल्याला ॲव्हेन्युचे नंबर कसे वाढतात किंवा कमी होतात त्यावरून कळतें. तसेंच कोणाचाहि पत्ता शोधून काढण्यास सोपे जातें व कोणाला विचारण्याची जरुरी वाटत नाहीं. हीच पद्धत अमेरिकेच्या बहुतेक शहरांमधून आहे. आपल्याकडेसुद्धां ही पद्धत अनुकरण करण्यासारखी आहे असें मला फार वाटतें कारण आपल्याकडील गोखले रोड, रानडे रोड आणि तघलक रोड ह्यांनीं फार घोटाळा होतो. आपण अगदीं गोखले रोडजवळ असावें परंतु गोखले रोड विचारण्याची पाळी येते. न्यूयॉर्कमधेंसुद्धां कांहीं ठिकाणीं रस्त्यांची नांवें आहेत परंतु फारच थोडी आहेत.

येथील बसचें भाडें १५ सेंट आहे. ह्या भाड्यांत मजुरीचा खर्च झेंपत नाहीं तो त्यांना फार महाग पडत असल्यामुळें तेथें बस कंडक्टर ठेवणें शक्य होत नाहीं. बस थांबल्याबरोबर ड्रायव्हर पायाखालचें पॅडल दाबून बसचें दार उघडतो. न्यूयॉर्कच्या कोणत्याहि भागाकरतां सरसकट १५ सेंटचेच भाडें असल्यामुळें तिकिट मागायचा प्रश्नच येत नाहीं. १० सेंटचें एक चांदीचें नाणें, जें आपल्या पावली एवढें असते व त्याला डाइम् म्हणतात, व दुसरे ५ सेंटचें निकलचें असतें त्याला निकल म्हणतात. ही दोन्हीं नाणीं ड्रायव्हरजवळ असलेल्या कांचेच्या बरणीसारख्या भांड्यांत टाकतात. ही नाणीं निरनिराळ्या मार्गानें आंत जातात व त्यावेळेस निरनिराळी घंटी वाजते. त्यामुळें ड्रायव्हर उतारूंनीं नाणी बरोबर टाकलीं कीं नाहीं तें कळतें. तसेच बसमध्यें किती जण बसले आहेत तें छापलें जातें. तुमच्याजवळ पैसे टाकण्याकरितां जर सुटी नाणीं नसतील तर तुम्हीं डॉलरची नोट ड्रायव्हरला दिली तर त्याच्याजवळ दुसरें यंत्र असतें त्यानें तो तुम्हांला चटकन् मोड देतो. ह्या बसेस् विशिष्ट रस्त्यावरून जातात. आपल्याला कोणत्या तरी स्ट्रीटवर उतरून ॲव्हेन्यूवर जायचे असेल तर ट्रान्सफर म्हणून तिकिट मागायचे व तें तिकिट घेऊन बस बदलून जातां येते. पुन्हां तिकिट काढावें लागत नाहीं. ह्याचा अर्थ

असा कीं, न्युयॉर्कच्या कोणत्याहि भागांत जायचें असेल तरी १५ सेंटचेच भाडें असतें. ट्रॉन्सफर तिकिटांवर कोणत्या वेळेस दिलें आहे व कोणत्या वेळेपर्यंत चालू शकेल तें छापलेलें असतें.

न्युयॉर्कचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इथें परिचारिक असलेले रेस्टॉरंट याशिवाय ज्याला ऑटोमेशन म्हणतात तशी रेस्टॉरंट सुद्धां आहेत. हे बहुतेक हॉर्न ॲण्ड हार्डस कंपनीची आहेत. ह्या रेस्टॉरंटमधून सर्व खाण्यापिण्याचे पदार्थ निरनिराळ्या खिडक्यांतून ठेवलेले आहेत. व त्यांची किंमत त्यावर लिहिलेलीं असते. पैसे खिडकीच्या विशिष्ट भोंकांत टाकले म्हणजे खिडकीचें दार उघडतें व तुम्ही आंतील पदार्थ काढून जवळच्या टेबलावर बसून खाऊं शकतां. खाणें झाल्यानंतर मात्र तुमच्या बश्या नेण्यास १–२ परिचारक असतात. तसेंच चहा, कॉफी वगैरे सारखे पदार्थ खालीं ठेवलेल्या कपांत, तुम्हीं विशिष्ट छिद्रांत नाणें टाकलें कीं, मोजका द्रव पदार्थ पडतो. अशीच व्यवस्था सगळ्या स्टेशनावरून व दुसऱ्या मुख्य जागांच्या ठिकाणीं कोकाकोलासारख्या पेयाकरितां सुद्धां केलेली आहे.

न्यूयॉर्कबद्दल आणखी कांहीं गोष्टींचा उल्लेख करण्यासारखा आहे. येथील लोक अगदीं साधे व सरळ आहेत. औपचारिकपणा बाळगत नाहींत. तुम्हांला बसेसमधून किंवा रस्त्यावरून फक्त गंजीफ्रॉक, पॅन्ट व पायांत सँडल घातलेली कितीतरी माणसें आढळतील. त्यामानानें अजून आपल्या हिंदुस्थानांत लोकांनीं इंग्रज लोकांचा औपचारिकपणा सोडला नाहीं. कितीहि गरमी असली तरी कोट घालण्याचें बाळकडू आपल्याला ईंग्रज लोकांनीं दिले होतें तें अजून सुटत नाहीं. आतां अलिकडे आपल्या हवेला मानवेल असे बुशकोट घालण्यास सुरुवात झाली आहे. त्याचा मानसुद्ध अमेरिकन लोकांनाच आहे कारण त्यांची सुरुवातसुद्धां तेथेंच झालीं.

येथें गाड्या ठेवण्यास रस्त्यावर जागा नसल्यामुळें गाड्यांचें पार्किंग करण्याकारतां ७–८ मजली इमारती असतात व गाड्या ह्या इमारतीवर लिफ्टनें किंवा चक्रव्यूह (Spirial) सारख्या रस्त्यानें घेऊन जातात. तासापाठीमागें २५ सेंट इतके भाडे घेतात. अशा जागेंत (Car Park) जर ३ मिनिटांत तुम्हांला गाडी काढून मिळाली नाहीं तर ते तुमच्याकडून भाडें न घेण्याची हमी देतात. कित्येक ठिकाणीं रस्त्यावर आंखलेल्या जागीं तुम्हांला गाडी ठेवण्याची जागा असते व तेथें पार्कींग मीटर लावलेलें असून तुम्हीं ह्या जागी गाडी ठेवल्यावर मीटरमध्यें ठरलेले भाडे टाकायचें कीं मिटर चालू होते व तासाचा

आंकडा दाखवीत हळूं हळूं कांटा तास संपल्याबरोबर शुन्याच्या काट्यावर येतो. तुम्ही तुमची गाडी त्या अवधींत त्या जागेंतून काढून घेतली पाहिजे तेथील काटा तुमची गाडी कायदेभंग असं दाखवतो. जर तुम्ही गाडी काढून घेतली नाहीं व रस्त्यावरती ह्या गोष्टींची नोंद ठेवणाऱ्या पोलिसनें तुमच्या गाडीचा नंबर घेतला तर तुमच्यावरती केस चालेल, व दंड होईल. तसेंच तुम्हांला जर गाडी आणखी ठेवायची असेल तर तास संपण्यापूर्वींच मीटरमधें आणखी एक नाणें टाकायचे म्हणजे मीटर परत चालूं होते व मग गाडी ठेवण्यासाठीं आणखी वेळ मिळतो. गाडी कमी वेळ ठेवायची झाली तर त्याप्रमाणांत नाणीं कमी प्रमाणांत टाकायची.

न्युयॉर्कची प्रजा चांगलीच संमिश्रित आहे कारण अमेरिकेंत निरनिराळ्या देशांतून लोक आले त्यामुळें सफेद (पांढऱ्या) माणसांबरोबरच इटॅली, मॅक्सिको व हिंदुस्थान येथील माणसेंहि दिसतील. केव्हां केव्हां कांहीं लोकांना पाहून आपल्याला चांगलाच भ्रम होतो कीं, हे हिंदुस्थानांतील तर नाहींत ना? येथील पांढरी माणसें व काळे निग्रो लोक विशेष मतभेद मानीत नाहींत असें दिसलें कारण मी कित्येक गोऱ्या माणसांजवळ निग्रोंची मुलें पाहिली. त्याचप्रमाणें येथील खाण्या-पिण्याच्या दुकानांतून हिंदुस्थानच्या दुकानांसारखी टापटीप असते परंतु इंग्लंडच्या दुकानासारखी स्वच्छतेबद्दल इतका कडकपणा नाहीं. वेटर्स लोंक काम नसेल त्या वेळेस गिऱ्हाईकांशी गप्पा मारतांना व जवळ बसतांना दिसतील. येथें आपल्यासारखा गिऱ्हाईक व नोकर ह्यांच्यामध्यें फरक मानला जात नाहीं. टीप देण्याची प्रथा येथेंहि चांगल्याच प्रमाणांत आहे. रेस्टॉरंटमध्यें किंवा टॅक्सीवाले बक्षिसी देण्याची आशा करतात. मात्र थोड्या कामाबद्दलही टीप दिलीच पाहिजे असें नाहीं. नंतर मी माझा न्यूयॉर्कमधील दौरा आटोपता घेतला. कारण मला वॉशिंग्टनला जायचें होतें.

## प्रकरण २ रें

# न्युयॉर्क ते वॉशिंग्टन

दुसरें दिवशीं वॉशिंग्टनला जाण्यासाठीं ग्रे हाऊन्ड बस स्टेशनवर आलों. अमेरिकेंत एका टोंकापासून दुसऱ्या टोंकाला जायचें असल्यास तुम्हीं बसनें जाऊं शकतां. बस व रेल्वे यांच्या भाड्यांत चांगलाच फरक असल्यामुळें बसनें जाणें पुष्कळच स्वस्त पडतें. बस स्टेशन आपल्याकडील स्टेशनसारखें असून मध्यें मोठा वेंटींग हॉल असतो. तेथें बाकें असून उतारू तेथें बसूं शकतात. उतारूंच्या खाण्यापिण्यासाठीं रेस्टॉरंट सुद्धां असतात. हातपाय धुणें वगैरे सर्व विधी करण्यास सर्व सोई केलेल्या आहेत. बस स्टेशनवर विचार-पूस करण्यासाठीं बाई असते. तिकिट काढण्यासाठीं तिकिट घरें असतात. मी माझें डी-सी चें तिकिट काढून बाकावर बसची वाट पहात बसलो. अमेरिकेंत एकाच गांवाची नांवें अनेक ठिकाणीं देतात. त्यामुळें ज्या राज्यांत ते ठिकाण मोडत असेल त्याचेंहि नांव गांवच्या नांवाबरोबर सांगावें लागतें. व असें सांगण्याची तेथें पद्धत आहे. वॉशिंग्टन येथें तीन ठिकाणीं आहेत. अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन, दुसरें पेनिसिल्वियांत असलेलें व आणखी एका राज्यांत असलेले त्यामुळें केंद्र सरकारची राजधानी असलेल्या वॉशिं-ग्टनचा उल्लेख करायचा झाल्यास वॉशिंग्टन डी.सी. म्हणायचें कारण हें कोलंबिया डिस्ट्रिक मधें आहे. बस कोणत्या कोणऱ्या धक्क्यावर उभी रहाणार हे लाऊड स्पिकरवर सांगण्यांत येते. बस आल्याबरोबर उतारूंना कळविण्यांत येते. उतारूंच्यासमोर कांचेचे दरवाजे असतात. बाहेरच्या भागांत थांबलेली बस उतारूंना दिसते व नंतर सर्वजण कांचेच्या दरवाज्यांतून बाहेर पडतात. तेथील बस ड्रायव्हर उतारूजवळील सुटकेस घेतो व त्याब-द्दल तुम्हांला एक तिकिट देतो. तिकिटाचा अर्धा भाग सूटकेसला बांधतो. बसमधें सामान ठेवण्याची जागा फार मोठी असते. मोठमोठ्या सूट केसीस सुद्धां आंत मावतात. येथील लोकांना जास्त सामान नेण्याची संवय नसते.

सर्व बस कंपन्यामधें ग्रे हाऊन्डची कंपनीला प्राधान्य आहे. ह्यांच्या बसेसनां (Scene-Cruiser)असें म्हणतात. ह्या बसेस ३०-४० माणसांना सहज घेऊं शकतात. मधील भाग ड्रायव्हरच्या भागापेक्षां उंच केला असल्यामुळें डायव्हरच्या समोरचा भाग प्रवासी लोकांना दिसतो. आंतील बसायच्या गाद्या चांगल्या असून मऊ मऊ असतात. तसेंच त्या विमानांतील खुर्चीप्रमाणें पुढें मागें सरकवतां येतात व सरळ ताठ किंवा

आरामशीर बसतां येते. खिडक्यांची कांच जांभळट रंगावरती असून बाहेरच्या प्रकाशा-पासून प्रवाश्यांना त्रास होत नाहीं.

थोड्याच वेळांत माझी बस सुरू झाली. बसमधील ड्रायव्हरचे कपडे अगदीं विमा-नाचा पायलटसारखें होतें. बस सुरू करण्यापूर्वी त्यानें त्याच्यासमोर एक पाटी लावून लिहिलें होतें कीं " तुमच्या ड्रायव्हरचे नांव ××× असें आहे. तसेंच ते फार चांगल्या स्वभावाचें व विनयी असून बस चालू असतांना मात्र त्याच्याशीं बोलूं नये. " असें लिहिण्याची काय पद्धत आहे हे मात्र मला कळलें नाहीं. परंतु एवढें मात्र खरें कीं तेथें सर्व कामें डायव्हरलाच करावी लागत असल्यामुळें ते थोडे चिडकेच दिसायचे तेव्हां त्यांच्या मनावर थोडेसें दडपण यावें म्हणून पाटी लावण्याची युक्ति योजिलीं असावी. कारण त्यामुळें तरी ते प्रवाश्यांशीं न चिडतां वागावेत. अमेरिकेंत एखाद्या माणसानें दुसऱ्या माणसाकडून युक्तिनें कसे काम करून घ्यावें याचा सशास्त्र अभ्यास केलेला असून ह्या बाबींत इतर राष्ट्रांपेक्षां अमेरिकेचे लोक पुष्कळच पुढें आहेत.

बस ड्रायव्हरनें बस सुरूं करण्यापूर्वी आपण वॉशिंग्टनला निघालों असें मायक्रोफोन-वरून सांगितलें. तसेंच बस अमुक अमुक ठिकाणीं थांबेल व प्रवाशांनीं त्यांचें खाणेंपिणें करून घ्यावें व आपली बस सुमारें २ वाजतां वॉशिंग्टनला पोंहचेल. बस सुरूं करण्यापूर्वी ड्रायव्हरनें त्याच्याजवळील बटन दाबून बसचें दरवाजे बंद केलें नंतर एअर–कण्डिशनिंग मशीन सुरूं झालें. आतां मात्र आंतमध्यें थंडावा वाटून आम्हांला सुखावह वाटूं लागलें. आम्हीं न्युयॉर्कच्या निरनिराळ्या उद्योगधंदेवाल्या दाट वस्तींतून चाललों होतों. हळूं हळूं न्युयॉर्क सुटलें. अमेरिकेंत मोठमोठ्या शहरांना जोडणारे मुख्य रस्ते असतात व ह्यांना टर्न पीस असें म्हणतात. ह्या रस्त्यावर जाण्याकरितां दर मैलावर टॅक्स द्यावा लागतो. हा कर गोळा करण्याकरितां ठराविक ठिकाणीं दरवाजे उभारलेलें असतात. ह्या टर्न पीसवरून बाजूच्या गांवाचें ओलांडणारे रस्ते पूलावरून काढलेले आहेत. त्यामुळें त्रास होत नाहीं. रस्ता बहुतेक सरळ असतो व चांगलाच रुंद असल्यामुळें एकावेळेस तीन गाड्यासुद्धां जाऊं शकतात. समोरून येणाऱ्या गाड्यांना निराळा रस्ता असतो. दोन रस्त्यांमधें एक पट्टी सोडलेली असते. पायीं चालणाऱ्यांना ह्या रस्त्यावरून जाण्याची परवानगी नसतें. वाहनांना गतिवेगाची कांहीं मर्यादा नसल्यामुळें ती भरमसाट दौडवूं शकतात. परंतु रस्त्यावर दुरुस्तीचें काम चालू असेल त्यावेळेस ६० मैल वेगानें गाड्या न्याव्यात म्हणून " गाडी सीमा ताशीं ६० मैल " अशी पाटी लावतात. तेथील बसेस सुद्धां पुष्कळ वेगानें जातांना

जातांना दिसतात. आमच्या न्युयॉर्क ते वॉशिंग्टनच्या रस्त्याच्या दरम्यान कित्येक ठिकाणीं रेल्वेची लाईन समांतर जात होती परंतु पुष्कळ वेळां आमची बस आगगाडीला पाठीमागें टाकून पुढें जात होती.

आम्हीं न्युयॉर्क सोडून १०–१५ मैल पुढें आलों होतों तेवढ्यांत रस्त्यावर आम्हांला नुकत्याच एका गाडीला ॲक्सिडेंट झालेला दिसला. गाडीच्या पाठीमागच्या बाजूस टक्कर लागल्यामुळें गाडीचा तो भाग चांगलाच चेपलेला दिसत होता. आंतील पुरुष–बायकांच्या ओरडण्यावरून त्यांना लागल्याचें दिसत होतें. आमच्या बस ड्रायव्हरनें बस लगेच बाजूला करून त्यांच्या मदतीसाठीं प्राथमिक मदतीचें (फर्स्ट एड) सामान काढून तो त्या गाडीकडे धांवत गेला. लगेच पोलिसांची विशिष्ट आवाज करणारी गाडी आली व तीमधें प्रवाश्यांना प्राथमिक उपचारासाठीं सर्व बंदोबस्त होता. पोलिसच्या कांहीं माणसांनीं गाडीचें दार उघडून आंत अडकून बसलेल्या माणसांना जेमतेम बाहेर काढलें. सर्वांना थोडेबहुत लागलेले होतें. थोडा रक्तपात झालेलाहि दिसत होता परंतु सुदैवानें कोणी दगावलें नव्हते.

न्युयॉर्क ते वॉशिंग्टनचें अंतर ३०० मैलांचे असेल व आमच्या प्रवासांत अधून मधून येणारीं गांवे सोडल्यास बहुतेक मोठा भाग दाट जंगलाचा दिसला. असाच जंगलाचा भाग मला वॉशिंग्टनहून पिटर्सबर्गला जातांना दिसला. अमेरिकेच्या पुष्कळ राज्यांतून जंगलाचे भाग आहेत व कांहीं ठिकाणीं वस्ती करण्यासहि वाव आहे. तसेंच अमेरिका अजून पुष्कळ डेवलॉप होण्यासारखी असून तेथें माणसांची जरूरी आहे. त्यामुळें ते दरवर्षी ठरविलेल्या संख्येप्रमाणें माणसें येऊं देतात. इंग्लंडमधून दरवर्षी ९० हजार माणसें येऊन देण्याचें ठरविलें आहे. व हिंदुस्थानांतून दरवर्षी फक्त १०० माणसांचा आंकडा (कोटा) मर्यादित केलेला आहे. वास्तविक इंग्लंडमध्यें युद्धामुळें माणसांची चांगलीच टंचाई वाटते व त्यांच्या स्वतःच्या देशांत ते दुसऱ्यांना येऊं देतात कारण त्यांचे उद्योग धंदे चालविण्यास माणसांची जरूरी असते व म्हणूनच तेथें स्त्रिया व मुलें यांनाहि काम मिळते. अशा इंग्लंडमधून ९० हजार लोकांना येण्याची परवानगी देतात. परंतु आपल्या देशांतून मनुष्यवस्ती जास्त असून उद्योगधंदे कमी असल्यामुळें लोक बेकार असतात तरी सुद्धां १०० लोकांनाच परवानगी द्यावी हें किती अन्यायाचें आहे. इंग्लंडमधील जी माणसें अमेरिकेंत जातात ती सुद्धां परत इंग्लंडलाच येतात. परंतु उलटपक्षीं हिंदुस्थानांतून अमेरिकेस वसाहत करण्याची इच्छा असलेल्या लोकांना कित्येक वर्षांपूर्वी नांवें नोंदवून ठेवावी लागतात व १०–१५ वर्षांनंतर त्यांना जाण्याची संधी मिळते.

## प्रकरण ३ रें

# वॉशिंग्टन

आम्हीं सकाळीं ९ वाजतां न्युयॉर्क सोडलें होतें व आम्हीं वॉशिंग्टनला पोंहचलों तेव्हां तीन वाजले होते. वाटेंत अपघाताच्या ठिकाणीं व चहापाण्याकरितां सुमारें १॥ तास खोळंबा झाला होता म्हणजे अंदाजें ४॥ तासांत ३०० मैलांचें अंतर बसनें कापलें होते. मला हिंदुस्थानच्या आपल्या प्रतिनिधीच्या कचेरींत (इंडियन अँबेसी) तांतडीनें जायचें असल्यामुळें मी कुठल्याहि हॉटेलमध्यें न जातां तेथें जाण्याचें ठरविलें व माझी सूटकेस मी ॲटोमॉटिक लॉकरमधें ठेवण्याचें ठरविलें. हें ॲटोमॅटिक लॉकर रेल्वे, बस स्टेशनांवरून व कांहीं सार्वजनिक जागेंतून ठेवलेलें असतात. हें अमेरिकेंतील एक कंपनी चालवते. ही लॉकर्स म्हणजे आपल्या कपाटासारखी निरनिराळ्या खणांची ड्रावर्स असून तुमच्या सामानाप्रमाणें लहानमोठें खण असतात, तसेंच २४ तासांचें भाडें ठराविलेलें असतें. सामानाप्रमाणें भाडें आकारण्यांत येते. जोंपर्यंत खणांत सामान नसतें तोंपर्यंत ते खण उघडे असतात. तुम्हीं सामान ठेवल्यावर तेथेंच खणांची किल्ली असते. ती लावून खण बंद करावा नंतर किल्ली जवळच्याच विशिष्ट छिद्रांतून भाडें टाकलें कीं, मग तुम्हांला किल्ली मिळतें व ती घेऊन तुम्हीं बाहेर जाऊं शकतां. ह्याचा उपयोग रेल्वे व बसमध्यें जातांनाच करीत नसून बाजारांत जातांना किंवा एकादे वेळेस मार्केटींग करून बरोबरचें सामान तेथें ठेऊन मग इतर कामें करण्यास जातात व सवडी-नुसार खणांत ठेवलेलें सामान घेऊन मग घरीं जातात.

मी माझें सामान ॲटोमॅटिक लॉकरमधें ठेऊन बाहेर पडलों. नंतर मॅसेच्युसेटस ॲव्हेन्युवर असलेल्या हिंदी सरकारच्या प्रातिनिधींच्या कचेरीची चौकशी केली. मग टॅक्सीनें जाणेंच सोईचें असल्यामुळें टॅक्सी करून तेथें गेलों. येथील टॅक्सींना मीटर नसून टॅक्सीवाले म्हणतील तें भाडें द्यावें लागतें. वॉशिंग्टनचें निरनिराळें भाग केलेले असून त्या भागाकारितां विशिष्ट भाडी ठरविलेली आहेत. तसेंच टॅक्सी-ड्रायव्हर कोणाला फसवीत नसून प्रामाणिकपणें ठरलेलेंच भाडें घेत असावे असें वाटते. बहुतेक डायव्हर्स निग्रोच आढळले. टॅक्सी निरनिराळ्या कंपनीच्या असून त्यांच्या छतांवर कंपनीचें नांव असतें. उदा० बेल डायमंड वगैरे अशी नांवें होती.

मी कचेरींत गेल्यानंतर स्वागत करणाऱ्या बाईला मला श्री. सुंदरम् ह्यांना भेटायचें आहे असें सांगितलें तेव्हां त्या बाईनें ते बाहेर गेल्याचें सांगून मला थांबण्यास सांगितलें. मी त्यांना विचारलें कीं, तुमच्या ऑफिसमधें कॅफेटरीआ आहे कां ? व मला कांहीं खाण्यास मिळेल कां ? त्यावर त्या बाईनें तें बंद झाल्याचें सांगितलें. परन्तु जवळील ड्रग स्टोअरमधें जा म्हणून सांगितलें. हें स्टोअर म्हणजे औषधाचें दुकान होतें. मला खाण्यासाठीं तिनें ह्या स्टोअरचें नांव सांगितलें ह्याबद्दल मला आश्चर्य वाटलें. परन्तु मी तसें न दाखवतां तिनें सांगितलेल्या दुकानांत गेलों. येथें फक्त औषधेंच विकत नसून खाण्याकरितां चांगलेंच रेस्टॉरंट होतें व दुसऱ्या अनेक वस्तुहि तेथें मिळत होत्या नंतर मला असें कळलें कीं येथें औषधांच्या विक्रिपेक्षां खाण्यापिण्याचीच विक्री जास्त होते. बहुतेक सर्व घरगुती वस्तु तेथें विकण्यांस ठेवत होते.

मी थोडेसें खाऊन परत कचेरींत आलेल्या बाईनें मी आल्याची वर्दी श्री. सुंदरम यांना टेलिफोनवरून दिली होतीच. परन्तु मला एका माणसाबरोबर त्यांच्या ऑफिसमधें पाठवण्यास सांगितलें असल्यामुळें मला तेथें पाठवलें मला श्री. सुंदरम् यांनीं आपल्या खोलींत बोलावलें. श्री. सुंदरम हे शैक्षणिक विभागाचें प्रमुख असून त्यांचें काम म्हणजे अमेरिकेंत येऊं इच्छिणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय लावणें व तेथें आल्यानंतर त्यांच्या गरजांकडे लक्ष देण्याचें होतें. मीसुद्धां कोळशाच्या खाणी पहाण्याकरितां हिंदी कचेरीला लिहिलें होतें व श्री. सुंदरम् ह्यांनी माझ्याकरितां निरानिराळ्या अमेरिकन कंपनींशीं व त्या सरकारच्या ब्युरो ऑफ माईन्सशीं पत्रव्यवहार केला होता. मी हिंदुस्थानांत असतांना अमेरिकेंत आल्यानंतर बंदोबस्त होईल असे त्यांनीं मला सांगितलें होतें. तसेंच श्री. सुंदरम् यांना मी अमेरिकेस केव्हां पोंहचतों हें कळवलें होतें श्री. सुंदरमनें माझ्या येण्याबद्दल आश्चर्य व्यक्त करून मला न येण्याचें पत्र लिहिल्याबद्दल सांगितलें तेव्हां मी चांगलाच गोंधळलो व त्याचें पत्र मला न मिळाल्याचें सांगितलें व मला न येण्याबद्दल पत्र कां लिहिलें याचा खुलासा विचारला तेव्हां त्यांनीं अमेरिकेंतील खळबळीबद्दल तुम्हांस कांहीं माहिती नाहीं कां ? असें मला विचारलें. माझी आगबोट अटलांटिक समुद्रावरून जात असतांना सुवेझ कालव्याची कंपनी, प्रेसिडेंट नासेरनें सरकारच्या हातांत घेतली होती. त्यामुळें येथें चांगलीच खळबळ उडाली होती, हें मी ऐकलें होतें त्यामुळें मी त्यांना सुवेझच्या कालव्याविषयीं कां ? असें विचारलें परंतु ते म्हणाले सुवेझच्या कालव्याचें नाहीं परंतु येथें एक महिन्यापूर्वीपासून सबंध देशभर असलेले लोखंडाच्या कारखान्यांचे कामगार संपावर गेले होते व त्यामुळें उद्योगधंद्याला चांगलीच थंडाई आली होती. बहुतेक मोठ्या कोळशाच्या खाणी सुद्धां

बंद होत्या. थोड्याच दिवसांपूर्वी हा संप मिटला असून कांहीं काम सुरू केलें होतें. व म्हणून कोळशाच्या खाणीवर भेट देण्यास येणाऱ्या लोकांची गोष्ट कंपनीच्या मालकांना रुचण्यासारखी नव्हती. हें ऐकल्यावर मला कुठपर्यंत खाणी पहातां येतील अशी भीति मी त्यांच्याजवळ व्यक्त केली व त्यांनींहि त्याबद्दल साशंकता दाखविली. मी ह्या संपाबद्दल इंग्लंडमध्येंच ऐकलें होते. व तो मिटल्याचेहि मला कळलें होते परंतु त्यामुळें मला खाणी पहातांना त्रास होईल याची कल्पना आली नव्हती. नंतर मी त्यांना सांगितलें कीं, त्यांचे पत्र मला न मिळाल्यानें मी इकडे आलों आहे. व इतक्या लांब आल्यानंतर मला कांहीं तरी पहाण्यासाठीं व्यवस्था करावी. त्यावर त्यांनीं बघूंया म्हटले व दुसऱ्या दिवशीं मला ब्युरो–ऑफ–माईन्सचे परदेशी विभागांचे प्रमुख अधिकारी लुई टर्नबुल ह्यांना भेटण्यास जाण्यास सांगितलें व नंतर लगेच त्यांनीं त्यांना फोन करून माझी भेटण्याची वेळ नक्की करून दिली. मला दुसऱ्या दिवशीं ११ वाजतां त्यांनीं बोलाविलें होते. श्री. सुंदरमूनीं मी कोठें उतरलों वगैरेची चौकशी केली परंतु मी कोठेंच उतरलों नाहीं असें सांगितल्यावर त्यांनीं मला " कैरो " हॉटेल स्वस्त व चांगलें असल्याचें सुचविलें.

नंतर मी माझी सुटकेस लॉकरमधून काढून घेतली व टॅक्सीनें " करो " हॉटेलवर आलों. तेथें माझ्यासाठीं खोली ठेवण्याची व्यवस्था हिंदी कचेरींतून आधींच झाली होती. त्या खोलीवर मी माझें सामान 'एलिव्हेटर'मधें ठेवून गेलों. आपण ज्याला लीफ्ट म्हणतो त्याला अमेरिकेंत 'एलिव्हेटर' म्हणतात. माझी खोली चांगलीच प्रशस्त होती. खोलीचें रोजचें भाडें २ डॉलर असून तेथें बरेच फर्निचर होते. जमिनीवर गालिचा वगैरे होता अमेरिकेंतील हॉटेल्स मधें फक्त खोलीचें भाडें घेतात त्यांत इंग्लंडप्रमाणें न्याहरीचा समावेश केलेला नसतो. तुम्हीं तुमचें जेवण कोठल्याहि रेस्टोरंटमध्यें घेऊं शकतां. प्रत्येक हॉटेलमध्यें टेलिफोन असतो आणि स्वतःच्या खोलींत असलेल्या फोनवरून कुठेंहि टेलिफोन करतां येतो. ह्या हॉटेलची इमारत ११ मजली असून वॉशिंग्टन मधील सर्व इमारतींत ती सर्वांत उंच आहे, असा हॉटेल मालकाचा दावा होता मी खालीं आलों आणि वॉशिंग्टनमध्यें कोणकोणती करमणुकीचीं साधनें आहेत किंवा स्थळें आहेत ह्याची त्याच्याजवळ चौकशी केली. तेव्हां त्यांनीं मला सर्व करमणुकीच्या साधनांची वगैरे एका कागदावर यादीच दिली त्या कागदावरून असें कळलें कीं वॉशिंग्टन दाखविण्यासाठीं निरनिराळ्या मार्गावरून प्रवासी लोकांसाठीं बसेसमधून स्थळें दाखविण्याची व्यवस्था होती. आपण त्यांना कळविल्यास आपल्या हॉटेलमध्यें ती बस आपल्याला घेण्यास येत असे आणि एकंदर प्रवास संपल्यावर परत आणून सोडीत असे.

मी वॉशिंग्टन पहाण्याकरतां थोडा बाहेर पडलों. आणि थोड्यावेळानें जवळच्या रेस्टॉरंटमध्यें जेवण्यास गेलों. येथें सुद्धां हिंदुस्थानांत रेस्टोरंटमध्यें पैसे टाकले म्हणजे आपल्याला वाटेल ती रेकॉर्ड वाजवून घेण्याची व्यवस्था आहे त्याप्रमाणें व्यवस्था आहे. फक्त फरक एवढाच कीं आपल्याकडे पैसे टाकण्यास मशिनजवळ जावें लागतें, परंतु येथें मात्र टेबलाजवळच पैसे टाकण्याची आणि बटण दाबून रेकॉर्ड लावण्याची व्यवस्था आहे. एखादें बटण दाबलें म्हणजे तेथेंच बसून आपणाला ती रेकॉर्ड ऐकूं येऊं शकते. जेवण झाल्यानंतर आपल्या टेबलावर बिलाचा कागद आणून ठेवतात, परंतु तो कागद मात्र उलटा ठेवतात. एखादे वेळेस बिलामधील आंकडा पाहून आपल्या मनामध्यें धस्स् होऊं नये म्हणून ही युक्ति असेल आणि मग जे कांहीं बील झालें असले तें तुम्हीं पैसे घेणाऱ्या माणसा-जवळ बील दाखवून भरायचें. खरोखरच येथील खाण्यापिण्याच्या पदार्थांचें भाव इतके भरमसाट असतात कीं, नवीन येणाऱ्या माणसाला धक्काच बसायचा! येथील डॉलरची किंमत आपल्या ५ रुपयांबरोबर आहे. येथें चहाच्या एका कपाला १० सेंट म्हणजे ८ आणे तर उकडलेल्या एका अंड्याला २० सेंट म्हणजे १ रुपया लागतो.

रात्र पडल्यामुळें मी विशेष कुठें न जातां जवळचाच भाग पहाण्याचें ठरविलें. नंतर मी फिरायला निघालों. वॉशिंग्टनचें एकमेकांना कापणारे रस्ते बहुधा मोठा पूल करून एकमेकांच्या वरखालीं जात असतात, व त्यामुळें मोटारींची अगदीं फारच जलद गतीनें वाहतून असते. वॉशिंग्टन हें अमेरिकेचे राजधानीचें शहर असल्यामुळें येथें काळ्या-गोऱ्याचा भेदभाव नाहीं. व हें दाखविण्यासाठीं कित्येक निग्रोंची घरें गोऱ्या लोकांच्या घरांना जोडून असतात. येथें फार उंच इमारती मात्र नाहींत. बहुतेक ३ ते ४ मजल्यांच्या इमारतीच आहेत. वॉशिंग्टनला येत असतांना मला कित्येक ठिकाणीं गाड्यांच्या विक्रीच्या जागा दिसल्या. ह्या गाड्या वापरलेल्या असतात. ह्यांना युज्ड कार पार्कस् म्हणतात. अशा जागीं रोज १५० ते २५० गाड्यांचा थवा अगदीं उघड्या जागेंत दिसतो. येथें विजेच्या दिव्यांचे तोरण केलेलें असतें व विक्री करणारा माणूस एका लहानश केबिनमध्यें बसलेला दिसतो. गिऱ्हाईक आले म्हणजे तो गाडी दाखवून त्यांत फिरवून आणतो. ह्या गाड्या नव्या सारख्या चकचकीत असून आपल्याकडे जी गाडी ८ ते १० हजाराला जाते ती येथें २००–२५० डॉलर्सना मिळतें. तसेंच अगदीं नव्या कोऱ्या गाड्या ५०० ते ६०० डॉसर्लना मिळतात. मी फिरतां फिरतां एका पार्कमध्यें गेलों व तेथें गाडीची चौकशी केली. रीडर्स डियजेस्टच्या एका अंकात एका डच माणसानें त्याच्या बायकोसह फक्त १०० डॉलर्समध्यें ३ महिने राहून सबंध अमेरिका पाहून घेतली होती.

जातांना त्याच्याजवळ कांहीं डॉलर्सहि उरले होते. अमेरिकेंत जातांना त्यांनीं गाडी बरोबर गेली होती. व त्यामुळें त्यांना सबंध अमेरिका पाहणें शक्य झालें. माझेंहि मनांत त्याचप्रमाणें गाडी घेऊन कमी खर्चांत अमेरिका पहावी असें आलें. कारण त्यामुळें मला सुटकेस उचलण्याचें श्रमहि पडलें नसतें. परन्तु हे जरी खरें असलें तरी जुनी गाडी घ्यायची आणि कुठें वाटेंत बंद पडली तर पंचाईत. शिवाय अमेरिकेंत जलद गतीनें जाणाऱ्या वाहतुकींत गाडी चालवणें हें धोक्याचें वाटतें. आणि हिंदुस्थानांत परत गाडी नेतांना परवान्याला बरेच पैसे लागतात. त्यामुळें मी गाडी घेण्याचा निर्णय बदलला. शिवाय मजजवळ डॉलर्सहि कमी होते.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी ब्युरो ऑफ माइन्सच्या ऑफिसमधें गेलों. हें ऑफिस डिपार्टमेंट ऑफ द इन्टरिअरच्या इमारतींत होते. येथें आणखी दुसरीहि ऑफिसेस होती. ही इमारत सहा मजल्यांची होती. ब्युरो ऑफ माईन्सच्या ऑफिसमधें निरनिराळ्या खोल्यांत डिपार्टमेंट ऑफ फॉरिन अॅक्टीव्हिटीजचें ऑफिस होते. व जगांमधील सर्व देशांच्या खनिजांबद्दल व थूस्तर (ज्यूऑलॉजी) बद्दल इत्थंभूत माहिती होती. कारण निरनिराळ्या राष्ट्रांकडून त्यांच्या राष्ट्रांच्या खनिज संपत्तीबद्दल माहिती देण्याकरितां आर्थिक व तज्ञ पुरविण्याची मदत अमेरिकेनें टी. सी. ए.च्या कार्यक्रमाखालीं मागासलेल्या राष्ट्रांना मदत देण्याचें कबूल केलेलें आहे. मला श्री. लुई–टर्न–बुलना भेटायचें होतें. त्यांनीं मला थोड्याच वेळांत त्यांच्या खोलींत बोलावलें. नंतर हाताखालच्या आणखी ३–४ अधिकाऱ्यांना बोलावून मला काय काय पहायचें आहे याबद्दल वाटाघाट केली. नंतर माझ्या कार्यक्रमांत त्यांच्या पिटर्सबर्ग येथील ब्युरो ऑफ माईन्सच्या ऑफिसमधून मला शक्य ती मदत मिळेल असें आश्वासन दिलें. मी स्वतःच इकडे तिकडे न फिरतां एकाच ठिकाणाहून खाणी पहाण्याचा विचार प्रगट केला होता कारण इंग्लंडमधें मला अनुभव होता कीं गांवोगांव फिरण्यामधें प्रवासाचा व एकाच जागीं रहातां येत नसल्यामुळें मर्जीप्रमाणें स्वस्त हॉटेल पाहून काढूं शकत नाहीं व त्यामुळें जास्त खर्च व्हायचा. श्री. लुई–टर्न–बुलनी त्यांच्या ऑफिसमार्फत मला खोली देण्याचें सुचविलें व माझी इच्छा असल्यास ती खोली मिळवून देण्याची इच्छा प्रदर्शित केली. तसेंच मला त्यांनीं हॉटेलमधें रहाणें महाग पडेल हेंहि सांगितल्यामुळें मी खोली देण्याच्या त्यांच्या सूचनेस ताबडतोब हो म्हटलें. मी वॉशिंग्टनला आणखी एक दिवस रहाणार होतो. म्हणून त्यांनीं त्यांच्या संस्थेमधें काय काय संशोधनाचे काम चालत आहे त्याची माहिती करून घेण्याकरितां माझी इच्छा असल्यास एक दिवस घालवायची सूचना केली. मी सुद्धां त्यास कबूल झालों. नंतर मी त्यांचा निरोप घेतला.

संध्याकाळीं वॉशिंग्टनचा प्रख्यात भाग पहाण्यांत घालविला. तेथें कॅपिटॉल म्हणजे अमेरिकेच्या राजधानीचा विधानसभेची इमारत बघण्यास आलो. परंतु संध्याकाळचे ५ वाजल्यामुळें ती बंद झाली व त्यामुळें मला बाहेरूनच पहाणें भाग पडलें. तेथून जवळच असलेल्या कांहीं इमारती पाहिल्यानंतर मी प्रेसिडेंटचे निवासस्थान (व्हाईट हाऊस) पहाण्याकरितां आलो. परंतु इतक्या मोठ्या राष्ट्राच्या राष्ट्रपतींचे घर फारच लहान आहे असें म्हणावें लागेल. आपल्या देशांत राजेरजवाड्यांचे महाल किंवा राष्ट्रपतींचे रहाण्याचे निवासस्थान किंवा गव्हर्नरच्या रहाण्याच्या निवासस्थानाच्या तुलनेंत व्हाईट हाऊस फारच छोटें वाटलें. त्याचप्रमाणें आपल्या देशांत त्यांच्या घराभोंवतीं जितका रक्षकांचा कडक पहारा असतो तेवढा आढळला नाहीं. रक्षकासाठीं एक लहान लाकडाची कॅबीन असून तेथें हा रक्षक खुशाल खुर्चीवर बसून रहातांना दिसला. दिवसाच्या ठराविक वेळेतच व्हाईट हाऊस पहाण्याची परवानगी असते.

ह्याच दिवसांत प्रेसिडेंटच्या निवडणुकीची चांगली धामधूम होती. निरनिराळ्या उमेदवारांच्या निवडणुकीच्या प्रचारासाठीं कार्य चालू होते. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार 'आयसेन हॉवर' ह्यांच्याकरितां निरनिराळे प्रचार चालू होते. मी रस्त्यावरून जात असतांना एका सुशोभित गाडींत नटनट्यांनीं 'आयसेन हॉवरला मतें द्या' अशा पाट्या घेतल्या असून त्यांची मिरवणूक काढली होती. त्याचप्रमाणें 'आय् लाईक आईक' म्हणजे मला आईक आवडतो अशी बटणें घालून लोक फिरत होते. आईक हें लाडानें दिलेलें नांव आहे. दुसऱ्या दिवशीं मी ब्युरो ऑफ माईन्सच्या ऑफिसमध्यें गेलो. नंतर ब्युरोंतील जे अधिकारी मला तेथील माहिती देणार होते त्यांच्याशीं थोड्याशा गप्पा मारल्या. त्यांनीं मला विचारलें कीं, तुम्हीं हिंदुस्थानांतून कोणत्या भागांतून आलांत? त्यावर मी त्यांना म्हटलें कीं, मी मुंबईमधून आलों आहे व मराठी बोलणारा आहे. नंतर ते मला म्हणाले कीं, आमच्या ब्युरोंत दासगुप्ता नांवाचा माणूस येऊन गेला तो मराठी होता का? तेव्हां मी त्यांना म्हटलें कीं बहुधा आमची नांवें 'ए' मधें अंतस्थ होतात. उदा० रानडे, आपटे, गोखले वगैरे तसेच बँगाली नांवाचे शेवटीं 'आ' येतो. उदा० कलकत्ता हे ऐकून त्यांना फार आनंद झाला कारण त्याला वाटत होते कीं हिंदुस्थानच्या ज्ञानाबद्दलची आपल्याला गुरुकिल्लीच मिळाली आहे. नंतर तो ज्या ज्या विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्याकडे घेऊन जात होता त्यांच्याशीं माझी ओळख करून देत असतांना सांगत असे कीं, तुम्हाला माहीत आहे का? कीं हिंदुस्थानांतील माणसांच्या नांवावरून हा माणूस कोणत्या भागांतून येतो हे ओळखतां येते. कारण त्यांच्या नांवापाठीमागें 'ए' आलें तर तो बॉम्बेतून आला असें समजायचें व 'आ' असलेलीं नांवें कलकत्ता येथील

आहेत असे समजायचे. ह्यांच्या देशांत किती सोपे आहे. नाहींतर आपल्याकडील माणूस टेकसासचा आहे का अरकनसासचा आहे हें कळण्यास मार्ग नाहीं. हें त्यांचे संभाषण ऐकल्यानंतर मला स्वतःलाच कळेना कीं ह्याला हिंदुस्थानच्या झालेल्या अपूर्ण ज्ञानाचा उलगडा करून ह्याला निराश करावें कीं त्या अज्ञानांतून राहून आनंदांत राहूं द्यावें, शेवटीं मी त्याचा उलगडा न करतांच तसे त्याला अज्ञानांत राहूं दिलें व त्यांचा निरोप घेतला.

नंतर त्याच दिवशीं ब्युरो ऑफ माईन्सची निरनिराळ्या विषयावर संशोधन करणाऱ्या विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची भेट घेतली व त्यांच्याशीं विचारविनिमय केला. संशोधनांत विशेष कांहीं नसून खाणींतल्या छताला ( रूफ ) मजबूत टिकवून ठेवण्याकरितां लोखंडाचे ६–६ आणि ८–८ फूट लांब छतामधें गज टाकून बाहेरील छताचे वजन आंतील छतावर पडल्यासारखें होते. ह्यामुळें अमेरिकेंतील खाणींचें छत सुरक्षित झाले आहे असें त्यांचें म्हणणें होते. बाकीच्या विषयांवर विशेष करून कोळसा व पत्थर ह्याला निरनिराळें करण्याच्या संशोधनांत, त्याचप्रमाणें कोळशांतून आंतील वायु द्रव्यें बाहेर काढून त्याच्यातून कोक करण्याच्या विषयांत इंग्लंड व कॉंटिनेंटमध्यें चांगलें संशोधन झाले आहे असें त्यांचे म्हणणें होते.

संध्याकाळीं मी पुन्हां हिंदुस्थानच्या कचेरींत गेलों. कारण मला आदल्या दिवशीं ह्या कचेरींतील अधिकारी श्री. शहाणे भेटले होते. त्यांनीं त्यांच्या घरीं जेवायला बोलावले होते व त्यांनीं मला ह्या कचेरींत बोलाविले होते. मी यथें आल्यानंतर थोड्याच वेळांत श्री. शहाणे आले. नंतर त्यांच्या निवासस्थानीं जाण्याकरितां त्यांच्या गाडींतून निघालों. वाटेंतच सौ. शहाणे यांना घेऊन आम्हीं संध्याकाळीं घरीं पोंहचलों. घरीं आल्याबरोबर श्री. शहाणे यांनीं मला माझा कोट, टाय वगैरे काढण्यास सांगून आराम करण्यास सांगितले. हें एक अमेरिकेंतील जीवनाचे वैशिष्ट्य आहे. तुम्हीं कोणाहिकडे गेलांत तरी प्रथम तुम्हांला तुमचे कपडे काढून आराम करण्यास सांगितले. हें एक अमेरिकेंतील सर्व घर दाखविलें. अमेरिकेंतील सर्व घरें तीन मजली असून जमिनीच्या खालीं खणलेल्या भागाला बेसमेंट म्हणतात. ह्याच्यामधें घरांतील अडगळचे सामान, वॉशिंग मशिन, घर आपसुक गरम करण्याचे हिटर वगैरे असते. बहुतेकांच्या घरीं ह्या वस्तू असतात. वॉशिं-गटन मशिनमध्यें तुम्हीं कपडे टाकून किती मिनिटें कपडे ठेवायचे आहेत त्यांवर आंकडा ठेवला कीं, तितक्या मिनिटांनीं कपडे धुवून निघतात व मशिन आपोआप बंद होते. तसेच पिळण्याच्या यंत्रांत ते पिळून निघतात.

पहिल्या मजल्यावर बसायची खोली व जेवणाची खोली वगैरे असतात तर वरच्या मजल्यावर झोंपायच्या खोल्या असतात. श्री. शहाणे यांनीं माझ्याबरोबर आणखी कांहीं महाराष्ट्रीयन लोकांना बोलाविले होते. त्यांतील एकदोन मंडळी येऊं शकली नाहींत. इंटर नॅशनल मोनेटरी फंडाच्या ऑफिसमध्यें काम करणारे श्री. पंडित व तेथें वैद्यकीय शास्त्राचा विशेष अभ्यास करणारे एक डॉक्टर व त्यांच्या पत्नी आल्या होत्या. नंतर आम्हीं बऱ्याच गप्पागोष्टी केल्या. सगळे महाराष्ट्रीयन असल्यामुळें आमच्या गप्पा चांगल्याच रंगल्या. श्री. शहाणे यांचें घर वॉशिंग्टनपासून बरेंच दूर होते. आजुबाजूला विशेष घरें नसून किड्यांचा किर्र् किर्र् असा आवाज ऐकूं येत होता. ह्या सर्व वातावरणानें आपण अमेरिकेंत नसून एका खेड्यांत आल्यासारखें वाटलें. श्री. पंडितांची, झरिआचे प्रमुख मजूर नेते महेश देसाई ह्यांच्याशीं ओळख होती. श्रीं. पंडितांनीं एक वाक्य सांगितलें तें मला फारच आवडलं ते म्हणाले कीं तुम्हीं झरिआच्या खाणी क्षेत्राला इतकें पुढें आणा कीं झरिआला हिंदुस्थानचें ऱ्हूर (जर्मनींतला अत्यंत उद्योग क्षेत्राचा भाग) अशी उपमा न देतां जर्मनीच्या लोकांनीं त्यांच्या ऱ्हूरला हे जर्मनीचे झरिया अशी उपमा दिली पाहिजे. ही कल्पना मला फारच पसंत पडली. आमचे जेवण (बफेट) पद्धतीनें झालें, म्हणजे टेबलावर सर्व पदार्थ ठेवून प्रत्येकानें आपल्या बशींत हवा तो पदार्थ काढून घ्यायचा. नंतर मला महाराष्ट्रीयन डॉक्टरांनीं आपल्या गाडींतून हॉटेलवर सोडलें.

दुसऱ्या दिवशीं मला पिटर्स बर्गला जायचें होतें व त्याप्रमाणें वॉशिंग्टनच्या ब्युरो ऑफ माईन्सच्या लोकांना कळविण्यास सांगितलें होतें. परन्तु मला येथील प्रख्यात इमारत स्मिथसोनीअन इन्स्टिट्यूट पहायची असल्यामुळें मी ते पहाण्याचें ठरवून दुपारीं जाण्याचें निश्चित केलें. नंतर मी प्रेसिडंटच्या घरावरून निघालों व तेथून जवळ असलेल्या इमारती पाहिल्या. अमेरिकेंतील नोटा छापण्याचें ऑफिस, जॅफरसन मेमोरिअल, वॉशिंग्टन मोनोमेन्ट वगैरे पाहिले. स्मिथसोनिअन इन्स्टिटयूट हे अमेरिकेचे फार प्रख्यात संग्रहालय असून निरनिराळ्या विषयांचा केलेला संग्रह चार पांच इमारतींत ठेवलेला आहे. तेथें जगांतील फार सुंदर चित्रांचा संग्रह, निरनिराळ्या वाघांचा संग्रह व विज्ञानाच्या विषयावर फारच मोठा संग्रह असून हे संग्रहालय ज्ञान वाढविण्याकरितां फारच उपयोगाचें आहे. हें सर्व पाहून दुपारची बस गांठायची असल्यामुळें मी माझ्या हॉटेलवर आलों. नंतर सामान घेऊन खालीं आलों व लगेच टॅक्सी मागाविली. इथें एक सांगणें जरूरीचे आहे कीं, इंग्लंडमध्यें बहुधा १२ च्या पुढें हॉटेल सोडल्यास तुम्हांला दुसऱ्या दिवशीचाहि आकार द्यावा लागतो. तसेंच अमेरिकेंत दुपारीं २ वाजतां हॉटेल सोडण्याची वेळ समजतात. ह्याला चेक-अप-टाईम म्हणतात. समजा तुम्हांला दुपारनंतर हॉटेल सोडायचें असेल; तर

हॉटेलमध्यें स्वागत करणाऱ्या माणसाजवळ तुमचे सामान खोलींतून काढून ठेवण्यास द्यावे व सवडीप्रमाणें नेले तरी चालते म्हणजे खोलीचा दुसरे दिवसाचा चार्ज लागूं होत नाहीं.

वॉशिंग्टनला असतांना एका संध्याकाळीं मी इंटर नॅशनल क्लबला गलों होतों. तेथें निरनिराळ्या देशाच्या लोकांना एकत्र येण्याची संधि मिळते. ह्यामुळें निरनिराळ्या देशांतील समजुती एकमेकांना कळतात. येथें बऱ्याच प्रमाणांत लोक येतात. प्रत्येक देशांतील माणूस आपल्या नांवाचे व कोणत्या देशाचा आहे तें चिन्ह कोटाला लावतात. कांहीं कांहीं लोकांना सेक्रेटरी बोलावतात व निरनिराळे प्रश्न विचारतात. मी गेलों तेव्हां एका हिंदी विद्यार्थ्याला हिंदुस्थानबद्दल प्रश्न विचारीत होते.

मी टॅक्सीतून बस स्टँडवर येऊन ३॥ च्या सुमारास पिटर्सबर्गची बस गांठली. वाटेंत जातांना मोठमोठीं जंगलें लागली. अधून मधून लहानमोठीं गांवें लागायची. इथें कित्येक ठिकाणीं पेट्रोल पंपांत पैसे टाकून आपोआप पेट्रोल भरणारे पंप व तसेंच ठराविक पैसे भरून गाडीची साफसुफी करण्याच्या जागा आढळल्या. आमची बस पिटर्सबर्ग बस-स्टँडवर रात्रीं ९ वाजतां पोंहचली. हें शहर बरेंच मोठें असून आम्हांला शहरांतील दिवे बऱ्याच अंतरावरून लागलेले दिसले. परंतु त्यापूर्वी आम्हांला एक मोठा डोंगर खोदून आंतून एक (खोल) बोगदा केला होता त्यांतून जावें लागलें. ह्यामधून एका वेळेस दोनच गाड्या जाऊं शकतात. बोगद्याच्या आंत जवळ जवळ बरेच ट्यूब–लाईट्स लावलेले होते. तेथें अगदीं दिवसाचा उजेड वाटत होता.

मी बसमधून बाहेर आलों व टॅक्सीवाल्यास व्हाय्. एम्. सी. ए. मध्यें घेऊन जाण्यास सांगितले. टॅक्सीवाल्यानें मला विचारलें कीं, तुम्हांला कोणत्या व्हाय्. एम्. सी. ए. त जायचें आहे? त्यावर मी सांगितलें कीं, गोऱ्या लोकांच्या. कारण काळ्या व गोऱ्या अशा दोन्हीं लोकांच्या व्हाय्. एम्. सी. ए. आहेत. मला निग्रो ड्रायव्हर म्हणाला कीं तुम्हांला गोऱ्या लोकांच्या वाय्. एम्. सी. ए. त घेणार नाहींत. तुम्हीं काळ्या लोकांच्या वाय्. एम्. सीं. ए. त गेलेलें बरें. त्यामुळें मला काय करावें तें सुचेना. ह्या अपमानाला कसें काय तोंड द्यावें ह्या विचारांत होतो रात्रीची वेळ असल्यानें ह्या वेळीं जास्त भानगडींत न पडतां टॅक्सीवाल्याला काळ्या लोकांच्या वाय्. एम्. सी. ए. त नेण्यास सांगितलें. माझ्या मनांत असें विचार आलें कीं आपणच जर इंग्रज लोक, आपण काळे लोक म्हणून आपल्याशी चांगली वर्तणूक करीत नसल्याची

फिर्याद करीत होतो व अमेरिकेंत चालू असलेल्या काळ्यागोऱ्याच्या वादाबद्दल आपण येवढी सहानुभूती दाखवतो तर काळ्या लोकांच्या वाय्. एम्. सी. ए. ला जाण्यांत आपण कां कमीपणा मानावा ! उलट आपण ह्याच लोकांची प्रीती संपादन केली पाहिजे. एशिया व आफ्रिका येथील लोकांनीं एकत्र येऊन पाश्चिमात्य देशांच्या श्वेतवर्णी लोकांनीं जो पृथ्वीवर इतका मोठा भाग कब्जांत घेऊन पृथ्वीतून निघणाऱ्या इतक्या द्रव्यांची मालकी घेतली आहे व काळ्या लोकांना इतक्या वाईट रितीनें वागवितात तेव्हां त्यांना शह दिला पाहिजे.

आमची टॅक्सी पिटर्सबर्गच्या निरनिराळ्या रस्त्यावरून चालली होती. मला जरा भितीच वाटत होती कीं हा टॅक्सीवाला पैसे लुबाडण्याकरितां आडमार्गाने तर नेत नाहीं ना ! म्हणून मी त्याच्याशीं गप्पागोष्टी सुरू केल्या. मी जेव्हां हिंदुस्थानचा आहे असें त्याला कळलें तेव्हां मला म्हणाला कीं तुमचा महात्मा गांधी किती देव माणूस आहे. आम्ही त्याची ह्या देशांतसुद्धां पूजा करतो. त्यानंतर मी त्याला ते दिवंगत होऊन ८ वर्षे झाल्याचें सांगितलें तेव्हां त्याला हे माहीत नव्हते म्हणून आश्चर्य वाटलें. नंतर त्यानें मला ते कशानें मरण पावले असा प्रश्न केला. मी त्याला आमच्याच एका माणसानें त्यांचा खून केला असें सांगितलें तेव्हां त्याला कांहीं उलगडाच होईना नंतर मी त्याला सर्व परिस्थिती समजावून सांगितली. बरेंच अंतर गेल्यावर आमची टॅक्सी वाय. एम्. सी. ए. त आली. तेथें मी खोलीबद्दल चौकशी केली; येथें रहाणारे सर्व लोक निग्रोच होते. माझ्या मनांत जरी सर्व वर्गाच्या व सर्व जातीच्या लोकांसाठीं समान हक्क असावेत व सर्वांना चांगल्या रितीनें वागवावें असें उदात्त विचार घोळत असले तरी मला येथ आल्यानंतर कसेसेंच वाटलें. नंतर मला माझ्या खोलीची किल्ली देण्यांत आली. मला खोली दाखविण्याकरितां व्यवस्थापक आला. एकंदर स्वच्छता, टापटीप कमीच होती. दिवस कधीं उजाडतो व मी येथून केव्हां जातों असें मला झालें, माझ्या खोलीचें शेजारचे गृहस्थ मला बरे वाटले. त्यांच्याबद्दल विचारपूस करितां ते एक अमेरिकन युनिव्हर्सिटीचें पी. एच. डी. असून एका कॉलेजमध्ये प्राध्यापकाचे काम करीत होते. एखादे वर्षानंतर ते परत हिंदुस्थानांत येणार होते. मी त्यांना विचारलें कीं, येथें काळ्यागोऱ्यांमध्यें चांगलाच भेदभाव मानतात काय ? व काळ्यागोऱ्यांच्या निरनिराळ्या व्हाय्. एस्. सी. ए. आहेत. ह्याबद्दल आपण खुलासा कराल काय ? त्यावर ते मला म्हणाले कीं, तसे कांहीं नसून लोकांच्या निरनिराळ्या समजुती झाल्या आहेत. बाकी गोऱ्या लोकांच्या व्हाय्. एम्. सी. ए. त जाण्यास तसा विरोध नाहीं.

सकाळीं मी न्याहरी करून फॉरबेस–स्ट्रीटवर असलेल्या ब्युरो ऑफ माईन्सच्या ऑफिसमध्यें गेलों. तेथें डायरेक्टरांची चौकशी केली व त्यांच्या ऑफिसमध्यें गेलो. त्यांनी माझी विचारपूस करून सांगितलें किं, तुमच्यासाठीं वॉशिंग्टनच्या ब्युरो ऑफ माईन्सनी खोलीची व्यवस्था करून ठेवण्यास सांगितलें असल्यामुळें तुम्हीं तुमची खोली पहा व पसंत असल्यास सांगा. नंतर मी तेथून खोली पहाण्यास गेलों. खोली जवळच असल्यामुळें मी पायीच चालत निघालों. खोलीवर आल्यावर त्यांनी खोलीच्या मालकीण बाईला बोलावलें व माझी ओळख करून दिली. या बाईचे नांव मिसेस ग्लॅडेस बूथ होतें. ह्या बाई चांगल्याच वयस्क होत्या. वरच्या मजल्यावरतीं खोली दाखविण्यांत आली. ह्या खोलींत पलंग, सोफा, लिहिण्यासाठीं टेबल खुर्ची वगैरे सर्व कांहीं फर्निचर होतें. जमिनीवर गालीच्या अंथरलेला होता. खोलीचें भाडें ८ डॉलर्स होतें. तें एका आठवड्याचें होतें. इतर हॉटेलच्या मानानें मला स्वस्त वाटलें. मी खोलीहि रहाण्यास पसंत केली. नंतर मी परत ब्युरो ऑफिसांत आलो व तेथें माझी कांहीं अधिकाऱ्यांची ओळख करून देण्यांत आली. थोड्यावेळानें मी पुन्हां माझ्या निवासस्थानी म्हणजे वाय्. एम्. सी. ए. त आलों.

सर्व सामान खोलींत ठेवून संध्याकाळीं पिटर्सबर्ग शहर पहाण्याच्या हेतूनें निघालो. फोर्बस–स्ट्रीट हा पिट्सबर्गचा मुख्य बाजाराचा भाग असून इथें बरीच मोठमोठीं दुकानें आहेत. मी जात असतांना मला अटलांटिक व पॅसिफिकच्या डीपार्टमेंटल स्टोअर्सची पाटी पहाण्यांत आली. ह्या स्टोअर्सबद्दल मी श्री. मायसन फ्रेझरकडून बरेंच ऐकलें होतें. इथें चांगल्याच स्वस्त दरानें वस्तू मिळतात. ह्याच्या शाखा सबंध अमेरिकेभर पसरलेल्या असून ह्याला थोडक्यांत ए. पा. स्टोअर्स म्हणतात. अशा निरनिराळ्या कंपनीच्या सबंध देशभर शाखा असलेल्या स्टोअर्सना सुपर मार्केट व जाएंट मार्केट म्हणतात सबंध देशभर शाखा असल्यामुळें फारच मोठ्या प्रमाणावर लोक माल विकत घेत असल्या-मुळें ह्यांना स्वस्त दरानें मिळतो व म्हणून ते स्वस्तहि देऊं शकतात.

मला श्री. मायसन फ्रेझर यांनीं असें सांगितलें कीं, कित्येक लोक विशेषतः विद्यार्थी वर्ग स्वतःच्या खोलींत घरमालकिणीकडून स्टोव्ह ( गॅसचा किंवा विजेचा ) घेऊन स्वतःचें जेवण स्वतःच तयार करतात. त्यामुळें माझ्याहि मनांत तसें करण्याचें आलें. कारण इथें येण्यापूर्वी बऱ्याच लोकांनीं भिती घातली होती कीं, अमेरिका हें भयंकर खर्चाचे ठिकाण असून दररोज माणशीं साधारण ५० ते १०० रुपये इतका खर्च येतो. म्हणून हा प्रयोग

करण्याचें मी ठरविलें. त्यामुळें आपल्याला किती कमी खर्चांत रहावयास मिळेल ते अज-मावताहि येईल असें मनाला वाटलें.

येथील स्टोअर्समध्यें जिनसा अगदीं पद्धतशीर रीतीनें मांडलेल्या असतात. प्रत्येक वस्तूसमोर त्याची किंमत लिहिलेली असते. मी तेथील लोणी, बिस्कीटें, चीज वगैरे विकत घेतले. तेथें कॉर्नफ्लेक्स एका मिनिटांत शिजणारे तांदळाचें पॅकेट, टीनड्‌फिश वगैरे अनेक जिनसा मिळत होत्या. येथें हिंदुस्थानांत मिळतात तशा भाज्या पाहून मला फार आनंद झाला. वांगी, फुलकोबी, कांदे, बटाटे, लसूण, मुळा, गाजर, फरसबी, वगैरे सर्व कांहीं भाज्या होत्या. मला अगदीं त्या भाज्या घेऊन आपल्या पद्ध-तीनें करून खाव्याशा वाटल्या. परन्तु स्वतःला स्वैपाकाचा गंध नसल्यामुळें मी अगदीं निराश झालों. दुसऱ्या बाजूला निरनिराळ्या प्रकारचें मासे व कोंबडीचे कापलेले तुकडे ( फ्रीझींग केस ) मध्यें पहायला मिळालें. ही फ्रीझींग केस म्हणजे कांचेच्या पेटीसारखी पेटी असून त्यांत अगदी थंड वायुनें उष्णता मान कमी करून आंतील पदार्थ चांगले सुरक्षित रहावे याची व्यवस्था केली होती. दुसरे असेच शिजविलेले पदार्थ घरी जाऊन उकडून किंवा तळून एका मिनिटांत काढतां यावे असेहि पदार्थ होते. मी फक्त थोडी फळें घेऊन बाहेर पडलों. येथून तुम्हांला निरनिराळ्या दरवाजांतून जावें लागतें तुम्ही घेतलेल्या सामानाचें पैसे घेण्याकरिता बहुतेक बायका बसलेल्या असतात. तुमच्या गाडींतील माल भराभर बाहेर काढून त्याची जी कांहीं किंमत छापली असेल ती त्यांच्या कॅश मशीनवर टाइप रायटर सारखी छापत जातात व सगळ्या वस्तूंच्या किंमती छापल्या किं बेरजेचें बटण दाबलें किं तुम्ही घेतलेल्या वस्तूंची एकदम रक्कम आपोआप छापली जाते. तुम्ही पैसे दिल्यानंतर तुमचे पैसे परत द्यायचे असल्यास ते सुद्धां एक बटण दाबले किं, तुम्हीं घेतलेल्या वस्तूंची किंमत एकदम आपो-आप छापली जाते. तुम्हीं पैसे दिल्यानतर तुमचे पैसे परत घ्यायचे असल्यास ते सुद्धां एक बटण दाबलें कीं कळतें. तुमच्या सर्व जिनसा एका कागदाच्या पिशवींत घालून तिचें तोंड बंद करून तुम्हांला नेतां येईल असें पॅकेट तयार करून देतात. तुम्हांला मजबूत पिशवी हवी असल्यास २ सेंट देऊन एक पिशवी मिळूं शकतें. ह्या मार्केटमध्यें शिरल्यावर तथें गाद्या नसलेल्या लहान मुलाच्या प्रमाणें चार चाकें असलेल्या गाड्या असतात. त्यांतील एक गाडी घेऊन तुम्हीं स्टोअरमध्यें खरेदीला जायचें व त्यांत सर्व सामान घेऊन जातांना ती गाडी परत होती तेथें ठेवायची अशी पद्धत आहे. मी सामान घेऊन बाहेर पडलों. मला ह्या वेळेस फार आनंद झाला होता कारण मला कमी खर्चांत रहातां

येईल ही एक गोष्ट होती व अमेरिकेंत तेथील लोकांप्रमाणें बिन्हाड केलें असल्यासारखें वाटून अमेरिकेबद्दल जी हुरहुर वाटायची ती निघून गेली होती. माझें मन स्वस्थ असून मला एकप्रकारची गंमत वाटत होती. सामान घेऊन मी घरी आलो व सर्व सामान खोलीमध्यें ठेवून घरमालकिणीबरोबर गप्पागोष्टी करण्यास खालीं आलों. ह्या घर-मालकिणीचें वय ७० वर्षांचें असून त्या तेथील हॉस्पिटलमध्यें नर्सचें काम करीत होत्या व त्यांना रोज १८ डॉलर पगार मिळत होता. ह्या बाईला दोन मोठीं मुलेंसुद्धां होतीं. मी त्या बाईला म्हणालो कीं, तुम्हीं आतां म्हातारपणीं कशाला काम करतां ? हे माझें शब्द ऐकतांच ती रागानें मला म्हणाली कीं, मी काय म्हातारी आहे ? नंतर मला माझी चूक कळून आली कीं, अमेरिकेंत कोणत्याहि बाईस म्हातारी म्हटल्यानें राग येतो व असें कधीं म्हणायचें नसतें. नंतर मी तिची क्षमा मागितली व मला स्वयंपाकासाठीं भांडी मिळतील का म्हणून विचारलें तसेंच त्यांचा गॅसचा स्टोव्ह मिळेल का विचारलें ? त्यावर तिनें ते आनंदानें देण्याचें कबूल केलें व दुधाचाहि बंदोबस्त केला. दुधासाठीं कार्डबोर्डचे डबे असून आंत मेणासारखा पदार्थ लावलेला असल्यामुळें कागद ओला होत नाहीं. त्या बाईनें मला त्यांचा रेफ्रिजरेटर वापरण्याचीहि परवानगी दिली.

दुसऱ्या दिवशीची न्याहरी मी घरीच केली. दूध, भरपूर पावरोटी, लोणी, बिस्कीटें केळी वगैरे खाऊन आपण रेस्टॉरंटपेक्षां स्वस्त दरांत खातो ह्या विचारानें समाधान वाटलें. दुसऱ्या दिवशीं शनिवार असल्यामुळें ब्युरोचें ऑफीस बंद होतें. मला कांहीं काम नसल्यामुळें सर्वांना घरीं पत्र लिहिण्यास घेतलें. त्याचप्रमाणें ज्यांच्या खाणी मला पहावयाच्या होत्या अशा अमेरिकन कंपन्यांनाहि पत्रें लिहिली. नंतर मी पोस्टाच्या तिकिटाच्या चौकशीसाठीं बाहेर पडलो तेव्हां असें कळलें कीं, शनिवारीं दुपारीं पोस्ट ऑफीस बंद असते तेथें जवळच माझ्या शेजारी एक बाई उभी होती. तिनें मला किती तिकिटें हवी आहेत असें विचारून मला हवी तेवढी तिकिटें दिलीं तसेंच मला कुठल्या देशांतून आलांत म्हणून प्रश्न केला. मी हिंदुस्थानांतून आलो आहे हें सांगितल्यावर येथील हिंदी लोकांची ओळख झाली आहे का असा प्रश्न केला. मी नाहीं म्हटल्यावर ती मला मी तुमची ओळख करून देतें असें सांगून तिच्या बहिणीच्या घरीं नेलें. तेथें मुकर्जी नांवाची बाई रहात होती व ती माझी दुसऱ्या हिंदी लोकांशी ओळख करून देईल असे तिचें म्हणणे होतें. नंतर त्या बाईच्या बहिणीच्या घरीं आल्यानंतर तिथें त्या मुकर्जींची व माझी ओळख करून दिली. ह्या बाईचा नवरा म्हणजे श्री. मुकर्जी मेटालर्जिस्ट असून पिटर्सबर्ग येथील लोखंडाच्या कारखान्यांत काम करीत होते. मिसेस मुकर्जींनी मला तेथें

रहात असलेल्या हिंदी लोकांची माहिती सांगितली. तसेंच एक दोघांची गांठ टेलिफोनवर घडून आणली. त्यापैकी एक आगरवाल हे युनायटेड स्टेट्स् स्टील कार्पोरेशनमध्यें एका लॅबोरेटरींत काम करीत होते. त्यांनी अमेरिकन बाईशी लग्न करून ते अमेरिकेंतच स्थाईक झाले होते. त्यांनी मला त्यांच्या घरी येण्याचे आमंत्रण दिलें. ज्या बाईने मला इथें आणलें तिची बहिण कार्नेगी लॉजीकल इंस्टीट्यूट मधील एका ऑफिसमध्यें काम करीत होती. थोड्या वेळानें ती बाई स्वतःच्या हॉटेलवर जाण्यासाठीं निघाली व मीहि तिचे बरोबर निघालों. जातांना वाटेंतच पीटर्सबर्ग युनिव्हर्सिटितील एक प्रोफेसर भेटले. त्या बाईने लगेच त्यांच्याशी ओळख करून दिली व मला पिटर्सबर्ग मधील मायनींग इंजिनिअरींगचा भाग कसा पहावयास मिळेल असें विचारलें त्या गृहस्थाने मला त्या विभागाचें प्रमुख शिक्षक डिन फ्रिटरर यांना भेटायला सांगितले. त्यावर मी त्यांना त्यांच्याशी ओळख करून द्याल कां म्हणून प्रश्न केला परंतु ते म्हणाले कि, त्यांत ओळख करून काय द्यायची तुम्हीं त्यांच्या खोलीवर केव्हांही जाऊन तुम्हांला तो विभाग पहायचा आहे असें सांगा. खरोखर अमेरिकेंत आपण, जसा ब्रिटिश राजवटींत ओळख, परिचय व अंमलदारशाहीचा बाऊ केलेला आहे तसा मुळींच नाहीं त्या बाईनेंहि हॉटेलवर नेल्यानंतर मला पिटर्सबर्गची माहिती देणारी पुस्तकें दिली. नंतर त्या बाईचा मी निरोप घेऊन निघालों. ह्या हॉटेलच्या प्रवेशद्वारानें माझें जरा लक्ष वेधलें. ही दारें कांचेची असून त्याला जरा हात लावतांच आपसूक उघडून थोडा वेळ ती तशीच राहून मग पुन्हा आपसुक बंद होत होती. मी हॉटेलमधून बाहेर पडतांच मला एक हिंदी विद्यार्थी भेटला-मी लगेच त्यांच्याबद्दल चौकशी केली. तो पिटर्स बर्ग येथें युनिव्हर्सिटीत केमिकल इंजिनिअरींगचा अभ्यास करीत असून त्यानें मला त्याच्या हॉटेलवर येण्याचें आमंत्रण दिले. त्याचें हॉटेल जवळच होते. प्रत्येक खोलींत दोन दोन विद्यार्थी होते. प्रत्येकाला अभ्यासाकरिता निरानिराळ्या खुर्च्या टेबलें व झोंपण्यासाठीं पलंग. तसेंच आगगाडींतील बर्थ प्रमाणें भिंतीला लागून वरती दुसरा पलंग होता. अमेरिकेच्या मानानें हें हॉटेल विशेष आवडलें नाहीं. आपल्या हिंदुस्थानांतील कांहीं हॉस्टेलस् सुद्धां चांगली आहेत असे माझें म्हणणें आहे. तेथील विद्यार्थ्यांनीं मला १५ ऑगस्टचा हिंदुस्थानचा स्वातंत्र्यदिन जवळच आला आहे तो पुढील रविवारी साजरा करण्याचें ठरविलें असून त्या निमित्तानें हिंदी पद्धतीचा जेवणाचा कार्यक्रम होता तेव्हां त्याचें आमंत्रण मला दिलें. त्या वेळेस पुष्कळच हिंदी लोक भेटतील असे त्यांनीं मला सांगितलें पिटर्सबर्गमधील हिंदी असोसीएशनचे सेक्रेटरी जवळच रहात असून ते पिटर्स बर्ग युनिव्हर्सिटीचे विद्यार्थीहि होते त्यांच्या खोलीवर मला ते विद्यार्थी घेऊन आले परन्तु हे गृहस्थ खोलीवर नसल्यामुळें मला भेटलें नाहींत. मी त्यांचा निरोप घेऊन पिटर्सबर्ग बाजार पहाण्यासाठीं निघालों.

दुसरे दिवशीं रविवार होता. रविवारी ६० सेंट देऊन पिट्सबर्ग शहर पहाण्याचें तिकीट मिळून (सेंट म्हणजे डॉलरचा १०० वा भाग) तुम्हीं सकाळीं ६ वाजल्यापासून ते रात्रीं १२ वाजेपर्यंत केव्हांहि कोणत्याहि (ट्राममधें) स्ट्रिटकारमधें बसूं शकतां. व तुम्हांला पिट्सबर्ग पहातां येते. मी पिटर्सबर्ग शहराच्या माहितीचे पुस्तक त्या बाईजवळून घेतल्यामुळें त्या त्या जागा पहावयास निघालों.

प्रथम पिटर्सबर्गच्या मुख्य बाजाराच्या विस्तारांतच आलो. अमेरिकन शहरांतील मुख्य व्यापार व बाजार पेठेला डाऊन टाऊन म्हणतात. व वस्तीच्या भागाला अप् टाऊन म्हणतात. त्याचप्रमाणें बाजारपेठेंतून डाऊन् टाऊन व अप् टाऊन मुख्य रस्त्याला, उजव्या व डावीकडच्या विस्ताराला क्रॉस्टाऊन म्हणतात. जसें मुंबईचा मुख्य बाजारभाग म्हणजे फोर्टमधील भागाला डाऊन् टाऊन म्हणायचें. अमेरिकेंत डाऊन टाऊन विभागांत बऱ्याच उंच इमारती आहेत. त्या ४०–४५ मजल्यांच्या आहेत. पिटर्सबर्ग व शहराच्या दोन्ही बाजूनें दोन नद्या मनंगहिला व ओहायो ह्या वाहातात व त्यांचा संगम होतो. ह्या भागांत हा संबंध विस्तार आहे. कांहीं वर्षांपूर्वी हें सर्व उजाड असून आतां तेथें भव्य इमारती बांधल्या गेल्या आहेत. ह्या त्रिकोणी जागेला गोल्डन ट्रॅंगल म्हणतात. संगम झालेली नदी ह्या विस्ताराच्या जवळुन वहातें व तिचें पात्र मोठें असून त्याला ओलांडण्याकरितां बरेंच पूल बांधलेले आहेत. समोरच्या बाजूला उंच टेकड्या असून त्यावर जुनें पिटर्सबर्ग शहर वसलें आहे. ह्या टेकडीवर चढण्याकरितां (इनक्लीन्ड रेल्वे) चढण असणाऱ्या कित्येक निमुळत्या रेल्वे केलेल्या आहेत. १० सेंटचें तिकिट घेतलें कीं, डोंगराच्या पायथ्यापासून, डोंगरावर त्यांच्या डब्यांत बसलों की, चढतां येतें. पिटर्सबर्गच्या ह्या रेल्वे म्हणजे अमेरिकेंतील एक वैशिष्ट्य आहे. दुसरीकडे कुठें अशा पहावयास मिळत नाहींत. असें पिटर्सबर्गच्या गाईडमध्यें लिहिलेलें आहे. डोंगराच्या शिखरावर विजेचे एक मोठें क्रेन बसविलेलें असतें व त्याला चांगलाच लोखंडाचा दोर गुंडाळला असून ह्या डब्यांत जास्तींत जास्त २० माणसें बसूं शकतात. निमुळत्या रस्त्यावर डबा जात असल्यामुळें आंतील बैठकी सामान रहावें म्हणून ते गाडीच्या डब्याशी विशेष करून बसाविलेलें असतें. डब्यांत ठराविक माणसें बसल्यानंतर डोंगराच्या पायथ्याशीं असलेला मनुष्य टेलिफोन करून क्रेन चालविणाऱ्या माणसाला कळवतो. व नंतर क्रेन दोराच्या सहाय्यानें डबा वर खेंचला जातो. तेथें उतारूंना उतरण्याची सोय असते. व तेथून समोर पिटर्सबर्गचें दृश्य फारच सुंदर दिसतें. येथील मी कॅमेरानें पुष्कळच चित्रें घेतली. ह्या डोंगराच्या खालून सुद्धां कित्येक बोगदे खणलें आहेत. डोंगराच्या पलिकडे असलेल्या

वस्तींत गाड्या व ट्रामनें बोगद्यांतून जातां येते मी परत ट्राममध्यें बसून नदीवरचा पूल ओलांडून डाऊन टाऊनला आलों. नंतर थोडा वेळ हा भाग पहाण्यांत घालविला. येथील मोठ्या इमारतींत एक 'अल्कोवा' ची ४० मजली इमारत आहे. 'अल्कोवा' हें अल्युमिनियम कॉरपोरेशन ऑफ अमेरिकेच्या आद्याक्षरांतून तयार केलेलें नांव आहे. अल्युमिनियमचा इमारती बांधण्यास सुद्धां उपयोग होऊं शकतो. ह्या इमारतींत हे दाखवण्याकरितां विटांचे काम नसून सबंध इमारतीच्या भिंती अल्युमिनियमच्या पत्र्यानें केलेल्या आहेत. ह्या पत्र्यांना आधार म्हणून लोखंडाच्या गर्डर घासून चौकटी तयार करून त्यावर हे पत्रे चढविलेले आहेत. त्यांत सुंदर कांचेच्या खिडक्या वगैरे लाविलेल्या आहेत.

येथून मी पिटर्सबर्गचे पाणी संग्रहालय व त्याला लागूनच असलेल्या मोठ्या बागेंत गेलो. बागेंत उंट वगैरे प्राणी होते. त्यावर हौशीकरितां मुलांना फिरवत होते. लोकांच्या मनोरंजनासाठीं इथें सुद्धां अनेक प्रकार होते. तसेंच अनेक प्राण्यांचा संग्रह होता. ह्या बागेच्या मधूनच जाणाऱ्या रस्त्यावर मोटारींची रहदारी अव्याहत चालली होती. रस्ता ओलांडायचा असल्यास जवळच उभारलेल्या खांबावरचे बटण दाबलें म्हणजे लाल दिवा लागून गाड्यांना थांबवितां येते व रस्ता ओलांडण्याचें काम सोपें होतें.

दुसऱ्या दिवशीं मी ब्युरो ऑफ माइन्सचे ऑफिसामधें गेलों व तेथील डायरेक्टरला भेटलो. मला डायरेक्टरांना भेटण्याकारितां आपल्याकडे जशी स्लीप पाठवितात तसे येथें कांहीं पाठविण्याचा प्रकार दिसला नाहीं. मी सरळ आंत गेलो. माझ्या रहाण्याची व्यवस्था लागली आहे कीं नाहीं ह्याचा तपास करून इथून अंदाजे ८० मैल दूर असलेल्या 'जॉय' कंपनीच्या फ्रॅंकलिन गांवांत असलेल्या कारखान्यांत पहाण्यासाठीं गेलों. आम्हीं ब्युरो ऑफ माइन्सच्या गाडीनें निघालो. ब्युरो ऑफ माइन्सच्या जवळ जवळ १०० गाड्या असतील. ह्या सर्वांसाठीं ब्युरोच्या कचेरीच्या खालीं एक मोठें तळघर असून त्यांत ह्या सर्व गाड्या ठेवल्या होत्या. ज्या अधिकाऱ्याला ब्युरोच्या कामाकरितां बाहेर जायला लागायचें त्याला गाडी नेण्यासाठीं वरच्या अधिकाऱ्याची परवानगी लागत असे. गाडी काढण्यापूर्वीं व गाडी ठेवतांना 'मायलेजमिटर' चा आकडा नोंदवून ठेवण्यास लागत असे. तसेंच कोणत्या कामाकरितां गाडी घेऊन गेलांत त्याचेंहि टिपण करावें लागे. हे सर्व अधिकारी आपापल्या गाडींतून येत असत. ह्यांच्या गाड्या दुसरीकडे ठेवत असत. येथें आपल्या-प्रमाणें स्वतः गाडी ठेवून कंपनी कडून भत्ता घेण्याची पद्धत नाहीं. गाडी 'अधिकाऱ्याला

सुद्धा ' स्वतः चालवावी लागते. आपल्याकडे ज्याप्रमाणें ड्रायव्हर ठेवण्याची पद्धत आहे त्याप्रमाणें येथें नसून फक्त श्रीमंत माणसेंच ड्रायव्हर ठरूं शकतात, गाडीच्या पाठी मागची सीट नसलेल्या गाड्या सरकार विकत घेते. कारण एकतर त्या थोड्या स्वस्त मिळतात व मागची सीट नसल्यानें दुसऱ्या अधिकाऱ्यांना गाडी घरच्या मंडळींसाठीं वापरतां येत नाहीं. मला गाडींतून घेऊन जाणारें गृहस्थ चांगलेंच तरुण असून इलेक्ट्रीकल इंन्जीनीयर होते. त्यांचें काम खाणींत वापरल्या जाणाऱ्या मशिनरीची सुरक्षितता पहाण्याचें होतें. आम्ही जात असतांना रस्त्यावर बरींच निग्रो व गोऱ्या लोकांची मुलें वर्तमान पत्र विकत असतांना दिसली तेव्हां मी त्या गृहस्थांना विचारलें किं ह्या मुलांची परिस्थिती खरेंच कांहो गरीबीची असते त्यावर ते म्हणालें त्यांत आश्चर्य कांहीं नाहीं. कारण मी सुद्धां माझी परिस्थिती गरीबीची असल्यामुळें वर्तमान पत्रें विकून शिक्षण पुरे केलें. त्यामुळें मला मात्र चांगलेंच आश्चर्य वाटलें.

आम्हीं सकाळीं १० च्या सुमारास फ्रँकलिनच्या 'जॉय' कंपनीच्या कारखान्यांत पोंहोचलों. तेथें आम्हांला कारखाना दाखवण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. 'जॉय' कंपनी ही जगांतील सर्वांत मोठी मायनिंग मशिनरी करणारी कंपनी आहे व तिचें अमेरिकेंत निरनिराळ्या ठिकाणीं अनेक कारखाने आहेत परंतु त्यांत फ्रँकलिनचा कारखाना फारच मोठा आहे. ह्या कारखान्यांत, खाणींत वापरली जाणारी मोठमोठी मशिनरी तयार होते. त्यांत सतत कोळसा कापणारे मशीन, कोळसा भरणारें मशीन, कोळशाला खाणींत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं घेऊन जाणाऱ्या गाड्या वगैरे अनेक निरनिराळी यंत्रसामुग्री तयार होते. कारखाना पहाण्यापूर्वी आलेल्या पाहुण्यांना ' जॉय कंपनीचे पाहुणे ' असा बिल्ला देण्यांत येतो व तो बिल्ला कारखाना पाहून आल्यानंतर परत करायचा असतो. हीच पद्धत अमेरिकेंतील कारखान्यांत दिसते.

जॉय मॅन्युफॅक्चरींग कंपनीच्या ऑफिसांत व दुसऱ्या ऑफिसेसमधें आपण पत्र लिहिण्याकरितां जसे स्टेनोग्राफरला बोलावून पत्र लिहितो अशी पद्धत येथें नसून तुम्हांला जे कांहीं लिहायचें असेल ते तुमच्या टेबलाच्या फोनमध्यें बोलतात व ठराविक बटण दाबलें की सेक्रेटरीच्या टेबलावरती असलेल्या डीक्टेटींग मशीनवर हे सर्व रेकॉर्ड होऊन जाते. तुम्ही काय लिहिले आहे ते परत दुसरें बटण दाबलें कीं ऐकावयास मिळते व तुमची चूक तुम्ही दुरुस्त करूं शकतां. निरनिराळे अधिकारी स्वतःच्या टेबलावरून त्यांना जे कांहीं लिखाण करायचें

ते आपल्या टेबलावरच्या फोनमधेंच बोलून सेक्रेटरीच्या टेबलावरच्या मशीनवर रेकॉर्ड करून घेतात. नंतर सेक्रेटरी फावल्या वेळांत तो मजकूर ऐकून टाईप करतात.

दुसऱ्या दिवशीं ब्युरोची निरनिराळे प्रयोग करण्यासाठीं ब्रुस्टन मुक्कामीं असलेली कोळशाची खाण बघण्याकरितां मला घेऊन जाण्याचा बंदोबस्त ब्युरोनें केला होता. ब्रुस्टन हे पिट्सबर्गहून अंदाजे ३०–४० मैल दूर असेल. ह्या कोळशाच्या खाणींत कोळशाच्या भुकीनें होणाऱ्या स्फोटावर निरानिराळे प्रयोग चालू होते. व खाणींत झालेल्या स्फोटाचा किती दाब आहे, काय टेम्परेचर होते वगैरे सर्व गोष्टी आपसुक इलेक्ट्रोनिक मशीननें वरच्या ऑफिसमधें रेकॉर्ड व्हायचें. नंतर मला इथून जवळच असलेल्या प्रयोग–शाळेंत घेऊन जाण्यांत आले. इथें कोळशांतून डायरेक्ट पेट्रोल तयार करण्याचे काम चालू होते.

नंतर ओहोमो स्टेटमधें असलेल्या "स्ट्रीप माइन्स" (म्हणजे कोळश्याच्या थरा-वर असलेले माती पत्थर कापून टाकून, खालचा कोळसा काढून घेण्याच्या पद्धतीला स्ट्रीप मार्दक म्हणतात.) पहाण्याचा कार्यक्रम केला होता. मला 'सेंट क्लेरेन्स विले' मधें असलेल्या ब्युरो ऑफ माइन्सच्या डिस्ट्रक्ट ऑफीसमधें पोंहचविण्याचा बंदोबस्त केला होता. सेंट क्लेरेन्स–विले हे अंदाजे पिटसबर्गहून ८०–१०० मैल दूर होतें. मला ब्युरोच्या एका इन्स्पेक्टरनें येथें आणलें. तेथें माझी इन्स्पेक्टरनें सर्वांशीं ओलख करून दिली. थोड्या वेळानें तेथील चीफ इन्स्पेक्टरनें आठवण झाल्यासारखें करून, अरे हो तुम्हांला आमच्या ऑफीसमधील काम करणाऱ्या बायकांशीं ओळख करून देण्याचें अगदींच विसरलों होतो असें म्हणून मला आंत या म्हणून नेलें. सर्व बायकांशीं माझी आोळख करून दिली. ह्या सर्व बायका मध्यम वयाच्या होत्या. त्या मला म्हणाल्या कीं, आज तुम्हीं येणार हें पिटसबर्गच्या ऑफीसमधून आजच आम्हांला कळलें व आम्हीं तुमच्या येण्याची फार वाट पहात होतो. परंतु तुम्हांला पाहून आमची चांगलीच निराशा झाली. हे ऐकल्यावर माझ्या मनांत आलें कीं ह्यांचा म्हणण्याचा हेतू तरी काय आहे म्हणून मी त्यांना खुलासा करण्यास सांगितलें तेव्हां त्या म्हणाल्या कीं आम्हांला वाटलें कीं तुम्हीं दाढीमिशा व सुंदर पगडी घातलेले दिसाल व अशी आमची अपेक्षा असल्यामुळें तुम्हांला पाहून फारच फरक वाटला. मागील वर्षीं आमच्या येथें हिंदुस्थानांतलि एक गृहस्थ येऊन गेले ते दाढीमिशा व पगडीमुळें केवढे भव्य दिसत होते. त्यांचे नांव आतां आठवत नाहीं. मी त्यांना 'गिरीपाल' कां म्हणून विचारलें तेव्हां त्या हो हो म्हणाल्या. व ते कुठें आहेत म्हणून त्यांनीं मजजवळ चौकशी केली.

माझ्यासाठीं येथील लोकांनीं हॉटेलचा बंदोबस्त केला होता. मला दुसरें दिवशीं खाण पहाण्यासाठी तयार रहाण्यास सांगितलें. माझी पिटसबर्ग येथील खोली इथें फक्त तीन चार दिवसच रहाण्याचें असल्यामुळें मी सोडली नव्हती. संध्याकाळीं मी माझ्या हॉटेलसमोर असलेल्या एका फोटोग्राफरच्या दुकानांत गेलों व माझ्याजवळील सिनेफिल्म प्रोसेसींगकरितां देऊन एक फिल्म विकत घेतली. माझी ह्या दुकानाच्या मॅनेजरशीं चांगली ओळख झालीं होती. त्यांनीं मला फावल्यावेळांत त्यांच्याकडे बोलावलें.

दुसऱ्या दिवशीं मला सांगितलेल्या वेळेस ब्यूरोच्या दोन इन्स्पेक्टरांनी खाण दाखविण्याकरितां नेले. त्यांनी मला स्वतःची नांवें सांगितली. त्यांतील एकाचे 'टॉम' व दुसऱ्याचे 'डिक' असें होते. नंतर त्यांनी मला माझें नांव विचारलें तेव्हां मी त्यांना गुप्ते असेच सांगितलें. परंतु त्यांनीं मला पहिले नांव विचारले त्यावर मी त्यांना असे सांगितलें कीं माझे नांव घेण्याच्या भानगडींत पडूं नका, कारण तुम्हांला हांक मारणें जमणार नाहीं. परंतु त्यांनीं मला नांव सांगण्याचा फारच आग्रह केला म्हणून मी त्यांना नुसते "द्वारका" असें सांगितलें. तरी सुद्धां त्यांना उच्चार करतां येईना. मग ते म्हणाले, ह्याला संक्षिप्त रूप सांगा. एवढें मोठें नांव नको. मग मी त्यांना म्हणालो कीं, मला "देव" अशी हांक मारलीत तरी चालेल. हें नांव मात्र त्यांना पसंत पडले.

आम्हीं "हन्ना" कोल कंपनीची खाण पहाण्यास आलों. येथें लोक जगांतील सर्वांत मोठें असें पावर शॉवेलनें पत्थर व माती कोळशाच्या थरावरून उचलून अलगद फेंकून देत होते. हा पावर शॉवेल १५० फूट म्हणजे १६ मजले उंच असून जगांतील जमिनीवर चालणाऱ्या कोणत्याहि प्रकारच्या यंत्रांत सर्वांत जास्त वजनाचा होता. (१००० टन) व एका वेळेस ६० क्युबीक यार्ड माती व पत्थर ह्याच्या फावड्यांत १५४ फूट उचलुन फेकून द्यायचा. ह्याची किंमत सुमारें दोन कोटी रुपयांएवढी होती. त्यांच्या सहाय्यानें रोजचा ५ ते ६ हजार टन कोळसा खणला जायचा. कोळशाच्या थराची जाडी अंदाजे ५ फूट होती तर त्यांच्या वरच्या माती पत्थराची जाडी अंदाजे १५० फूट होती. म्हणजे कोळशाच्या थरा पेक्षा माती पत्थराची जाडी किती पट तरी मोठी होती. हिंदुस्थानांत सर्व कामें हातांनींच करायची असल्यामुळें माती व पत्थर याची जाडी जास्तीत जास्त दीडपटच घेऊं शकतों. कारण नंतर माती व पत्थर काढण्याचा फार खर्च येतो. येथील माती व पत्थर खोदून काढण्याची रीत फारच निराळी होती. आम्ही आपल्या येथें फक्त ३ किंवा ४ फूटांचे अंदाजें १ इंच व्यासाचें भोंक करून त्यांत सुरुंग लावतो तर येथें १५० फूट लांबीचे ८ इंच

व्यासाचे भोंक करतात. त्यांत डायनामअीटसारख्या स्फोटक द्रव्यांनीं सुरुंग लावतात. ह्या कोळशाच्या खाणीच्या जवळच १२० मैल दूर असलेल्या पावर हाऊसला कोळसा पूरा पाडण्याकरितां फक्त लोखंडाच्या नळांतून पाणी व कोळसा ह्यांचे मिश्रण करून ह्याला पंपाच्या सहाय्यानें कोळसा पूरा करण्याची एका योजनेची अंमलबजावणी करण्याचें काम चालूंच होतें. येथील कोळसा व पत्थर निरनिराळा करण्याचा कारखाना (कोल वॉशरी) सुद्धां फारच मोठा होता. व रोजच्या वॉशरींत १५ हजार टन कोळसा धुतला जायचा. दुसऱ्या दिवशीं मी येथील आंतील खाण पहायला गेलों. इथें जिकडे तिकडे कोळशाचा उतार विशेष नसल्यामुळें विजेचें लोकोमॅटीव्हज् ज्याला अमेरिकेंत 'मोटर' म्हणतात तें दिसत होते. कोळशाच्या थराला खालून पायातून कापून त्याला फक्त आंत भोंक करून सुरुंगांत (डायनामाअीट) न लावतांना फक्त हवेच्या दाबानें पाडून टाकण्यांत यावयाचा. ह्या हवेचा दाब दर चौरस इंचाला ५ ते ७ हजार पौंड असायचा. पडलेला कोळसा एका कोळसा भरणाऱ्या मशीननें भरला जायचा व नंतर दहा दहा टनाच्या कोळशाच्या गाडींत येऊन पडायचा व नंतर तेथून बाहेर जायचा.

इथल्या कोळशाच्या खाणींत मी बघितलें कीं जसा इंग्लंडच्या खाणींमध्यें बाहेरचा मोठा भपका दिसायचा तसा तो इथें नसायचा. इंग्लंडमध्यें रोजचा ५ ते ७ हजार टन कोळसा काढणारी खाण अत्यंत मोठी समजत तर इथें ५–७ हजार टन म्हणजे अत्यंत साधारण समजायचे. एवढी गोष्ट मात्र खरी कीं, अमेरिकेंत नैसर्गिक फारच थोड्या अडचणी आहेत. इंग्लंडमध्यें पुष्कळ खोल कोळसा मिळतो व कोळशाच्या थराची जाडी फारच कमी म्हणजे दीड ते दोन फुटाची असते तर अमेरिकेंत कोळसा कमी खोलीवर मिळतो व तेथील थरांची जाडी ५ फूटापेक्षांहि अधिक असते. परंतु त्यामानानें खाणावरचे ऑफिस वगैरे फारच साधे असतें. बहुतेक कामगारांसाठीं लागणाऱ्या सुखसोयी एकाच इमारतींत केलेल्या असतात. इंग्लंडमध्यें एका माणसापाठीमागें एक ते दीड टन कोळसा निघतो तर येथें १५ ते २० टन कोळसा निघतो. हिंदुस्थानांत मात्र अंदाजे ३–४ माणसां-पाठीमागें १ टन कोळसा निघतो. अर्थात्च तेवढ्याच उत्पादनाच्या खाणीकरितां इथें फारच थोडीं माणसें लागतात म्हणून त्यांच्या सुखसोयीकरितां फार मोठ्या इमारती कराय‍ची जरूर नाहीं.

आम्हांला नंतर खाणीचे सुपरिंटेंडेंट, जवळच्या गांवांतील एका रेस्टॉरंटमध्यें घेऊन गेले. तेथें आमच्या दुपारच्या जेवणाचा बंदोबस्त केला होता. खाण्यानंतर आम्हांला लहान

लहान बाटल्या भरून आईस क्रीम टाकलेलें दूध दिलें. हें दूध पिऊनच माणसाचें पोट भरायचें. दुसऱ्या दिवशीं इथून जवळच असलेल्या व्हेनिस—बार्गला ओहायो स्टेटच्या कोळश्याच्या खाणींतील कामगारांना अपघात झाला असेल तर प्राथमिक उपचार देण्यांच्या चढाओढीचे सामने ठेवले होते. ते पहाण्याकरितां माझा कार्यक्रम पिट्सबर्गच्या ब्युरोनें केला होता. कारण तेथें कोळश्याच्या खाणींतील मोठ मोठें अधिकारी येणार होते. त्यांची व माझी ओळख होऊन मला इतर खाणी पहाण्यास अडचण पडूं नये म्हणून त्यांनीं असा माझा कार्यक्रम आंखला होता. मला व्हेनीस—बर्गला घेऊन जाण्याकरितां ब्युरोचे माझे दोन इन्स्पेक्टर मित्र आले होते. नंतर आम्हीं ब्युरोच्या गाडीनें निघालों. वाटेंत आम्ही आणखी एका इन्स्पेक्टरला घेतलें. सेंट क्लेरेन्स—व्हिलेपासून ३०–४० मैलांवर व्हेनिसबर्ग होतें. आम्हीं सकाळीं ९ च्या सुमारास तेथें पोहोंचलों. आमच्या गप्पागोष्टी हिंदुस्थानच्या अगदीं साधारण माणसांच्या असतात तश्याच होत्या. अमेरिकेंत सुद्धां चांगला दर्जाच्या धंदेवाईक टेक्निकल माणसांचा अभाव असल्यामुळें साधारण प्रकारच्या माणसांनासुद्धां सरकारी नोकरीवर अधिकाऱ्यांच्या जागेवर घ्यावें लागतें. त्यामुळें सगळेच अधिकारी बुद्धीनें व चातुर्यानें उच्च कक्षेचें असतात असे नाहीं. त्यामानानें मला वाटतें कीं, हिंदुस्थानच्या वरच्या अधिकाऱ्यांत बौद्धिक वाढ जास्त असते. मोटारींतून प्रवास करीत असतांना बहुतेक लोक कोट घालून गाडी चालवत नाहीं, परंतु कोटाची इस्त्री चांगली रहावी म्हणून हँगरला अडकवून गाडीच्या बाजूला कोट ठेवतात व गाडी चालवतात. कोणाला रस्ता वगैरे विचारायचा असेल तर हॅलो " बड " किंवा " बडी " म्हणून संबोधितात. ह्या शब्दाचा अर्थ ' मित्र ' असा होतो. हा शब्द जरी अमेरिकेंत प्रचलित असला तरी ह्या शब्दांचा उपयोग साधारणपणें कोळशाच्या खाणीच्या विस्तारांत होतो. व तेथें त्याचा अर्थ कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्याचा साथीदार असा होतो.

आम्ही गाडीतून उतरल्याबरोबर माझे साथीदार कोट घालून आम्हांला जेथे जमायचें होते त्या कॉलेजच्या जागेकडे जात होते. परंतु इतक्यांत कोणीतरी ओरडून सांगितलें कीं, आंत कोणीच कोट घातलेले नाहींत. तेव्हां आनंदानें त्यांनी सर्वांनी कोट काढून टाकून देऊन आंत गेले. इथें कमीत कमी १००–१२५ माणसें जमलीं होतीं. त्यांत ३० निमंत्रित माणसें सोडली तर बाकी ब्यूरोचे सर्व अधिकारी लोक होते. त्यांचें काम आजच्या चढाओढीत जज्ज (पंच) म्हणून न्याय देण्याचें व इतर कांहीं कामें असतील ते करण्याचें होते. निमंत्रित पाहुणे मात्र खाणींतील मोठमोठे अधिकारी होते. माझी त्या

सर्वांशीं ओळख करून देण्याचें काम ब्यूरोच्या इन्स्पेक्टरनें केलें. त्याला ते काम दिल्यामुळें तें त्यानें चोखपणानें केलें. तो मला एका बाजूला नेऊन निमंत्रित पाहुण्यांची ओळख करून द्यायचा. मी ह्या लोकांशीं ओळख करून घेऊन त्यांच्या खाणी कशा आहेत वगैरे चौकशी वरून खाणी पहाण्याचा कार्यक्रम आंखला. येथें आमच्या जेवणाची व्यवस्था केली होती. जेवण वगैरे झाल्यानंतर जेथें सामने होणार होते तेथें आम्हीं गेलों. येथें जमलेल्या सर्व जज्ज लोकांना एका कंपनीतर्फे स्टेनलेस स्टीलचें कारविंगनाईफ देण्यांत आले त्यांनीं मला-सुद्धां एक दिली. ही सुरी फार चांगल्या नामांकित कंपनीनें केली असून त्याची किंमत ५ ते ७ डॉलर होती असें सांगण्यांत आले.

चढाओढीत भाग घेण्यासाठीं निरनिराळ्या कंपनीचे लोक आले होते. थोड्या वेळानेंच सामन्याला सुरवात झाली. आपल्याकडे जसें क्रिकेट स्टेडियम व बसण्यासाठीं ज्या तऱ्हेची सोय असते तशी येथें होती. कांहीं प्रेक्षक समोरच्या बाजूला उभे राहून सामने पहात होते. मुख्य निरिक्षकांसाठीं एक उंच व्यासपीठ उभारले होते. येथें आणखी कांहीं लोकांशीं माझी ओळख करून दिली. अधूनमधून प्रेक्षकाचें मनोरंजनासाठीं कांहीं जादूचे खेळ नाच वगैरे ठेवले होते. मध्यें एकदां जादूचा प्रयोग सुरू होण्याचें एका गृहस्थानें सांगितले. परंतु तो खेळ होण्यापूर्वी एका गृहस्थाला ५ मिनिटें बोलायचें आहे असें सांगितल्यामुळें मला वाटलें आजच्या सामन्याविषयीं तो गृहस्थ कांहीं बोलणार असेल. परंतु हा एक फेरीवाला असून त्यानें एकदोन भिंगाच्या दुर्बिणी विकावयास आणल्या होत्या व सांगत होता कीं, माझ्याजवळ जपानी बायना-क्युलर्स आहेत. इतक्या स्वस्त व चांगल्या दुर्बिणी कुठेंहि मिळणार नाहींत व किंमत फक्त १ डॉलर असून मी तुमच्यामध्यें फिरेन ज्यांना लागेल त्यांनीं घ्यावा. पसंत नसल्यास पैसे परत करीन." अशा साध्या माणसाला व्यासपीठावर येऊन बोलून दिल्याबद्दल मला जरा विशेष नवल वाटलें. कारण असा प्रसंग हिंदुस्थानांत कधींहि घडत नाहीं.. परंतु व्यक्तिस्वातंत्र्य व व्यापारीपणा जिथें इतका पुढें गेला आहे तेथें त्यांना ह्यांचे कांहींच वाटलें नाहीं. तसेंच मी कित्येक लोकांच्या खिशाला लॉंड्रीवाल्यांची जाहिरात लावलेली पाहिली व ते खुशाल फिरत असत. एवढेंच नव्हें पण त्यांना त्याबद्दल कांहींच वाटत नव्हतें. तसेंच जसें स्वतःच्या देशांतील माल त्याच देशांत खपावा असा आग्रह असतो तसें मात्र इथें दिसलें नाहीं. कारण कित्येक दुकानांत "हा फारच सुंदर जपानी कॅमेरा असून तुम्हांला अमेरिकन कॅमेरा ह्याच्या जोडीचा मिळणार नाहीं." अशा जाहिराती दिसल्या. कारण ह्याचे असें असावें की, उगीच देशाबद्दल फाजिल अभिमान

त्यांना बाळगावा लागत नाहीं. कारण येथील बराचसा माल निर्यात होतो व थोडा फार दुसऱ्या देशाचा आणावा लागला तर त्यांना त्याबद्दल कांहींच वाटत नाहीं.

सामना संपण्यापूर्वी समोरच असलेल्या व्यासपिठावरून चीफ जज्जनें ध्वनिक्षेपांतून सांगितलें कीं, हिंदुस्थानांतून आलेले श्री. गुने यांनीं व्यासपीठाकडे यावे. मी त्याप्रमाणें तेथें गेलो. तेथें माझी आणखी कांहीं व्यक्तिशी ओळख करून देण्यांत आली. समारंभ आटपल्यानंतर ब्युरोच्या अधिकाऱ्यांबरोबर मी पिटसबर्गला आलों. मी माझ्या घराची घंटा वाजवली तेव्हां माझ्याबरोबर शिकत असलेले श्री. मेहता यांनीं दार उघडले. त्यांना पाहून मला आश्चर्य वाटले. श्री. मेहता जियॉलोजीकल सर्वे ऑफ इंडियाचे असिस्टंट डायरेक्टर असून ते हल्लीं पॉईंट फोर प्रोग्रामाखालीं अमेरिकेंत आले होते. त्यांच्याशीं गप्पागोष्टी करून परत मी माझ्या खोलींत गेलों.

दुसऱ्या दिवशीं १५ ऑगस्टच्या निमित्तानें येथील हिंदी लोकांनीं संध्याकाळीं जेवणाचा बेत आंखला होता. मी व श्री. मेहता तेथें गेलों. कार्यक्रम जवळच्याच कार्नेगी-टेकच्या मुख्य हॉलमध्यें ठेवला होता. तेथें कमींत कमी ६०—७० हिंदी लोक तरी जमले असावेत. तसेंच ३९—४० निमंत्रित अमेरिकन पाहुणे आले होतें. येथें आल्यानें मला बऱ्याच हिंदी लोकांना भेटण्याची संधि मिळाली. श्री. रूस्तगी बंगाली पध्दतीचा सदरा, धोतर व वहाणा घालून डौलानें फिरत होते. त्यांच्या पत्नी व दुसऱ्या कांहीं हिंदी बायका हिंदी पद्धतीचा पोषाख करून आल्या होत्या. एक दोन अमेरिकन बायका सुद्धा साड्या नेसून आल्या होत्या. जेवण संपूर्णपणें हिंदी पद्धतीचें होतें. शिवाय त्यांत पुलाव, कोंबडीची आमटी आणि पूऱ्या व भाजी होती. जेवण झाल्यानंतर हिंदुस्थानातून जाऊन आलेले श्री. क्रो यांनीं आम्हांला हिंदुस्थानमध्यें त्यांनीं काढलेल्या कांहीं फिल्मस दाखविल्या.. त्यानंतर श्री. आनंद नांवाच्या विद्यार्थ्यानें हिंदींत गाणीं म्हटली व कार्यक्रम आटोपल्यावर आम्हीं मोकळें झालों.

पिटस्बर्गला मी बऱ्याच कोळशाच्या खाणी पाहिल्या. अमेरिकेंत कोळशाचें उत्पादन बरेंच आहे. पिटस्बर्गच्या आजुबाजूचा भाग कोळशाच्या खाणीचा असून पेन्सिलव्हानिया स्टेट, वेस्ट व्हर्जिनिया, ओहायो हीं सर्व राज्यें बहुतेक कोळशाच्या थरावरती वसलेलीं आहेत. इथें इतका विपुल कोळसा आहे कीं, इथें लोक दरवर्षी ८६० कोटी टन कोळसा काढतात. म्हणजे हिंदुस्थानपेक्षां १५ पटीनें जास्त काढतात. तरी सुद्धां ह्यांच्या कोळ-

शाची संपत्ती अजून ४०० हजार वर्षेपर्यंत पुरेल असें त्यांचें म्हणणें आहे. मला कितीहि लांब जायचें असलें तरी मला घेऊन जाण्यासाठीं गाडी यायची. येथील कोळशाच्या खाणींत फारच यंत्रसामुग्रीचा उपयोग होतो. ह्यामुळें पुष्कळ माणसांच्या श्रमांची जरूरी पडत नाहीं. येथें एका मिनिटाला ८ टन कोळसा कापणारी मशीने आहेत. त्यांना इतका कोळसा खाणीच्या बाहेर कसा घेऊन जायचा हाच प्रश्न पडला आहे. इथल्या खाणींचें थर बहुधा सपाट असल्यामुळं विजेनें चालणारी लोकोमॅटीव्हज खाणींत वापरतात. व बहुतेक मशीनें एका जागेवरून दूसरांकडे ह्या लोकोमॅटीव्हजच्या सहाय्यानें जात असल्यानें कामें लवकरच होतात. इथल्या मशिनरीमध्यें चांगलाच फरक आहे. खाणींत उतरण्याकरितां अगदीं ऑफिसच्या जवळच उंच मोठ्या इमारती असतात. त्यांत एलिव्हेटर्स असतात. बटन दाबून तुम्हीं एलिव्हेटर्सला बोलवूं शकतात. अशी व्यवस्था इंग्लंडच्या कोणत्याहि खाणींत नव्हती.

कोळशाच्या खाणींतून जात असतांना बऱ्याच ठिकाणीं पेट्रोलियमच्या खाणीसुद्धां आढळतात. आणखी तीन चार हजार फूट गेले कीं, नेचरल गॅस व पेट्रोलियम मिळतो. इंग्लंड किंवा हिंदुस्थानांत कुठेंहि कोळशाच्या थराखालीं पेट्रोलियम सांपडत नाहीं. ओर्डोविसियन थरांमधून सहसा पेट्रोल मिळत नाहीं. जगामधील हे एकच उदाहरण आहे कीं, ह्या थरामधून पेट्रोल मिळतें. किती नशिबवान् ही माणसें आहेत असेंच आपल्याला वाटेल. कारण ह्याच्या देशांत कोळसा, पेट्रोलियम व लोखंड विपूल आहे. शिवाय इतर धातु म्हणजे तांबे, सोनें, शिसें, जस्त, युरेनियम व अनेक प्रकारचीं खनिज द्रव्यें त्यांना मिळतात व त्यामुळें हे लोक सुखवस्तु व चैनींत रहातात त्यांत नवल कसले ! हिंदुस्थाना-पेक्षां तीन पटीनें हा देश मोठा असून, वस्ती त्या मानानें कमी आहे. तेथें उद्योगधंदे ही भरपूर आहेत. शेतीवर काम करणाऱ्या मजुरांची संख्या फारच थोडी त्यामुळें प्रत्येकाच्या वांटणीस पुष्कळ जमीन येतें. आपल्याकडे शेतकऱ्याला १ एकर जमीन मिळण्याची मुष्किल. परंतु येथें बहुतेक माणसांना प्रत्येकीं २० एकर जमीन असते. जमिनीला चांगल्या खतांचा पुरवठा होतो त्यामुळें भरपूर धान्य उत्पादन होते व शेतकरीहि श्रीमंत आणि चैनींत राहूं शकतो. आपल्याकडील जमिनींना खतपुरवठा नसल्यामुळें त्यांचा कस निघून जातो जमिनीपासून निघणाऱ्या ह्या धनापेक्षां खनिजधन कितीतरी निघते व त्याला जोडणारे अनेक धंदे निघल्यानें त्यांना ऐश्वर्य प्राप्त झाले आहे हें आपल्या लक्षांत येतें. पेट्रोलियम नॅचरल गॅस हा इतका विपूल मिळतो कीं, प्रत्येक घरांत गॅस वापरतात व घरा-साठीं लागणाऱ्या हरएक वस्तू विजेवरती चालतात. घरकाम करणें हें त्यामुळें फारच सोयीचें झालें आहे. शिवाय सुटसुटीत होत असल्यामुळें घरकामाशिवाय दुसरीं कामें करण्यास वेळ

मिळतो. मला कित्येक बायका त्यांचीं घरें मोठ्या कौतुकानें दाखवायच्या. त्यांची विजेवर चालणारी वॉशिंग मशीन, कपड्यांना प्रेस करणारीं यंत्रे वगैरे पाहून हिंदुस्थानांतील बायकांना किती कामें करावी लागतात ह्याची आठवण होतें.

मि पिट्सबर्गला असतांना माअीन्स सेफ्टी ॲप्लिएन्सेस कंपनी नांवाच्या कंपनीचा कारखाना पाहिला. ह्याच कारखान्यांत खाणींत लागणाऱ्या सुरक्षिततेसाठीं निरनिराळ्या वस्तु करीत होते. तेथें डोक्यासाठीं सेफ्टी हॅटस्, पायासाठीं बूटस् व हाताकरितां चामड्यांचें हातमोजे व खाणींत सेफ्टी क्रेम्प्स वगैरे अनेक वस्तू दिसत होत्या. याशिवाय खाणींत स्फोटक वायुचा स्फोट झाल्यानंतर त्यापासून निघणाऱ्या अत्यंत विषारी कार्बन मोनॉकसाइड ह्या गॅसच्या बचावापासून रक्षण व्हावें म्हणून Rescue Apparatus वगैरे तयार करीत होते. त्याचप्रमाणें खाणींत मिळणारे दुसरे वायु जे सल्फ्युरेटेड हॅड्रोजन ह्यापासून बचाव व त्याची परीक्षा करण्यासाठीं पुष्कळ साधने तयार होत होते. अमेरिकेंत मोटार वाहातुकीकरितां जितके बोगदे आहेत त्या सर्व बोगद्यांतून मोटारींतून निघणाऱ्या कॉर्बन मोनॉक्साइडचे प्रमाण वाढलें कीं आपोआपच बोगद्यावर ठेवलेला पंखा चालू होऊन शुध्द हवा बोगद्यांत खेंचली जाते. ह्याकरितां ठेवलेलीं यंत्रे बहुतेक ह्या कंपनीचींच आहेत. मला त्यांच्या विकास खात्याच्या डायरेक्टरांनीं विचारलें कीं, तुमच्या देशांत एवढीं गाईगुरें असून गुरांच्या कातड्यांकरितां तुमचा देश सधन असून आम्हांला टाटा कंपनीकडून सेफ्टी बेल्ट करितां इतकी मोठी ऑर्डर येते कीं त्याबद्दल आम्हांला आश्चर्य वाटते. Rescue Apparatus विकण्याकरितां आनंदच आहे. परंतु सेफ्टी बूटस आम्हीं हिंदुस्थानांतून भागवायचें कीं, तुम्हांला विकायचे ! हे त्यांचे म्हणणें मला अगदीं रास्त वाटलें.

मी कांहीं दिवसांकरितां इथून ६० मैल दूर असलेल्या युनियन टाऊनला तेथील खाणी पहाण्याकरितां गेलों होतों. तेथील ‘ रोबिना ’ नांवाची खाण मीं पाहिली. येथें रोजचें ४० हजार टनाचे उत्पादन होते. ही जगांतील सर्वांत मोठी खाण आहे असें म्हणतात. ह्या खाणींत कमींत कमी १५० विजेचे लोकोमोटिव आहेत व खाणींतलें पंप, पंखे बहुतेक गोष्टी आपोआप म्हणजे ॲटोमॅटिक चालणाऱ्या आहेत. मला ही खाण चार दिवस बघायला परवानगी मिळाली. बहुतेकांना एकच दिवस खाण पहाण्याची परवानगी मिळतें.

मला गुड मॅन कंपनीचें इंजिनियर कांहीं दिवस त्यांची माशिनें कशी चालतात

हें दाखविणार होते. या गृहस्थांना एक आठ वर्षांचा मुलगा व १२ वर्षांची मुलगी होती. मी त्यांच्याबरोबर एक दिवस जात असतांना त्यांना विचारलें कीं, कालच्या दिवस तुम्ही कसा घालविला त्यावर त्यांनीं मला सांगितलें कीं मी टॉमला ( म्हणजे त्यांच्या मुलाला ) पेपरकरितां मदत केली. मला त्यांच्या बोलण्याचा अर्थ नीट कळला नाहीं. म्हणून मी पुन्हां त्यांना विचारले कीं, " परीक्षेचे पेपर्स सोडविण्यास तुम्ही कशी काय मदत केलींत ? " यावर ते म्हणाले कीं, मी टॉमला वर्तमानपत्र विकण्याकरितां मदत करीत होतो. हे ऐकून मला फारच आश्चर्य वाटले व मी त्यांना म्हटले कीं तुम्ही चांगले सुखवस्तु असून एवढ्या लहान मुलाला वर्तमानपत्र विकायला कशाला लावता. त्यावर खुलासा केला कीं मी जरी सुखवस्तु असलो तरी माझ्या मुलांनीं परावलंबी राहता कामा नये. त्याला एक सायकल विकत घ्यायची आहे म्हणून त्याचे पैसे त्यानेंच उभे केले पाहिजेत. मला खरोखरी त्यांचे कौतुक करावेसे वाटले. आपल्या देशांत मनुष्य थोडा सुखवस्तु असला कीं त्याचे नातेवाईक त्यावर आपली जबाबदारी टाकून परावलंबी राहतील परंतु त्यांना एखादे हलके वाटणारे काम मात्र करणार नाहींत. आपल्याकडे चांगल्या व हलक्या कामच्या किती भ्रापक कल्पना आहेत. आपल्याकडे एखाद्या गृहस्थाचा मुलगा अशी कांहीं वर्तमानपत्रें विकत असेल तर आपण ही गोष्ट दुसऱ्या कोणाला सांगूं का ?

मी येथें असतांना एकदा कामांवरून परत आल्यावर हॉटेलच्या मॅनेजरनें कळविलें कीं, तुम्हाला पिट्सबर्गहून फोन आला होता. व त्यांनीं तुम्हांला परत तेथें फोन करण्यास सांगितलें आहे. मला वाटले तेथें फोन करण्यास भाडें ( चार्ज ) द्यावें लागेल. परंतु अमेरिकेंत तुम्हांला जर बाहेरून फोन आला परंतु तुम्हीं गैरहजर असलांत तर उलटपाशी तुम्ही त्या नंबरवर फोन केलात तर तुम्हांला निराळे भाडें द्यावे लागत नाहीं. मी फोन केल्यावर मला माझ्या घरून आलेल्या कांहीं तारांचा उल्लेख पिट्सबर्गच्या ऑफीसनें केला. येथील कार्यक्रम संपल्यावर मी पिट्सबर्गला परत आलो.

मी एक आठवडा जॉय कंपनीबरोबर घालवण्याचें नक्की केलें व त्याप्रमाणें त्यांच्या इंजिनियरर्सबरोबर मी फिरत होतो. आम्ही एके दिवशीं चुन्याच्या दगडाची जमिनीच्या खालची (under ground) खाण पाहिली. ह्या खाणींत निमुळत्या रस्त्यानें मोटारीनें थेट आंतपर्यंत जाता येते. आंतील रस्ते चांगलेच होते व वाहतुकीच्या सुरक्षिततेसाठीं आंत निरनिराळे सीग्नल होते. खाणींत काम करणारे सर्वच मजूर स्वतः स्वतःच्या गाड्या घेऊन

येत असत व गाड्या बाजूला ठेवून काम करायचें. पेट्रोल वगैरे घेण्यासाठीं खाणीच्या आंतच पंप वगैरे होता.

मी येथें पिटसबर्गच्या शहराकरितां सुव्वर टॅनल्स म्हणजे शहरांचें घाणेरडें पाणी घेऊन जाण्याकरितां बोगदे खणण्याचें काम चालू होतें तें पहाण्याकरितां माझ्यासाठीं व्यवस्था करण्यांत आली होती. ह्या बोगद्याचा व्यास १२ ते १४ फुटाचा होता. एका बोगद्यांत एवढ्या व्यासाचा सबंध पत्थर कोरून काढण्याकरितां एक निराळें यंत्र एका कंपनीनें केलें होतें. हें यंत्र रोजचा १५० ते २०० फूट लांबीचा बोगदा कापूं शकतो असें ह्या कंपनीचें म्हणणें होतें. हिंदुस्थानात आठवड्याला ५० ते ६० फूट बोगदा कापतां आला तरी आपण पुष्कळ समजतो. माझें पिटसबर्गच्या आजुबाजूच्या खाणी पहाण्याचें काम संपलें होतें. मी इथून अंदाजे १५० ते २०० मैल दूर असलेल्या विल्कीस बेरीला जाण्याचें ठरविलें. व त्याप्रमाणें मी पत्रव्यवहार केला. परंतु मला गुड मॅन मॅन्युफॅक्चरिंग कंपनीनें त्यांचा कारखाना पहाण्यासाठीं पुष्कळ आग्रह केल्यामुळें मी तेथें जाण्याचें ठरविलें व विल्कीस बेरीचा कार्यक्रम रद्द केला.

मला येथें माझ्या पिटसबर्गच्या जीवनाबद्दल आणखी कांहीं उल्लेख करावासा वाटतो. मला खोली मिळाल्यानंतर माझा पोटापाण्याचा प्रश्न हातानेंच सोडविण्याचा निश्चय केला. मला घरमालकिणीनें माझ्या खोलींत गॅसची प्लेट लावून दिली होती. मी हिंदुस्थानांत जरी पुष्कळ चहा घेत होतो तरी मी एकदम चहा बंद करण्याचें ठरविलें. प्रथम मी दुध गरम करीत होतो परंतु तें बंद करण्याचें ठरविलें कारण दूध गरम करायचें म्हटलें तर भांडें स्वच्छ करावें लागत होतें. मी माझ्या सकाळच्या नाश्त्याकरिता गॅसच्या स्टोव्हवरच काडी उजळून स्टोव्ह पेटवत असे. एक पाण्याचे भांडे एका स्टोव्हवर तर दुसरें दुसऱ्या स्टोव्हवर ठेवून त्यांत अंडी उकडत टाकायची. दुसऱ्या भांड्यांतील पाणी गरम झाल्यावर दाढी करण्यास सुरुवात करायची व दाढी झाल्यावर अंडी सोलून पावरोटीच्या तुकड्याला लोणी किंवा जॅम लावून वगैरे बिस्किटें, केळीं व दुसरी फळें असायची ती खात होतो. अशा रीतीनें माझा नास्ता व्हायचा. नास्ता झाला कीं, मी ब्युरोच्या ऑफिसमध्यें जात असे दुपारचे जेवण बाहेरच व्हायचे व संध्याकाळीं घरीं आल्यावर कांहीं बाजारहाट करून जवळ असलेल्या कार्नेगी लायब्रेरीत वाचत बसत असे. लायब्रेरी बंद व्हायच्या आंत मी घरी परत यायचा.नंतर दोन मिनिटांत तयार होणाऱ्या भाताच्या पुडक्यांतला तांदुळ काढून एका चूलीवरती भात शिजवीत असे व दुसऱ्या शेगडीवर तुरीची डाळ व भाजी टाकीत असे. माझे स्वयंपाक

शास्त्रांतील प्रयोगच होते. सबंध आयुष्य ऐतोबासारखे घालविले असल्यामुळें मला थोडा कंटाळा यायचा व रात्री भूक लागत नसल्यामुळें मी जसे झाले असेल तसे जेवून माझी दुसरी कामें करुन झोंपी जात असे. ह्याचा एक फायदा असा व्हायचा कीं, दुसरे दिवशीं सकाळीं मला चांगलीच भूक लागायची त्यामुळें सकाळचा नास्ता करण्यासाठीं मला त्रास वाटायचा नाहीं. ह्या सर्व खटपटीमुळें माझे चांगलेच पैसे वांचले.

माअीन्स सेफ्टी अप्लाइन्स कंपनीच्या डायरेक्टर नी महात्मा गांधीबद्दल बरेच वाचले होते. त्यांनीं हिन्दुस्थानांबद्दल ही थोडीफार माहिती गोळा केली होती व ते म्हणाले कीं तुमच्या हिंदुस्थानांत येऊन साधुसंतांना भेटायचे आहे. पिटसबर्ग मला माझ्या घरासारखेच वाटत होते. इथे मला बरीच मित्रमंडळी लाभली. मी पिटसबर्ग जड अंतःकरणानें सोडले.

मी शिकागोला जाण्यासाठीं पिटसबर्ग स्टेशनवर आलो व शिकागोचे तिकीट काढले. मी मुद्दाम रेल्वेनें जायचें ठरविले होते कारण अमेरिकेला रेल्वे प्रवास कसा काय असतो हे मला बघायचे होते. माझ्या जवळची सुटकेस चांगलीच जड असल्यामुळें मी पोर्टर मिळतो कीं नाहीं ह्याबद्दलची चौकशी केली. लगेच इथे "रेड कॅपने यावे" असे मायक्रोफोननें चौकशीकचेरीवर बसलेल्या एका बाईने सांगितले. थोड्याच वेळानें एक लालटोपी घातलेला निग्रो हमाल आला व त्या बाईनें माझ्याजवळून २५ सेंट घेऊन एक तिकीट दिले व हमालाला माझी सुटकेस दिली. थोडे अंतर गेल्यावर हमालानें मला विचारलें किं तुमचें सामान फक्त गाडींत चढवून द्यायचें आहे कीं तुमच्यासाठीं बसण्यासाठीं जागा सुद्धां शोधून देऊं. मी विचारलें, "गाडींत जागा मिळणार नाहीं कां!" तेव्हां तो म्हणाला, "गाडी अगदीं भरून येते व तुम्हांला चटकन जागा मिळणार नाहीं." मला जरा संशयचआला कीं, हा कांहींतरी हिंदुस्थानी प्रकार दिसतोय. गाडींत चांगलीच जागा होती. पण जास्त बक्षिसी मिळविण्यासाठीं हमालाची ही युक्ति होती. स्टेशनवर गाडींची वेळ होईपर्यंत लोकांना आंत सोडत नाहींत व वेळ झाली कीं कांचेचें दरवाजे उघडून लोकांना आंत जाऊं देतात. कोणत्या कोणत्या स्टेशनवर गाडी थांबणार ते कांचेच्या दरवाजाजवळ उभा राहिलेला माणूस ओरडून सांगत असतो. स्टेशनच्या आंत येण्याकरितांहि दोन दरवाजे असून बाजूला विजेचे दोन लहान लहान दिवे दुर्बिणीसारख्या दोन आडव्या नळ्यांमधून एकमेकांवर प्रकाश टाकीत होते. ह्या प्रकाशाच्या आंत मनुष्य शिरल्याबरोबर कांचेचें दरवाजे आपसुक उघडून जायचे व दरवाज्यांतुन आंत गेल्याबरोबर बंद व्हायचें. अशीच व्यवस्था मी अमेरिकेच्या दुसऱ्या कांहीं दुकानांमधून सुद्धां पाहिली. अमेरिकन गाड्यांमध्यें दोन वर्ग असतात. एक 'कोच' व दुसरा पुलमन् ह्या वर्गाला 'पुलमन्' कंपनीकडून स्वतंत्र डबे जोडले

जातात व ह्या डब्यांचें तिकिट तुम्हांला जशी जागा हवी असेल त्याप्रमाणें पुलमन् कंपनी-कडून मिळते. तुम्हांला फक्त बसण्याकरितांच जागा हवी असल्यास त्याप्रमाणांत दर व तुम्हांला व्यवस्थेशीर दिवाणखान्यासारखा एक डबा हवा असल्यास त्याप्रमाणें दर आंखण्यांत येतो. पुलमन् कंपनीचें तुम्हांला जागेचें भाडें व रेल्वे कंपनीचें भाडें ह्या वर्गाला अशी दोन्हीं द्यावा लागतात. मला हीं वर्ग पहाण्याची इच्छा असल्यानें मी तिकीट इन्स्पेक्टरला माझी इच्छा व्यक्त केली. व त्यानें त्याचे काम संपल्यावर मी तुम्हांला दाखवतो असें आश्वासन दिलें. थोड्या वेळानें त्यानें मला सबंध पुलमन् वर्गाचें निरनिराळें भाग दाखविलें. ‘ कोच ’ वर्गात चांगल्यापैकीं आरामशीर कुशनच्या गाद्या असतात, व आपल्या फर्स्ट क्लास सारखा असतो. संबध गाडी एअर कंडीशण्ड केलेली असते.

तुमच्या तिकीटाबरोबर आणखी एक कागदाचें कुपन मिळते त तुम्हीं तुमच्या सीटपाठीमागें विशिष्ट केलेल्या जागेंत खोवून दिले की तिकिट तपासणारा तुम्हाला त्रास देत नाहीं. ते खोवलेलें कुपन बघुन तो निघून जातो. तुम्हांला बसल्या बसल्या झोपतां येतें.

आमची गाडी संध्याकाळीं ५ च्या सुमारास शिकागोला पोहचली. मी जवळच्याच टेलिफोनमधून ‘ इंटरनशनल स्टुडंटस् होम ’ ला टेलीफोन करून विचारले की तुमच्या जवळ खोली आहे कां नाहीं ? त्यांचे होकारार्थ उत्तर आल्यामुळें मी तिकडे टॅक्सीने गेलो. हे ‘ इंटरनॅशनल स्टुडंटस् होम ’ निरनिराळ्या विद्यार्थ्यांकरितां बांधलेले असून येथें रहाणे बरेच स्वस्ताचे असते. दुसऱ्या दिवशी मी ‘ गुड-मॅन मॅन्युफॅक्चरींग ’ कंपनीच्या ऑफिसमधें त्याबाजूला जाणाऱ्या एका हिंदी विद्यार्थ्याच्या गाडींत बसून गेलो व त्यांचा कारखाना पाहिला. त्यांच्या ‘ एक्सपोर्ट ’ डायरेक्टरनें तेथील ‘ इंडस्ट्रीज ऑफ सायन्स ” म्युझियमची फारच प्रशंसा केल्यानें मी ते पहाण्यास गेलो. मी जेवढा वेळ होता तेवढ्या वेळांत पहाता आले तेवढे पाहिले. ते म्युझियम खरोखरीच फार सुंदर होते व त्यामधें कोळशाच्या खाणीचे मॅाडेल केले होते, व हुबेहुब खऱ्या खाणीवर असलेल्या ‘ इंजिन ‘ सारखे इंजिन ठेवले होते. तसेच आत जाण्याकरीता ‘ इलेवेटार ’ करून खाणीच्या आंत जाण्याची व्यवस्था केली होती. आंत खाणीची कल्पना येण्याकरितां निरनिराळ्या विभागांत खाणींत लागणारी निरनिराळी यंत्रे चालवून दाखवायचे व सरतेशेवटी खाणींत काय अपघात होतात व कशामुळें होतात त्याबद्दल एक मनुष्य भाषण सुद्धां करायचा. ह्याच संग्रहालयामधें पहिल्या महायुद्धांत जर्मनीची एक पकडली गेलेली पाणबुडी नौका (सबमरीन) सुद्धां तेथे

ठेवली होती. त्या पाणबुडी नौकेत घेऊन जायचे व त्याबद्दल माहिती दिली जायची पाणबुडी अमेरिकन लोकांनीं पकडण्यापूर्वी पाणबुडीवरच जर्मन अधिकारी काय बोलले त्याचें 'रेकॉर्डिंग' त्या लोकांनीं केले होते ते प्रेक्षकांना वाजवून दाखवितात. नंतर जवळच्याच हॉलमध्यें पाणबुडी पकडण्यापूर्वी घेतलेलें चित्र दाखवितात. ही पाणबुडी नौका व कोळशाची खाण बघण्यासाठी प्रवेश फी आहे. बाकी सर्व भाग फुकट पहायला मिळतो. त्या संग्रहालयाचे निरनिराळे विभाग केलेले आहेत. एका विभागांत रेडिओ व टेलव्हिजनची माहिती दिलेली आहे तर टेलिफोनच्या विभागांत सुरुवातच्या टेलिफोनपासून आतां पर्यंतच्या टेलिफोनची प्रगति दाखविली आहे. एक टेलिफोन साधारण टेलिफोनपेक्षां १०० पटीनें मोठा केलेला असून त्याचा आंतला भाग पहातां यावा म्हणून त्याला कापलेला आहे. दुसऱ्या टेलिफोन मधें बोलले कीं ह्या टेलिफोनच्या रिसिव्हरमधल्या कार्बनच्या बारीक बारीक तुकड्यांचीं 'वायब्रेशन' आपण बघूं शकतो. त्याचप्रमाणें कांहीं टेलिफोनमधें बोललेलें दुसऱ्या माणसाला कसें ऐकू येते हे पहाण्याकरीतां एक बटन दाबलें कीं तुम्हांला तुमचें बोलणें परत ऐकूं येते. त्याचप्रमाणे तुमचे कान ऐकण्यास किती तीक्ष्ण आहेत हे पहाण्याचेहि एक यंत्र आहे. इथें हल्लीचा टेलिफोन असतां त्या पेक्षांहि अगदीं नवीन असा टेलिफोन आहे कीं ज्यामधें तुमच्या गैरहजेरींत आलेले टेलिफोनचें निरोप तुम्हांला मिळू शकतात. तुम्ही कांहीं विशेष निरोप ठेवून गेलांत तर ते समोरच्या माणसाला सांगणारे टेलिफोनहि आहेत. समजा कोणी डॉक्टर बाहेर गेलेला असेल व त्याच्या गैरहजेरींत कोणी आले तर तुम्ही जर टेलिफोनवर तसा निरोपाचा बंदोबस्त केला असेल तर त्याना तो मिळू शकतो, व त्यानंतरचा त्यांचा निरोपहि तुम्हांला मिळतो. उदा. असें कीं, "हॅलो, हा डॉक्टर स्मिथचा टेलिफोन आहे. डॉक्टर स्मिथ घरीं नाहीं व जवळच्याच सिनेमा गृहांत गेलेले आहेत व रात्रौ ९ च्या सुमारास परत येतील" वें तुमचा निरोप काय आहे तो घेऊन ठेवतो. नंतर डॉक्टर घरीं आल्यावर एक बटण दाबले कीं त्यांना कोणाचे निरोप आहेत ते कळतें व निरोप टेलिफोनवर ऐकण्यास मिळतो. टेलिफोनच्या ह्या युक्तिला 'अमांडा' असें म्हणतात. दुसऱ्या एका विभागांत लोखंड तयार करण्याची सर्वंध माहिती दिलेली आहे. असेंच प्लास्टिक विभाग, कांचेचा विभाग, औषधसंबंधीचे विभाग वगैरे अनेक विभाग असून त्या विभागाची संपूर्ण माहिती दिलेली आहे. 'टेलीव्हिजन' च्या विभागांत टेलिव्हिजनच्या कॅमेरा समोर तुम्ही उभे राहिलांत कीं तुमच्या समोर असलेल्या टेलिव्हिजनच्या सेटवर तुम्हाला तुम्ही स्वतःच पहातां वा दुसऱ्या खोल्यामधून असलेल्या टेलिव्हिजन सेटवर तुम्ही दुसऱ्यांना दिसतां. मोटारच्या विभागात ज्याला "मोटोरमा" असें नांव दिलेले आहे त्यांत मोटारचे निरनिराळे भाग कांचेच्या पेटींत ठेवून ते कसे काय काम करतात ते दाखविले आहे. तुम्हीं बटण दाबले कीं,

हे भाग काम करायला लागतात व त्याबरोबरच एक रेकॉर्ड सुरू होऊन त्या भागांची निरनिराळी माहिती देण्याचें काम करतें अशीच युक्ति म्युझियमच्या निरनिराळ्या ठिकाणीं आहे. म्युझियममध्यें कोणत्याहि नवीन शोध लागलेल्या गोष्टींबद्दल माहिती पुरविण्यासाठीं अगदीं झटपट तयारी असते. मी तेथें होतो त्यावेळेस नुकतेच एका रिस्टवॉच्च आकाराएवढा प्रक्षेपक (ट्रान्समिटिंग–सेट) आणि रीसिव्हींग सेट ठेवण्यांत आला होता. सूर्याच्या किरणानें चाललेल्या बॅटरीवर हा काम करीत असे. प्रकाशाच्या फसवणुकीच्या विभागांत (आप्टीकल इल्युजन) तुम्हांला एक लहानसा ग्रामोफोन गोलगोल फिरतांना दिसतो. वर पाटी लिहिलेली असते., तुम्हीं तुमच्या तानें धरा व त्याला फिरतांना बंद करा. तुम्ही खिडकींत हात घालून ग्रामोफोन बंद करण्याला गेलांत तरी ग्रामोफोन तुमच्या हातांतच येत नाहीं. परंतु फक्त हवेमध्यें तुमचा हात फिरत असतो कारण ग्रामोफोन खोलच्या कपाटांत फिरत असून निरनिराळ्या आरशांनीं त्याचें किरण केंद्रित करून तुम्हाला खरोखरींचा ग्रामोफोनचा आभास होतो.

येथें विजेबद्दल लोकांचे ज्ञान वाढविण्याकरितां व्याख्यान देण्यासाठीं एक सभागृह आहे व दिवसांतून ३ ते ४ वेळां विजेवर निरनिराळ्या प्रकारचे गमतीदार प्रात्यक्षिकें दाखवून लोकांची विजेबद्दलची जिज्ञासा तृप्त करतात.

हे प्रयोग एक बाई करून दाखविते आणि त्यत्चबरोबर ती माहिती देते. एका प्रयोगांत कांहीं रसायन द्रव्यांच्या सहाय्यानें विजेसारखा प्रकाश करतात, तर एका प्रयोगांत विजेच्या अणुफेकीनें (Ele. Bombardment) अर्ध्या मिनिटाच्या आंत एक मक्याचें कणीस भाजून दाखवितात. आणखी एका प्रयोगांत एका लोखंडाच्या विजेच्या तारेला लोहचुंबक गुणानें हवेंत अगदीं अधर ठेवतात. हा प्रयोग करून दाखविणाऱ्या विजेच्या लोहचुंबकाला ‘ लेव्हीटेटर ’ म्हणतात. असे लोहचुंबक जगामध्यें फक्त तीनच आहेत असें मला सांगण्यांत आलें.

हें वस्तूसंग्रहालय इतकें मोठें आहे कीं, हें नीट पाहण्यास कमींत कमी ७–८ दिवस लागतील. मी माझ्या अमेरिकेला जाणाऱ्या अनेक वाचकांना हें म्युझियम पहाण्याची अगदीं आग्रहानें शिफारस करीन. मी पाहिलेल्या निरनिराळ्या म्युझियममध्यें हेंच म्युझियम मला सर्वांत मोठें व शिक्षण देणारें वाटलें.

‘ शिकागो ’ हे शहर ‘ लेक मशीगन ’ वर वसलेलें असून ह्याच्यातून एक कालवा काढलेला आहे. ह्याला शिकागो नदी म्हणतात. शिकागो शहरामधून मुख्य बाजार पेठेंतून ॲलीवेटेड रेल्वे जाते. ही पहाण्याची फारच मजा वाटते. शिकागो शहरामध्यें

निरानिराळ्या रेल्वे जात असून शिकागो इलिनाईस कंपनीची रेल्वे, दुसरी सबरबन, तिसरी जामिनीवर चालणारी रेल्वे, व चौथी जामिनींवर हवेत पुलावर चालणारी अॅलंवेटेड रेल्वे ह्याशिवाय निरनिराळ्या बसेस सुद्धां आहेत.

शिकागो येथें तिकिट विकण्याकरितां बस कंडक्टर आहेत हें पाहून मला आश्चर्य वाटलें. मला नंतर एक बस कंडक्टरनें सांगितलें कीं, आमच्या येथें सुद्धां बस कंडक्टर काढून टाकण्यांत येणार होते परंतु आमच्या तीव्र विरोधामुळे त्यांना बस कंडक्टरनां ठेवावें लागलें. बहुतेक शिकागो शहर येथील रेंडॉल्फ स्ट्रीट वर असलेल्या प्रुडेंशियल इन्शुअरन्स कंपनीच्या ४२ व्या मजल्यावर असलेल्या ऑब्झर वेटरी मधून दिसतो ह्याचें तिकिट ५० सेंट असून ह्या ऑब्झर वेटरील चारी बजूनीं कांचेची तावदानें लावलली असून त्यामधुन सबंध शहर दिसतें रात्रीं शिकागो शहराचा देखावा नयनरम्य दिसतो. शिकागो शहरांत मारपीटीचे प्रसंग फार घडतात, असे मला सांगण्यात आले. रात्री मी बाळजोशी व मिसेस् जोशीना भेटायला गेलो होतो. त्यांनी मला इतक्या रात्री येण्याचें कारण विचारलें व शिकागोंत मारपीटीचे प्रसंग होत असल्याने रात्री न फिरण्याची मला सूचना दिली तरीसुद्धां मी रात्री २.२ वाजेपर्यंत फिरत असे परंतु कुठेही त्रास झाला नाहीं

येथील इंटरनॅशनल स्टुडंट होम मध्ये असतांना तेथील नोटीस बोर्डावर निरनिराळ्या नोटीसा पाहील्या. त्या बहुतेक, शिकागों तें न्यूयॉर्कला जाण्यासाठीं मोटारींनी प्रवास करणाऱ्या सहायेकरूंची जरुर आहे. मोटार आळीपाळीने चालविली पाहिजे, खर्च वाटून घ्यायचा" अशा अनेक ठिकाणी जाण्यासाठी जाहिराती होत्या. कित्येक ठिकाणी "मोटार चालविल्यास फूकट प्रवास" अशा सुद्धां नोटीसा होत्या. खरंच आपल्या सारख्यांना दुसऱ्याच्या वेळे प्रमाणे जाणे शक्य होत असेल तर सबंध अमेरिका थोड्या खर्चांत पहाणे शक्य आहे.

मी येथून अंदाजे १२५ मैल दूर असलेल्या "मिलवॉकी" शहरांत जाण्याचे ठरविले. कारण तेथील ॲलिस-चामर्स कंपनीचा कारखाना बघण्याचा माझा विचार होता. मी शिकागोच्या डाउन-टाऊन बस स्टेशनला आलो. आणि बस गाठली. हे बस स्टेशन आपल्या येथील कोणत्याहि रेल्वेस्टेशन पेक्षां मोठे असून बस जेथे उभ्या राहतात तेथील दरवाजे कांचेचे असून ते फारच छान दिसतात. मी संध्याकाळची बस गांठली व रात्री ८ वाजतां "मिल-वॉकी" ला पोहोचलो.

" मिल-वॉकी " ला माझी सुटकेस न फिरविता त्यांतील जरुरीचे कपडे व नित्योपयोगी वस्तु काढून एका पिशवीत भरून माझी सुटकेस बस कंपनीच्या माणसाच्या हवाली केली. मी शिकागोहून " मिल-वॉकी " वगैरे जागेचे न्युयॉर्क पर्यंतचे तिकिट काढले होते. बस कपनीचे एका जागे पासून व परत त्या जागी येण्याचे तिकिट काढले तर बराच फरक पडतो आणी बस कंपनीचे टीकीट दुसऱ्या देशात काढले तर कमी दर आकारला जातो. कारण स्टेट टॅक्स लागत नाहीं. ह्या बस कंपनीचे तिकीट अमेरीका सोडून दुसऱ्या देशांतून सुद्धां मिळते. बसस्टेशनपासून जवळच असलेल्या Y. M. C. A मध्ये मी वर सांगितल्याप्रमाणें माझे थोडेसे सामान पिशवित टाकून गेलो त्यामुळे माझी सुटकेस उचलण्याची दगदग वाचली. दुसऱ्या दिवशी सकाळी मी ॲलिस-चामर्सचा कारखाना बघण्यास गेलो, व दुपारपर्यंत हा कारखाना बघण्यांत वेळ काढला.

मला तेथे आणखी कांहीं हिंदी-विद्यार्थी भेटले. डॉ. दासगुप्ता नांवाच्या स्थाईक झालेल्या गृहस्थांचा पत्ता मिळाल्यामुळे मी त्यांना फोन केला व त्यांना घेवून जाण्याविषयी कळविले. डॉ. दासगुप्ता अेका सिरेमिक कंपनींत तज्ञाचें काम करीत असून त्यांच्या कंपनीच्या सहाय्यानें तें अमेरिकन नागरीक झाले होते. ते व त्यांच्या पत्नीचा अमरिकेंतच रहाण्याचा बेत होता, कारण त्यांनी अेकदां हिंदूस्थानांत येऊन चांगली नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला परंतू तशी नोकरी न मिळाल्यामुळें तें परत अमेरिकेंत आले होते. ह्यांच्या प्रमाणेंच मी बहुतेक हिंदी विद्यार्थ्यांची मनाची कुचंबणा झाल्याचें पाहिलें होतें. येथें नोकरी करण्याबद्दल किंवा युनीव्हरासिटींत संशोधन करण्याबद्दल चांगलाच पगार मिळतो व ते ह्या पगारांत गाडी वगैरें ठेवूं शकतात. ते जें कांही येथें शिकतात त्याचा उपयोग हिंदुस्थानांत करणें अवघड असल्यामुळें तसेंच त्यांची हिंदूस्थानात जाण्याबद्दल-तीव्र नाखुशी असते.

मला अमेरिकेच्या युनीव्हरसीटीचें अेखादें तरी वसाहतिचें गांव Campes पहावयाचें सांगण्यांत आल्यामुळें येथून जवळच असलेल्या मेडीसनचें कॅम्पस बघण्याकरीतां जाण्याचें ठरविलें. तेथें रहात असलेल्या कांही बंगाली विद्यार्थ्यांचें पत्ते मला डॉ. दासगुप्तानी दिले होते. मी मेडीसनला जाण्याकरीतां संध्याकाळीं निघालो व रात्रीं ८ वाजतां पोहोंचलों. बस स्टेशनवरून मला दिलेल्या पत्त्यावर टेलीफोन केला. व मला त्या विद्यार्थ्यांबरोबर रहातां येईल कीं नाहीं अशी चौकशी करतां त्यांनी मला खुशाल या असें सांगितले. तेव्हां मी टॅक्सी करून त्यांच्या निवासस्थानीं गेलो. तेथें ४ विद्यार्थी अेक घर घेऊन रहात होतें.

आमच्या थोड्या वेळ गप्पा गोष्टी झाल्यावर त्यांच्यापैकीं एका विद्यार्थ्यानें मला स्टुडंटस युनियनची इमारत पाहण्याची सूचना केली. इथें विद्यार्थ्यांच्या निरनिराळ्या सोसायटीच्या कचेऱ्या असून क्लब्स वगैरे होते. विद्यार्थी व विद्यार्थिनींची नृत्य वगैरे करण्याची जागा सुद्धां होती. माझ्या आणखी कांही विद्यार्थ्यांच्या ओळखी झाल्या.

दुसऱ्या दिवशीं सकाळी मी इथल्या आणखी थोड्या शिक्षण संस्था बघितल्या व आणखी कांहीं विद्यार्थ्यांच्या ओळखी करून घेतल्या. संध्याकाळी इथल्या हिंदी विद्यार्थ्यांचें संमेलन होते तेंथ गेलो. तेथें मला एक महाराष्ट्रीयन बाई भेटल्या. त्यांच्याबद्दल चौकशी करतां त्या माझ्या ओळखीचे डॉ. लिखिते यांच्या पत्नी असून शिकागोला रहात होत्या. कांहीं हिंदी विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय त्यांनी घरांत केली होती. डॉ. लिखिते हे बडोदे राज्याचे डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रीकल्चर होते. माझी त्यांच्याशी विद्यार्थी अवस्थेंत ओळख झाली होती. डॉ. लिखिते आता अमेरिकेचे नागरिक झाले असून शिकागोला घर घेऊन राहिले होते.

इथला कार्यक्रम संपल्यावर मी कांहीं हिंदी विद्यार्थ्यांबरोबर त्यांचें हॉस्टेल पहावयास गेलो. अमेरिकेच्या हॉस्टेल्समध्ये विद्यार्थ्यांना दूध वगैरे भरपूर मिळत असून अमेरिकन विद्यार्थी खूपच दूध पितात.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी ' मॅडिसिन ' हून परत शिकागोला आलो व तिथून परत मी रात्रींची बस गाठून ' आयोव्हा ' स्टेट मधील सिडर-रॅपीडस जागीं जाण्यास निघालों ' सिंडर-रॅपीडस ' ला सकाळीं पोहोचलों. बस स्टेशनवरुन सिडरलिंक बेल्ट कंपनीच्या सेल्स डायरेक्टरना टेलिफोनवरून मी आल्याचें कळविलें व थोड्या वेळानेच ते मला न्यायला आले. माझी तेथल्या एका चांगल्या हॉटेलमध्यें रहाण्याची सोय केली होती. मी माझ्या खोलीवर सामान ठेवून परत त्यांच्याबरोबर त्यांच्या ऑफिसांत आलों. ही कंपनी माती, दगड वगैरे जमीनीवरून दूर टाकून देण्याची यंत्र सामग्री तयार करते. मी त्यांचा कारखाना बघून त्यांच्या दुसऱ्या अधिकाऱ्याबरोबर त्यांची वापरलीं जाणारीं यंत्रें पहाण्याकरितां गेलो तसेंच आम्ही तेथून १० मैलांच्या अंतरावर असलेल्या एका चुन्याच्या दगडांच्या खाणी पहावयास गेलो, दुपारीं एका रेस्टॉरंटमध्यें जेवण घेतलें. माझ्या मित्रानें त्यांच्याबरोबर व्हिस्कीची बाटली आणली होती व असे करण्याचे कारण विचारतां त्यांनीं सांगितलें कीं, ' आयोव्हा ' स्टेट मध्ये मद्यपान करण्याचें असल्यास बाटली स्वतःची आणावी

लागते. कारण येथील रेस्टॉरंटमध्यें मद्य विकण्याची मनाई आहे. चुन्याच्या आणि दगडाच्या खाणी बघून झाल्यानंतर आम्ही थोड्या वेळानें चहा घेऊन निघालों. थोडे अंतर जातो न जातों तोंच माझ्या पोटांत एकाएकी दुखू लागले. सहन करण्याच्या हेतूनें मी तसाच गाडीत बसलों. परंतु हळू हळू कळा वाढूं लागल्या दुःखणे असह्य वाटल्यामुळें शेवटीं मी गाडी कुठेतरी थांबविण्यास सांगितलें व औषधाचा कांहीं बंदोबस्त करण्यासाठीं माझ्या सहकाऱ्याना सांगितलें. परंतु संध्याकाळ झाली असल्यामुळें केमिस्टची दुकानें बंद होतीं.

इंग्लंड व अमेरिकेस संध्याकाळीं ६ नंतर खाण्यापिण्याच्या दुकानाशिवाय सर्व दुकानें बंद होतात. शेवटीं मला जवळच्या हॉस्पिटलमध्यें माझे बरोबरचे गृहस्थ घेऊन गेले परंतु कामावर असलेल्या नर्सनें डॉक्टरांना टेलिफोन केल्यामुळें डॉक्टरांनीं मला कांहीं औषध देऊन सेडर रॅपिडसला पाठवून देण्याचें सांगितलें. आम्ही थोड्या वेळानें सेडर रॅपिडसला पोहोचलों. माझें पोट दुखण्याचें अजून मुळींच राहिलें नव्हतें. म्हणून माझ्या मित्रांना माझ्या खोलीवर डॉक्टरांना घेऊन या असें सांगितले. व मी माझ्या खोलीवर आलों. माझें पोट चांगलेंच दुखत होते मला एक दोन उलट्या झाल्या परंतु पोट दुखण्याचें थांबलें नाहीं. थोड्या वेळानेंच माझे मित्र डॉक्टरांना घेऊन आले. व त्यांनी माझी तपासणी करून मला कांहीं औषध व इंजेक्शन दिलें व थोड्या वेळांतच झोंप लागली, सकाळीं डॉक्टर माझी चौकशी करण्यासाठीं आले व आणखी औषध लिहून देऊन संध्याकाळपर्यंत जर मला बरें वाटलें तर मला शिकागोला जाण्याची परवानगी दिली. माझें पोट अधून मधून दुखत होतें परंतु एकंदरींत बरें वाटत होतें. मी परत कारखाना बघून घेतला व संध्याकाळीं शिकागोला जाण्यास निघालो. डॉ. साहेबांनीं माझ्या जवळून त्यांच्या फी बद्दल २० डॉलरचा आंकडा ठेवला होता. जाण्यापूर्वी मी व माझा मित्र व आणखी त्या कंपनीचे कांहीं अधिकारी गप्पागोष्टी करीत बसलों होतों. त्यांच्यापैकीं एकानें मला विचारलें, "तुम्हांला अमेरिकेंत सर्वांत कोणत्या गोष्टीनें जास्त आकर्षून घेतलें?" मी थोडा वेळ विचार करून सांगितलें कीं, तुमच्या देशांतील फक्त एकाच गोष्टीनें माझें मन आकर्षिलें आहे ते म्हणजे तुमच्यांतील अत्यंत चांगल्या माणुसकीनें. तुमच्या देशांतल्या उंच उंच इमारती किंवा तुमच्या चकचकणाऱ्या मोटारगाड्यांबद्दल मला कांहींच वाटत नाहीं. कारण ह्या सर्व गोष्टी आम्ही आज ना उद्यां करू. पण तुमच्या इथली माणुसकी आहे ती खरोखर मन वेधण्यासारखी आहे. तुम्ही लोक शिष्टाचार बाजूला ठेऊन इतक्या मनमोकळया मनाने वागतां कीं त्यामुळें आम्ही आमच्या देशांत आहोंत

असें वाटतें. ह्या गृहस्थांना माझें हे उत्तर ऐकून चांगलेंच आश्चर्य वाटलें व त्यांनी माझ्या मताबद्दल आनंद व्यक्त केला. मी संध्याकाळची बस गांठून रात्रीं शिकागोला आलों व त्याच रात्रीं न्यूयार्कला (डट्रोईट) नायगरा फॉलच्या रस्त्यानें येण्यास निघालों.

आमची बस सकाळीं १ च्या सुमारास डेट्रोईटला पोंहचली. मी बसमधली पाटी-मागची बाकाची जागा अडवली होती त्यामुळें मला सबंध रात्र झोपतां आलें. रात्रीच्या प्रवासाला २५ सेंट दिले कीं उशी मिळते व तेवढ्याच आणखी पैशानें ब्लॅंकेटस वगैरे सुद्धां मिळतात. बसमधें रात्रीच्या वेळेस विशेष गर्दी होत नाहीं पाठीमागच्या जागेवरती कोणीच लोक बसायला येत नव्हते त्यामुळें मला झोंपण्याचा विशेष त्रास झाला नाहीं. मी थेट न्यूयार्क पर्यंतच्या अंदाजें ९०० मैलांचे अंतराचा अशा रितीनें प्रवास केला व सकाळीं उठून मला पहाण्याची जागा पाहून रात्रीं प्रवास करीत असल्यामुळें मला माझ्या थोड्या वेळात बहुतेक सर्व मला पहावयाचें होते तें पहातां आलें व हॉटेलमध्यें उतरत नसल्यामुळे माझा हॉटेलचा खर्च सुद्धां वांचला.

मी माझी सूटकेस लॉकरमध्यें ठेवली व बसस्टेशनवर प्रातःविधी आटोपून डेट्रोईट गांव पहाण्यास निघालों. बस स्टेशनवर कळलें कीं, ‘डेट्रोईट’ तें नायगरा फॉलची बस कॅनेडाच्या कांहीं भागांतून जाते व माझ्याजवळ सींगल ॲन्ट्रीव्हीसा असल्यामुळें मला कॅनडामधून परत अमेरिकेस येण्यापूर्वी त्रास होईल ह्याबद्दल अधिक चौकशी करण्याकरितां इमीग्रेशन ऑफिसमध्यें मला चौकशी करण्याकरितां सांगितलें त्याप्रमाणें मी इमीग्रेशन ऑफिस शोधण्यास निघालो. ‘डेट्रोईट’ हें चांगलेच मोठें शहर असून त्याच्या आजुबाजूला अमेरिकेचे मोठमोठे मोटार कंपन्यांचे कारखाने आहेत. ह्या मोटार कंपन्यांच्या प्रगतींवर आर्थिक स्थिति चांगली अवलंबून आहे व अमेरिकेचे आर्थिक धोरण डेट्रोईट मधून घडलें जाते असें म्हणतात. मी डेट्रोईट नदीच्या खालून गेलेल्या बोगद्याच्या इमीग्रेशन ऑफिसमध्यें आलों. मला केनेडाच्या रस्त्यानें परत अमेरिकेंत येण्यास त्रास पडेल कीं नाहीं ह्याची चौकशी केली. माझा अमेरिकेचा सींगलॲन्ट्री व्हिसा असल्यानें मला केनडाच्या रस्त्यानें जातां यायचें नाही असें सागण्यांत आलें. डेट्रोईट शहर नदीवर वसलेलें असून ह्या बाजूनें दुसऱ्या बाजूला जाण्याकरितां पूल न बांधतां बोगदा केला आहे.

बोगद्यांतून एकसारखी वाहतूक चालू असते. हें काम संपवून माझा डेट्रोईटच्या मोटारींचा एखादा कारखाना पहाण्याचा विचार होता परंतु परत माझें पोट दुखणें सुरू

झाल्या मुळेंमी तो बेत रहित केला व नायगारा (धबधबा) ला जाण्याचें टरविलें. बसने स्टेशन-वर आलों व माझें कॅनडाचे तिकिट रद्द करुन घेऊन ओहायो स्टेटच्या कोलंबस मार्गाहून नायगराचे तिकिट घेतले व बसची वाट पहात बसलों. माझ्या खिशांत केडार–रॅपीड हॉटेलची किल्ली चुकीनें आल्यामुळें ती मी जवळच्या पोस्टाचें पेटींत टाकली. डेट्रोईट नदीच्या पलिकडेच कॅनडाची हद्द लागते. व नदीखालीं केलेला बोगदा युनायटेड स्टेटस व कॅनडाला जोडतो. बोगद्याच्या दोन्ही बाजूला दोन्ही राष्ट्रांच्या जकातीच्या कचेऱ्या आहेत.

माझी बस दुपारच्या सुमारास निघाली व 'बेफेलोला' सकाळीं १ ला पोंहचली. तेथून नायगरा धबधब्याला जाण्याकरितां निराळी बस असून मी त्या बसनें निघालों. नायगराला ८ च्या सुमारास पोहोंचलों. पुन्हां बसस्टेशन मध्ये सूटकेस लॉकरमध्यें टाकली व मला कांहीं शर्टस धुवून घ्यायचे होते म्हणून जवळच्या लॉँड्रींत संध्याकाळीं ५ वाजेपर्यंत मिळेल ह्या हिशोबानें एक्सप्रेस डिलीव्हरी साठीं दिले नंतर धबधबा पहाण्यास निघालों. धबधबा अगदीं जवळच होता. खरंच इतक्या उंचावरून पडत असल्यामुळें धबधब्याचें फारच भव्य व नयनरम्य दृष्य दिसत होते. धबधबा पहाण्याकरितां बाजूलाच एक चांगली जागा केली आहे व तेथून तो चांगला पहातां येतो. बाजूलाच सुंदर बाग आहे. नायगरा धबधबा हा नायगरा नदीचा असून नायगरा नदी कॅनडा व अमेरिकेच्या मध्यें वहातो. नदीवरती धबधब्याहून थोड्या अंतरावर एक पूल बांधलेला आहे ह्याला (रेनबॉ ब्रीज) म्हणतात. त्यावरून सतत अमेरिका व कॅनडाची वहातूक चालू असते. पुलाच्या बरोबर मध्यभागीं कॅनडा व अमेरिकेचे राष्ट्रध्वज फडकत असतात. मी अमेरिकन ध्वजापर्यंत गेलों व तेथून कांहीं धबधब्याचे फोटो काढले. हा धबधबा दोन भागांत आहे. एक सरळ आकृतीचा व दुसरा घोड्याच्या कलाकृतीचा आहे. धबधब्याची खरी शोभा कॅनडाच्या बाजूनें दिसते. धबधब्याच्या पायथ्याशीं जाण्याकरितां एका (अॅलीवेटरच्या) विजेच्या पाळण्याचा बंदोबस्त केलेला आहे. नदींत एक आगबोटसुद्धां प्रवासी लोकांच्या करमणूकींकरितां असते. ही आगबोट धबधब्याच्या पत्थरापर्यंत अगदीं त्याला लागेल अशा रीतीनें धबधब्याजवळ जाते. आंत बसलेल्या लोकांचे पाण्याच्या तुषारामुळें कपडे भिजतात. ह्या आगबोटीला लेडी ऑफ धी मीस्ट म्हणतात.

मी धबधबा पाहून एका दुकानांतून नायगराच्या आठवणी ठेवण्याकरिता तेथील कांहीं वस्तू विकत घेत होतो तेथें मला एक हिन्दी बाई दिसल्या. त्या मिसेस विजुर होत्या. त्यांची एका अमेरिकन बाईशीं ओळख नायगरांतच झाली होती. ती तिची

गाडी घेऊन त्यांना नायगरा धबधबा दाखविण्यास लौकरच येणार होती. माझी इच्छा असल्यास त्यांच्याबरोबर चलण्याची त्यांनीं मला विनंति केली व मी ती ताबडतोब मान्य केली. थोड्या वेळानें त्यांची अमेरिकन मैत्रिण आली व आम्ही सर्वजण तिच्या गाडींतून नायगाराचे निरनिराळे भाग बघण्यास गेलो. एका उपवनांतून आम्हीं नायगारा नदी अगदीं सपाट मैदानांवरून वहात असतें तेथें आलो. नंतर नायगराचे निरनिराळे भाग पहात फिरलों. एके ठिकाणीं कॅनडाहून अमेरिकेंत येण्याकरितां हवेंत चालणाऱ्या तारेच्या दोरानें ( एरीयल रोप वे ) उतारूंना एका टोंकापासून दुसऱ्या टोंकाला पाळण्यानें घेऊन जात होते. रात्रीच्या वेळेला कॅनडाच्या बाजूनें धबधब्यावर हजारो कॅंडल पॉवरचे निरनिराळे रंग बदलणाऱ्या दिव्यांतून प्रकाशज्योत फेंकतात. हे रंग पाण्याच्या तुषारावरती पडत असल्यामुळें फारच सुंदर देखावा दिसतो. कॅनडाच्या बाजूनें धबधबा खरा पाहण्याची शोभा असते. त्यामुळें बहुतेक लोक तेथेंच जातात. माझ्याबरोबरच्या हिंदी स्त्रिया, ती अमेरिकन स्त्री, तिच्या भावाबरोबर कॅनडाच्या बाजूनें धबधबा पहाण्यास गेल्या. परंतु मला एका बाजूचाच व्हिसा असल्यामुळें तेथून जाणें शक्य नव्हते. मी रात्री १० ची बस गांठून न्यूयॉर्कच्या मार्गाला लागलो.

# [ परत न्यूयॉर्क ]

न्यूयॉर्क आतां ३०० मैलांच्या अंतरावर होते आम्हीं सकाळीं १० च्या सुमारास तेथें पोहचलो. तेथें मला जी थोडीबहुत खरेदी करावयाची होती ती मी केली. बाकी बघावयाचें न्यूयॉर्कचें प्रेक्षणीय भाग मी पाहून घेतले. एके दिवशीं "हायफाय" [ ही–फी–हाय फिडेलिटी ] चें रेडिओच्या निरनिराळ्या शाखेचे प्रदर्शन होते. प्रदर्शन एका सात मजली इमारतीमध्यें भरलें होतें तेथें रेडिओ टेलिव्हिजन व तत्सम जिनसांचे अद्यावत नमुने निरनिराळ्या कारखान्यांनीं दाखविलें होते. एका टेप रेकॉर्डिंग मशिनवर त्यांच्या विशिष्ट पद्धतीनें आवाज रेकॉर्ड केला जात असून सात निरनिराळ्या दिशांतून येणारें आवाज तशाच निरनिराळ्या दिशेंतून ऐकूं यायचें ह्या पद्धतीला डूअल ट्रॅक शिस्टीम म्हणतात. न्यूयॉर्कला मी माझ्या ८ मिलीमिटर फिल्म करितां एक जुनें प्रोजेक्टर माझ्या दृष्टीस पडल्यामुळें मी ते घेतलें. त्याचप्रमाणें कांहीं खेळणीं वगैरे जिनसा सुद्धां 'मॅसीच्या स्टोअर' मधून घेतल्या. मॅसीचा स्टोअर जगांतील सर्वांत मोठा स्टोअर आहे असें म्हणतात. तो दोन सात मजली इमारतींतून ठेवला आहे. अमेरिकन लोकांना जगांत सर्वांत श्रेष्ठ, मोटी, लांब वगैरे, ह्यांच्या निरनिराळ्या वस्तूंची तुलना करावयाची संवयच आहे पिटसबर्गमधें तर मला एका माणसानें सांगितलें कीं, पिटसबर्गचा ( गोल्डन ट्राइंगल ) सुवर्ण त्रिकोनाच्या व्यापारी विभागांत जगांतील सर्वांत सुंदर स्त्रिया आहेत. मला त्याच्या बोलण्याची बोलण्याची गंमतच वाटली जगांत सर्वांत उंच इमारती किंवा सर्वांत लांब पूल आहे असें म्हटलें तर समजण्यासारखें होते पण ह्या गृहस्थानें सौंदर्याच्या कोणत्या धोरणावरून ह्या विभागाच्या इथल्या बायकांना सर्व जगांतील सुंदर म्हणून ठरविलें ह्याचा मला उलगडा झाला नाहीं.

मी निघण्यापूर्वीं एका संध्याकाळीं कुमुदताई समर्थ ह्यांना पोंहचविण्याकरितां बस स्टॅंड वर उभा होतो इतक्यांत मला लंडन न्यू एअर बोटीवर विमा व्यवसाय करणारी बाई अचानक भेटली व तिला बघून मला चांगलाच आनंद झाला. कुमुदताईची ओळख करून देतांना मी म्हणालों कीं, ह्या माझ्या जातीच्याच आहेत. बोलतांना तर बोलून गेलों. परंतु नंतर चटकन् माझ्या लक्षांत आलें कीं, मी ह्याच बाईला आतां हिंदुस्थानांतील जातीभेद निघून गेला आहे असे आपण सांगितलें होतें व माझ्या बोलण्यानें मी जरा

चपापलों. परंतु उपाय नव्हता. मी हिंदुस्थानांतून १० हजार मैल दूर आल्यावर सुद्धां जातीच्या भूतानें माझा पिच्छा सोडलेला नाहीं.

एक दिवशीं संध्याकाळीं मला मायरुन प्लेझरनें त्यांच्या कंपनीची रीसर्च लॅबोरेटरी (ज्याला इंग्रजींत लॅबोरेटरी म्हणतात ह्याचा उच्चार अमेरिकेंत लॅबोटोरी करतात) दाखविली ही लेबेटोरी कांहीं विज्ञानाच्या तज्ञांनीं खाजगी कंपनी उभारून चालविली होती. ह्यांना निरनिराळ्या कंपन्यांकडून, अमेरिकन सरकारकडून निरनिराळ्या प्रश्नांवर संशोधन करण्याकरितां काम मिळायचें. हे लोक बहुतेक इलेक्ट्रोनीक्स वर संशोधन करायचे. नंतर आम्ही न्यूयॉर्कचा चायना टाऊन भाग पहाण्याकरितां निघालों. मायरनें फारच उत्साहानें मला इकडे तिकडे हिंडविलें माझ्या बुटांत एके ठिकाणीं थोडा खळगा झाल्यानें व माझा पाय तेथें सतत पडत असल्यानें पाय दुखण्यास थोडी सुरुवात झाली होती. म्हणून मी त्यांना हिंडणें पुरें करण्याचें ठरविलें. परंतु त्यांचा उत्साह इतका दांडगा होता कीं, मी माझ्या पायाकडे दुर्लक्ष करून तसाच हिंडलों व रात्रीं ११ च्या सुमारास माझ्या निवासस्थानीं आलों. सकाळीं मात्र उठून पहातों तों पाय फारच सुजलेला दिसला. व मला चालणेंहि अशक्य झालें होतें. मला दुसऱ्या दिवशींच आगबोट गांठायची होती व मला आगबोट गांठणें कसें काय जमेल ह्याची भिती वाटूं लागली मी जेमतेम बूट घालून खालीं आलों व जवळच्या दुकानांतून पायाला मालीश करण्याकरितां औषध घेतलें. एकसारखा गरम पाण्यानें पाय शेकल्यानें व मालिश केल्यामुळें जरा पायाला आराम पडला. मग मी दुपारच्या वेळेस माझ्या आगबोट कंपनीच्या ऑफिसमध्यें फोन करून माझ्या बर्थबद्दल चौकशी केली व सर्व कांहीं सुरळीत असल्यानें मला आणखी कांहीं करायला पाहिजे कां असें मी विचारलें तेव्हां त्यांनीं मी प्रवास परवाना घेतला कीं नाहीं ते विचारलें. मला ह्याबद्दल कांहींच माहीत नसल्यानें मी त्यांना सांगितलेल्या पत्त्यावर आलों व चौकशी केली. प्रवास परवाना तुम्ही अमेरिकेंत कांहीं प्राप्ती केली असल्यास त्याचा कर दिला आहे कीं नाहीं ह्याबद्दल असतें. प्राप्ती नसल्यास किंवा असल्यास तो प्राप्ती कर दिल्यास हे सर्टिफिकेट ताबडतोब मिळतें. हें सर्टिफिकेट घेऊन मी परत खोलीवर आलों. नंतर परत मी माझ्या पायाची जोपासना केली. दुसऱ्या दिवशीं बोट क्वीन मेरी गांठायची होती म्हणून उरलेल्या जिनसा घेण्यास निघालों. नंतर आम्हांला आमच्या बोटीवर ४ वाजेपर्यंत पोंचायचें होतें. बोट ५ वाजतां सुटणार होती मी २ च्या सुमारास टॅक्सी केली व बोटीच्या धक्क्यावर आलों. माझ्याजवळ दोन डागिने

झाले होते. एक सूटकेस व दुसरा माझे प्रोजेक्टर त्याला कार्डबोर्डच्या खोक्यांत ठेवलें होतें. सामान बोटीच्या अधिकाऱ्यांनीं सांगितलेल्या जागीं ठेवलें. नंतर बोटीवर चढण्यास 'टुरिस्ट' वर्गाच्या प्रवाश्यांसाठीं असलेल्या प्रवेशद्वाराजवळ आलों व इथें माझें तिकिट, प्रवास परवाना व दुसरें कागद दाखवून बोटीच्या आंत गेलों.

## खंड ३ रा

# ( युरोपकडे )

आमची बोट "क्वीन मेरी" ही जगांतील दुसऱ्या नंबरची मोठी बोट आहे. ती ९३ हजार टनाची होती. बोट फारच मोठी असून तिच्या आंतील रस्ते सांपडायलासुद्धां त्रास व्हायचा. बोटीवर निरनिराळे मजले होते. तसेंच निरनिराळ्या केबिन करितां निरनिराळे रस्ते होते. सर्व उतारूंची बोट पहाण्याची गडबड होती व जो तो ह्या मजल्यावरून त्या मजल्यावरती व निरनिराळ्या रस्त्यानें जाण्यांत व सर्व भाग पहाण्यांत दंग होता. बोटीवर टेलिफोनची सुद्धां सोय होती. ह्या टेलिफोनला जमिनीवरच्या टेलिफोनशीं संधान करून घ्यायचें व त्यामुळे बोटीवरून कुठेंही बोलतां येणें शक्य होतें. माझें बोटीचा परिचय करून घेण्याचें काम संपल्यावर मी डेकवर आलों व माझ्या बालपणापासून पहाण्याची अत्यंत तीव्र मनोकांक्षा ठेवली होती त्याच्याकडे पहात उभा राहिलों. समोर असलेले इंम्पायर–स्टेट बिल्डिंग व त्याच्याजवळ असलेले परंतु मला न दिसणारे रक्तान हाऊस, रॉकफेलर सेंटर व माझ्या न्यूयॉर्कच्या आठवणी ह्या सर्व गोष्टी माझ्या मनःचक्षुपुढें येत होत्या. माझी इतक्या वर्षांची मनोकांक्षा पूरी होत असल्याने माझ्या मनाला एक प्रकारचा निराळाच आनंद होत होता. थोड्या वेळानें आमची बोट सुरू

झाली. मी न्यूयॉर्कची शेवटची आठवण म्हणून कॅमेरानें फोटो घेण्यास सु वात केली. आता काळोख होत चालला होता स्टच्यु ऑफ लिबर्टी पर्यंत बोट येइतो काळोख चांगलाच झाला होता. बोटीवरचा परिचारक एकसारखा डेकवरच्या बोट ड्रील करतां चला असें म्हणत होता.

न्यूयॉर्क विशेष दिसत नसल्यामुळें शेवटीं मी हलक्या मनानें खाली आलो व माझ्या कॅबीनमधून लाईफ बेल्ट आणून डेकवरती सर्व उतारूंकरिता घेत असलेल्या ड्रील करितां गेलो. ही ड्रील म्हणजे आमबोटीत कदाचित अपघात झाल्यास उतारूंना पोहता यावे म्हणून असे लाइफ बेल्ट लावण्यास देतात व वापरण्याची सवय असावी म्हणून ड्रील घेतात ड्रील संपल्यावर मी माझ्या कॅबीन मधें आलो. व माझ्या कॅबीनमध्यें असलेल्या दुसऱ्या उतारूंची ओळख करून घेतली. हे गृहस्थ हिंदी वाटत होते म्हणून त्यांच्याबद्दल चौकशी केली तेव्हां ते म्हणाले मी हिंदी नसून ब्रीटीश गीयानाचा वतनी आहे. त्याची अधिक चौकशी करितां असे कळले कीं त्याचे पूर्वज हिंदी असून तीन पिढ्यापासून त्यांचे कुटुम्ब ब्रिटीश गियानांत स्थायिक झाले होते. मी त्यांना विचारले कीं तुमचें पूर्वज हिंदी म्हणून घेण्याचा बाणा कां ठेवीत नाहीं. आतां हिंदूस्थान स्वतंत्र देशाचे नागरिक म्हणन घेण्यास भूषण आहे. मग तुम्हांला परकीय राष्ट्राच्या आधिन संस्थानचे नागरिक म्हणवून घेण्यांत काय बरें वाटतें ? त्यावर तो गृहस्थ मला म्हणाला कीं मला ब्रि. गियानाचा नागरिकपणा- मुळें पुष्कळ फायदे होतात. दूसरे म्हणजे मी इग्लंडमध्यें असतांना तेथील हिंदी लोकांनीं मी त्यांच्यांत मिसळत असून सुद्धां परकेपणा दाखविला त्यामुळें मला आतां हिंदी म्हणून घेण्यास आवडत नाहीं. मी त्यांच्याशीं केलेल्या ह्या गैरवर्तनाबद्दल चांगलाच खेद दाखविला व झालें गेलें विसरून जाण्यास सांगितलें व आतां हिंदूस्थानबद्दल आस्था ठेवा म्हणून सुचविलें. तसेंच लोकांनीं हिंदुस्थानबाहेर जाऊन वसाहती अवश्य कराव्यात परंतू मातृभूमीशीं संबंध तोडूं नयेत असेंहि सांगितलें. नंतर मी त्याला हिंदुस्थानांत एकदां येऊन जाण्यास सांगितलें व माझ्याकडे येण्याचें आग्रहाचें आमंत्रण दिलें. हे गृहस्थ इंडस्ट्रियल केमिस्ट्रीचे पी. एच. डी. असून ते इंग्लंड व अमेरिकेंत नोकरी करत होते. त्यांची ॲटलांटिक पार करण्याची ही पांचवी खेप होती.

आमच्या बोटीवर सिनेमा वगैरे सर्व कांहीं होतें. जेवणाच्या हॉलमध्यें एका वेळेस ५००–८०० माणसें जेऊं शकतील एवढा मोठा प्रशस्त हॉल होता. तरी सुद्धां एका

वेळेस सर्वांसाठीं जेवणाची व्यवस्था होत नसल्यानें दोन बैठकींत कुठे बसायचें हें सर्व उतारूंजवळ दिलेल्या कार्डावर असायचे. उतारूंच्या निरनिराळ्या गरजांबद्दल बोटीचा पर्सर बघत असतो. तुमच्या खोलीच्या व्यवस्थेकरितां जो असतो तो स्टुवर्ड पहातो. मी शिकागोला घेतलेली ८ मिलिमिटरची फिल्म मला नुकतीच न्युयॉर्क सोडण्यापूर्वी प्रोसेस होऊन मिळाली होती. माझ्याजवळ प्रोजेक्टर होते ते मी पर्सरला दाखविलें. त्यानें पडद्यावर फिल्म दाखविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. माझें प्रोजेक्टर ११० व्होल्टचे असल्यानें व जहाजावर २२० व्होल्टची लाईन असल्यानें व ट्रान्सफॉर्मरची व्यवस्था नसल्यामुळें पर्सरनें शेवटीं लाचारी दाखविली.

आमची बोट संथपणानें समुद्राचें पाणी कापत चालली होती. बोटीवर असलेले निरनिराळे मनोरंजक कार्यक्रमामुळें वेळ कसा गेला हेंच कळलें नाहीं. बोटीच्या प्रवासाच्या दुसऱ्या दिवशी बोटीवर असलेल्या सर्व प्रवाशांच्या नांवाचें छापील पुस्तक प्रत्येकाच्या केबिनमध्यें टाकण्यांत आलें नंतर यापैकीं कांहीं नांवें ओळखून काढण्याकरितां कांहीं मजेदार चुटके व म्हणी देण्यांत आल्या व त्यावरून जो जास्तीत जास्त नांवे ओळखून काढेल त्याला बक्षिसे देण्याच्या चढओढीचा कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. असेच दुसरे सुद्धां ठेवण्यांत आले होते. बोटीवर सुंदरपैकी लायब्ररी व लहानसा बाग व पोहण्याचे डबके (स्वीमींग पूल) वगैरे होतेच रात्री ज्यांना नृत्य करायचे असेल त्यांच्यासाठीं सुद्धां सोय होती. एके दिवशीं फॅन्सी ड्रेसची चढाओढ होती त्यांत एका पाकिस्तानच्या माणसाला बक्षिस मिळालें.

बोटीवर आम्हीं सात आठ हिंदी प्रवासी असल्यामुळें वेळ चांगलाच जायचा. कांहीं प्रवाशांपैकीं १८ आणि २० वर्षांच्या मुली होत्या त्या सुट्टीच्या दिवसांत अमेरिका बघून परत चालल्या होत्या. आपल्याकडे मोठमोठ्या माणसांना आपलाच देश पहाण्यास आर्थिक अडचणीमुळें जातां येत नाहीं परंतु इकडे मात्र फार उलट आहे.

सर्वांत उंच मजल्यावर डॅक होते. इथें एक पौंड देऊन बसण्याकरितां डॅकची खुर्ची मिळायची. माझा पाय बरा नसल्यामुळें मी सुद्धां एक खुर्ची घेतली होती. येथें निरनिराळ्या खेळांची सोय होती. बोटीवर एक चार्ट होता व त्या नकाशावर रोज बोटीनें किती प्रवास केला हे रात्री १२ ला बोटीची समुद्रावरची जागा दाखवून निदर्शित करीत.

आमची बोट त्याच दिवशीं दुपारीं फ्रान्स मधील ‘ शेरबुर्ग ’ बंदरावर पोहचणार होती व ज्या प्रवाशांना फ्रान्स व इतर युरोपच्या देशांतून जायचें होते ते ह्या बंदरावर

बोट दोनच तास थांबणार होती बाकी प्रवाशांना बंदरांत उतरण्याची परवानगी नव्हती ह्या बंदरावर बोट आल्यानंतर प्रवासी उतरूं लागले होते. त्यांचे सामान एक कॅन्हेअर कन-व्हेअरनें भराभर बाहेर जात होते एका तासामध्यें सामान उतरविलें. येथें ३००–४०० प्रवासी उतरल्यामुळें बोट बरीच रिकामी दिसत होती. ठरलेल्या वेळेस बोटीनें 'शेरबुर्ग' सोडलें व साऊथ हॅम्पटन डॉकचा मार्ग धरला. रात्रीं एक च्या सुमारांस ह्या शहराचें हिरवे निळें दिवे दिसू लागलें. सबंध रात्र बोट बाहेरचा नांगर टाकून उभी होती सकाळीं आमची बोट साउथ हॅम्पटन धक्याला लागलीं. आम्हीं कस्टमच्या खोलींत गेलो. येथें सामानाची तपासणी झाली व मी समोरच उभ्या असलेल्या लंडनच्या गाडीत बसलो. लंडन शहर येथून ६५ मैल दूर होते. लंडनचें तिकिट बोटीवरच मिळायचे किंवा बंदरावर असलेल्या तिकिट घरांत मिळायचें.

## प्रकरण २ रें

# ( परत लंडन )

आमची गाडी ११ च्या सुमारास लंडनला पोहचली. तेथून मी माझ्या एका हिन्दी प्रवाशाबरोबर वाय. एम्. सी. ए. वर आलो. आधीच मी न्युयॉर्कहून कळविल्यामुळें त्यांनीं माझी खोली ठेवली होती. मला लंडनला विशेष काम म्हणजे मला येथून हॉलंड स्विल्झर्लंड वगैरे युरोपच्या देशांतून शेवटी रोमहून विमान गांठायचें होते. म्हणून इथल्या देशांत जाण्याकरितां व्हिसा घ्यावयाचा होता. त्याचप्रमाणें लंडन सोडण्यापूर्वी लंडनची कांहीं चित्रें मला मुव्ही कॅमेऱ्यानें घ्यायची होती.

मी नेदरलॅंडच्या कचेरींत व्हिसा करतां गेलो. मी माझा हिंदुस्थानचा परत प्रवास

जिनोव्हा, नेपल्सपासुन मुंबईपर्यंत जहाजानें करणार होतों. परंतु आतां तसें न करतां विमानानें प्रवास करण्याचें ठरविल्यामुळें त्याप्रमाणें हरिसिंग कंपनीला कळविलें होतें व त्यांनीं कलकत्त्याच्या बी ओ. अे. सी. च्या ऑफिसमध्यें माझे जहाजाचे भाड्याच पैसे भरले होते. बाकीचे पैसे मला बी. ओ अे. सी. च्या ऑफिसमध्यें भरण्यास कळविलें होतें. मी बी ओ. अे. सी. च्या ऑफिसमध्यें फोन केला. त्यांना भाड्याचे पैसे भरण्यास त्यांच्या ऑफिसमधें येण्यास कळविलें व त्याप्रमाणे मी दुसऱ्या दिवशीं गेलों व बाकीचे ८ पौंड भरून रोम ते मुंबईचें विमानाचें तिकिट काढलें ह्याच वेळेस इजिप्तमधें झालेल्या सुअेज कॅनालच्या गडबडीमुळें बहुतेक लोक जहाजाचें तिकिट कॅन्सल करून विमानाचें तिकिट काढीत होते व त्यामुळें विमानाचें तिकिट मिळण्याचें चांगलेंच अवघड झालें होतें. एअर इंडिया इंटर नॅशनलची एकेक महिना आधींपासून तिकिटें विकलीं गेलीं होती. मला सुद्धां बी ओ. अे. सी चें तिकिट मोठ्या मुष्कीलीनें मिळालें. माझा विचार लंडनहून हॉलंड, जर्मनी, फ्रान्स व रोमवरून उतरत उतरत विमानाने जाण्याचा होता परंतु एकाच ठिकाणी विमानानें उतरण्याची सोय असल्यामुळें मी शेवटीं जमिनीच्या मार्गानेंच युरोप खंडाचा प्रवास करण्याचें ठराविलें. व रोमला विमान गांठण्याचें नक्की केलें.

मला लंडनला मुख्य काम म्हणजे हॉलंड स्वित्झर्लंड वगैरे देशांत जाण्याकरितां व्हिसा करुन घेण्याचें होतें व आमचे विमान टर्की, इजिप्त, पाकिस्तान वरुन जात असल्यामुळें त्या देशांची नांवे माझ्या पासपोर्टमध्यें नसल्यामुळें ती पासपोर्टांत लिहून ठेवण्याचें काम होतें. मी माझा पासपोर्ट घेऊन हिंदुस्थानच्या हायकमिशनरच्या ऑफिसमधे गेलो परन्तु तेथें हे काम होत नसून हिंदुस्थान सरकारच्या दुसऱ्याच एका कचेरींत होत असल्यामुळें मी तिकडे गेलों. मी माझा पासपोर्ट त्या ऑफिसमधें दिला. मला माझा पासपोर्ट व्हिसाची नोंद करण्याकरितां परत लवकर पाहिजे होता. असें सांगून मी माझा अर्ज दिला. मला पासपोर्ट दुसऱ्या दिवशीं मिळाला. पासपोर्ट घेऊन मला आधीं नेदरलँडसूला जायचें असल्यामुळें मी त्यांच्या कचेरींत गेलों. व्हिसाचा फॉर्म भरून लागणाऱ्या फोटो करितां खिशात हात घालतो तों कळलें कीं फोटो माझ्या खिशांतून केव्हांतरी बाहेर पडले होते. मी माझ्याजवळ फोटो नसल्याबद्दल लाचारी दाखविली व फोटो खिशांतून पडल्याबद्दल सांगितलें. मला वाटलें कीं फोटो सल्यामुळें मला परत कचेरींत हेलपाटा खावा लागेल परन्तु माझा अर्ज घेणाऱ्या माणसानें सांगितले कीं आतां जर फोटो नसले तरी उद्यां पोस्टानें पाठवण्याची व्यवस्था करा म्हणजे तुम्हांला व्हिसा देतो. मला जरा आश्चर्यच

वाटलें व मी दुसऱ्या दिवसापर्यंत माझा फोटो पाठविण्याचें त्यांना वचन दिलें व मला व्हिसा मिळाला.

मी लौकरच ह्या कचेरींतून निघालों. फोटो पाठविण्यासाठीं स्टुडिओचा तपास केला. पिकॅडेली सर्कसवर १ तासाच्या आंत फोटो काढून देणारें स्टुडीओ पुष्कळ आहेत. तेथें मी गेलों व एका स्टुडिओत माझा फोटो काढून घेतला. हा स्टुडिओ बायकाच चालवित होत्या. फोटोच्या प्रती घेऊन त्यांतील एक प्रत नेदरलँडसच्या कचेरींत पाठवून दिली. स्वित्झर्लंडचा व्हिसा हॉलंडमधें जाऊन काढून घेण्याचें ठरविलें. जर्मनीला जाण्याकरितां हिंदुस्थानच्या नागरिकाना व्हिसा लागत नसल्यामुळें तेथील प्रश्न येत नव्हता

लंडनला दुपारचें जेवण हायकमिशनरच्या कचेरीमधील कँटीनमधें घ्यायचो. हिंदुस्थानच्या लोकांकरितां ही चांगलीच सोय होती. इथें हिंदी पद्धतीचें जेवण मिळायचें बाहेरच्या रेस्टॉरंटमध्यें ह्यापेक्षां जेवण महाग पडायचें. लंडनला माझें टॉवर ऑफ लंडन पाहायचें बाकीं राहिलें होतें. ते मी ह्या खेपेस बघून घेतले. टॉवरमधे जाण्याकरितां १ शिलींगची फी आहे. प्रवेशद्वाराजवळ एक लालभडक मखमलीचें कपडे घातलेला उंच, धिप्पाड, टोपी घातलेला हत्यारबंद सैनिक उभा असतो. तो इतक्या निश्चलपणें उभा असतों कीं एखादा पुतळाच असेल असे वाटते. ह्याच्याजवळ उभे राहून कित्येक प्रवासी स्वतःचा फोटो कढून घेतात व लंडनची आठवण म्हणून घेऊन जातात.

लंडनचे टॉवर ही फार ऐतहासिक जागा आहे व येथें इंग्लंडचे राजे व राज्यांनीं १२ व्या शतकापासून ह्या टॉवरचा स्वतःच्या निवासस्थानासाठीं उपयोग केला. इंग्लंडच्या इतिहासांतलि अनेक प्रसंग ह्या टॉवरमध्यें घडले. अगदी जुन्या वेळेपासून युद्धांत लागणारे निरनिराळे सामान व संरक्षणासाठी लागणाऱ्या चिलखतांचें चांगलेच संग्रहालय आहे. एके ठिकाणीं ह्या राजनी वापरलेले जडजवाहिरांचें सुद्धां मोठे संग्रहालय आहे.

मला हॉलंडला जायचें असल्यामुळें मी लंडनहून हुक ऑफ हॉलंडचे तिकिट काढलें व आगबोट ब्रिटीश रेल्वेचीच असल्यामुळें आगबोटीचें निराळे तिकिट लागत नाहीं. मला लीव्हरपूल स्ट्रीट स्टेशनावरून गाडी गांठायची असल्यामुळें मी येथे दुपारीं १ वाजतां आलो. माझ्या जागेचा नंबर गाडत शोधून काढून बसलों. एक तासानें गाडी बंदरावर

आली. मी सामान पोर्टरजवळ देऊन नंतर आमच्या पासपोर्टरची पहाणी वगैरे होऊन मी बोटीवर आलों. बोट मध्यम आकाराची होती. माझी केबिन शोधून त्यांत माझें सामान ठेवलेले बघून नंतर मी बोटीची पहाणी करण्याकरितां बाहेर आलों व डेकवर उभा राहून बोटींतील आजुबाजूच्या सुळसुळाटाकडे पहात होतो. थोड्या वेळानें बोटनें इंग्लंडचा किनारा सोडला.

आम्हीं इंग्लंडच्या किनाऱ्याला राम राम ठोकून नंतर जेवण आटोपून कॅबिनमध्यें आलों. माझ्या कॅबिनमध्यें एक स्कॉच डॉक्टर व डच गृहस्थ होते. आम्हीं बराच वेळ गोष्टी करून झोंपी गेलो.

प्रकरण ३ रें

# हॉलंड

सकाळीं उठून बघतों तर आमची बोट अजून हालत असल्यानें आमचा प्रवास चालूच आहे असें मला वाटलें परंतु कॅबिनमध्यें प्रवासी न दिसल्यानें मी कॅबिनच्या बाहेर आलों व पहातों तर बोट धक्क्याला लागली होती व प्रवाशांची उतरण्याची गडबड चालू होती. मी सुद्धां लगबगीनें तयार झालों. दुसऱ्या प्रवाशांबरोबर खालीं उतरलो. माझें सामान माझ्यानंतर उतरविण्यत येणार होते. आम्हां सर्व प्रवाशांना कस्टम्स व इमीग्रेशन ऑफिस मधून जावें लागलें. पासपोर्ट व्हिसाची तपासणी झाल्यानंतर आम्हीं बाहेर पडलों. इथें ब्रिटिश पौंडचे इथल्या नाण्यांत म्हणजे गिल्डरमध्यें बदली करून घेण्यांत येत होते. त्याप्रमाणें मी सुद्धां कांहीं नाणी घेऊन बाहेर पडलों. येथें विशेष कांहीं बघण्यासारखें नसल्यानें

मी रॉटरडॅमला जाण्याचें ठरविलें व समोरच्या प्लॅटफॉर्मवरूनच आगगाडी जात असल्या-मुळें मी रॉटरडॅमध्यें तिकिट काढलें व सामान पोर्टरला देऊन गार्डीत बसलों. इथें ब्रिटिश रेल्वेसारखे पोर्टर कंपनीचे नसून त्यांना हमाली निराळी द्यावी लागते. पोर्टरनें ५० सेंट हमालीचें पैसे सांगितलें परंतु मला ते जास्त वाटल्यामुळें मी प्लॅटफॉर्मवरील रेल्वे अधिकाऱ्याला काय हमाली द्यायची ते विचारलें तेव्हां तो म्हणाला की आमचे हमाल जी योग्य हमाली असेल तेवढींच सांगतील व इथें तुम्हांला कुणीहि फसवणार नाहींत. ही गोष्ट खरी होती. कारण इंग्लंडमध्यें दुसऱ्या देशाच्या प्रमाणांत पुष्कळच प्रामाणिकपणा आहे. थोडया वेळानें आमची गाडी सुटली. १ तासानें आम्हीं रॉटरडॅमला आलों.

माझा चुलत भाऊ चि.मोहन दोन दिवसांनीं रॉटरडॅमला येणार होता म्हणून त्याला भेटण्याकरिता मी हॉलंडमधें तीन दिवस रहाण्याचें ठरविलें होतें.त्याचप्रमाणें मला हॉलंडच्या कोळशाच्या खाणी पहावयाच्या होत्या. कारण इथल्या खाणी कांहीं ठराविक सरकारच्या असून त्या फारच बघण्यासारख्या होत्या. मी सर्व सामान माझ्याबरोबर न फिरवतां फक्त जरूरीचें कपडे घेऊन फिरावें असें ठरविलें होतें म्हणून मी सामान स्टेशनवरील क्लोकरूम-मध्यें ठेवण्याचें नक्की केलें. माझ्या सामानांत फक्त सूट केस होती. एका कार्डबोर्डच्या पेटींत प्रोजेक्टर ठेवला होता. मी प्रोजेक्टर सूट केसमध्यें ठेवून जरूरापुरते कपडे घेऊन बाहेर पडलों. सबंध आगगाडीच्या प्रवासात व आतासुद्धां चांगलेंच धुकें पडलें होते ५ फुटांवरची वस्तु सुद्धा नीट दिसत नव्हती. प्रवासी लोकांकरितां सरकारकडून त्यांच्या सोईकरितां एक निराळी कचेरी ठेवली आहे. तेथें चौकशी करण्याकरितां गेलों. हें ऑफिस रोटरडॅमच्या कुलझिंगेल नावाच्या विस्तारांत होतें. हा विस्तार अगदीं अद्यावत् धर्तीच्या मोठ्या मोठ्या इमारतींनें भरलेला होता. अजूनसुद्धां इमारती बांधण्याचें काम चालूच होतें. मला रोटरडॅमला काय काय पहाण्याजोगें आहे ह्याकरितां त्यांनीं माहिती पुरविणारें एक पुस्तक दिलें व थोड्या वेळात काय काय बघतां येईल हें समजावून सांगि-तलें. मला हेगला भारतीय कचेरीत इथल्या कोळशाच्या खाणी बघण्याकरितां इथले लोक काय काय मदत करूं शकतील ह्याची चौकशी करायची असल्यामुळें मला त्यांच्या ऑफिसमधून त्यांनीं हेगच्या भारतीय कचेरीशीं टेलिफोनचें कनेक्शन दिलें. कचेरीच्या लोकांनीं सांगितलें कीं, तुम्हांला ऑफिसमध्यें यायचें असल्यास आजच या कारण दुसऱ्या दिवशीं दसरा असल्यामुळें भारतीय कचेरी बंद होती. मी लौकरच जाण्याचे ठरविलें व जवळच्या एका मोठ्या स्टोअरमधे जाऊन एक सूट केस विकत घेतली. माझ्या बरोबर

असलेले थोडे कपडे कार्डबोर्डच्या पेटींतून काढून घेऊन सूट केसमध्यें भरलें. थोडे खाण्याचें उरकून घेऊन हेगला जाण्याकरितां परत स्टेशनवर आलों. हेगचें तिकिट काढलें व गाडी पकडण्यास स्टेशनकडे चाललों. इथल्या स्टेशनवरच्या तिकिट विक्री करणाऱ्या ऑफिसची खुबी म्हणजे तिकिट ऑफिसच्या खिडकीला एक गोल फिरणारी तबकडी असते. तुम्हांला कुठचे तिकिट हवे तें सांगून तिकिटाचे किती पैसे द्यावयाचे तें तुम्हांला तिकिट विक्री करणारी बाई सांगते व त्याप्रमाणें तुम्हीं तिकिटांचे पैसे खिडकी-बाहेरच्या गोल तबकडींत ठेवायचे. तबकडीचा अर्धा भाग तिकिट ऑफिसमध्ये असतो व त्यांत ती बाई तिकिट ठेवते व गोल तबकडी फिरविते. त्यामुळें पैशांचा भाग आंत जातो व तिकिटें बाहेर येतात.

गाडीला वेळ असल्यानें मी स्टेशनवरील उपहार गृहांत आणखी थोडें खाऊन घेतलें. बिलामध्यें तुमच्या खाण्यापिण्याच्या बिलावर १० टक्के नोकर लोकांकरितां आणखी घेतात. ह्याशिवाय तुम्हांला नोकर लोकांना वेगळे पैसे द्यावे लागत नाहीं. थोड्या वेळानें गाडी आली व मी हेगकडे प्रयाण केलें. हेगला पोंहचतां सुमारें १॥ वाजला होता. माझ्याजवळची सूट-केस क्लोक रूममध्यें ठेवली व भारतीय कचेरीचा पत्ता काढीत गेलो. तेथें मला सांगण्यांत अलें कीं, इतक्या लौकर मला माझा खाणी पहाण्याचा कार्य-क्रम आंखणें त्यांना जमणार नाहीं तरीसुद्धां तेथील आंतरराष्ट्रिय टेक्निकल को-ऑपरेटिव्ह संस्थेला फोन करून विचारण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें त्यांनीं फोन केला परंतु उत्तर न मिळाल्यानें मला तेथें चौकशी करण्याकरितां सांगितलें. मी चौकशीसाठीं निघालों. इथें जवळच आंतरराष्ट्रीय न्यायालय होते. त्यावरून मी निघालो. मला हें पहाण्यास आतां वेळ नसल्यानें मी दुसऱ्या दिवशीं पहाण्याचें ठरविलें. मला स्वित्झर्लंडचा व्हिसा घ्यायचा होता. मी तेथील ऑफिसची चौकशी केली. तेथें फॉर्म वगैरे भरून दुसऱ्या दिवशीं व्हिसा घेऊन जाण्यास सांगितलें. मी परत आंतरराष्ट्रीय टेक्नीकल को-ऑपरेटिव्ह संस्थेची चौकशी केली. मला सांगितल्याप्रमाणें मी बसमध्यें बसलों व तेथें जाण्यास निघालों. इथल्या बसेससुद्धां अमेरिकेसारख्याच होत्या. कंडक्टर वगैरे नसून ड्रायव्हरलाच पैसे देऊन तिकिट काढायचें असतें. इथें सुद्धां ट्रान्सफरचें तिकिट मिळतें. मला एका ठिकाणीं बस बदलायची होती म्हणून वाहतूक नियंत्रित करणाऱ्या पोलिसाला मी मला जायच्या जागेचें नांव लिहून दाखविलें तेव्हां पोलिसानें सुद्धां कोणत्या बस नंबरमध्यें जायचें व कोणत्या बाजूला उभें राहयचें तें सांगितलें. नंतर मी त्याप्रमाणें रस्त्याच्या समोरच्या

बाजूला गेलो परंतु माझ्यापासून कमींत कमी २०० यार्डावर उभ्या असलेल्या त्या पोलिसानें शिटी फुंकून मला रस्त्याच्या विरुद्ध बाजूला जायला सांगत होता. मी जरा घुटमतळत राहिलों तेव्हां तो सरळ वाहतूक नियंत्रित करण्याचें काम सोडून धांवत माझ्याकडे येऊन येणाऱ्या बसमध्ये मला बसविलें व ड्रायव्हरला मला कुठें उतरायचें तें ठिकाण सांगून तो गेला. त्यामुळें मला ह्या पोलिसाच्या वर्तणुकीचें आश्चर्य वाटलें कारण आपलें कर्तव्य सोडून एका परकियाला मदत करण्यासाठीं तो धांवत आला होता. अशीच वर्तणूक मला हॉलंडमध्यें दुसऱ्या लोकांमधें पहावयास मिळाली. हॉलंडमध्यें बऱ्याच माणसांना इंग्लिश बोलतां येते व इंग्लिश बोललेलें समजतें व त्यामुळें बहुतेक व्यवहार करायला त्रास पडत नाहीं. मला कुठें जायचें झाल्यास मी त्या जागेचें नांव चिठ्ठीवर लिहून दाखवित असे. मी आंतरराष्ट्रीय टेक्नीकल मदतीची कचेरी शोधून काढली व त्यांच्या सेक्रेटरी-कडे मी माझ्या नांवची चिठ्ठी पाठविली. नंतर मला लौकरच सेक्रेटरीच्या खोलींत बोलविण्यांत आलें. सेक्रेटरी ह्या एक बाई होत्या त्यांना मी एक मायनींग इंजीनीयर असून इथल्या कोळशाच्या खाणी पहाण्याची माझी इच्छा असून त्या दाखविण्यासाठीं व्यवस्था करण्याची विनंती केली. माझ्याबद्दल अधिक चौकशी करतां त्यांना सांगितलें कीं, मला कोळशाच्या दाखविण्याकरितां 'हेड राइटसन' कंपनीचें मॅनेजिंग डायरेक्टर श्री. निडहॅम हे ह्याच सुमारास हॉलंडमधें मुद्दाम येणार होते परंतु त्यांच्या कंपनीचे कांहीं काम निघाल्यामुळें ते येऊ शकले नाहात. माझ्या अधिक परिचयासाठीं मी त्यांना त्यांच्या आलेलें पत्र दाखविले. हेड राइटसन कंपनी कोळशापासून पत्थर निराळा करण्यासाठीं डच स्टेट माइन्सचे पेटंट उपयोगांत घेत होती. सेक्रेटरी बाईनें सांगितलें कीं, काळशाच्या खाणी दाखविण्याची व्यवस्था करणारे त्यांचे वरचे अधिकारी आजारी होते व आज संध्याकाळीं त्या त्यांच्याकडे जाऊन माझी खाण पहाण्याची व्यवस्था करण्याबद्दल त्यांच्याकडे चौकशी करून येतील. व म्हणून त्यांनी मला दुसऱ्या दिवशीं ११ च्या सुमारास चौकशी करण्याकरितां परत त्यांच्या ऑफिसमधें यायला सांगितलें. मला आतां एका रात्रीकरितां तरी रहाणें भाग होते व म्हणून मी परत स्टेशनकडचा रस्ता धरला. मी स्टेशनजवळ असलेल्या हॉटेलसमधे चौकशी करून एका हॉटेलमधें स्टेशनवर ठेवलेली सूट केस घेऊन आलों. हॉटेलच्या मालकाला तुटक फुटक इंग्रजी येत होतें. खोलींत सामान ठेवून मी गांव पहाण्यास निघालों. गांवामधून एकदोन कालवे काढले होते व सामानाची वहातूक त्यांच्यांतूनच व्हायची गावाच्या मुख्य बाजाराच्या भागांत बऱ्याच मोठ्या मोठ्या इमारती होत्या. हॉलंडमधें रेडिओ, टेलिव्हिजन वगैरे बऱ्याच जिनसा

बनतात. इतर देशांच्या मानानें त्या थोड्या स्वतः सुद्धां असतात. जगप्रसिद्ध फिलिप्स कंपनी हॉलंडमधलीच आहे हें सांगावयास नको. त्याचप्रमाणें वायनॉक्युलर्स सुद्धां स्वस्त मिळतात.

मी रस्त्यावर चालत असतांना कांहीं लहान मुलें कांचेच्या पेटींत ठेवलेला खेळ दाखवीत होती व लहान मुलांच्या सणासाठी लोकांनीं जे कांहीं पैसे दिले ते जमवत होती. मला आपल्याकडच्या मुलांची त्याचप्रमाणें त्यांच्या सणांसाठीं पैसे जमविण्याची आठवण आली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं न्याहरी करून मी येथील प्रसिद्ध इंटर नॅशनल कोर्ट ऑफ जस्टिस ही संस्था पहाण्यास गेलों. प्रवेश वर्गणी देऊन आम्ही भेट देणाऱ्यांच्या खोलींत जमलों. आम्ही ३० स्त्री पुरुष एकत्र झालों असूं. थोड्याच वेळानें आम्हांला संस्था दाखविणारा वाटाड्या आला व त्यानें डच्च भाषेंत किती माणसांना ऐकावयाचें आहे असें विचारतां २-४ हात उंच झाले. नंतर इंग्रजी भाषेंत किती माणसांना ऐकावयाचें आहे असें विचारण्यांत आलें तेव्हां ५-१० हात उंच झाले. त्याप्रमाणें फ्रेंच, स्वित्झ, जर्मन भाषेकरितां थोडे थोडे हात उच झाले व त्यानें नंतर ह्या सर्व भाषांमधून अस्खलितपणें ह्या संस्थेची माहिती देण्यास सुरुवात केली. आम्हांला हा इसम निरनिराळ्या खोल्यांमधून घेऊन जात होता व तेथें असलेल्या भिंतीवरचीं चित्रें, फर्निचरबद्दल चांगलीच माहिती प्रत्येक भाषेंतून पुरवायचा. ह्या संस्थेला निरनिराळ्या राष्ट्रांकडून मौल्यवान जिनसा भेट आलेल्या आहेत. ह्या वाटाड्याची विनोद करण्याची चांगलीच कुशाग्र बुद्धि होती. मला त्याच्याबद्दल चांगलाच आदर उत्पन्न झाला होता. एका मोठ्या दिवाणखान्यांत निरानिराळ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींकरितां त्या त्या राष्ट्रांच्या नांवाच्या खुर्च्या होत्या. त्यांत त्यांनीं ज्या ज्या राष्ट्रांची माणसें आमच्याबरोबर होती त्यांना गंमतीदार रीतीनें संबोधून आपआपल्या राष्ट्राच्या खुर्चीत बसायला सांगितलें. उदा० अमेरिकेच्या माणसाला म्हणायचा, " बसा मि. आयझनेहॉवर " ही तुमची खुर्ची. मला म्हणाला, " मि. नेहरू " तुम्हीं इथें बसा इत्यादि.

ही संस्था निरानिराळ्या राष्ट्रांचें आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तंट्यावर निर्णय देण्याकरितां आहे व ह्यांत इथें झालेल्या निरनिराळ्या देशांच्या न्यायाधिशांची तैलचित्रें ठेवलेलीं आहेत. हिंदुस्थानच्या एका न्यायाधिशाचें तैलचित्र सुद्धां तेथें होतें. आम्हीं गेलों त्या वेळेस पोर्तुगालनें भारत सरकारविरुद्ध एका पोर्तुगीज टापूंतून दुसऱ्या पोर्तुगीज टापूंत भारताच्या प्रदेशांतून पोर्तुगीज सैन्याला जाण्याची परवानगी न दिल्याबद्दल वादविवाद चालू होता. सस्थेच्या व्हरांड्यांत हिंदुस्थान सरकारनें दिलेला महात्मा गांधींचा पुतळा फारच पहाण्यासारखा होता. संस्था दाखवून झाल्यानंतर आमचा मार्गदर्शक

घाईघाईनें संस्थेच्या बाहेर जाणाऱ्या दरवाज्याजवळ हात पसरून उभा राहिला व मला कुणाला कांहीं द्यावयाचें असेल तर द्यावें अशी इच्छा प्रदर्शित केली. बाहेर जाणाऱ्या सर्व लोकांनीं त्याच्या हातावर कांहीं ना कांहीं नाणें ठेवायला सुरवात केली. जो मनुष्य मला इतका बुद्धिमान वाटला त्यानें अशा प्रकारें पैसे मागावे ह्याबद्दल मला जरा आश्चर्यच वाटलें. ह्या इमारतीच्या बाहेरील बाग फारच सुंदर आहे. त्याची मी रंगीत चित्रें बाहेर आल्यावर घेतलीं. नंतर मी स्विझर्लंडच्या कचेरींत गेलों व माझ्या पास पोर्टवर माझा व्हिसा दाखल करण्यांत आला कीं नाहीं ह्याची चौकशी करीत असतांना तितक्यात स्वित्झर्लंडचे वकील तेथून जात होते त्यांची मी भेट घेतली. ते पांच मिनिटांच्या आंत येतो म्हणून निघून गेले व त्यानंतर आल्यावर माझें व्हिसाचें काम केलें.

इथें व हॉलंडमधील दुसऱ्या देशांत सायकलींचा चांगलाच सुळसुळाट दिसला. सायकलवरतीं मोठीं माणसें दोन दोन मुलांना बसवून घेऊन जातांना दिसायचीं. सायकलीच्या रस्त्यांसाठीं रस्त्याच्या दोन्हीं बाजूला निराळा मार्ग असायचा व त्याच्या दुसऱ्या बाजूला पायीं चालणाऱ्या लोकांकरितां निराळा रस्ता असायचा व त्यामुळें मोटारींना अगदीं अमेरिकेसारखे बेफाम गतीने जातां यायचें.

माझें हेग पहाण्याचें संपले होतें म्हणून मी संध्याकाळच्या गाडीनें ॲमस्टरडॅमला जाण्याचें ठरविलें. सकाळीं उठल्याबरोबर माझे सर्व कार्यक्रम आटोपून मी आंतरराष्ट्रीय शास्त्रीय (टेक्निकल) मदतीच्या कचेरींत गेलों व माझ्या कार्यक्रमाबद्दल सेक्रेटरीबाईंना विचारलें. सेक्रेटरीबाईंनीं कळवलें कीं, मी आमच्या खाणीवरच्या डायरेक्टरना विचारतें व त्यांना तुम्हांला खाणी बघण्याचा बंदोबस्त करतां येईल. खाणीवर टेलिफोन करतां कळलें कीं, खाणीवर त्या दिवशीं आणखी कांहीं पाहुणे येणार असल्यामुळें मला त्यांना खाण दाखविण्याचा कार्यक्रम करतां येणें शक्य नव्हतें. नंतर मी हॅगमधील प्रसिद्ध इमारती बघितल्या.

मी संध्याकाळीं हॅगहून ॲमस्टरडॅमची गाडी धरली व रात्रीच्या सुमारास ॲमस्टरडॅमच्या सेंट्रल स्टेशनला पोंहोंचलो. स्टेशन फारच भव्य व मोठें आहे. स्टेशनवरून बाहेर आल्याबरोबरच प्रवासी लोकांना माहिती देण्याची कचेरी आहे. मी ह्या कचेरींत स्वस्त दरांत कोणच्या हॉटेलांत रहातां येईल ह्याची चौकशी केली. त्यांनीं बाहेरून येणाऱ्या प्रवाशांसाठीं सोई केलेल्या हॉटेलांची यादी दिली व कुठें कुठें राहण्याची जागा आहे हें

विचारण्यासाठीं टेलिफोननें चौकशी केली. मी त्यांनीं सुचविल्याप्रमाणें एका हॉटेलकडे जाण्यासाठीं ट्राम गांठली. कचेरी सोडण्यापूर्वी ॲमस्टरडॅमचा तेथील महत्वाच्या जागा दाखविणारा त्यांनीं मला नकाशा दिला व मी कोणकोणत्या गोष्टी केव्हां पहाव्या हें मला समजावून सांगितलें

मी माझें हॉटेल शोधून काढलें व एक खोली घेतली. ह्या हॉटेलमध्यें दोन माणसां-साठीं सुद्धां खोली मिळत होती. परंतु मी माझी स्वतंत्र खोली ठेवली. नंतर मी गांवाचा मुख्य भाग पहाण्यास गेलो. ह्या भागांत पुष्कळ सिनेमा, नाट्यगृहें व मोठमोठीं दुकानें होती त्याचप्रमाणें अनेक रात्रीचे क्लब ( नाअीट क्लब ) होते. नाअीट क्लब हा काय प्रकार आहे हे पहाण्यास मी एका क्लबमध्यें गेलों. आंत जाण्याकरितां निराळी प्रवेश वर्गणी नव्हती. मात्र कांहीं पेय घ्यावीच लागायची. येथें भाव मात्र फारच असा-यचे. इथें कांहीं विशिष्ट कलावंतांना आपली कला दाखविण्याकरितां बोलावण्यांत यायचें. ह्यांत कुणी गाणारे, कुणी बॅलेट नृत्य करणारे, जादूचे प्रयोग करणारे व कांहीं हंसविणारे कलावंत असायचे. मी ज्या क्लबमध्यें गेलों तेथें हिंदुस्थानच्या दोन अग्लो इंडी-यन नाच करणाऱ्या मुली नरगीस व नीना ह्यांचे बॅलेट नृत्याचें प्रयोग चालले होते. त्यांचे वर्णन ब्रीटीश इंडीयन आर्टीस्ट असें क्लबच्या बाहेर लावलेल्या जाहीरनाम्यावर केलें होते. त्यांचा पहिला प्रयोग संपल्यावर मी त्यांना तुम्ही तुम्हांला ब्रीटीश इंडीयन कां म्हणवून घेतां असें विचारलें व आतां हिंदुस्थानवर ब्रिटनची सत्ता संपली असून आतां आपल्याला ब्रीटीश इंडी-यन म्हणवून घेणें चांगलें नाहीं व तशी सुधारणा तुम्हीं करून घ्या. असें त्यांना सुचविलें. त्यांनींहि माझें म्हणणें मान्य आहे म्हणून तशी सुधारणा करूं म्हणून म्हटलें. नंतर मला विशेष कार्यक्रमाची गोडी नसल्यामुळें मी माझ्या हॉटेलवर परत आलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्हीं न्याहरीला बसलों. तेथें निरनिराळ्या देशांचे आणखी कांहीं तरुण होते. त्यांच्याशीं गप्पागोष्टी करण्यांत माझा वेळ चांगलाच गेला. नंतर मी एका जर्मन मित्राबरोबर बाहेर फिरावयास निघालों. मोटरबोटनें ॲमस्टरडॅम पहाण्याचे ठरविलें. कारण मोटरबोटनें सबंध ॲमस्टरडॅम पहातां येतें, व प्रवास सुद्धां मजेंत होतो. हें शहर लहान लहान बेटावर वसलेलें असून त्याच्या रस्त्यांना समांतर अनेक कालवे लागतात. प्रवाश्यांच्या सुखसोईसाठीं अनेक मोटरबोटी बांधलेल्या आहेत. ह्या मोटरबोटी प्रवाशांना सबंध ॲमस्टरडॅम दाखवून थेट झायडरशीं समुद्रांत ( ज्याच्यावर शहराचे बंदर वसलेलें आहे ) पुष्कळ अंतरापर्यंत घेऊन जातात. बंदर पुष्कळ कामामुळें गजबजलेलें

आहे. माल उतरवून घेण्याचें व भरण्याचें काम निरनिराळ्या बोटींवर सतत चालू असते. जहाजांची दुरुस्ती करण्याकरितां सुद्धां निरनिराळ्या गोद्या आहेत.

हॉलंडच्या राजकुटुंबाचा महाल इथेंच आहे. मी उतरतांना लायबेरीयाचे (प्रेसिडेंट) राष्ट्रपति राज्य पाहुणे म्हणून आले होते. मी पोस्टांत पत्र टाकावयास जात असतांना रस्त्यावरतीं मला लोकांचा थवा दिसला व त्यांना अडवून ठेवण्यासाठीं घोडेस्वारांचा पोलिस पहारा पाहिला. तेथें चौकशी करितां मला कळलें कीं, जवळच राजमहल असून राष्ट्रपति गत महायुद्धाच्या मृत सैनिकांच्या समाधीवर पुष्पहार चढवून राज्यमहालांत परत येणार होते. त्यांना पहाण्यासाटीं हा लोकसमूह जमला होता. मी आंत जायची सोय आहे असें मला सांगण्यांत आलें. मी आंतमध्यें गेलों. माझ्यासमोर बराच जनसमूह राजमहालाच्या चौकांत गोळा झाला होता. थोड्या वेळांतच प्रेसिडेंटसाहेबांची स्वारी थाटामाटानें चार सहा अश्व जोडलेल्या रथांत बसून आली. मी जवळच्याच इमारतीला टेकून ठेवलेल्या सायकलींवर चढलो व एका खिडकीचा आधार घेऊन फिरती चित्रें घेतलीं व मी तेथून निघालों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी ह्या भागांत आलों असतांना परत लोकांचा थवा राज-महालासमोर बघीतला म्हणून मी त्याच बाजूस गेलो. मी, लोकांच्या थव्याच्या पुष्कळ पाठीमागें होतो व उंच ठिकाणीं उभा रहाण्याचा प्रयत्न करून माझ्या मुव्ही कॅमरानें फोटो घेत होतो. मला मुव्ही कॅमेरानें फोटो घेण्याला होणारी अडचण बघून लोक सरकून मला पुढें जाण्यास सांगूं लागलें व असें करतां मी अगदीं पुढच्या रांगेत जाऊन पोंहचलों. माझ्यापासून थोड्याच अंतरावर राष्ट्रपतींची स्वारी आली व त्यांचे स्वागत करण्यासाटीं राणी ' विल्हेलिमया ' आली ह्या सर्वांचे चलचित्र मला अगदीं सावकाशीनें घेतां आलें. माझी सुटकेस बऱ्याच पाठीमागें ठेवली होती व एका गृहस्थानें तिच्याकडे पाहण्याचें कबूल केलें होतें म्हणून मी निर्धास्तपणें फोटो घेत होतो. नंतर त्या गृहस्थानें माझी सुटकेस माझ्या स्वाधीन केली. तेथून मी सरळ स्टेशनकडचा रस्ता धरला. स्टेशन अगदीं समोरच होतें. मी रोटरडॅमला दुपारीं ४ वाजतां पोहचलों.

ज्या जहाजानें माझा चुलतभाऊ येणार होता त्या कंपनीच्या कचेरीमध्यें जाऊन जहाजाच्या येण्याबद्दलची चौकशी मी केली तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, जहाज दुपारींच आलें आहे व येथून २० मैल दूर असलेल्या गोदीमध्यें थांबलें आहे तेथें लोकल ट्रेननें

जातां येते असें मला कळलें त्याप्रमाणें परत स्टेशनवर आलों. लोकल ट्रेनमधें बसून सांगि-तलेल्या स्टेशनवर आलो. तेथून एक फेरी बोट मधें बसून समोरच्या किनाऱ्यावर असलेल्या 'वल्ड ग्लेड' बोटीवर गेलो व तेथें भावाचा पत्ता शोधून काढला. तेथें बोटींत आमची भेट झालीं. त्या बोटींत थोडावेळ काढुन आम्हीं दोघे परत रोटरडॅमला जावयास निघालो. येथें येईपर्यंत चांगलाच काळोख झाला होता. नंतर तेथील स्टेशनवर जेवायाला गेलो. मला इंडोनेशीयन जेवणाची चांगलीच चटक लागलीं असल्यामुळें आम्हीं इन्डोनेशियन पद्धतीचे जेवण मागवलें. अशा पैकींचे जेवण मी हेगला रस्त्यावरून जातांना घम-घमाट सुटला होता तेव्हां मसाल्याचा घमघमाट कुठें येतो ते पहाण्यासाठीं एका उपहारगृ-हात गेलो. ते इन्डोनेशियन उपहारगृह होतें. तें इन्डोनेशियन कलाकृतीनें शृंगारलेलें होतें. जेवणाचे निरनिराळें मसालेदार पदार्थ असून पापड, चटण्या, पापड्या वगैरे भर_ पूर होतें. पुलावा फारच सुंदर पैकीं केला होता. चांगल्या पाश्चात्य पद्धतीच्या जेवणापेक्षां त्यांच्याकडे किंमतहि कमी होती मला हें जेवण आपल्या हिंदी किंवा चिनी जेवणाहीपेक्षां फारच आवडलें माझ्या वाचकांपैकी कुणाला इन्डोनेशियन जेवणाची संधी मिळाल्यास ती जरूर घ्या असें मी सांगेन.

आम्हीं नंतर इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी केल्यावर रोटरडॅमच्या बाजारांत फिरलों. चिं. मोहनला त्याच्या बोटीवर जायचें असल्यामुळें व शेवटची फेरी १२ वाजल्या ची असल्यामुळें मी टुरीस्ट ऑफीसमधें जाऊन कुठें रहाण्याची सोय होत असल्यास फोन करून व्यवस्था करण्यास सांगितलें व त्याप्रमाणें त्यांनी एका हॉटेलमधें माझा बंदोबस्त केला. मला सकाळीं इथें हॉटेलमधें किंवा स्टेशनवर भेटण्याचें कबूल करून चि. मोहननें माझा निरोप घेतला. मी त्याला स्टेशनवर पोचवून माझ्या खोलीवर झोंपवयास गेलों. हे हॉटेल म्हणजे प्रवाशा करिता स्वस्त दराचें होते व खोली म्हणजे एक लहानशी केबीन असून त्यांत फक्त झोंपण्यास एक पलंग होता. खोलीचे दारसुद्धां अर्धें उघडेंच होतें. दुसऱ्या दिवशीं सकाळी न्याहारी करून हॉटेलचे बिल चुकते करून मी रोटरडॅमच्या स्टेशनवर आलों. गाडीला वेळ असल्यामुळें केशकर्तनाचें काम स्टेशनवरील सलूनमधें उरकलें. केश-कर्तनाचें व डोक्याला तेलमालिश करण्याचें निरनिराळें दर होतें. मला हे माहीत नम त्यामुळें व डच न्हावी असल्यानें त्याला इंग्लीश नीट बोलता येत नसल्यानें मी तेल मालिश करण्याचें जास्त पैसे देऊन बाहेर पडलों.

मी मोठें सामान क्लोकरूममधें ठेवून दिलें होतें ते काढुन घेतलें व नंतर विचार केला कीं माझ्या जवळ लागेल तेवढे सामान ठेवून बाकी सर्व सामान सरळ पाठवून घ्यावें

व तेथें मी जेव्हां रोमला विमान गांठायला येईन तेव्हां सामान सोडवून व्यायचें असें ठरविलें म्हणून जरूरीचें सामान सुटकेसमधून काढुन माझ्या बरोबरच्या लहान सुटकेसमधें भरलें. नंतर किती वजन होते हें पाहण्याकरितां काटयावर हमाला जवळ सामान दिलें. सामानाचें वजन ३० किलो ग्राम झालें त्यामुळें इतके वजनाचें सामान विमानांत जाणें शक्य नव्हतें. माझें ठराविक सामान रोमला सरळ पाठवून परत ते ठराविक दिवसांनीं सोडवून घ्यायाला सुद्धां १० पौंड खर्च आला असतां त्यामुळें सर्व सामान मी जर्मनीस न्यायचे ठरविलें थोड्यावेळांत म्हणजे सुमारें ९॥ ला मला चिं. मोहन भेटण्यास आला मी रोटरडॅमला रोमचें तिकिट काढलें व गाडी गांठण्याकरितां आम्हीं प्लॅटफॉर्मवर आलों. डब्यांत सामान ठेवून आम्हीं थोडावेळ गप्पागोष्टीं केल्या व कॅमेरानें कांहीं फोटो घेतलें. थोड्यावेळानें गाडी सुटल्यानें मी चिं. मोहनचा निरोप घेतला व रोटरडॅम सोडलें.

प्रकरण ४ थें

# जर्मनी

अंदाजें १०० मैलावर जर्मनीची हद्द सुरू होत होती. त्यापूर्वीच पैसे बदलुन देण्याकरितां बँकची माणसे आलीं. हॉलंडमधें प्रत्येक स्टेशनवर पैसे बदलुन देणारी बँकेची माणसे असतात. व आपल्याकडील पौंड व अमेरिकन डॉलरचें गिलडरमधें रुपांतर करतां येतें. गिलडर आपल्या रुपया येवढेंच नाणें आहे. त्याचे १०० हिस्से केले असून प्रत्येक हिस्याला सेंट म्हणतात. मी माझ्याजवळचें डच नाण्याचे जर्मन नाण्यांमधें रुपांतर करून घेतलें. जर्मनींत मार्कचें नाणें चालतें व ते अंदाजे गिलडरच्याच किंमतीचें असतें. त्यांचे

सुद्धां १०० भाग असून प्रत्येक भागाला फेनिंग म्हणतात. आमची गाडी झपाट्यानें चालली होती. बहुतेक सर्व गाडया विजेनीच चालणाऱ्या असतात. गाडी जात असतांना कित्येक वेळां फुलांची पुष्कळ शेतें पहावयास मिळत होती. हॉलंडमधें फुलांचा पुष्कळ व्यावसाय चालतो फुलें विकण्यास कित्येक लोक रस्त्यावर दुकानें सजवून बसतात वाटेंतील एखाद दुसऱ्या स्टेशनवर सँडविच व बिअर विकणारी लोक आली. जर्मनीची हद्द सुरू होण्यापूर्वीं कस्टमची व इमिग्रेशनचे लोक सामान व पासपोर्ट तपासून गेले माझा हुरकोल फिल्ड पहाण्याचा कार्यक्रम होता. व्हेस्ट फालियातल्या ल्युनोला जावयास मी निघालों होतो. मला आबेर हाउझेनला गाडी बदलायची होती. दुपारी ४ वाजतां ऑबेर हाउझन आलें. मी उतरलों व सामान हमालाला दिलें व मला ल्युनोचे तिकिट काढायचें आहे तेव्हां मला तिकिट घर दाखविण्यास सांगितलें. मी त्याला हे इंग्रजी सांगितलें परन्तु त्याला कांहीं समजलें नाहीं व दुसऱ्या जर्मन उतारूंनाहि कांहीं समजत नव्हतें. पुष्कळ प्रयत्नानें इंग्रजी कळणाऱ्या एक जर्मन माणसाला मी समजाऊन सांगितलें व त्यांनी हमालाला तिकिटघराकडे मला घेऊन जाण्यांस सांगितलें मी तिकिटघरापाशी आलों व ल्युनोचें तिकिट मागितले. हे मी त्याला कागदावर लिहून दिलें नंतर तिकिट घेऊन मी प्लॅटफॉर्मवर आलों. मला आणखी एका ठिकाणीं गाडी बदलावी लागली. नंतर तेथून मी ल्युनोची गाडी पकडली. आपल्या इथल्यासारखीच होती येथून निघण्यापूर्वीं ज्या कंपनीच्या पाहुणा म्हणून मी जाणार होतो. त्या कंपनीला मी आगाऊच माझ्या येण्याची वेळ तारेनें कळवली होती. थोड्यावेळानें तिकिट तपासण्याकरितां तिकिट चेकर आला. मीं माझें तिकिट दाखविलें. तें पाहून त्यानें माझ्या जवळ २ मार्कची मागणी केली. त्यानें पैसे कां मागावें हे मला कळलें नाहीं त्यामुळें मी त्याला मोडक्या तोडक्या जर्मनींत विचारलें कीं हा फस्ट क्लास आहे कां? त्याच्या बोलण्यावरून हा दुसऱ्या वर्गाचा डबा होता तरीसुद्धां पैसे द्यावे लागतील असे तो म्हणाला मला त्याचें पुढचें बोलणें कांही समजलें नाहीं. मी त्याच्याशीं बराच वेळ हुजत घातली. शेवटी कंटाळुन दुसऱ्या जर्मन मनुष्यानें मला एकेक स्टेशनची नांवे घेऊन ही गाडी त्या स्टेशनला उभी न रहातां पुढें जाईल हें अभिनय करून सांगितलें. ही गाडी डॉटमंडला थांबेल असेहि त्यानें सांगितलें. मी त्यांना ही गाडी एक्सप्रेस् आहे की विचारलें तेव्हां त्या दोघांना अगदीं आनंदाच्या उकळ्या फुटल्या व ते हो हो म्हणालें मग मी कांहीं न बोलतां त्याचे पैसे दिले.

ल्युनो स्टेशन संध्याकाळी पांचाच्या सुमारांस आलें. मी सामान हमालाजवळ देऊन जवळच उभ्या असलेल्या स्टेशनमास्तरला मला टेलिफोन करायचा असें संकेतानें सांगितलें. त्यानें मला टेलिफोन दिला. व मी माझ्या होल्ट कंपनीला टेलिफोन केला व इंग्रजी

मागा बोलतां येणाऱ्या व्यक्तिला फोन द्या असें सांगितलें थोड्यावेळानें माझ्याशीं एक व्यक्ति बोलूं लागली. त्या व्यक्तिला माझा परिचय थोडक्यांत करून दिला त्या व्यक्तिनें मला स्टेशनवर थांबा तुम्हांला कोणीतरी न्यायला येईल असें सांगितलें मी स्टेशनमास्तरच्या खोलींतून बाहेर पडलों व स्टेशनांतून बाहेर पडणाऱ्या फाटकांतून निघालों. तेथें बसलेल्या तिकिट कलेक्टरनें माझ्याशीं जर्मन भाषेंत कांहींतरी भाषण केलें परन्तु मला ते कांहींच समजलें नाहीं व म्हणून त्यानें माझ्याशीं बोलणें सोडले. मी पुढें जातां तो माझ्या लक्षांत आलें कीं त्याला आपलें तिकिट पहायचें असेल म्हणून मी पुन्हां मागें येऊन त्याला तिकिट दिलें. त्यानेहि अभिनय करून तिकिट पाहिजे असल्याचें सांगितलें मी बाहेर येऊन थोडावेळ थांबतो इतक्यांत एक तरुण गृहस्थ माझ्या जवळ आलें व मला म्हणालें कीं आपणाच मि. गुते कां ? मी गे– वर्क – शाफ्ट कंपनींतून आलों आहे. नंतर त्यानें मला समोरच असलेल्या हॉटेलमधें गाडींतून नेलें माझ्याखोलींत माझें सामान पोंचवून दिल्यावर ते माझ्याशीं गप्पा मारीत खाली रेस्टॉरंटमधें बसले. नंतर आम्हीं अघळपघळ गप्पा मारल्या. थोडावेळानें ज्यांनीं माझा जर्मनींतली खाणीं पहाण्याचा कार्यक्रम आंखला ते गृहस्थ श्री मार्टिन कुर्थेन सुद्धां तेथें आलें. व आम्हीं निरनिराळ्या विषयांवर बोललों. ते दोघे माझ्या बरोबर जेवलें व माझा निरोप घेण्यापूर्वी दुसरें दिवशीं न्याहरीला काय लागेल ते समजाऊन घेऊन हॉटलच्या लोकांना तसें सांगून मला उद्यां सकाळीं ते न्यायला येतील असें सांगून निरोप घेतला मी सुद्धां थकलों असल्यामुळें माझ्या खोलींत झोपण्यास गेलों.

दुसरे दिवशीं मला एका कोळशाच्या खाणींत नेण्यांत आलें. माझ्याबरोबर असलेले जर्मन गृहस्थ ( जे मला स्टेशनवर भेटायला आले होते ) ते माझें इंटरप्रिटर म्हणून काम करीत होतें. खाणीचें मॅनेजर व डायरेक्टरांशी माझी ओळख करून देण्यांत आली. इथल्या खाणींत जो तो एकमेकाला ग्लुकॉफ म्हणून संबोधीत असे त्याचा अर्थ " मी तुम्हांला तुम्ही खाणीच्या बाहेर सुरक्षितपणें पडाल अशी इच्छा करतो " असा होता. खाणीच्या आंत जाण्याकरितां सब कपडे खाणीकडून मिळतात व आपलें कपडे खाणीच्या स्नानगृहांत ठेवून देऊन खाणीवरील कपडे घालून मग आंत जायचें. पायांत घालायचें बूट व डोक्याला सुरक्षिततेची टोपी वगैरे सर्व कांहीं मिळतें.

खाणींतून बाहेर आल्यावर पिण्याकरितां मद्य जर्मन कंपनीकडूनच असायचें हे अगदीं एकमेकांकडे " ग्लुकॉफ " म्हणून लष्करी पद्धतीनें घ्यायचें व लोकहीं थोडेबहुत लष्करी शिस्तीनें वागत असल्यामुळें हिट-

लरच्यावेळचें जर्मनी कसें असेल ह्याचा विचार यायचा. मद्यपान झाल्यावर खाणीवरच्या स्नानगृहांत स्नान करायला जायचें असते. हीं स्नानगृहें खाणींतून कामकरून आलेल्या कामगार, व अधिकारी वर्गाकरिंता खाणींतर्फे बांधलेली असतात. पाहुण्यांकरिंता स्वतंत्र खोली असते व स्नानगृहाची निगा राखणारा जर्मन परिचारक अंगाला मालीश वगैरे करुन देऊन तुम्हांला स्नान करण्यास मदत करतो. मी अशा रीतीनें आणखी थोड्या खाणी पाहिल्या. इथल्या खाणी म्हणजे जर्मनींतल्या प्रख्यात र्‍हर नांवाच्या सर्वांत मोठ्या औद्योगिक क्षेत्रांत असलेल्या खाणी होत. ह्या खाणीमधें कोळशाचा थर फक्त १॥ ते दोन फुटच जाडीचा असायचा व पुष्कळ ठिकाणीं आम्हांला सापासारखें सरपटत सरपटत जावें लागायचें. त्यामानानें हिंदुस्थानांतील कोळशाचें थर कित्ती तरी जाडे आहेत व दीड ते दोन फुटांच्या थराला आम्हीं स्पर्शसुद्धां करीत नाहीं. आपण कोळशासारख्या नैर्सगिक संपत्तीत इतकें धनिक असून सुद्धां आपण कोळशाच्या उत्पादनांत ह्या देशांपेक्षां इतकें मागे आहोंत ह्या गोष्टीचा विचार येतां मनाला जरा क्षोभच वाटतो.

इथल्या खाणींशिवाय मी खाणींत लागणारी यंत्रसामुग्री करणारे कारखानेंसुद्धां बघितले. मला दुसऱ्या इतर देशांपेक्षां जर्मनींत आदरातिथ्याबद्दल लोकांचा चांगलाच कल असलेला दिसला. माझा पाहुणचार जिथें तिथें फारच उत्तम रितीनें व्हायचा. एका ठिकाणीं मी म्युनीचला जायचे आहे असें म्हटल्यावर माझें म्युनीचपर्यंतचें अंदाजें ६०० मैलाचें पहिल्यावर्गाचें तिकट व तेथें रहाण्याची हॉटेलची सोय वगैरें सर्व कांहीं मी ना ना म्हणत असतांना करून दिलीं. मी हीं गोष्ट माझ्या जर्मन मित्राला सांगित-ल्यानें त्यानें मला जरा खोंचूनच विचारलें किं आम्ही जसा पाहुणचार बाहेरील लोक आल्यावर करतों तसा आमचा होईल कां ? मी जरा ह्या प्रश्नाला गोंधळूनच गेलो परन्तु शेवटीं समय सुचकतेने सांगितलें कि, आमच्या पाहुणचाराबद्दल शंका घेण्याचे कांहींच कारण नाहीं कारण आमच्या देशांत इंग्रज लोक फक्त व्यापार करायला आले होते त्यांना पाहुणचाराकरिंता आमच्याकडील लोकांनी सबंध देश देऊन टाकला परन्तु आतां मात्र आम्हीं तुमच्यासारखाच पाहुणचार देऊं. त्याच्यापेक्षां जास्त अपेक्षां कोणी ठेऊं नये. जर्मनींत परदेशाच्या माणसाबद्दल जरा जास्तच मान व कौतुक असते व ते थोडे जास्तच प्रमाणांत असतें असें म्हणावयास हरकत नाहीं, अशी तक्रार जर्मन लोकांनींसुद्धां मजजवळ केली. एके दिवशीं माझा मित्र मार्टिन कुथेननीं त्याची गाडी रस्त्यावर उभीं न करतां उभीं न करण्याच्या जागीं उभी करून दुकानांतून घाईनें कांहीं सामान आणावयास गेला व परत आला इतक्यांत पोलिसचा शिपाई त्याला तिथें गाडी

उभी ठेवल्याबद्दल रागावूं लागला परन्तु मला त्या गाडींत पाहिल्याबरोबर अगदीं लष्करी पद्धतीनें सलाम ठोकून अगदीं विशेष कांहीं न बोलतां निघून गेला. मार्टिन कृथेनसुद्धा त्याच्यावर खूपच चिडला. मला नंतर मार्टिन म्हणाला किं, मी जर एकटाच असतो तर ह्यानें माझ्यावर केससुद्धां केली असती परन्तु तुला ( परदेशातला ) पाहून कांहीं न बोलतां निघून गेला. खरोखर आमच्या जर्मन लोकांना परदेशी लोकांचें कांहीं वेगळेंच वेड आहे.

जर्मनीत इंग्रजी बोलता येणारे लोक फार थोडे आहेत कित्येक लोकांना बोलल्याचें समजतें पण बोलतां येत नाहीं. कारण इंग्रजीचें शिक्षण जर्मनींत सक्तिचें आहे. त्यामुळें बोलणें तरीसुद्धा अवघडच जातें परंतु संकेतानें व्यवहार करणें बरें पडते असे माझ्या अनुभवास आले. मला जर्मनी तुटके फुटकेंच येत होते परंतु सर्व व्यवहार मी संकेताने केलें. जर्मनींत मी अनेक चांगल्या गोष्टी पाहिल्या त्यांत ' इसाबेला ' कार ही फारच छान गाडी होती. ह्या गाडींत दोन माणसें बसूं शकतात. बसण्याकरितां पुढचा कांचेचा दरवाजा उघडावा लागतो. व त्याबरोबर स्टिअरिंगचें चाक सुद्धां दरवाजा बरोबर बाजूला होतें. ही गाडी गॅलनला १०० मैल जाते त्यांच्या इंजिनाला थंड करण्याकरिता पाणी न घालतां ते फक्त हवेंत थंड होते. तशीच जर्मनीची जगविख्यात गाडी ' फोकस्-वॅगन ' लहान कुटुंबाकारितां ( यूरोपमध्यें बहुतेक लहान कुटुंबं असतात ) फारच सोईची पडतें तिची किंमत ३००० रुपये असल्याळें कोणत्याहीं जर्मन कुटुंबाला त्यांच्या आटोक्यांत असल्यामुळें ह्या गाड्यांचा सुळसुळाट जिकडे तिकडे दिसण्यांत येतो. ही गाडी सुध्दां गॅलनला ५० ते ६० मैल जाते. हिचें इंजिनसुध्दां हवेनें थंड होतें. माझा इथला खाणी व मशिनरी पहाण्याचा कार्यक्रम संपला असल्यामुळें मला लौकरच रोमला घरीं परत येण्याकरितां विमान गांठायचें होतें. मी म्युनिचला जावयास निघालों. हें शहर जर्मनीच्या " बव्हेरिया " मधें असून तेथें फारच मोठें संग्रहालय आहे असें माझें ऐकण्यांत पुष्कळ वर्षांपासून होतें. म्हणून जर्मनी सोडण्यापूर्वी हें बधून घ्यावें अशा उद्देशानें मी हें म्युझियम पहाण्यास निघालों होतों. मी सकाळीं ' डॉटमुंडहून ' निघालों व ऱ्हूर कॉलफिल्डला जड अंतःकरणानें नमस्कार करून म्युनिचकडे डोळे लावून चाललों होतो. वाटेंत डुंझेलडार्फ, कोलोन इत्यादि मोठीं शहरें लागलीं. गाडी अगदीं पुष्कळ रस्त्यावर ऱ्हाईन नदीच्या कांठानें जात होती. ऱ्हाइन नदीवर मालाची वाहतूक करणाऱ्या पुष्कळ आगबोटींचा सुळसुळाट पहाण्यास येत होता. हे दृश्य फारच नयनरम्य होतें.

दुपारचें जेवण गाडींतल्या रेस्टॉरंट कारमधें बसून घेतले व बाहेरचे दृश्य पहाण्यात

तन्मय झालों होतों. आगगाडीच्या बाहेर जिकडे तिकडे बर्फ आच्छादला होता. डब्याच्या खिडक्या कांचेनीं घट्ट बंद केल्या असल्यामुळें व आंतील हवा गरम करण्याची सोय असल्या-मुळें बाहेरच्या थंडीची कांहींच कल्पना येत नव्हती. इतक्यांत मला डुलकी आली व माझ्या भोवतालच्या जगाचा मला विसर पडला. थोड्यावेळाने माझ्यासमोर बसलेल्या वृध्द जर्मन प्रवाशाने मला हलवून उठविलें, व मला म्हणाला कीं ही पहा तुमच्या देशांतील स्त्री. मी पहातों तो खरोखर हिंदी साडी नेसलेली स्त्री माझ्यासमोर उभीं होती मी झोंपेतून उठल्यामुळें जरा गोंधळलों व त्यांना जवळच्याच जागेवर बसायला सांगितलें व तुम्ही हिंदुस्थानांतील आहांत कां म्हणून चौकशी केली. त्यांनी मला सांगितलें कीं मी हिंदुस्थानांतील नसून मलायांतील आहे त्यांचा एकंदर पोशाखावरून मला त्या हिंदुस्थानीं असाव्यात असा संदेह झाला होता तो बरोबर ठरला. त्यांच्या बोलण्यावरून कळलें किं त्या बॅरिस्टर झाल्या असून त्या त्यांच्या वडिलांबरोबर वकिली करण्याकरितां स्वदेशी चालल्या होत्या. त्यांनी मला जर्मन येते कां असें विचारलें तेव्हां मी त्यांना दडपून " हो " म्हणून म्हटलें. त्यांनीं त्यांच्या गाडी बद्दल चौकशी करण्यांकरितां कांहीं प्रश्न विचारण्यास सांगितलें. मी समोर-च्या जर्मन उतारूंशी बोलतांना मला बरेंच अडखळण्यास झालें. ते पाहून त्या म्हणाल्या 'रांहूंद्या' इतके जर्मन तर मला सुद्धां येते आणि खरोखर त्या माझ्या पेक्षां बरेच चांगलें जर्मन बोलत होत्या.

म्युनीच स्टेशन येतांच त्या म्हणाल्या किं, त्यांना दुसरी गाडी गांठायला १० मिनीटेंच होतीं. म्हणून त्यांचे सामान पोहोंचविण्याकरीतां त्यांनी मला व्याकूळतेनें विनवणी केली. परंतु त्यांची बॅग बरीच मोठी होती. इंग्लंड व अमेरिकेला माझी स्वतःची सूट केस उचलून माझ्या हाताला घट्टे पडलें होते त्यामुळें मला वाटत होतें किं ह्या भानगडींत पडूं नये परन्तु एकदां वाटलें किं स्त्रीदाक्षिण्य दाखवावें. परन्तु कर्मधर्म संयोगानें म्युनिच स्टेशन-वर हमाल मिळाला व त्या बाईची सोय झाली. मी सुद्धां माझें सामान हमाला जवळ देऊन टॅक्सी करून पार्क हॉटल ( तेथें माझा आधीपासूनच बंदोबस्त झाला होता. ) मधें माझ्या खोलीवर आलों. रात्र झालीं असल्यामुळें लौकरच जेवण आटोपून मी म्युनिच शहारांत फिरण्यांस निघालों. थोडे फिरल्यावर मी माझ्या खोलींवर झोंपण्यास आलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळी न्याहारी करून मी म्युनिचचें संग्रहालय पहाण्यास निघालों. थोडयावेळानें संग्रहालया जवळ आलों. आंतजाण्यासाठीं दोन मार्कचें तिकिट घेऊन आंत गेलों. संग्रहालय फारच मोठें व भव्य होतें त्यांत निरनिराळे विभाग होतें. खानिजांचा व

खाणींवरचा विभाग फारच मोठा होता. कोळशाच्या, पोटॅशच्या व लोखंडाच्या खाणी दाखविल्या होत्या. विद्युत् शास्त्राच्या विभागांत विजेवरचें निरनिराळें प्रयोग करून दाखविलें होतें. इथें प्रकाशाच्या विभागांत कांहीं ऑप्टीकल एल्यूशन चे प्रकार होत व त्यांत एका कांचेवर सुंदर बागेचे चित्र काढलें होते व त्यांच्या पाठीमागून आपण चाललें, किं आपली लहानी आकृती ह्या कांचेवरती पडायची व कांचेकडे बघणाऱ्या माणसाला कांचेपाठीमागचा मनुष्य बागेंत उभा असें दिसायचें. हें म्युझियम मोठें असलें तरी मला शिकोगाचें इंडस्ट्रीज सायन्स म्यूझियम ह्याच्यापेक्षां पुष्कळ पटीनें बरें वाटलें. त्यामानानें हें म्यूझियम चांगलेच मागासलेंले होतें

म्युनिचला थोडीबहुत खरेदी:करुन विशेषत: माझ्या मित्राकरिता एक दुर्बिण विकत घेऊन मी दुसऱ्यादिवशीं सकाळीं म्युनिच सोडलें. नंतर स्वित्झलॅंडमधील झुरिचला निघालों स्टेशनवर पोर्टरला सामान देऊन मी तिकिट काढायला गेलों व थोड्या वेळानें परत येऊन बघतों तर पोर्टर दिसेना. मी पोर्टरचा शोध करण्याकारितां प्लॅटफॉर्म वर इकडे तिकडे हिंडू लागलों परंतु कांहीं केल्या दिसेना. मग मी जरा घाबरलोंच व स्टेशन वरील पोलिसच्या माणसाला त्या पोर्टरसंबंधीं सांगितलें तो म्हणाला घाबरूं नका. तुम्हीं जिथें सामान दिलें होतें तिथेंच जा पोर्टर तुम्हांला तेथेंच भेटेल. मी तेथें गेलो व खरेंच तो पोर्टर मला तेथें शोधत आला. तो दुसऱ्या एका प्रवाशाचें सामान ठेवायला गेला होता व थोड्यावेळानें सामान ठेवून तोंच मला शोधत आला होता. मी सकाळीं नऊच्या सुमारास म्युनिच सोडलें. आमची गाडी डोंगराळ प्रदेशांतून चालली होती. रेल्वेलाईनच्या बाजूस पांढराशुभ्र बर्फ पडलेला होता. बर्फ पडणे म्हणजे काय ? हें मी प्रथमच म्यूनिचमध्यें पाहिले. मी म्यूनिचला असतांना सबंध दिवसभर बारीक कागदा सारखा बर्फ पडत असें व थोड्या वेळांत मोठा थर जमत असे.

दुपारी २ च्या सुमारांस ऑस्ट्रीयाची कस्टम ऑफ इमिग्रेशनची माणसें एका स्टेशनवर आमच्या गाडींत चढलेली पाहून चांगलाच चपापलों. चौकशी केली असतां आमची गाडी ऑस्ट्रीयाच्या हद्दींतून चालली होती असें कळलें. आमची गाडी ऑस्ट्रीया-तून जात असेल हें मला माहींत नव्हतें. मी निघण्यापूर्वी नकाशा बघितला होता परंतु आमची गाडी अगदी स्वीत्झर्लंड व ऑस्ट्रीयांच्या हद्दींतून चालली होती त्यामुळें ऑस्ट्रियांतुन गाडी जात होती हे लक्षांत असेल हें माझ्या लक्षांत आलें नाहीं. मी

ऑस्ट्रियाच्या हद्दीतून जाण्याकरितां ट्रानसिट व्हीसा केलेला नव्हता. त्यामुळें मला भिती वाटत होती किं मला जवळच्या स्टेशनवर उतरवून देऊन परत जर्मनीत पाठवतात किं काय ! माझ्या जवळ पासपोर्ट मागितला तेव्हां मी अगदीं भितभित दिला इमीग्रेशन च्या माणसानें त्याला नीट तपासून पाहिला व कांहीं न बोलतां त्याने तो मला परत दिला तेव्हां मला फार हायसें वाटलें.

# प्रकरण ५ वें

## ( स्वित्झर्लंड )

आतां आम्हीं स्वित्झर्लंडमधून जात आहोंत ह्याची अगदीं प्रचिती येत होती. बर्फाच्छादित आल्प्स पर्वताच्या रांगा रेल्वे लाईनच्या दोन्हीं बाजूला लागल्या होत्या अधून मधून सपाट जमिन दृष्टीस पडायची व मधेच सुंदर मोठें सरोवर दिसायचें स्वित्झर्लंडमधील बहुतेक शहरें सरोवराकाठीं वसलेली आहेत. दुपारी चारच्या सुमारांस झुरिच आलें. सामान स्टेशनावरच्या सामानाच्या खोलींत हवालीं करून हॉटेलची व्यवस्था करायला निघालों, झुरिच स्टेशन फारच मोठें आहे. जवळच 'स्विस एअर' च्या माहिती देणाऱ्या कचेरींत चौकशी करून स्टेशन जवळच्या हॉटेलमधें रहाण्याची सोय करून घेतली. सामान परत घेऊन हमालाला दिलें व त्यानें

ते त्याच्या हातगाडींत ठेवलें. मी सांगितलेल्या पत्त्यावर तो ते घेऊन आला. त्याला किती मजुरी द्यायची हे विचारलें तेव्हां त्यानें ३ रु. मांगितले. मी त्याला विन बोभाट दिली, कारण इथल्या लोकांचे ठरलेले दर असतात व त्यांच्याशीं कमीजास्त करण्यांत कांहीं अर्थ नसतो. स्वित्झर्लंडच्या लोकांचा रहाण्याचा दर्जा युरोपमधें पुष्कळच वर आहे- व म्हणूनच इथली मजुरी सुद्धां दुसऱ्या देशांपेक्षां जास्त आहे.मी सामान खोलींत ठेऊन झुरिच शहर पहाण्यांस निघालों.

झुरिच शहराचा नवीन भाग अगदी अद्यावत् तऱ्हेच्या मोठमोठ्या इमारतींचा आहे. झुरिच शहराच्या बाहेर मोठे थोरलें झुरिचचें सरोवर आहे व त्याच्या भोंवताली जुनें शहर वसलेले आहे. शहराच्या मधून एक मोठा थोरला कालवा काढलेला आहे व त्याच्या दोन्हीं बाजूला मोठमोठालें रस्ते आहेत. इथेंसुद्धां रस्त्यावर अधून मधून निरनिराळया प्रकारचीं फुलें विकण्याकरितां लोक बसलेले असतात. स्वित्झर्लंड म्हणजे घड्याळाच्या उद्योगाचें माहेरघर असल्यामुळें तेथें कितीतरी घड्याळाची दुकानें दिसतात. घड्याळ्याचें निरनिराळें नमुनें असून कित्येक घड्याळे सोन्याच्या बांगडींत अगर रत्नजडित आंगठींत बसविलेली असतात. त्यांची किंमत २००० फ्रँक पर्यंत होती १०० फ्रँक पर्यंत किल्ली न देतां चालणारें ॲटोमिटीक घड्याळ मिळत होतें. मी माझ्याकरितां एक घड्याळ इथून पसंत केलें व दुसऱ्या दिवशीं ते विकत घेतलें.

मी माझ्या जवळचें जास्त सामान प्रोजेक्टर वगैरे हालंडमधून घेतलेल्या सूट-कसे मधें भरुन त्याल' जर्मनींत असतांनाच जहाजाच्या मार्गानें पाठवून दिलें होते. इतकें असून सुद्धां माझ्याजवळ सामानाचें ओझें जास्तच होतें व म्हणून रोमला जाण्या-पूर्वीं जास्ती असलेले सामान इथूनच पाठवून द्यावें ह्या विचारानें मी एक सूट केस घेण्याकरितां दुसऱ्या दिवशीं सकाळीं बाहेर पडलों. २१ फ्रँकची म्हणजे अंदाजे २८-३० रु ची एक सूटकेस विकत घेतली मला त्याची किंमत जरा जास्तच वाटली परंतु त्याच्यापेक्षां कमि किंमतीच्या सूट केस मिळत नव्हत्या [ हिन्दुस्थानांत आल्यावर चौकशीं करितां अशाच सूटकेसची किंमत दुप्पट होती असें कळलें ] नंतर मी झुरिच स्टेशनावर जाऊन टुरिस्ट ऑफिस मधें गेलों व झुरिच जवळ कांहीं पहाण्याची स्थळ आहेत कां म्हणून विचारलें तेव्हां त्यांनीं सांगितलें कि जवळ माऊन्ट पिलाटुस नांवाचा डोंगर आहे व त्यावर चढण्याकरितां तारेच्या दोरीची रेल्वे केबल वे आहे व ठराविक अंतरापर्यंत चढणावर चढण्याकरितां दोन रुळांमधें तिसरा रुळ घालून

त्यावर दात उठविलेले असतात व ह्यावर वर चालतील असें दाताचें चक्र गाडीला जोडून असतें व ह्यामुळें गाडी वर चढत असतांना ती परत पाठीमागे येऊ शकत नाहीं. मी लगेच 'माऊंट पिलाटुस' जायचें ठरविलें व लौकर लौकर हॉटेल वर येऊन घरीं पाठविण्याचें सामान बाहेर काढून बाजारांतून आणलेल्या सूटकेसमधें भरलें हॉटेलच्या लोकांना घरचा पत्ता सांगून ती सूटकेस नीट वेस्टन करून पोष्टानें हिन्दुस्थानांत पाठवून देण्यास सांगितलें. नंतर मी घाईनें स्टेशनवर माऊंट पिलाटुसला जायची गाडी पकडण्यास आलों. एक गाडी थोड्याच वेळापूर्वी निघून गेली असल्यामुळें मी स्टेशन-वरच्या उपहारगृहांत जेवून घेतले. एकतासानंतरची गाडी गांठली. अंदाजे १८ फ्रँकचे तिकिट लागलें. मी झुरिचच्या स्टेशनवरच ऐकलें होतें किं, कदाचित माऊन्ट पिलाटुसची तारेची रेल्वे डोंगरावर बर्फ पडल्यामुळें बन्द असेल. नंतर तिकिट देणाऱ्या माणसानें स्टेशनवरून एकदां फोन करून विचारून घेतलें परंतु ती रेल्वे बंद असल्याचें कोणी सांगितलें नाहीं. नंतर थोड्याच अंतरावर असलेल्या लेक ल्युसेर्नला मला गाडी बदलायची होती म्हणून तेथें पुनः चौकशी केली. गाडींत बसल्यांनंतर तिकिट तपासणी करणाऱ्या रेल्वे आधिकाऱ्यानें मौंट पीलाटुस्ची तारेची गाडी बंद पडली असल्याचें सांगितलें व तुम्ही ह्या स्टेशनवर उतरून जा असेंहि म्हणाला. मला काय करावें ते कळेना व गाडी विशेष जास्तवेळ थांबत नाहीं त्यामुळें विचार करायला वेळच नव्हता म्हणून मी उतरून गेलो. हे स्टेशन अगदींच किरकोळ होतें. माझ्या बरोबर एक इंग्लीश बाई व तिची मुलगी माझ्या सारख्याच त्या स्टेशनवर उतरल्या होत्या. स्वित्झर्लंडमधें बहुतेक सर्वांना इंग्रजी बोलतां येतें परन्तु इथल्या स्टेशनवरच्या तिकिट देणाऱ्या इसमाला स्वीसशिवाय दुसरी कोणचीच भाषा येत नव्हती त्यामुळें आमच्या तीन इंग्रजी बोलणाऱ्या प्रवाशांचा ह्या माणसाची टिंगल करण्यांत व त्याच्याशीं हातवारे करून बोलण्यांत चांगला वेळ गेला. मी इंग्लंड सोडल्यापासून मला इंग्रजी वर्तमानपत्र वाचायला मिळालें नव्हते. त्यामुळें बाहेरच्या जगात काय चाललें हें कळत नव्हतें. मी इंग्लंड सोडायचा वेळेस इंग्लंड, फ्रान्स व इजिप्तचें संबंध बिघडलें होतें. व गंभीर परिस्थिती निर्माण झालीं होती. हे मला स्टेशनवरील ह्या स्वीस् माणसानें हातवारे करून सांगितलें किं, इंग्लंड व इजिप्त मधें खरोखरीचें युद्ध सुरू झाले आहे. मला जरा धास्तीच बसली व हिंदुस्थानांत परत जायला आपल्याला त्रास तर होणार नाहीं अशी शंका मनांत आली.

आम्हांला 'लेक ल्युसेर्न'ला परत जायला वेळ होता म्हणून आम्हांला आमचेंच मनोरंजन करणें भाग होतें समोरच हिमाच्छादित डोंगर दिसत होते मी दोन डोळ्याची

दुर्बिण जवळच टेवल्यामुळें मला त्याच्याकडे जवळून पहाण्याचा आनंद वाटायचा, वेळ कंटाळवाणा जात होता व मला वाटलें किं त्या तिकिटकलेक्टरचें न रोकतां 'माऊन्त पिलाटुस'च्या पायथ्याशीं जायला पाहिजे होतें. म्हणजे तारेच्या रेल्वेनें जातां आलें नसते. तरी त्या रेल्वेचें निरीक्षण करतां आलें असते. मी जवळ कॅमेरा वगैरे घेतला होतो परंतु माझी निराशा झाली.

मी संध्याकाळीं लेक ल्युसर्नला परत आलों. परंतु सरळ घरी न जातां सवंध शहर पाहून यावें म्हणून टुरीस्ट ऑफीस मधून शहराच्या माहिती संबंधानें नकाशा मिळवून शहर पहाण्यास निघालों. हें शहरसुद्धां सरोवर वर वसलेले असून झुरीचच्या मान नें बरेंच लहान आहे, व थोडे जुनें आहे. तेथें घड्याळाची बरींच दुकानें असून मी एका दुकानांत शिरलो व लेडिज रिस्टवॉच व एक ट्राव्हेलिंग एलार्म क्लॉक घेतलें. तेथून एका रेडिओच्या दुकानांत गेलों असतांना दुकानाचा मालक माझ्याजवळ आला व माझा हात जोरानें धरुन मला विचारु लागला किं तुम्हीं हिंदुस्थानचें आहांत कां व मी' हो म्हटल्यावर तुम्हीं 'शोभना समर्थ'ला ओळखतां कां ? मी त्यावर नाहीं म्हणून तिला पडद्यावर पाहिलें आहे असें सांगितले तेव्हां त्याची जरा निराशाच झालीं व त्यानें मला सांगितलें किं शोभना समर्थ व माझा चांगला परिचय आहे. त्यांची मुलगी इथेंच शिकायला होती. तुम्हीं त्यांना माझा निरोप सांगा वगैरे वगैरे...

लेकल्युसेर्न बघून परत स्टेशनला आलो. झुरीचची गाडी गांठली. रात्रीचें ८-९ वाजलें होते. माऊन्ट पिलाटुसला जाता न आल्यामुळें तिकिट परत केले व ते पैसे परत घेतलें. नंतर मी माझ्या हॉटेलवर परत आलों. आल्यावर मला असें कळलें किं त्यांना सूटकेस पाठविणें जमलें नाहीं त्यामुळें मी सूटकेस परत घेतलीं व खोलींवर येऊन झोपलो. दुसऱ्या दिवशीं झुरीच सोडून रोमला जायचें होतें.

सकाळीं उठून मी खोलीसोडून हॉटेलचे बील चुकतें केलें आदल्यादिवशीं मी माझा गरम सूट धुवायला दिला होता व तो मला २४ तासाच्या आंत परत पाहिजे होता असे सांगितलें होते. मला माझ्या हॉटेलच्या लोकांनीं गरम सूट लौकरच मागवून दिला पॅंट भलतीच आली म्हणून परत दुसरा माणूस पॅंट घ्यायला पाठविला. धुण्याचा चार्ज विचारतां २१ फ्रॅंक म्हणजे अंदाजे २६ रुपये मला सांगण्यांत आले मी जरा थंडगारच झालो दुसऱ्या सूटाबरोबर माझीसुद्धां चांगली धुलाइ झालीं होती

इतकी महागाई मी अमेरिकेंतसुद्धां पाहिली नाहीं. मी आश्चर्य दाखवल्यावर मला सांगण्यांत आलें किं, साधारणपणें कपडे सात दिवसांनी धुवून मिळतात त्याला ५ फ्रँक पडतात. जर तीन दिवसांत कपडे पाहिजे असल्यास त्याला अर्जंटचा दुप्पट चार्ज द्यावा लागतो. परंतु २४ तासांत पाहिजे असल्यास टेलेक्स सर्विस म्हणतात त्याला २१ फ्रँकचा आकार [चार्ज] द्यावा लागतो. मी अगदी गप्प बसलों. मुकाट्यानें पैसे चुकते केले. मनांत मला वाटूं लागलें किं मुंबईला थोड्या मळकट कपड्यांत उतरलों असतो तरी बरें झालें असतें परंतु ही 'टेलेक्स' सर्विस नको होती. सामान हमालाजवळ देऊन मी स्टेशनवर आलों. इथें कोणी सामान खांद्यावर घेत नाहीं. इंग्लंड व अमेरिकेंत सामान खांद्यावर घेतात. इथें लहानश्या हातगाडींत सर्व सामान ठेवतात. मी एका म्हातान्या बाईला तिच्या घरचें समान काठीला टिंगवून काठीला तीन रोलर्स लावून पायगाडी सारखे ढकलतांना पाहिलें होते.

गाडीला वेळ असल्यामुळें मी प्लॅटफॉर्मवरच थोडा वेळ थांबलों. बाजूला वळून पहातो तर तीन हिंदी माणसे माझ्या जवळच उभी होती. मी ल्युनोला असतांना ऐकलें होते कीं, धनबादचे चांचाणी बंधु व एक कोळशाच्या खाणीचें मालक जर्मनींत कोळशाच्या खाणीसाठीं यंत्रसामुग्री विकत घेण्याकरितां त्या वेळेस तेथें फिरत होते. मी त्यांच्याजवळ गेलो व त्यांच्याबद्दल चौकशी केली. मला संशय आला होता किं तेच तर हे नाहींत ना ? पण चौकशी केल्यावर माझें बरोबर ठरलें व आम्हीं एकाच व्यवसायाची व एकाच जागेची माणसें अनपेक्षित भेटल्यामुळें आम्हां सर्वांना फार आनंद झाला. थोड्या वेळानें माझी गाडी आल्यामुळें मी त्यांचा निरोप घेऊन गाडीत बसलों.

प्रकरण ६ वें

# रोमकडे मोर्चा

आतां मी माझ्या रॉटरडॅम– रोमच्या तिकिटवर परत प्रवास सुरू केला. ओबेरहाऊसेन ते झुरीच पर्यंत मी निराळें तिकिट काढले होते, व इथपर्यंतचें माझें तिकिट वाया जात होतें. [ मुंबईला आल्यावर ते तिकिट अमेरिकन एक्सप्रेस कंपनीला दिलें,

व प्रवास न केलेल्या मार्गाचे पैसे परत घेतले. ] रोमपर्यंत जाणारे दोन तीन डब्बे होते. मी एका डब्यांत जागा गांठली. समान खाली ठेवायचे नसून वरील रॅकवर ठेवायचें असल्यामुळें मी सामान वर ठेवायला लागलो. माझी बॅग वजनदार असल्यामुळें मला वर उचलून ठेवायला फारच त्रास पडत होता. जवळच्याच बाकावर १८-२० वर्षांची स्वीस मुलगी बसली होती. मला बॅग उचलण्यास त्रास पडत आहे हे पाहून ती लागलीच उठली व तुम्हांला मदत करूं कां ? असें विचारून तिनें खरंच माझ्या बॅगेला हातभार लावून माझी बॅग लावण्यास चांगलीच मदत केली. विशेष चौकशी करतां ही मुलगी इटालीला इटालियन भाषा शिकण्यास जात होती. ती मीलानोला उतरून कोणत्या तरी इटालियन कुटुंबाबरोबर राहून त्याची भाषा व दुसरें कांहीं शिक्षण करणार होती अशाच रितीनें अभ्यास करणाऱ्या मुली मी इंग्लंड वगैरे ठिकाणी पाहिल्या. फक्त ही प्रवृत्ति इंग्लंडच्या लोकांमध्यें पुष्कळ कमी आहे व बहुतेकांना इंग्रजी शिवाय दुसरी भाषा येत नाहीं. जितका देश लहान तितके तिथें जास्त भाषा जाणणारें लोक आढळतात. उदा. हॉलंड — स्वित्झर्लंड मध्यें स्वतःच्या भाषा शिवाय दुसऱ्या एक दोन भाषा बहुतेकांना येतात.

गाडी सुटायच्या अर्धातासापूर्वी स्टेशनवर एक हिंदी गृहस्थ पांढराशुभ्र लांब कुडता व पांढरे शुभ्र धोतर व त्याचा कच्छा घालून एका युरोपियन बाई बरोबर आला. त्याची चालायची छटा इतकीं मनोवेधक होती व त्यानें धोतर इतकें सफाईनें नेसलें होते किं त्यांचेच कपडे स्टेशनवर सर्व प्रवाशांपेक्षां आकर्षक होते असे मी म्हणेन. मी लगेच गाडीतून उतरुन त्यांच्याशी ओळख करुन घेतली. माझ्या सबंध येवढ्या प्रवासांत मी त्यांनाच प्रथम धोतर नेसल्याचें व इतक्या गौरवाने चालत असल्याचें पाहिले. त्यांच्या त्या मानी व करारी स्वभावाबद्दल त्यांचे मी अभिनंदन केलें. आपला भारतीय पोषाखसुद्धां इतका चांगला दिसूं शकतो ह्याचें मला राहून राहून कौतुक वाटलें. परदेशी पोषाखापुढें आपला पोषाख हलका वाटतो व त्यामुळें आपल्याला लाज वाटतें ह्या मनोवृत्ती बद्दल मला खेद वाटला. ह्या गृहस्थाबद्दल चौकशी करितां त्यांचे नांव श्रीयुत पारेख होतें. ते मुंबईचे असून त्यांचा मरीनलाइन्सवर ब्लॉक होता. हे परदेशांत योगअभ्यासाचें वर्ग चालवावयाचे त्यांनी आतांपर्यंत इंग्लंड, अमेरिका भागांत दौरे केले होते. त्यांचे लग्न एका फ्रेंच बाईशी झालें असून आतां त्या बाहेरगांवी जात असल्यामुळें हे गृहस्थ निरोप द्यायला आले होतें.

आमची गाडी आल्प्स पर्वताच्या रांगेवर उंच्या भारीत चालली होती. बाहेर जिकडे

तिकडे बर्फ पडत होता. गाडीच्या कांचा लावल्या असल्यामुळें व आंतील हवा गरम करण्याची सोय असल्यामुळें बाहेरची थंडी कळायची नाहीं. आमच्या समोरच पर्वतांची उंच उंच गगनचुंबी शिखरें आम्हांला दिसायची. कित्यक वेळा खोल दऱ्या व त्यावर वसलेली लहान गांवे आमच्याहुन पुष्कळ खोल दिसायची. स्टेशनच्या छपरावर, प्लॅटफार्मवर चोहोंकडे बर्फ सांचला होता. गाडी विजेवर चालत होती. तिचा वेग बराच होता. मी माझा सिनेकॅमेरा चांगलाच चालू ठेवला होता. मोठमोठे बोगदे सुद्धां बरेंच येऊन गेलें. दुपारीं दोनच्या सुमारास हळूहळू गाडी सपाट प्रदेशांत येऊं लागली. थोड्यावेळानेंच इटलीची हद्द सुरू झाली आमच्या डब्यांत आतां पर्यंत विशेष गर्दी नव्हती लोकांची वागण्याची पद्धत फार विनयशील होती. संध्याकाळ होईपर्यंत इटालियन उतारूंची चांगलीच गर्दी झाली बसायला जेमतेम जागा मिळायची. त्यांची मोठमोठ्यानें बोलण्याची पद्धत, डब्याच्या खिडकींतून सामान टाकयाची रीत व सहउतारूंना आपल्या बरोबरचे खायला आग्रहानें देण्याचें पाहून मला अगदीं आपण हिंदुस्थानांतून जात आहोंत असें वाटलें.त्यांतल्या त्यांत बरेच इटालियन आपल्या सारखे दिसतात कारण दक्षिण इटालित अरब लोकांनी चारशेंवर्षे वसाहत केली होती, त्यामुळें त्यांची प्रजा संमिश्रणाची असल्यामुळें कांहीं लोक आपल्या हिंदुस्थानांतील लोकांसारखे दिसतात.

रात्री १० वाजतां मिलानोचें स्टेशन आलें. असंख्य टयूब लाइटस्‌नें प्रकाशित केल्यानें हे स्टेशन झगझगाटांत चांगलें मोठे दिसत होतें. येथून वेनीसला जाता येते. मला वेनीसला जाण्याची फार इच्छा होती परतु मला रोमला फक्त एकच दिवस राहून दुसऱ्या दिवशीं मुंबईचें विमान गांठायचें होते त्यामुळें गत्यंतर नव्हतें. रात्रीं १२ वाजतां गाडी रोमच्या स्टेशनवरती आली. स्टेशनच्या प्लॅटफार्मबाहेर येतो न येतो तोंच एक चांगलें कपडे घातलेले गृहस्थ भेटलें व माझ्याशीं इंग्रजीत बोलून मला कुठें जायचें आहे वगैरे चौकशी करुन मला स्टेशनपासून जवळच असलेल्या विशेष महाग न पडेल अशा हॉटेलकडे घेऊन जाण्यास हमालाला सांगितलें. मी त्यांच्याबद्दल चौकशी करतां ते म्हणाले किं, ते एक पत्र व्यवसायी होते व मला परदेशी समजून त्यांनी माझ्याबद्दल चौकशीं केली होती त्यांचे मी आभार मानून स्टेशनच्या बाहेर पडलों. हमालाला विचारलें किं टॅक्सी करायची किं काय ? पण ते हॉटेल जवळच आहे असें म्हणून एका हिन्दी मजूरासारखाच माझ्या बॅगला खांद्यावर ठेवून चालूं लागला. अंदाजे दोन फर्लांग चालल्यावर हॉटेल आलें खोलीवर सामान ठेवायला सांगून २०० लिरा द्या असें सांगता मी जरा चपापलो व मला हा फसवत तर नाहींना अशी शंका आली कारण इटालींत फसवेगिरीचे

प्रकार फार होतात असें माझ्या ऐकण्यांत होते. मी माझी शंका हॉटेल मालकाला सांगितली तेव्हां तो दर योग्य आहे असें त्यांनी सांगितलें. २०० लिसला एक सिगारेटचें पाकिट सुद्धां येत नाहीं असेहि सांगितलें. मी माझ्या मनांत हिशोब केला तर १। रु. झाला. मग मी त्याची हमाली देऊन टाकली. खोलीचें भाडें विचारतां रोजचें ८००० लिस ऐकून मी परत आश्चर्यचकित झालो. परंतु त्यानें सांगितलें किं येथील म्युनिसीपालटीनें हॉटलचें वर्ग केले आहे. श्रेष्ठ, मध्यम व कनिष्ठ असें आहेत व त्यांचे आकार कोष्टकाप्रमाणें आहेत. तुमच्या खोलींत सुद्धां तुमचें भाडे कोष्टकांत सांपडेल. त्यानें मला असें सांगितल्यावर मी माझ्या खोलींत येऊन पाहिलें तों खरेंच माझ्या खोलीचें भाडे म्युनिसीपालटीचें सील असलेल्या कोष्टकांत सांपडलें.

बरींच रात्र झालीं असल्यामुळें मी झोंपून गेलों. दुसऱ्या दिवशीं निघणाऱ्या विमानांत माझ्या जागेची चौकशी करण्यासाठीं मी माझें नित्यक्रम आटोपून हॉटेलच्या बाहेर पडलों व 'बी. ओ. ए. सी.' च्या विमान कंपनीच्या ऑफिसमधें आलो. विमान कंपनीची कचेरी रोमच्या एका मोठ्या हॉटेलमधें होती. चौकशी करितां विमानाच्या उतारूंची यादी अजून आली नव्हती परंतु थोड्या वेळाने येणार होती व परत चौकशी करायला त्यांनीं मला सांगितलें. माझा मुख्य प्रश्न म्हणजे माझ्या जवळचें जास्तीचें सामान पोष्टानें पाठवून देण्याचा होता. मी जवळच्या पोष्टांत चौकशी केली तर तेथें फक्त २ पौंड पर्यंतचींच पार्सलें घेतात व जास्ती वजनाचें पार्सल असेल तर रोमच्या सेंट्रल ऑफिसमधें जायला पाहिजे असें त्यांनी सांगितलें. ह्या माणसाला कांहींतरी इंग्रजी येत होतें नाहींतर बहुतेक इटालियन लोकांना इंग्रजी मुळींच येत नाहीं. मी त्यानें सांगितलेल्या पत्त्यावर बसनें गेलो. पोष्टांत पुष्कळ हातवारें करून मला हिंदुस्थानांत पार्सल पाठवयाचें आहे ते सांगून व त्यानेंसुद्धां रोमन आंकडे काढुन किती दर लागेल हें सांगितलें. मी घाईघाईने हॉटेलवर आलो व माझी हिन्दुस्थानांत पाठवायची सूटकेस खोलीवरून आणून हॉटेल व्यवस्थापकांकडून गुंडाळून हिन्दुस्थानचा पत्ता घालण्यास सांगितलें. नंतर मी तेथील उपहारगृहांत जेवायला गेलो. त्या दिवशीं दिवाळीचा दिवस होता हे मला ठाऊक होतें. मी इटालियन पद्धतिनें केलेला पुलावा वगैरे जेवण व इटालियन जेवणाचें वैशिष्ट्य असलेला स्पघेटीचा प्रकारहि मागविला. स्पघेटीचें लांबच लांब धागे व्यवस्थित रीतीनें मला तोंडाच्या चंबूत काट्याचमच्यानें ठेवतां येत नव्हतें व शेजाऱ्या टेबलावर बसलेली एक इटालियन जोडप्यांतील तरुण स्त्री खो खो हंसत होती. माझ्या स्पघेटीशीं चाललेल्या युद्धालाच ती हंसत असेल अशी मला दाट शंका आली. व

ह्या युद्धांत माझा पराजय होत होता तरी थोडावेळ मी चालूंच ठेवलें. स्पर्धेतील शह देण्यासाठीं व खाण्याची पद्धत शिकण्यासाठीं माझ्या आजूबाजूस कोणीच तो पदार्थ खात नसल्यामुळें मला शिकतां येणें शक्य नव्हतें, त्यामुळें मी तो पदार्थ तसाच ठेवून परिचारकला तो नेण्यास सांगिला. नाहींतरी तो पदार्थ नुसतां पिठूळ पिठूळ लागत होता व विशेष आवडलाहि नाहीं. जेवणांत मला जर कांहीं आवडलें असेल तर जेवणानंतरची फळें. भरपूर मोठमोठी द्राक्षें व इतर लागतील तेवढीं फळें देतात. जेवण संपवून मी आलों व माझी हिंदुस्थानांत पाठविण्याची सूटकेस घेऊन बाहेर पडलों व पोष्ट ऑफीसची बस गांठली. पोष्ट ऑफीसांत येऊन पाहातों तों सर्वत्र शुकशुकाट. विचारपूस केल्यावर कळलें किं, आज पोस्टाला अर्ध्या दिवसाची सुट्टी होती. त्यामुळें सूटकेस संबंधी काय करावें ते कळेना. शेवटीं नक्की केलें किं सामान नेणाऱ्या विमानानें पाठवून द्यावी. विमानाच्या प्रवाश्याना तिकिटाबरोबर दिल्या जाणाऱ्या बिनदराच्या सामानाशिवाय, जास्तीचे नित्योपयोगी लागणारें सामान ‡ दरांत सामानाची वाहतूक करणाऱ्या [फ्रायट्रर] विमानानें पाठवितां येते. मी ह्या सवलतीचा फायदा घेण्याचें ठरविलें. म्हणून जवळच असलेल्या माल–विमानाच्या कचेरींत गेलों व माझें तिकिट दाखवून सुटकेस त्यांच्या हवालीं केली. मालवाहु विमान आमच्या विमानाच्या दुसऱ्या दिवशींच सुटणार आहे असें मला तेथील कारकुनानें सांगितलें. विमानानें सुटकेस पाठविण्यासाठीं ५ पौंड लागलें. पोस्टानें पार्सल पाठवितां आलें असतें तर १ पौंडात काम झालें असतें. सुटकेस पाठविण्याचें काम झाले असल्यामुळें मला बरेंच हायसें वाटत होतें. हे सगळें करतां दुपारचें ४ वाजलें होते. मी आतां रोम जितकें पहातां येईल तेवढे पाहाण्याचें ठरविलें. जवळच्याच प्रवाश्यांच्या विमानाच्या कचेरींत माझ्या जागेबद्दल चौकशी केली. त्यांनी माझें नांव यादींत असल्याचें सांगितलें. विमानतळावर प्रवाश्यांना घेऊन जाणारी बस पहाटेस ४ वाजतां निघत असल्याचें सांगितलें व त्यापूर्वींच विमानतळाच्या कचेरीवर येण्यास सांगितलें.

मी विमान कंपनीच्या कचेरींतून बाहेर पडलों व समोरच असलेल्या रोम दाखविणाऱ्या टुरीस्ट कचेरींत गेलो व मला रोम दाखविणारी बस केव्हां मिळेल असें विचारलें तेव्हां त्यांनीं आज संबंध रोम शहराला अर्ध्या दिवसाची सुट्टी आहे असें सांगितलें व आज तुम्हांला ती बस मिळणार नाहीं असेंहि सांगितलें मी त्यांना कारण विचारतां ते म्हणाले किं "आज आमचे पोपसाहेब, वटीकन शहरांत असलेल्या मंदिरांत मृत आत्म्यांना बोलवतात व त्यांच्या आत्म्यास शांति मिळो" अशी प्रार्थना करतात. मी विचारलें किं, इटालींत

मेलेल्या मृतात्म्यांना बोलवतात का ! " नाहीं ! नाहीं ! सबंध जगांत मेलेल्या मृतात्म्यांना बोलवतात. आमच्या पितरांना व तुमच्या पितरांना सुद्धां " दिवाळीच्या अमावस्येला रोमचे लोक पितृपक्षीं अमावास्या करतात असा मी तर्क केला. पोप साहेबांच्या ह्या वार्षिक कार्यक्रमाबद्दल मला चांगलेंच कुतुहल वाटलें. मी शेवटीं साध्या बसनेंच वटीकन शहरांत जायचें ठरविलें व एक बस गांठली

रोमच्या बहुतेक बसेसमध्यें गर्दी असते कंडक्टर प्रवेशद्वाराच्या कोपऱ्यावर बसलेला असतां. तेथें त्याला पैसे द्यायचे व जागा असल्यास बसायचें नाहींतर उभ्या उभ्या प्रवास करायचा. संध्याकाळ झाली होती व पाऊस सुद्धां पडत होता. मला उभेंच रहावें लागलें. टिग्रिस नदी ओलांडून नंतर वटीकन शहराची हद्द सुरू होते. वटीकन शहर हे पोप साहेबांचें रोमन धर्माचें मुख्य स्थळ आहे व इथेंच पोप साहेबांचें निवास-स्थान असून त्यांच्या निवासस्थानाजवळच मोठे थोरलें रोमन कॅथालिकांचें चर्च आहे. बरीच संध्याकाळ झाली होती व पाऊस पडत होता. व तेथें असलेली भंगुरे पाहून शहरांत परत येणाऱ्या बसचा मार्ग धरला. वटीकन शहरांत संबंध सत्ता पोपसाहेबांची असून विशिष्ट गणवेश घातलेला त्यांचा नोकरवर्ग फिरत असतो. कित्येकांजवळ शस्त्रेंसुद्धां असतात. मी परत रोम स्टेशनावर आलों व जे कांहीं भग्न अवशेष बघायला मिळतील ते पहावें ह्या उद्देशानें परत बस गांठली. माझ्या जवळ टुरीस्ट ऑफीसनें दिलेला रोमचा नकाशा होता, व कुठें काय बघण्यासारखें आहे ते सर्व कांहीं स्पष्ट केलेलें होते. जेथें मर्दानी खेळाचें सामने व्हायचे त्या ऑलिम्पसच्या क्रिडांगणाचे आतां भग्न अवशेष राहिलेले दिसले. कित्येक ठिकाणीं तर इतके कमी अवशेष उरलें होते कि, एका ठिकाणीं मी एका जागेला खूप फेऱ्या मारल्यावर ती जागा कुठें आहे असें विचारतां मी त्याच जागेवर उभा आहे फक्त कांहीं अवशेष राहिले नसल्यामुळें ती जागा आतां दिसून येत नाहीं असें सांगण्यांत आलें.

परत फिरतांना कसे जायचे ह्याची चौकशी एका सुशिक्षित इटालियन तरुणाला केली. त्यानें जवळच रोमच्या नवीनच तयार केलेल्या ट्युब रेल्वेचें स्टेशन असल्याचें सांगितलें. मलासुद्धां सेंट्रल स्टेशनला जायचें आहे तुम्हीं सुद्धां माझ्याबरोबर चला असें तो म्हणाला. त्या गृहस्थांना बरेंच चांगलें इंग्रजी बोलतां येत होतें. व ते युनायटेड नेशन्सच्या खाद्य नियंत्रणाच्या कचेरींत काम करीत असून त्यांचे वरिष्ठ अधिकारी एक हिंदुस्थानीच होते. त्यांनी सांगितलेले नांव महाराष्ट्रीयन होते. आम्ही सेंट्रल स्टेशनला आलों व बाहेर पडलो. माझे नवे मित्र मला जवळच्या एका उपहारगृहांत घेऊन गेले व रोमची कॉफी

प्रख्यात आहे असे सांगून कॉफी मागवली. आम्ही बऱ्याच गप्पा मारून नंतर एकमेकांचा निरोप घेतला.

मी दुपारीच जेव्हां हॉटेल सोडलें तेव्हां माझ्या बरोबरची बॅग घेतली होती व विमान कंपनीच्या हवाली केली होती. नंतर हॉटेलची खोली रिकामी केली. मी विचार केला होता कि, दिवसा रोम बघतां न आल्यामुळें रात्री जितके रोम बघतां येईल तितके बघून घ्यावे व जरूर वाटल्यास एखाद्या हॉटेलमध्यें सुद्धां रात्री रहावें. नाहींतर विमान कंपनीच्या कचेरीत वेळ काढावा कारण पहांटे चार वाजतां विमानतळावर जाण्याकरितां बस निघणारच होती. म्हणून थोडेबहुत बाकी राहिलेलें रोम पहाण्यास निघालों. रोममध्यें बरेंच फिरलों व रात्री १२ वाजतां विमान कंपनीच्या कचेरीत आलों. एक दोन प्रवासी आले होते. एक बाई हिंदुस्थानांत बुद्धाच्या २५ व्या वाढदिवसा निमित्त होणाऱ्या समारंभांत भाग घेण्यास चालल्या होत्या. त्या बुद्धसोसायटीच्या इंग्लंडमध्यें प्रमुख होत्या. त्याना हिंदुस्थान सरकारचें आमंत्रण असल्यामुळें त्या मुंबईस चालल्या होत्या. त्या सुद्धां एक बांकावर झोपल्या होत्या. मी सुद्धां एका बांकावर झोंपण्याचा प्रयत्न केला परंतु दोन वाजल्यानंतर प्रवाशांचा कलकलाट सुरू झाल्यामुळें झोंप येणें शक्य नव्हतें. शेवटीं चार वाजले आम्हांला कोच मध्यें बसण्याकरितां उठविण्यांत आलें. मी कोचचें तिकिट घेतलें. थोड्या वेळानेंच कोच रोमच्या विमानतळावर जाण्यास निघाला. रात्रीची वेळ होती. सबंध रोम झोंपलें होतें. हळूं हळूं आम्हीं रोमच्या जुन्या भागांतून जाऊं लागलो. अधून मधून भग्न अवशेष दिसत होते. रोम शहरापासून विमानतळ २० मैल दूर असेल. रोम शहर हळूं हळूं संपलें. आमचा कोच आतां शेतांतून जाणाऱ्या रस्त्यावरून चालला होता. शेवटीं विमानतळ आलें. आम्हीं कोचमधून उतरलों. आमच्या विमानाला सुटण्यास आणखी थोडा अवकाश होता. म्हणून मी विमानतळावर तेवढ्यांत सकाळचे कार्यक्रम आटोपून घेतलें. थोड्या वेळानें सांगण्यात आलें किं, विमानाच्या नादुरुस्तिमुळें विमान ठरलेल्या वेळापेक्षां उशिरा निघेल. हळूं हळूं सकाळ झाली. आमची सकाळची न्याहरी विमान कंपनीला देणें भागच पडलें. विमानतळावर कांहीं हिंदी विद्यार्थी जर्मनी वगैरे ठिकाणहून आले होते. इंग्लंड व इजिप्तच्या युद्धामुळें जागतिक युद्ध होईल अशा भीतीनें कित्येक विद्यार्थी आपला अभ्यास टाकून परत हिंदुस्थानांत जायला निघाले होते आगबोटी सुवेझ मार्गानें जात नव्हत्या व कांहीं विमान कंपनीनें आपल्या फेऱ्या बंद केल्या होत्या. त्यामुळें विमानानें जाणाऱ्यांची संख्या फारच वाढली होती व आधीपासून तिकिट काढून ठेवलेल्या लोकांनाच जायला मिळायचे. रोमच्या विमानतळावर कित्येक

दिवसांपासून हिन्दी विद्यार्थी येऊन बसले होतें. त्यांनीं ओपन तिकिट काढून ठेवलें होतें. जर कोणी जाण्याचें रद्द करील तर त्या ऐवजी ह्या ओपन तिकिट असलेल्या लोकांना जायला मिळायचें कोणीहि जाण्याचें रद्द करित नसल्यामुळें ही मंडळीं येथें बऱ्याच दिवसांपासून अडकून पडली होती व थोडीबहुत विनाकारण खर्च होत असल्यामुळ संकटांत सांपडली होती. आमचें विमान सकाळीं ७ च्या सुमारांस दुरुस्त झालें होतें आम्हांला विमानांत बसायची सूचना मिळतांच आम्ही आनंदानें विमानाकडे जाण्यास निघालों. माझ्या मनांत कित्येक निरनिराळें विचार डोकावून जात होतें. माझा प्रवास यशस्वी झाला होता. ह्या सहा महिन्यांत जीवनांतील माझी अमेरिकेस जाण्याची महत्वकांक्षा सिध्दीस गेली होती. आणि मी खूप हिंडून बरेंच पाहिलें होतें. मला कोळशाच्या मोठमोठ्या खाणी बघायच्या होत्या त्या मी बघितल्या. हे सर्व मी माझ्या हिंमतीवर कोणाची कांहींही मदत न घेतां केले होते. त्यामुळें माझ्या मनाला एक प्रकारचा निराळाच आनंद वाटत होता.त्याबरोबरच माझ्या बायकामुलांना त्रास झाला नसेल ना ? असे विचार मनांत येत होते कारण माझ्यासाठीं त्यांनीं एकटे रहाण्याचें कबूल केलें होतें. ह्या त्यांच्या स्वार्थत्यागामुळेंच माझें जाणें शक्य झालें होतें असा विचार माझ्या मनांत येत होता व पाय विमानाकडे वळत होते. विमानावर सुंदर ऊन पडले होतें त्यामुळें मला फोटो घेण्याची इच्छा झालीं परंतु विमानाचा फोटो काढण्याची परवानगी नसेल अशी माझी समजूत होती त्यामुळें मी विमान अधिकाऱ्याला विचारलें तों त्यानें सांगितलें किं “ जरूर चालेल परंतु आतां आपल्याला निघायला वेळ झाला आहे तरी नंतर कोणत्यातरी विमानतळावर तुम्हीं फोटो काढा. आपण आता लवकरच निघूं ” असें त्यांनीं सांगितलें. आतां मला मुंबईला जाण्याची घाई झालीं होती म्हणून मी जास्त कांहीं न बोलतां विमानाच्या पायऱ्या चढलो व माझ्या जागेवर जाऊन बसलों. थोड्यावेळांनेच आमच्या विमानानें उड्डाण केलें व खालीं पसरलेल्या रोम शहराचा निरोप घेतला. आम्हीं पुढचा मार्ग आक्रमकू लागलों.

प्रकरण ७ वें

# मायभूमिकडे

आमचें विमान टुरीस्ट वर्गाचें असून एका रांगेत ३ खुर्च्या होत्या. मी येतांना आलों त्या एअर इंडियाच्या विमानांत एका रांगेत २ खुर्च्या होत्या त्यामुळें बसायला जागा जास्त आरामशीर होती. एकंदरीत एअर इंडियाची सर्व व्यवस्था जास्त चांगली वाटली. विमानांत देण्यांत येणारें जेवणसुद्धां एअर इंडियाचेच बरें वाटलें. वाटेंत एक दोनवेळां विमान हवेच्या दाबाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत गेले असल्यामुळें चांगलेंच जोरानें एकदम खालीं यायचें. आंत बसलेली माणसें खुर्चीतून थोडीबहुत फेंकली जायची व खुर्चीवरचा सुरक्षिततेचा पट्टा घालावा लागायचा. दुपारीं २ ला इस्तंबुल आलें तेथें एक तास थांबून आम्हीं परत आकाशाचा मार्ग धरला. बी. ओ. ए. सी. चा हा विमानमार्ग खरे पहातां कैरोवरूनच होता परन्तु इजिप्त इंग्लंडचें युद्ध सुरू झाल्यामुळें विमान कंपनीनें तो मार्ग सोडून दिला होता. संध्याकाळीं ७ ला बगदाद आलें व रात्रीं १० च्या सुमारास बसरा आलें. बगदादवरून जांताना तेथील स्टेशनवरचें हिरवे दिवे खूपच सुंदर दिसत होतें. आतां आम्हीं अगदी अरब प्रदेशांतून जात होतों व इजिप्त मधें चाललेल्या गडबडीची चांगलीच कुणकुण कानांवर येत होती. बसराच्या विमानतळाच्या उपहारगृहांतलें कांहीं वाढपी हिंदुस्थानींच होतें. त्यांनी आम्हांला चाललेल्या गडबडीची चांगलीच माहिती दिली. इंग्लंडनें इजिप्तवर केलेल्या आक्रमणामुळें अरब देश इंग्लंडवर चांगलाच चवताळला होता. ईराक, इराण इ. देशांत जरी इंग्लंडचें चांगलेंच वर्चस्व होते व तेथील सत्ता जरी इंग्लंडच्या सत्तेच्या आधीन गेली होती तरी लोकांना इंग्लंडचे इजिप्तवरचें आक्रमण मुळींच आवडलें नव्हतें. बहुतेक लोक खूपच बिथरले होते व त्यांनीं इंग्लंडच्या नागारिकांची मालमत्ता लुटून खूप जाळपोळ केली होती. बसराच्या विमानतळाच्या बाहेरच किती तरी जाळपोळ झाली होती. हे विमानतळ मोठ्या मुष्किलीनें सशस्त्र सैनिकांच्या जोरावर टिकून राहिलें होते. ब्रिटीश कंपनीच्या विमानांना अजून उतरतां येत होते. आमच्या बरोबरचें ब्रिटीश प्रवासी अगदीं चोरट्यासारखेंच विमानतळाच्या रेस्टॉरंटमधें बसलें होते व त्यांच्या तोंडावरची अस्वस्थता अगदीं स्पष्टपणें दिसत होती. उपहारगृहांत कांहीं अरब लोक पण होतें. व तेथें आलेला कृत्रिमपणा सगळ्यांच्या लक्षांत येत होता. विमानतळावरचे अरब परिचारक हिंदुस्थानी लोकांसारखेंच दिसत असल्यामुळें आता

हिंदुस्थानजवळ आलें ह्याची जाणीव होत होती. त्या सर्वांना " असल्लाम वा लेकुम " करून आम्हीं कराचीचा टप्पा गांठला.

पहांटे ५ ला कराची आलें. एकावेळेस आमच्याच हाडामासांचे असलेल्या परन्तु राजकारणामुळें दुरावलेल्या त्या माणसांबद्दल एकप्रकारचें ममत्व वाटल्याशिवाय रहात नाहीं. व्हरांड्यावर झाडू देणाऱ्या घाणेरड्या पायजम्यांत फिरणारा अब्दुल, बुटाला पॉलिश करणारा रहेमान, अगदीं मायभूमिचीच लकरें वाटत होती. पुष्कळ दिवसांनी भेटलेल्या आप्तेष्टांना जसें बघून आनंद होतो अगदीं तसेंच त्यांना बघून वाटतें. मग उपहार–गृहांतला खमंग आम्लेट करणारा रफीक महमंद व मोठ्या आदबीनें वावरणाऱ्या रफीक बद्दल तर विचारायलाच नको. मंहमंदला फक्त महमंदभाई असे म्हणून आस्थेनें चौकशी करतां त्यानें दुसरें आम्लेट माझ्यापुढें सादर केलें. किती अगदीं देवमाणसें ! त्यांनी सर्वांनीं त्यांची आर्थिक स्थिती वाईट असून हिंदुस्थानपेक्षां त्यांचीं इथें अबळ चाललीं आहे असें सांगितलें.परंतु इतके सर्व असून सुद्धां त्यांची जिन्हा साहेबांवर चांगलीच आस्था दाखवत होती. इथें इजिप्त पक्षातर्फे इंग्लंडविरुद्ध मिरवणुका निघाल्या होत्या व पोलिसांना गोळीबार करावा लागला होता इत्यादि गोष्टी कळल्या. इथें आमच्याबरोबर एक सोळासतरा वर्षांचा अमेरिकन मुलगा मुंबईस शिकायला चालला होता. त्याच्याशी बोलणें झालें तेव्हां हा मुंबईस शिकण्यास जात आहे ऐकून मला आश्चर्य वाटलें. हा न्यू ईरा हायस्कूलमधें शिकत होता व त्याचें वडील मुंबईस स्टॅनव्हॅक कंपनींत काम करीत असतांना त्यानें न्यु ईरा हायस्कूलमधें शिकण्यास सुरुवात केली होती. आतां त्याच्या वडीलांची बदली न्यूयॉर्कला झाली होती परंतु ह्या मुलाला ही शाळा इतकी आवडली होती किं तो न्यूयॉर्कला शाळेच्या व्हेकेशनमधेंच आईवडीलांना भेटण्यास जात होता. व शाळा उघडणार म्हणून तो परत मुंबईस चालला होता. मी त्याला विचारलें किं तुमच्या अमेरिकेंत तर इतक्या चांगल्या चांगल्या शाळा आहेत मग तूं हिंदुस्थानांत कां शिकतोस ? व आमच्याकडील मुलें तर तुमच्या देशांत मुद्दाम शिकायला जातात. तो मला म्हणाला किं ते कांहीं असले तरी मला इथलें शिक्षण अमेरिकेच्या कोणत्याहि शाळेपेक्षां फार चांगलें वाटतें. मी इथून न्यूयॉर्कला गेलो व अमेरिकेच्या शाळेंत नांव दाखल केले तेव्हां माझें इथलें शिक्षण इतकें चांगलें होते किं मी वर्गांत पहिला आलों परंतु मला तेथें करमेना. शिवाय हिंदुस्थानांतील माझे सहाध्यायी व मास्तर फार प्रेमळ आहेत व मला ती शाळा फार आवडते म्हणून परत

मुंबईस शिक्षणास गेलो. हे त्याचें बोलणें ऐकून मला फार आनंद वाटला. मला वाटलें आतां गंगा उलटी वाहूं लागणार किं काय ? आमची माणसें ज्ञान पिपासाच्या तृप्ती-करिता पाश्चात्य देशांत न जातां तेथील माणसें आमच्याकडे कधी येतील ? कधी आमच्या वाराणसी, नालंदा व तक्षशीला सारखीं ज्ञानपीठें परत सुरू होतील जगाच्या ज्ञान मुमुक्षांना फक्त धर्म व तत्वज्ञानाचीच दिशा न दाखवून अणुच्छेदन व भौतिक ज्ञानाच्या खोल खोल विहिरीचें अतिशीतल व मधुर पाण्याचें झरे वहातें करतील ? आमच्यांत काय नाहीं ! एका अत्यंत्य गौरवशाली संस्काराचें वारसदार आज कांहीं वर्षे परकीय राज्यतंत्रामुळें भौतिक दृष्ट्या पाठीमागें राहिले पण आतां आम्ही निश्चय केला असल्यामुळें आम्हांला उठायला किती वेळ लागणार ! आमच्यांत बुद्धिची चमक आहे. निसर्गाचीसुद्धां देणगी आहे. आम्हांला आतां उठलेंच पाहिजे.

एका तासानें आमच्या विमानानें मुंबईकडे प्रयाण केलें. खालच्या अरबी समुद्राच्या लाटासारख्या माझ्या हृदयांत व मस्तकांतसुद्धां अनेक लाटा चालल्या होत्या.इतक्यांत मला आठवलें किं,मी माझ्याजवळ कांहीं लिसचे नाणें पडलें आहे.व परक्या देशांचे नाण कोणत्याहि देशांत चालत नाहीं त्यामुळें ह्या नाण्याची विल्हेवाट लाविण्याचें ठरविलें व हवाई अतिथ्याच्या बाईला [ एअर हॉस्टेस ] ते नाणे देऊन एक बिअरचा प्याला आणण्यास सांगितलें तिनें ते मोजून पाहिले व बिअरच्या प्यालाकरिता १२ लिस कमी पडतात असे सांगून मला ते परत केले माझ्याजवळच बसलेल्या इंडोनेशियांत व्यापार करणाऱ्या हिन्दी व्यापाऱ्यांच्या कानांवर हे शब्द पडतांच त्यांनी मी बिअर मागवतों घाबरुं नका असे सांगितलें. मी त्यांना समजावून सांगितलें किं मला बिअर मुळींच प्यायची नव्हती मला फक्त हे लिसच्या नाण्यांना निरोप द्यायचा होता व म्हणून मी बिअर मागवली होती परंतु त्यांनीं माझे म्हणणें ऐकुन घेतलें नाहीं व माझ्या हातांत बिअरच्या बाटल्या आल्याच हे गृहस्थ मुळचें हिन्दुस्थानचे असून आतां इंडोनेशियांत व्यापार करीत असून तेथेंच स्थाईक झाले होते. आमच्या गोष्टी खूप रंगल्या व गोष्टीच्या भरांत मी ह्या गृहस्थांना खूप विरोध केला असूनही त्यांनी परत प्रत्यकीं २ बाटल्या मागवल्या. मला कांहीं केल्या शेवटचा ग्लास खपत नव्हता व माझें डोकेसुद्धां चांगलेंच भणभणायला लागलें. इतक्यांत हवाई अति-थ्याच्या बाईनें वर सांगितलें कि आतां आपण अर्ध्या तासांत मुंबईला पोंहचूं. आता मुंबईची हद्द लागत आहे व मुंबईला दारूबंदीचा कायदा असल्यामुळें सर्वांनीं पेले रिकामे

करावें. माझ्या मित्रानें त्याच्या हातानें माझ्या तोंडात पेला रिकामा केला-व म्हणाला कीं आतां तूंला मुंबईला प्यायला मिळणार नाहीं.

प्रकरण ८ वें

# मुंबईस

थोड्या वेळांतच आमचें विमान सान्ताक्रुझ विमानतळावर येऊन उभें राहिलें. मला अगदीं चक्कर येत होती व स्थिरपणें खालीं कसें उतरावें हा विचार पडला परन्तु उतरल्याशिवाय तर गत्यंतरच नव्हतें. मी अगदीं पुढल्या रांगेत बसलों होतो म्हणून सर्वांत शेवटी उतरलों. शरिराचा तोल कसातरी सांभाळत उतरलों. नंतर उतारूंच्या (इनक्लोझर) घरट्याकडे चालूं लागलों. माझे आप्तजन आलेच होते त्यांना हात हालवून जकात कचेरीच्या अंमलदारांचा सामना करण्याच्या विवंचनेंत पडलों. मी ऐकले होतें कीं मुंबईच्या जकात कचेरीत उतारूंना चांगलाच त्रास होतो. मला आतांपर्यंत ह्या वर्गाकडून कुठेंच त्रास झाला नव्हता. आतां इथें काय होतें ते पहायचें होते. मी बरोबरच्या सामानाचें पत्र (डिक्लेरेशन फार्म) भरलें व दिलें. माझ्या बरोबर कांहीं लोकांनी लंडनहून त्यांच्या स्वजनांना देण्याकरितां कांहीं वस्तु दिल्या होत्या. जकात अधिकाऱ्यांनी मला

सामानाची यादी लिहिण्यांत मदत केली. मला कोणत्याहि सामानावर जकात पडली नाहीं. मी सामान उघडण्याकरितां बॅग उघडूं लागलों तर " आम्हांला तुमच्या म्हणण्यावर विश्वास वाटतो व बॅग उघडायची कांहीं जरुरी नाहीं. " असें त्यांनी मला सांगितलें. किती सज्जन लोक ! मी सामान हमालाजवळ दिलें व बाहेर पडलो. युरोप अमेरिकेच्या हमालांपेक्षां आमचें हमाल किती कृश ! माझें आप्तजन मला भेटण्यास बाहेरच उभे होते. त्यांना पाहून मला आनंदानें गहिंवरून आलें. मी बाहेर पडणारा शेवटचा उतारूं होतों. माझ्यासाठीं शहरांतील विमान कंपनीच्या कचेरीकडे जाणारा कोच माझी वाट पहात होता. मी टॅक्सिनें जाणार आहे असें सांगून कोच रवाना केला. आम्हीं सर्व घरीं आलों.

भाऊबिजेचा दिवस होता. मला हिंदी जेवण पुष्कळ दिवसांनीं मिळालें होतें. तसें नाहीं म्हणायला लंडनमधें भारतीय नौका शाखेचें कॅप्टन श्रीखंडे व वॉशिंग्टनमधें हिंद-सरकारचें माहिती अधिकारी श्री. शहाणे ह्यांच्याकडे हिंदी जेवण जेवलों होतो. माझ्यावर निरनिराळ्या प्रश्नांचा भडिमार चालूंच होता माझ्या डोळ्यापुढें परत लंडन, न्युयॉर्क, पिटसबर्ग आलें. मी आणलेल्या टेपरेकॉर्डवर सगळ्यांची बोलणीं व ऐकणीं झाली. रोमच्या रात्रीच्या जागरणानें व विमानांतल्या जागरणानें माझें डोळें मिटत होते. त्यांत-त्यांत्यांत विमानांत घेतलेल्या बिअरनें माझें डोकें अजून फिरतच होतें. मला थोड्य वेळांतच गाढ झोंप लागलीं व एक सुंदर स्वप्न पडलें.

मी एका खोल खोल विहिरीतून वर येत होतों. बहुतकरून हिरे खोदण्याकरितांच खोदलेली विहिर असावी, कारण ही खूपच खोल होती. दहा हजार फुटांपेक्षां कमी खोल नसेल. माझ्या कानावर सुंदर संस्कृत लोकाचें शब्द खणखणींत आवाजांत ऐकूं येत होते. " सर्वांत प्रथम आकाश नंतर सूर्य त्यांतून पृथ्वी " वगैरे किती शास्त्रीय व खरें ! ऋग्वेद यजुर्वेद, अथर्ववेद, व सामवेदाचें शब्द ऐकावयास मिळाल्यामुळें पार्थिवतेचें भाव विसरून खरा स्वर्गीय आनंद वाटला. आजूबाजूला सुंदर व शांतनिल प्रकाशाची ज्यात पेटत होती. पृथ्वीच्या गाभाऱ्यांतल्या हिऱ्याचेच ते प्रकाश वलय असावेत. मी हळूं हळूं वर येत होतों. वाल्मिकी ऋषी स्नानसंध्या आटोपून वेदव्यासांकडून सुंदर गोड आवाजांत रामायण लिहित होते. त्यांच्या लिखाणांतून तयार होत असलेली राम, लक्ष्मण, सीता यांची पात्रें अगदीं रक्त, हाड, मांस धारण करून त्यांतून जीवंत स्वरुप घेऊन बाहेर पडत होती व त्यांना असंख्य भाविक लोक पाया पडत होते. हळूं हळूं महाभारतांतील युधिष्ठिर, द्रौपदी व

श्रीकृष्णाची सुवर्ण द्वारका सुद्धां दिसूं लागली मी पुढें सरकला ज तो तों काय चमत्कार ! कालिदास महाराज ताडपत्रांवर मेघदूत लिहित होत. व त्यांतील यक्षाच्या विनवणींवरून जाणाऱ्या मेघाची गती सुपर कॉन्स्टेलेशन विमानापेक्षां जास्त वाढली. मी अगदीं आदरा. कालिदासांना प्रमाण करून पुढें सरसावलों तर समोरच भवभूति दिसले. माझें मस्तक अजून खालीं वांकलेलेंच होतें. आणखी पुढें पाणिनी, भास्कराचार्य व त्यांची कन्या लिलावती कांहींतरी खगोल शास्त्राच्या गणितांतला प्रश्न सोडवण्यांत अगदीं तल्लिन झालेलीं दिसलीं. पुढें जातों तर चरक औषधांच्या खलबत्त्यांत कांहीं तरी वनस्पती गोळा करून एका रोग्याला देणाच्या गडबडींत होतें. सुश्रुत त्यांच्या जवळच उभे होते व रोग्याचा आजार शस्त्रक्रियेनेच बरा होण्यासारखा आहे असें त्यांना समजावून सांगत होते. त्यांच्या हातांत चकचकणारी शस्त्रें होती. आणखी पुढें भगवान बुध्द डोळे मिटून अगदीं शांत स्वरूप धारण केलेलें दिसत होते. त्यांच्याकडे बघून मनांतलें निरनिराळें विकार नाश पावून शांतिसुखाचा आनंद मिळत होता. आणखी पुढ महावीर स्वामी अहिंसेचें तत्व शिकवित होते. मी पुढें चाललोंच होतो; परंतु आतां तो निळा प्रकाश कमी कमी होत चालला होता व चांगलाच काळोख वाटूं लागला होता. हिंयांच्या पासून मी दूर दूर चाललों होतों म्हणून कीं काय त्या अंध प्रकाशांत हळुं हळुं मोंगल सम्राट व त्याच्याशी झगडणारें राजे शिवाजी दिसूं लागलें, परंतु आतां काळोख वाढतच चालला होता. क्लाईव्ह वगैरे ब्रिटिश मुत्सद्दी दिसूं लागलें मला हें सर्व कांहीं चमत्कारिक वाटूं लागलें. जीव अगदीं गुदमरूं लागला. हा इतका काळोख कां ? मी उडी मारून खालीं जाणार इतक्यांत माझा हात कोणी तरी हलविल्यासारखें वाटलें. आणि बघतों तों काय बापूजीच समोर उभे होतो. म्हणत होते “ बघ तर खरं पुढें प्रकाशच प्रकाश आहे. जा पुढें ” असे म्हणून त्यांच्या नेहमीच्या हस्ताने मला मंत्रमुग्ध केलें. मी पुढें वळून बघतों तर विमानांतला अमेरिकन मुलगा माझ्यासमोरच होता. तो अगदीं आनंदानें हंसत होता. मला आश्चर्यच वाटलें. “ तूं कुठें होतास ? ”, “ मी तुमच्या पाठीमागेंच होतो. किती मोठा आहे तुमचा देश ! मग मी मुंबईला शिकायला आलों तर तुम्हांला आश्चर्य वाटायचें कारण काय ! ” मला त्याचे बोलणें पटलें पण आतां मला खरोखरीच कोणी गदगदां हालवीत होते. मी समोर बघतों तर माझी पत्नी मला गदगदां हलवित होती व एकसारखी म्हणत होती तुम्हांला व्हि. टी. ला धनबादचे बर्थ रिझर्व करण्याकरितां जायचें आहे ना ?

मी नेहमीच्या संवयीप्रमाणें थोडा चिडलोंच. मला स्वप्नांत आमच्या बराकुर व दामोदर वर कोळशाची व इतर जिनसांची असंख्य गलबतें चाललेली पहावयाची होती.

व त्यांच्या दोन्हीं बाजूला असंख्य पिटसबर्ग वसलेलीं बघायचीं होतीं. मी जरा घाबरलोंच, परंतु बापूजींचे वाक्य माझ्या कानांत घुमत होते. " तूं असा घाबरतोस काय पुढें प्रकाशच प्रकाश आहे." तेव्हां मला थोडें बरें वाटलें.

मला आतां सत्यसृष्टींत माझें अपुरें राहिलेलें स्वप्न खरेंच कां पहायला मिळेल ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 25892 दि: 15.5.127
क्रमांक 548 बौ. दि:

REFBK-0020412
REFBK-0020412